# महाराणा-प्रताप.

५१३५
म. ग्रं. सं. ठाणे
विभाग — चरित्र
ग्रं. नं. ९४



REFBK-0005269
मराठी ग्रंथ संग्रहालय

वासुदेव शिवराम कोल्हटकर

चैतन्य ग्रंथ माला

पुष्प १ लें

# महाराणा-प्रताप

REFBK-0005269

त्याचे पूर्वज

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.
ठाणे
ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ५२६०
शाखा (स्थळ प्रत)

लेखक—

वासुदेव शिवराम कोल्हटकर

आवृत्ति पहिली

विजयादशमी शके १८५७ } किंमत १। रुपया { ७ आक्टोबर सन १९३५

प्रकाशक
वासुदेव शिवराम कोल्हटकर
चैतन्य कचेरी
९५९ सदाशिव पेठ, पुणें २.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

मुद्रक
वासुदेव शिवराम कोल्हटकर
चैतन्य मुद्रणालय
९५९ सदाशिव पेठ, पुणें २.

॥ श्री ॥

# तीर्थस्वरूप कै० काका-( नानासाहेब )

तुम्ही मला माझ्या अकराव्या वर्षी केवळ एका दूरच्या नात्याच्या धाग्यानें आश्रय दिला आणि त्या असहाय स्थितींत माझें चार वर्षें पुत्रवत् परिपालन केलें ! त्या कालांत मला आपणाकडे जे स्वदेशीचे आणि स्वाभिमानाचे धडे मिळाले ते अमोल आहेत असें मी समजतों. आपल्या प्रेमळ आणि स्फूर्तिदायक सहवासाची मला अद्यापि स्मृति होते व त्या काळाचें स्मरण होऊन, हृदय भरून येतें ! काका, कृतज्ञताबुद्धीनें मी ही अल्पशी सेवा तुमच्या चरणी अर्पण करीत आहें.

तुमचा

**वासुदेव**

# तीर्थस्वरूप नानासाहेब सोमण
## — यांचा —
# अल्प परिचय.

नानासाहेबांचे मूळ पुरुष जगन्नाथ रामचंद्र हे मु|| मुरूड ता. दापोली जि० रत्नागिरी एथील मूळचे रहाणारे. हे एक कर्मठ ब्राह्मण असून उतार वयांत त्यांनीं सन्यास घेऊन मोठ्या आनंदानें चतुर्थाश्रमाचें परिपालन करीत आपली इहलोकींची यात्रा संपविली होती.

त्यांचे चिरंजीव वामन जगन्नाथ हे पुढें कोंकण सोडून मु|| पुणें एथें श्रीमंत बाळासाहेब नातू यांच्या पदरीं खाजगी कारकून म्हणून राहिले होते. पुढें श्रीमंतांचा काळ फिरून ते ब्रह्मावर्तास जाऊन राहिले तेव्हां कै०वामन तात्या हे श्री. मोरेश्वरक्षेत्रीं जाऊन मोरयाच्या संस्थानांत नोकरीस राहिले. यांना आंजर्ले एथील महादाजीपंत कोल्हटकरांची मुलगी चि. नर्मदा ही दिलेली होती. वामन तात्यांनां मोरगांवास गेल्यावर नारायण, हरी आणि गणेश असे तीन पुत्र झाले.

कै० नारायणराव अविवाहित असून कै० हरीभाऊ खानदेशांतील जळगांव एथें कोर्टांत क्लार्क होते.

वामन तात्यांचा तिसरा मुलगा गणेश म्हणजेच कै० नानासाहेब हे होत. ते आपलें जन्मस्थान जें मोरगांव तेथेंच त्यावेळच्या पद्धतीप्रमाणें मराठी ६ इयत्तांपर्यंत शिकून पुढें इंग्रजी शिक्षणाकरितां सातारा एथें कै० भाऊसाहेब जोशी वकील ( मोरगांव देवस्थानचे कारभारी ) यांच्या एथें जाऊन राहिले.

लहानपणापासून नानासाहेबांची प्रकृति फार उत्तम असल्यामुळें त्यांच्या बालमित्रांत ते फार हूड म्हणून प्रसिद्ध होते.

घरचीं गरिबी असल्यामुळें भाऊसाहेबांचे घरीं पडतील तीं कामें करून नानासाहेबांनीं इ. स. १८९० मध्यें मॅट्रिकची परीक्षा दिली. पुढें ते जळगांव एथें आपल्या बंधूंकडे जाऊन वकिलीचा अभ्यास करूं लागले. पुढें त्यांनीं लो. टिळकांच्या लॉक्लासांत जाऊन १८९२ त ते हायकोर्ट प्लीडरची परीक्षा उत्तीर्ण झाले.

नंतर जळगांवच्या ओक वकीलांच्या ओळखीनें मलकापूर (वऱ्हाड) एथें त्यांनीं वकीलीस सुरवात केली. त्यांची कुशाग्रबुद्धी मनमिळाऊ स्वभाव, परोपकार वृत्ति आणि कळकळीनें व आस्थेनें काम करण्याची पद्धति यांच्या योगानें थोड्याच दिवसांत तेथें उत्तम वकील म्हणून त्यांचा लौकिक झाला.

पहिल्या प्रतीच्या वकीलांत गणना असल्यामुळें, त्यांना पैसाहि चांगला मिळूं लागला. हळूहळू नानासाहेब मलकापूरचे स्थाईक झालें. त्यांनीं तेथेंच घर बांधून आजूबाजूला शेतीहि बरीच मिळविली. त्यांना नर्मदा व कृष्णाबाई या दोन मुली व गंगाधर, वामन आणि रामचंद्र हे तीन मुलगे अशीं पांच अपत्यें झालीं. पुढें त्यांचें कुटुंब लहानलहान मुलांचा भार मागें टाकून स्वर्गवासी झालें.

मलकापूरला एक चांगले सुखवस्तु म्हणून त्यांचा लौकिक झाला. अशा प्रकारें गरिबींतून वर येऊन कै० नानासाहेबांनीं आपल्या उद्योगाचें उच्च शिखर गांठिलें.

कै० लो. टिळकांवर त्यांची फार भक्ती होती. मलकापूरचे ते एक चांगले पुढारी होते. कित्येक वर्षें तेथील म्युनिसिपालिटीचें अध्यक्षस्थान त्यांच्याकडेच होतें. १९०८ च्या स्वदेशी चळवळींत त्यांनीं जोराचा भाग घेतला होता. पैसाफंडादि सार्वजनिक संस्था आणि अनेक सार्वजनिक फंडांस त्यांनीं यथाशक्य सहाय्य केलें आहे.

अनेक गरिब विद्यार्थ्यांना त्यांनीं आपलेपणानें मदत केली असून त्यांपैकीं पुष्कळ आज सुस्थितीला प्राप्त झाले आहेत.

त्यांचा स्वभाव फार हौशी होता व त्यांना व्यायामाची चांगलीच आवड असे. त्यांनीं मुद्दाम एक आखाडाही चालविला होता. त्यांचा मुसलमानांस चांगलाच दरारा असून हिंदूंना त्यांचा मोठा आधार वाटे.

मोरेश्वरच्या मोरेश्वरावर त्यांची निष्ठा होती. पूजा–अर्चा व नैवेद्य वैश्वदेव झाल्यावांचून त्यांना बरें वाटत नसे. मोरगांवच्या मोरयाच्या मंदिरांत त्यांनीं एक टुमदार भक्कम शेजघर बांधिलें आहे.

या कर्तबगार व गरिबींतून स्वकष्टानें वर आलेल्या सद्गृहस्थांनीं इ. स. १९२९ आश्विन शुद्ध प्रतिपदा या दिवशीं आपल्या वयाच्या ५९ व्या वर्षी इहलोक सोडिला. पाठीमागें आपल्या मुलबाळांची त्यांनीं उत्तम व्यवस्था करून ठेविली आहे.

---

# हृद्गत.

—❀—

अखिल जगाच्या इतिहासांत ' महाराणा प्रताप ' सारखा पराक्रम आणि त्याच्या सारखा पावित्र्यादि अनेक सद्गुणांचा एकत्र सांठा दुसऱ्या कोठें पहावयास मिळत नाहीं. म्हणून अशा राष्ट्रीय विभुतीचें ' आख्यान ' करून कीर्तन रूपानें त्याचे गुण गावे म्हणून त्याच्या चरित्राशीं आमचा प्रथम परिचय झाला. पुढें अनेक सद्गृहस्थांकडून ही सर्व माहिती पुस्तकरूपानें एकत्र प्रसिद्ध करण्याविषयीं आग्रह झाल्यामुळें व आम्हांलाहि तें पटल्यामुळें हा प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे तें सज्जन ठरवितील.

— चैतन्य ग्रंथमाला —

राणाजीचें चरित्र आबालवृद्ध स्त्रीपुरुषांस अत्यंत उद्बोधक आहे ! हें चरित्र ' चैतन्य ग्रंथमालेचें ' प्रथमपुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत असून या मालेकडून प्रतिवर्षीं निदान एकतरी उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध व्हावें अशी मनीषा आहे. प्रयत्न पद्धतशीर झाले व ग्रंथ लोकोपयोगी ठरले तर जनतेचा भरपूर आश्रय मिळाल्यावांचून रहाणार नाहीं असा विश्वास आहे.

माला सर्व प्रकारचे ग्रंथ प्रसिद्ध करणार आहे. हे सर्व ग्रंथ शक्य तितके स्वस्त देतां यावे अशी आमची इच्छा आहे. याकरितां अशा प्रकाशनाला धनिकांचा आश्रय मिळणें अत्यंत अवश्य आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाला मु॥ मलकापूर वऱ्हाड येथील सुप्रसिद्ध नागरीक श्री. वामन गणेश अर्थात् तात्यासाहेब सोमण यांनीं आपले परमपूज्य वडील कै० गणेश वामन अर्थात् नानासाहेब

सोमण यांच्या स्मरणार्थ जें सहाय्य केलें त्याबद्दल ' माला ' त्यांचा आभारी असून, मालेच्या या पहिल्याच प्रयत्नाला त्यांनीं जे सक्रीय प्रोत्साहन दिलें त्याबद्दल त्याचें आभार मानावे तेवढें थोडेच आहेत.

या कामीं ज्या ज्या लोकांनीं प्रोत्साहन दिले त्या सर्वांचेंच या नाहीं त्या रूपानें आम्हांस सहाय्य झालें आहे. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें आमचें कर्तव्यच आहे. तसेंच हें पुस्तक ज्या विविध ग्रंथांच्या आधारानें लिहिलें आहे त्या सर्व ग्रंथकारांचे आभार अवश्य मानिले पाहिजेत.

शेवटीं चैतन्य ग्रंथमालेंतून चांगल्या विद्वान् लेखकांचे लोकोपयोगी ग्रंथ जनसेवेला सादर होवोत हीच प्रभुपदीं प्रार्थना.

मि|| आश्विन
शु. १ शके १८५७

आपला नम्र,
वा. शि. कोल्हटकर.

# — विषयानुक्रमणिका —


प्रकरण १ लें—पूर्ववृत्त. पुष्पवतीचा पुत्र, बाप्पारावळ, आणखी
पृष्ठें १–११ एक विचित्र योगायोग, बाप्पाचें चितोड नगरींत आगमन.

प्रकरण २ रें—आर्यावर्तावर परकीयांचे हल्ले. क्षत्रियांची चिकाटी,
पृष्ठें १२–२० दाहीरकन्यांचें आत्मसंरक्षण, सूडाची अजब युक्ति, देशाचें दुर्दैव.

प्रकरण ३ रें—बाप्पारावळापासून संगराण्यापर्यंत. खुमानराणा,
पृष्ठें २१–३२ बगदादची अवदशा, सबक्तगीन, महाकेतु महम्मूद, गृहकलह व आत्मनाश, शूर राणी पद्मिनी, जोहार, पितृआज्ञा परिपालन, हमीराची आई, लाखाराणा व कुंभोराणा, सन्मानार्थ अविचार व ईश्वरी योग.

प्रकरण ४ थें—राणा संग्रामसिंह. संगाचें थोर मन, पृथ्विराजाचा
पृष्ठें ३३–४८ दुष्टपणा, धनगराच्या घरीं, राजकन्येची प्राप्ती, रायमल्लाची चिंता, अज्ञातवास संपला, बाबराचें हिंदुस्थानांत आगमन, संगाचें बल, बाबराची चितोडवर स्वारी, रत्नसिंह, पपाबाईचें राज्य, पिढीच्या पिढी लयाला गेली, राखीचें सामर्थ्य.

प्रकरण ५ वें—बनवीर आणि राणा उदेसिंग. दाईची स्वामि-
पृष्ठें ४९–७१ निष्ठा.

प्रकरण ६ वें—प्रताप, राणाझाल्यावर. प्रतिज्ञा.
पृष्ठें ७२–८०

प्रकरण ७ वें—राणाजीचें बालपण. विद्या व बल, शाक्तसिंह
पृष्ठें ८१–८५ फुटला.

प्रकरण ८ वें—दिल्लीच्या बादशहाचे आधारस्तंभ. पदवीदान,
पृष्ठें ८६–९१ स्वार्थासाठीं अधमपणा.

प्रकरण ९ वें—द्वेषाची ठिणगी पेटली. निर्मळ तें निर्मळच,
पृष्ठें ९२–९८ पावित्र्याला वैभव शरण गेलें, सर्पाच्या शेंपटीवर पाय, तीव्र निषेध.

प्रकरण १० वें–हळदीघांटचा घनघोर संग्राम. हळदीघाट तो हाच,
पृष्ठें ९९–१२० चित्तकाचा पराक्रम, सलिम मेला! सलिम मेला!, झालापति मानसिंहानें प्राणांची कुरवंडी केली, झालपतीचा सन्मान, चित्तकाची स्वामिनिष्ठा, अनर्थ ओढवला, आघात तेंच हित झालें, शाक्तसिंह शरण आला, चित्तकाचें देहावसान, सलिमास शंका आणि शाक्तसिंहाचें पुनरागमन, दुसऱ्या दिवशीं भयंकर अनर्थ.

प्रकरण ११ वें–दुर्दैवाचा फेरा. देवरानें दगा दिला.
पृष्ठें १२१-१२५

प्रकरण १२ वें–राणाजीचा वनवास. त्यांतच यवनावर हल्ले,
पृष्ठें १२६-१४३ फरीदखानास हात दाखविला, भिल्लांचे अनंत उपकार, शत्रूनेंहि प्रशंसा केली, पुत्तो तुझी धन्य आहे, परिस्थितीचा फटका, मोह अनिवार आहे.

प्रकरण १३ वें–बादशहाचा आनंद व पृथ्विराजाचें पत्र
पृष्ठें १४४-१४८

प्रकरण १४ वें–नौरोजा. अकबराचा स्त्रीवेष, अकबराची फट-
पृष्ठें १४९-१५३ फजिती.

प्रकरण १५ वें–अचानक हल्ला. देशत्याग, भामासानामक प्रधानाचें
पृष्ठें १५४-१६२ सहाय्य.

प्रकरण १६ वें–भाग्योदय व स्वराज्य प्राप्ती, चवताळलेला सिंह,
पृष्ठें १६३-१६८ प्रतिज्ञा पालन.

प्रकरण १७ वें–हिंदुसूर्य मावळला. राणाजीचा अंतकाळ.
पृष्ठें १६९–१७६

प्रकरण १८ वें–उपसंहार. शारीरिक बल, अतुल धैर्य, देशप्रीती,
पृष्ठें १७७-१८४ स्वधर्मनिष्ठा, स्वार्थत्याग, सत्यनिष्ठा, चिकाटी व सततोद्योग, बुद्धिमत्ता व राजनीति, स्वातंत्र्येच्छा.

# महाराणा प्रताप.

श्री ग्रं. सं. ५२६८
स्थळ सं. च नं. ८०६
श्री ५३४०

## —पूर्ववृत्त—

### प्रकरण १ लें.

सूर्यवंश विभूषण ' महाराणा–प्रताप ' हा राजस्थानच्याच नव्हे तर अखिल आर्यावर्ताच्या इतिहासांत स्वतःच्या अत्यंत निर्मल-प्रकाशानें झळकणारा एक तेजःपुंज हिरा आहे. कोठेंहि असला तरी हिरा तो हिराच, पण तो जर चांगल्या कोंदणांत बसविला तर त्याचें तेज अधिकच व्यक्तपणें खुलून दिसतें. त्याच प्रमाणें राणाजींच्या चरित्रांतील निरनिराळे ओजस्वी, बोधप्रद आणि रोमांचकारी प्रसंग हिऱ्याच्या पैलूंप्रमाणें राणाजींना कसे खुलवीत आहेत व आपल्या प्रकाशाचा उत्साही ठसा वाचकांच्या मनावर कसा उमटवीत आहेत तें पुढें ओघानेंच अनुभवावयास सांपडेल; परंतु असा हा अमोलिक हिरा कोंदणांत बसवितां आल्यास पहावें म्हणून त्याच्या वंशाचें पावित्र्य व पूर्ववृत्त थोडक्यांत देतों.

रघुकुलमंडण दाशरथी श्रीरामचंद्राला परम पराक्रमी लव आणि कुश असे दोन पुत्र होते. त्यांपैकीं लवानें लवकोट नांवाचें एक नगर वसविलें. तेंच हल्लींचें लाहोर नगर होय. लवाच्या ५४ व्या पिढीला

त्या ठिकाणीं सुमित्र नांवाचा राजा झाला. उज्जनीचा विक्रमादित्य हा सुमित्राच्या समकालींच होऊन गेला. सुमित्राचे दहावे पिढींत **कनकसेन** या नांवाचा एक पराक्रमी राजा झाला. कालगतीनें लाहोर सोडून तो सौराष्ट्रांत आला. आणि तेथील परमार–पवार–वंशाच्या राजाला जिंकून त्यानें तें राज्य मिळविलें. **वीरनगर** किंवा **वडनगर** हें त्यानेंच वसविलें आहे.

कनकसेनाच्या चौथ्या पिढींत **विजयसेन** नांवाचा राजा झाला. त्यानें **विजयनगर** व **विदर्भनगर** अशीं दोन नगरें वसविलीं. विजयनगर हें धोळक्याजवळ असून *विदर्भनगरास हल्लीं **सिहोरी** असें म्हणतात. भावनगरच्या वायव्येस पांच कोसांवर हल्लीं जें **वळा** म्हणून गांव आहे, तेथें **वल्लभीपूर** नांवाची एक अत्यंत प्रसिद्ध नगरी याच विजयसेनानें वसविली होती.

विजयसेनापासून शिलादित्यापर्यंत वल्लभीपूर ज्या वैभवांत होतें त्यावरून तें नामशेष होईल असें त्यावेळीं कोणासही वाटलें नसेल; पण इ. स. ५२४ सांत उत्तरेकडून म्लेच्छानीं आर्यदेशांत शिरून देशाची जी धूळधाण केली त्यांत वल्लभीपूर नष्टप्राय झालें. शिलादित्य महापराक्रमी होता, पण देशाचें दुर्दैव ओढवलें म्हणजे देशांत राष्ट्रघातकी नराधम जन्मास येऊन स्वजनांचा अधःपात करितात. शिलादित्याचे कांहीं मंत्री यवनांस सामील झाले, आणि मर्मस्थानांचा भेद झाल्यामुळें वल्लभीपुराचा नाश होऊन शिलादित्य मुलाबाळांसकट शत्रूकडून मारला गेला. त्याच्या राण्या त्याच्या पश्चात् सती गेल्या;

---

* दमयंतीचें माहेर म्हणून प्रसिद्ध असलेली विदर्भनगरी-नागपूर-ही निराळी.

व दीन बापडी वल्लभीपुरी अनाथ होऊन क्रूर शत्रूच्या हातीं पडल्यामुळें उजाड होऊन गेली.

## पुष्पवतीचा पुत्र.

परमेश्वराचे मनांत ज्याचें संरक्षण करावयाचें असेल त्याला प्रत्यक्ष काळही धक्का लावूं शकत नाहीं. विंध्याचलाच्या डोंगराळ प्रदेशांत चंद्रावती म्हणून एक नगरी आहे. तेथील प्रमार राजघराण्यांतील पुष्पवती नांवाची एक कन्या शिलादित्याला दिली होती. वल्लभीपुरी अनर्थांत पडली तेव्हां पुष्पवतीला कांहीं दिवस गेले असून ती माहेरीं गेली होती. पुत्रप्राप्तीसाठीं तिनें बराच देवधर्म केला होता, आणि अबूच्या पहाडाजवळ अंबाजीच्या दर्शनासाठीं ती मोठ्या श्रद्धेनें तिकडे गेली होती. आपल्या ऐपतीप्रमाणें मोठ्या थाटानें तिनें अंबापूजन केलें, आणि आतां मला पुत्र होऊन मी राजमाता होईन या अभिमानानें ती स्वगृहीं जाण्यास निघाली; पण वाटेंतच तिला तो दुःखकारक वृत्तान्त समजला. या विद्युत्पातानें पुष्पवतीच्या कोमल हृदयाला विलक्षण धक्का बसला आणि ती तात्काळ मूर्च्छित पडली. सखिजनांनीं तिला सावध केलें खरें पण तिला आपणास मूर्च्छाच अधिक हितकर, असें वाटलें. पुत्र होणार म्हणून जी अभिमानानें डोलत होती तीच आतां आपल्याला सती जावयास सांपडत नाहीं, म्हणून खेद मानूं लागली. ‘ ज्यांच्या आश्रयावर माझा सर्व आनंद ते माझ्या प्राणांचे प्राण, निर्दयकाळानें ओढून नेले. ’ हें एकच तिच्या दुःखाचें कारण होतें. शेवटीं गर्भरक्षणासाठीं तिनें एका गुहेचा आश्रय केला. तेथें योग्य वेळीं ती प्रसूत झाली व ईश्वरी योगायोगानें तिला पुत्र झाला.

वडनगरच्याजवळच ही गुहा असल्यामुळें पुष्पवती पुढें पुत्राला

घेऊन वडनगरला आली आणि त्या कोंवळ्या मुलाला **कमलावती** नांवाच्या एका ब्राह्मण स्त्रीच्या स्वाधीन करून आपण पतिस्मरण करीत सती गेली. 'ब्राह्मणाला उचित असें शिक्षण देऊन याचा रजपूतकन्येशीं विवाह करून दे' असें तिनें कमलावतीला सांगितलें होतें.

जन्मस्थळाला उचित असें '**गुह**' हेंच कमलावतीनें त्या पुत्राचें नामाभिधान केलें. पुढें त्याच्या पराक्रमामुळें **ईडर** एथील वेणुपुत्रांनीं -भिल्लांनीं-त्याला आपला राजा करून ते त्याच्या आज्ञेंत वागूं लागले. या गुहाचे जे वंशज तेच **गुहलोट** किंवा **गेहलोट** म्हणून प्रसिद्ध आहेत. गुहापासून सात पिढ्यांपर्यंत त्याचे वंशज ईडरचें राज्य उपभोगीत होते. पुढें भिल्लांनां स्वातंत्र्यलालसा उत्पन्न होऊन इतके दिवस आपण होऊन निष्कारण असे परस्वाधीन झालों असा त्यांना पश्चात्ताप होऊं लागला, आणि त्या स्वातंत्र्यप्रिय वेणुपुत्रांनीं गेहलोटांचा आठवा पुरुष जो **नागादित्य** त्याच्या विरुद्ध दंगा करून त्याचा वध केला.

## बाप्पा रावळ.

दुखावलेला सर्प आणि राजा किंवा राजघराणें या दोहोंचा क्रोध सारखाच भयंकर असतो. म्हणून नागादित्याचा वध करून सर्व भिल्ल त्याच्या कुटुंबाचा नाश करण्यासाठीं राजवाड्याभोंवतीं गोळा झाले. जिकडे पहावें तिकडे भिल्लच भिल्ल. आणि जो तो भिल्ल सांपडेल त्याला कंठस्नान घालीत आहे, असें पाहून राजकुटुंबांत विलक्षण भीषणता पसरली. कुणाला कांहीं मार्ग सुचेना. नागादित्याला त्यावेळीं '**बाप्पा**' नांवाचा एक तीन वर्षांचा मुलगा होता. गेहलोट कुळाचा आतां समूळ नाश होणार अशी सर्वांना सकारण

धास्ती वाटूं लागली. पण जो दयासागर पुष्पवतीच्या गुह नामक पुत्राला सहाय्य झाला, तोच आज पुनः त्या अतिप्राचीन व परम पवित्र घराण्याच्या संरक्षणार्थ सानुकूल झाला. आश्चर्य हें कीं, वडनगरच्या ज्या विप्रस्त्रीनें गुहाचा सांभाळ केला होता, त्याच कुलांतील ब्राह्मणांनीं राजपुत्र—बाप्पाचें रक्षण करण्यासाठीं ऐनप्रसंगीं संकटांत उडी घेतली. आपल्यावर संकटाचे कडे कोसळले तरी हरकत नाहीं, पण राजपुत्राचा सांभाळ हा झालाच पाहिजे, अशी त्यांनीं जणु प्रतिज्ञाच केली होती. राजपुत्राला घेऊन मोठ्या धाडसानें पण युक्तिप्रयुक्तीनें ते निघाले. आणि ईडरपासून सुमारें १५ मैलांवर **भांडेर** म्हणून एक किल्ला आहे तेथें आले. तेथें त्यांना आश्रय मिळाला. पण तें स्थळ असावें तितकें निर्भय नाहीं, असें वाटून राजपुत्राला घेऊन ते तेथून पराशर अरण्यांत गेले.

निबिड कानन, मोठमोठे वृक्ष, लहान लहान जाळ्या आणि या सर्वांना परस्पर गुंतवून टाकणाऱ्या रानवेली यामुळें तें स्थान मनुष्यप्रवेशाला धोक्याचें, पण म्हणूनच राजपुत्राचें रक्षण होण्याकरितां अधिक निर्भय झालें होतें. अर्थात या कामीं त्याच स्थळाची निवड करण्यांत आली. चित्रकूट पर्वत आपल्या उंच शिखरावरील गगनचुंबी वृक्षांच्या रूपानें आपल्या भावी अधिपतीवर कोणी चाल करून येत आहे कीं काय असें पहावें, म्हणून वर मान करून डोकावून जणुं पहाराच करीत होता. अशा ठिकाणीं **नागेंद्र** नांवाचें एक गांव आहे. तेथील शिवोपासक ब्राह्मणांच्या सहवासांत बाप्पा सुखानें कालकंठना करूं लागला.

थोर पुरुषांचें, थोर घराण्याचें, किंवा थोर राष्ट्राचें थोरपण, त्यानें धैर्यानें सोसलेल्या विपत्तीच्या भक्कम चौथऱ्यावरच उभारलेलें असतें.

थोरांना विपत्काल आला कीं तोही मोठा भयंकरच असतो. असेंच या प्रसंगावरून ठरत नाहीं काय ?

शिलादित्य महापराक्रमी राजा, पण त्याच्या पुत्राचा जन्म दुर्दैवानें गुहेंत व्हावा ! बरें, ज्याचा जन्म गुहेंत झाला तोच स्वपराक्रमानें ईडरचें राज्य भोगितो ! आणि त्याच गुहाच्या वंशांतील एका अर्भकास पुनः अरण्याचा आश्रय करावा लागतो ! ही ईश्वरी घटना किती विचित्र आहे ! पण भरती आणि ओहोटी ही सागरालाच असते. थिल्लराचा तो तटप्रदेश आणि तेथें डुरडुरणारे ते बेडूक हेच त्याचे संवगडी ! तेथें मौक्तिकेंहि नसावयाचीं आणि मगरीहि नसावयाच्या !

नागेंद्र या गांवीं एका ब्राह्मणाचे घरीं बाप्पा राहिला होता. ब्राह्मणाच्या गाई राखण्याचें काम त्याच्याकडे होतें. अरण्यांत गाई चारतांना एकदां एक चमत्कारिक गोष्ट घडून आल्याचें भाटांनीं आपल्या रसाळ काव्यांतून गाइलें आहे—

एक गाय पुष्कळ दूध देणारी असूनहि रानांतून घरीं आल्यावर पाहावें तों मुळींच दूध देईना ! ब्राह्मणाला स्वाभाविकपणें असें वाटलें कीं बाप्पाच गाईचें दूध पीत असावा. ब्राह्मणाची ही शंका राजपुत्राला कळली, तेव्हां त्याला वाईट वाटलें. खरोखरीच अशा रीतीनें दूध पिणें बाप्पाच्या स्वप्नांत सुद्धां आलें नव्हतें. मग हा प्रकार होतो तरी कसा ? याचा तपास केल्यावांचून राजपुत्राला सुख लागेना. नुसतें मी नाहीं, मी नाहीं, अशीं उत्तरें देऊन ब्राह्मणाची शंका दूर करणें हा सरळ मार्ग नव्हे, असें त्याला वाटलें. आणि त्यानें त्या गाईवर ज्यास्त नजर ठेविली. चरतां चरतां ती गाय एका निर्जन

गिरिकंदरांत गेली. तिच्या पाठोपाठ बाप्पाहि तेथें गेला. एका विशिष्ट ठिकाणीं जाऊन ती थांबली. आणि तिच्या खालीं असलेल्या पाल्या-पाचोळ्यावर तिच्या स्तनांतून दुग्धधारा स्रवूं लागल्या. बाप्पानें कुतूहलानें पुढें जाऊन तो पाचोळा दूर केला. तों त्याला तेथें एक स्वयंभू-महादेवाचें स्थान असल्याचें दिसून आलें. आजूबाजूला पाहतो तों जवळच एका गुहेंत एक तेजःपुंज तपस्वी त्याच्या दृष्टीस पडला. त्याच्याकडे पाहून बाप्पाला आदर उत्पन्न झाला, आणि त्यानें प्रतिदिवशीं त्या तपस्व्याची सेवा आरंभिली. भाग्यवान् पुरुषांना, प्रयत्नानेंहि साध्य होण्यास कठीण अशा गोष्टी सहजासहजींच साध्य होतात. हा तपस्वी हारीत मुनि होता. बाप्पाचा प्रेमळ स्वभाव मुनीला आवडला, आणि त्यानें बाप्पाला मोठ्या प्रभावी अशा विद्या शिकविल्या. बाप्पानें हारीत मुनींची नित्य येऊन सेवा करावी, असा क्रम पुष्कळ दिवस चालला होता. शेवटीं इहलोक सोडून जातांना मुनींनी बाप्पाला कल्याणकारक आशीर्वाद दिले. त्यामुळें बाप्पाचा आत्मविश्वास फारच वाढला.

आपण जगद्विख्यात सूर्यवंशांत जन्माला आलों असून, कालगतीमुळें जरी असें दैन्य कंठीत असलों तरी हारीत मुनींच्या आशीर्वादानें आपल्या पराक्रमाला यश येईल असा त्याला आतां पूर्ण विश्वास उत्पन्न झाला.

## आणखी एक विचित्र योगायोग.

ब्राह्मणाच्या गाई चारीत असतां एकदां एक अद्भुत योजना घडून आली होती. बाप्पाचा स्वभाव मनमिळाऊ असल्यामुळें रानांत गुरें चारावयास येणाऱ्या अनेक भिल्ल पुत्रांशीं त्याची मैत्री झाली

होती. तसेंच तो मोठा पराक्रमी आणि धाडशी असल्यामुळें सर्व मुलें त्यालाच आपला पुढारी समजत.

**शारदीय झूलनोत्सव** हा रजपुतांचा एक मोठा आवडता उत्सव आहे. मुलामुलांनीं एखाद्या रम्य स्थळीं जाऊन झोका खेळणें हें या उत्सवांतील महत्त्वाचें अंग आहे. बाप्पा आपल्या सवंगड्यांसह या उत्सवाचे वेळीं एकदां झूलन क्रीडेसाठीं गेला होता.

नागेंद्र नगरच्या **सोळंखी** राजाची कन्या आपल्या सख्यांसह योगायोगानें त्याच कुंजवनांत झूलन क्रीडेकरितां आली होती. हिंदोळ्याकरितां लागणारे दोर त्या मुलींना कोठें मिळतना. इतक्यांत त्यांना बाप्पा दिसला. सर्वच मुलें, आणि आनंदाचा आणि खेळण्याचाच तो दिवस. तेव्हां सहजच मुलींनीं बाप्पाजवळ हिंदोळ्याकरितां दोर मागितला. ब्रह्मलिखिताचें गणीत पुष्कळ वेळां उलटेंच सोडवीत यावें लागतें. कुणाच्या ध्यानींमनींहि येणार नाहीं, असा योगायोग जमून आला. सर्वच मुलें लहान होतीं. दोर मागितल्यावर बाप्पा म्हणाला, ‘ तुम्ही सर्वजणी जर माझ्या जवळ विवाह करीत असाल तर मी तुम्हाला दोर देईन. ’ झूलन क्रीडेसाठीं उत्सुक झालेल्या मुलींनीं दोर मिळावा म्हणून त्याला अनुमोदन दिलें. लगेच मुलामुलांनीं राजकुमारी आणि बाप्पा यांच्या वस्त्राला गांठ मारिली, आणि सर्वांनीं तेथील एका मोठ्या आम्रवृक्षाला प्रदक्षिणा घातल्या. झूलन क्रीडा झाली आणि मुलेंहि आपापल्या घरीं गेलीं.

पुढें सोळंखीराजकन्या उपवर झाली, तेव्हां राजा तिच्यासाठीं वर शोधूं लागला. पण एका ज्योतिषाला तिचा सहज हात दाखविला असतां त्या शास्त्र कोविदानें, मुलीचा विवाह यापूर्वींच झाला आहे,

असें राजाला सांगितलें. हें ऐकून सर्वांना मोठें नवल वाटलें. आणि बारकाईनें या गोष्टीचा तपास सुरू झाला.

आतां आपल्यावर कांहीं तरी संकट ओढवणार, असें वाटून बाप्पानें आपल्या भिल्ल मित्रांस बोलाविलें; आणि प्राण गेला तरी आम्ही तुला साह्य करूं व तुझ्या सुखदुःखांतच आपलें सुखदुःख मानूं, अशी त्यांच्या करवीं प्रतिज्ञा करविली. या भिल्ल मित्रांचें पुढें त्याला फारच सहाय्य झालें. बालीय आणि देव या नांवाचे दोन भिल्ल त्याच्या भिल्लमित्रांत प्रमुख होते. पुढें बाप्पा जेव्हां चितोडच्या सिंहासनावर बसला, तेव्हां आनंदित होऊन या दोघांनीं आपल्या अंगुलीच्या रक्तानें बाप्पाला टिळा लाविला. हा मान बाप्पाचे वंशजांनीं त्या भिल्लांच्या वंशाकडे अद्यापिहि ठेविला आहे.

भिल्लांच्या मदतीनें अरण्यांत राहून व इतर रीतीनें बालपणच्या त्या विवाहाची गोष्ट गुप्त राखण्याचा बाप्पानें पुष्कळ प्रयत्न केला. पण शेवटीं ती गोष्ट बाहेर आल्यावांचून राहिली नाहीं. मात्र त्यामुळें आपल्यावर संकट ओढवेल अशी जी बाप्पाला भीति वाटत होती ती खोटी ठरली. बाप्पाचा पराक्रम पाहून आणि त्याचें पूर्ववृत्त ऐकून सोळंखीराजाला आनंदच झाला. त्यानें आपल्या मुलीचें बाप्पाशीं मोठ्या थाटानें विधियुक्त लग्न लाविलें, आणि मुलीला मोठें आंदणहि दिलें. अशा प्रकारें रावळ आणि सोळंखी या दोन वंशांचा ईश्वरी योगायोगानें संबंध जडला.

## बाप्पाचें चितोड नगरींत आगमन.

हारीत मुनींच्या आशीर्वादानें, पराक्रमी भिल्ल मित्रांच्या सहाय्यानें आणि स्वपराक्रमावरील विश्वासामुळें बाप्पाची महत्वाकांक्षा वाढीस

लागली. त्यानें आपले कित्येक साथीदार बरोबर घेतले, आणि त्या निर्जन काननाचा त्याग केला. ईडरच्या सुविख्यात राजघराण्याचा एकच एक आधार अशा बाप्पाला त्याच्या वयाच्या तिसऱ्या वर्षा-पासून गिरिकंदरांतून भटकत गुरें राखीत आणि पडतील ते कष्ट सोशीत एकाद्या भिल्लाप्रमाणें दिवस काढावे लागले खरे, पण त्या-मुळें त्याच्या अंगीं कांटकपणा, धैर्य, श्रमजीवित्व इत्यादि सद्गुण पूर्णपणें वास करूं लागले. रानावनांची माहिती झाली, आणि कोणताहि प्रसंग आला तरी त्याला तोंड देण्यापुरेशी निर्भयताहि त्याच्या अंगीं आली.

देव देऊं लागला म्हणजे चारी बाजूंनीं देऊं लागतो. बाप्पा कानन सोडून आपल्या मित्रांसह जात असतांनां वाटेंत एका ठिकाणीं त्याची व सुविख्यात तपःसिद्ध गोरक्षनाथांची गांठ पडली. बाप्पाला गोरक्षनाथांनीं एक दुधारी तलवार दिली, आणि तिचा उत्तम उपयोग व्हावा म्हणून कांहीं मंत्रोपदेशहि केला. या गोष्टीमुळें बाप्पाचा उत्साह द्विगुणित झाला, आणि त्याचें यश आतां त्याच्या डोळ्यांपुढें त्याला साक्षात् दिसूं लागलें.

पुढें थोड्याच दिवसांनीं चितोडच्या मौर्यवंशीय मानराजाला जिंकून बाप्पा चितोडच्या गादीवर बसला. या गेहेलोट कुलप्रदीपानें अनेक पराक्रम केले असून त्याच्या चरित्रासंबंधीं कित्येक चमत्कार-युक्त वर्णनें भाट लोक मोठ्या अभिमानानें गातात. त्यानें आपल्या पराक्रमानें त्यावेळीं हिंदुसूर्य, राजगुरु, आणि चकवा (चक्रवर्ती) अशीं बहुमानास्पद भूषणें आपल्या शत्रु–मित्रांकडून मिळविलीं होतीं. इस्पहान, कंदाहार, काश्मीर, इराक, इराण, तुराण, काफरिस्तान इत्यादि हिंदुस्थानच्या पश्चिमेकडील देश जिंकून तेथें त्यानें आपली

सत्ता स्थापन केली, आणि तेथील राजस्त्रियांशीं विवाह केले. या महाभाग्यशाली राजाला १३० पुत्र झाले. त्यांपैकीं ९८ पुत्र हिंदु स्त्रियांपासून झाले असून बाकीचे इतर स्त्रियांचे होते. हे ९८ पुत्र आपणांस अग्निउपासक सूर्यवंशी असें म्हणवीत, आणि बाकीच्यांनीं आपापल्या आईच्या नांवानें निरनिराळ्या जाती स्थापन केल्या. या सर्वांनां **नौशेर पठाण** असें नांव आहे.

या शतायुषी राजानें आपल्या वयाचीं शंभर वर्षे पूर्ण झाल्यानंतर देह ठेविला. शेवटीं त्यानें संन्यास घेऊन योग मार्गाचा अवलंब केला होता. शवाची व्यवस्था करण्यासाठीं त्याच्या हिंदु व यवन पुत्रांत तंटा लागला असतां त्याच्या शवाचीं कमलपुष्पें झालेलीं मुलांच्या दृष्टीस पडलीं. तेव्हां त्यांचा वाद मिटला, आणि त्यांनीं त्या पुष्पांचा स्वीकार केला. अशी बाप्पाविषयींची एक कथा प्रसिद्ध आहे. या महापराक्रमी आणि अद्वितीय पुरुषानें चितोड येथें गेहेलोट किंवा रावळ घराण्याचें सिंहासन स्थापन करून तें स्थिर केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
चं. ८०६



मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ४३७५

# —आर्यावर्तावर परकीयांचे हल्ले—

## प्रकरण २ रें.

कौसल्यासुत श्रीरामचंद्रापासून बाप्पारावळापर्यंतचा सूर्यवंशाचा अत्यंत संक्षिप्त इतिहास मागील प्रकरणांत दिला आहे. आतां, ज्या घणाचे घावांखालीं आर्यांनीं आपलें वज्रदेहित्व सिद्ध केलें, त्याची, म्हणजे परकीयांच्या आर्यावर्तावरील हल्ल्यांची, संक्षिप्त माहिती सांगणें उचित आहे. कारण बाप्पारावळाच्या पुढील हकीगतीशीं त्याचा निकट संबंध असून राणाजीच्या चरित्राला सुद्धां ही माहिती पार्श्वभूमीच आहे असें म्हटलें तरी चालेल.

ख्रि. पू. ३२८ वर्षाच्या वसंतऋतूंत हिंदुकुश ओलांडून आपल्या ४०,००० फौजेनिशीं दिग्विजयार्थ निघालेला मॅसिडोनचा राजा अलेक्झांडर अर्थात् शिकंदर हा हिंदुस्थानावर चाल करून आला. त्याच्या पूर्वी हिंदुस्थानावर विदेशीयांनीं केलेल्या हल्ल्यांची ऐतिहासिक माहिती मिळत नाहीं.

शिकंदरानंतर ग्रीक, सिथियन, शक, हूण इत्यादि अनेकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या; आणि आजपर्यंत सुमारें दोनअडीच हजार वर्षें हा विधर्मीयांचा क्रम अव्याहत चालू आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, इतकीं वर्षें झालीं तरी हिंदुस्थान अद्यापि या सर्वांस पुरून उरला आहे. इतका प्रदीर्घ झगडा अखिल जगाच्या इतिहासांत क्वचितच पहावयास सांपडेल !

आपल्या समशेरीच्या प्रखर धारेनें अवघ्या जगास कंप उत्पन्न

करणाऱ्या. मुसलमानांना सुद्धां हिंदुस्थानांत क्षत्रीय आणि रजपूत यांचा अचाट पराक्रम आणि ब्राह्मणांचा जाज्वल्य धर्माभिमान, जागोजाग नडला आणि त्यामुळें यूरोपप्रमाणें हिंदुस्थान पादाक्रांत करण्याचा त्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. उलट इ. स. ७५० मध्यें महाजुलुमी यवनांविरुद्ध प्रचंड जूट करून हिंदूंनीं त्यांना स्वदेशांतून पार हांकलून दिलें.

यानंतर सुमारें अडीचशें वर्षें हिंदुस्थानाला यवनांपासून मुळींच उपद्रव होऊं शकला नाहीं. सांप्रतकालीं हिंदुस्थानाला पूर्ण पारतंत्र्य आल्यामुळें, जो तो, मग तो स्वजन असो वा परका असो, हिंदुस्थानाकडे दोष दृष्टीनेंच पाहूं लागला आहे. पण जे आपले प्राचीन सद्गुण आहेत, आणि ज्यांच्या योगानें आपणाला स्फूर्ति येण्यासारखी आहे, त्यांचीहि हेळसांड किंवा हेटाळणी होणें खचित हिताचें नाहीं. हिंदुस्थान परकीयांशीं पूर्वीपासून कसा झगडत आहे तें पुढील माहितीवरून कळेल.

## क्षत्रियांची चिकाटी.

शिकंदराचेमागें त्याचे कांहीं लोक इकडे राहिले होते, पण चंद्रगुप्तानें त्यांस हांकून दिलें. पुढें १०० वर्षांनीं ग्रीक लोकांनीं पुनः हिंदुस्थानावर स्वारी केली. पण मगधाधिपती पुष्पमित्रानें इ. स. पू. १७५ च्या सुमारास त्यांना बाहेर घालविलें. त्यानंतर शक आले. तक्षशिला व मथुरा एथें त्यांनीं सुमारें १००० वर्षें राज्य केलें. पुढें इ. स. पू. ५७ च्या सुमारास उज्जनीच्या विक्रमादित्यानें त्यांचा पराभव केला. कांहीं दिवसांनीं शकांची दुसरी एक टोळी इकडे आली. तिचाही शातकर्णी यानें इ. स. १२६ त मोड केला. नंतर युएची लोकांनीं पंजाब व त्याच्या जवळपासचा प्रदेश १०० वर्षें

आपल्या ताब्यांत ठेविला. पण गुप्तवंशीय समुद्रगुप्तानें चवथ्या शतकांत त्यांनाहि हुसकून दिलें. पांचव्या व सातव्या शतकांत हूण लोकांनीं इकडे मोर्चा वळविला. पण सहाव्या शतकांतील यशोधर्मानें पहिला आणि सातव्या शतकांत श्रीहर्षानें त्यांचा दुसरा हल्ला परतविला. हर्षानें या लोकांना इतकें चोपलें कीं पुढें सुमारें ३०० वर्षे इकडे परचक्र आलें नाहीं.

आठव्या शतकाच्या आरंभीं बगदाद येथील वलीद खलिफाच्या वेळीं देवल नांवाच्या सिंध प्रांतांतील एका बंदरांत रजपुतांनीं १००० मुसलमानांस पकडून ठेविलें. त्यावेळीं सिंधच्या कांहीं भागावर दाहीर नांवाचा राजा राज्य करीत होता. पकडून ठेविलेल्या लोकांची दाहीराजवळ मुसलमानांनीं मागणी केली, परंतु देवल बंदर दाहीराच्या राज्यांत नसल्यामुळें त्याला ती मागणी मान्य करितां आली नाहीं. पण तेवढ्यानेंच खलिफाचें बिनसलें, आणि महंमद कासीम नांवाच्या सरदारास मोठी फौज देऊन त्यानें दाहीरावर पाठविला. या युद्धांत दाहीर पडला आणि त्याच्या दोन मुली शत्रूच्या हातीं लागल्या.

## दाहीर-कन्यांचें आत्म-संरक्षण.

दाहीराच्या त्या सुंदर मुली हातीं लागतांच कासीमला फार आनंद झाला. ही भेट खलिफाला देण्यानें त्याच्याजवळ आपलें वजन वाढल्यावांचून रहाणार नाहीं, असें त्याला वाटलें. इकडे दाहीरावर विजय मिळालाच होता; त्यामुळें तो मोठ्या तोऱ्यानें बगदादला गेला.

तेथें गेल्यावर दाहीरकन्या खलिफाला अर्पण करण्याकरितां त्यानें

कांहीं योजना जुळवून आणिली. पित्याचा वध झाल्यामुळें त्या वीर-कन्या आधींच निराधार झाल्या होत्या. दुःखानें त्यांचीं वदनें कोमेजून गेलीं होतीं. आणि आपल्या कौमार्यावर घाला पडणार या भीतीनें त्यांचीं अंतःकरणें होरपळत होतीं. आतां आपलें संरक्षण कसें करावें हें त्यांना समजेना. त्या दीन वदनानें चोहोंकडे पाहूं लागल्या. भोंवतालीं त्यांना काय दिसलें असेल बरें! प्रत्येक वस्तू 'दुर्दैवी मुलींनो, तुम्ही परदेशांत पडलां आहांत, आमची ओळख तरी तुम्हाला कशी असणार!' असें सांगे. एकहि वस्तू त्यांना ओळखीची दिसली नाहीं. पाऊल टाकावें तेथें 'परदेश' 'परदेश' असे शब्द उमटूं लागले. पृथ्वी दुभंग होऊन जर आम्हाला आपल्या उदरांत घेईल तर किती चांगलें होईल बरें! असे विचार त्या तेज-स्वीनींच्या मनांत आले, पण व्यर्थ!

पुढें एका सुंदर महालांत भव्य आसनावर बसलेल्या एका यवना-समोर त्यांना नेण्यांत आलें. त्या आसनावरील यवनाला कासीमानें गुडघे टेंकून प्रणिपात केला. त्यावरून हा खलिफा असावा असें त्या मुलींनीं तेव्हांच ओळखिलें. आतां त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. हृदय धडधडूं लागलें, आणि धैर्य नष्ट झालें. 'तुम्ही वीर कन्या आहांत. आर्यधर्माचें उज्वल यश फडकविण्याचा तुम्हाला जणुं हा मानच मिळाला आहे असें समजा; आणि या प्रसंगीं वज्रापेक्षां कठोर बनून भगवद्वचनाप्रमाणें आपलें संरक्षण करून घ्या! भिऊं नका!' असें कोणी तरी अदृश्यपणें त्यांना सांगत आहे असें वाटलें. 'स्त्रीजातीला अनुरूप असा जो हृदयाचा ओलावा तोच तुम्हाला भेडसावीत आहे. तो पार नाहींसा झाला पाहिजे; म्हणून तुमच्या हृदयांतून मी बाहेर जातों.' 'अबला आहांत पण स्वसंरक्षणार्थ

आतां मर्द व्हा.' असें म्हणून कोणी तरी त्यांच्या हृदयांतून चपल-गतीनें त्यांच्या नेत्रांवाटे बाहेर आलें. दुःखाश्रूच होते ते, पण ते त्यांना कर्तव्यकठोर बनविण्याकरितां आले होते.

योग्य तो शिष्टाचार झाल्यावर मुलींना तेथेंच सोडून कासीम निघून गेला. आतां खलिफा आणि त्या दोघी मुली यांच्यावाचून तेथें कोणीच राहिलें नव्हतें. खलिफाची दृष्टि त्यांच्या सौंदर्यावर खिळून गेली होती.

डोळयांचे अश्रू जरा पुसून दाहीराच्या मोठ्या मुलीनें दीन वदनानें एकदां आपल्या धाकट्या बहिणीकडे पाहिलें, आणि त्याच दीन दृष्टीचा कोन क्षणभर खलिफाकडे वळविला. बराच वेळ पाणी वाहून गेल्यामुळें जरी नेत्रांवाटे अश्रुप्रवाह सुरूच होता तरी त्यांच्या हृद-याच्या कांहीं भागांतील ओलावा संपला असावा असें पुढील गोष्टी-वरून वाटतें.

## सूडाची अजब युक्ति.

खलिफा त्यांच्या प्राप्तीनें खुष झाला होता. मुली रडतांना सुद्धां कशा मोहक दिसत आहेत! असा विचार त्याच्या मनांत आला. जरा वेळानें त्यानें 'कां रडतेस अशी'? असें पुढें असलेल्या मुलीला विचारिलें. त्या अत्यंत चाणाक्ष आणि समयसूचक मुलीनें उत्तर काय द्यावयाचें तें आधींच ठरवून ठेविलें होतें. तिनें उत्तर दिलें, आम्हाला खलिफाला अर्पण करण्यापूर्वीच कासीमानें भ्रष्ट केलें आहे. याचा आमच्या मनाला फार खेद होत आहे. हें ऐकून कासीमच्या या दुष्कृत्याचा खलिफाला अत्यंत क्रोध आला, व रागाच्या भरांत त्यानें त्याला बोलावून आणून ठार मारविलें. त्याचें प्रेत पाहून दाहीर-कन्येला अत्यंत आनंद झाला आणि निःशंकपणें ती म्हणाली,

माझ्या परमप्रिय पित्याचा ज्या दुष्टानें वध केला त्याचा सूड उगविण्याकरितांच मी असें सांगितलें. वास्तविक पाहतां आम्ही कांहीं भ्रष्ट नाहीं. हें ऐकून सूड उगविण्यासाठीं योजलेल्या या विचित्र युक्तीबद्दल खलिफास आश्चर्य वाटलें, आणि त्याचा राग अधिकच पेटला. अत्यंत शूर अशा आपल्या सरदाराला आपण निष्कारण मारविलें याबद्दल त्याला खेद झाला. तेव्हां ज्यांच्यामुळें हा अनर्थ ओढवला, त्या दाहीर कन्यांचाहि त्यानें त्याच वेळीं वध करविला. मरणापेक्षां पावित्र्याची योग्यता अधिक मानणाऱ्या ह्या आर्य-कन्यांना तेंच मरण पाहिजे होतें. यासाठींच त्यांनीं ही युक्ती योजिली होती. त्यांच्या कल्पनेप्रमाणें ती सिद्धीस गेलेली पाहून त्यांना परमावधीचें समाधान वाटलें; व मोठ्या सुखानें मरण स्वीकारून त्या अमर झाल्या. दुष्टाचा सूड घेऊन पावित्र्य रक्षणाची त्यांची ही युक्ती अपूर्व आहे. यावरून त्या मुलींची धर्मनिष्ठा किती अचल होती हें सहज कळण्यासारखें आहे. हा प्रकार इ. स. ७११–१२ चे सुमारास झाला. पुढें २५–३० वर्षांच्या आंत मुसलमानांना रजपूतांनीं स्वदेशांतून कायमचें हांकलून लाविलें. यापुढें २००–२५० वर्षें हिंदुस्थानांत त्यांचा शिरकाव झाला नाहीं.

## देशाचें दुर्दैव.

याप्रमाणें आर्य देशाची विपुल संपदा लुटण्यासाठीं या देशावर पुष्कळ आक्रमणें झालीं. ८ व्या शतकाच्या आरंभापर्यंतची थोड-क्यांत जी माहिती आपण पाहिली त्यांत जे मुसलमान इकडे आले, त्यांनीं लूटमार तर केलीच, पण आपल्या धर्माचा प्रसार करणें हाहि त्यांचा हेतु होता, हें विसरतां कामा नये. तरीहि गुजराथ आणि सिंध या प्रांतांत त्यांचा पूर्वीपासून सुरू असलेला व्यापारच त्यांना

इकडे घेऊन आला असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांतील या दोन संपन्न प्रांतांतील व्यापार हस्तगत करण्यासाठीं उमर खलिफानें टाइग्रीस नदीच्या तीरावर बगसार म्हणून एक शहर वसविलें होतें. आर्थिक दृष्टीनें सुद्धां त्यांची हिंदुस्थानावर दृष्टी होती हेंच या गोष्टी-वरून ठरत आहे. त्यांनीं हिंदुस्थानचें धन तर लुटलेंच पण इकडे त्यांनीं जे अनन्वित प्रकार केले त्यांचें नुसतें स्मरण सुद्धां असह्य होतें. शहरेंच्या शहरें बेचिराख होऊन गेलीं, असंख्य लोक प्राणास मुकले, हजारों लोकांची वाताहात झाली, लाखों अन्नान्नदशेला लागले, आणि कित्येकांना जन्म नकोसा झाला. राज्येंच्या राज्यें धुळीला मिसळलीं तीं निराळींच. लक्ष्मीवर बलात्कार झाले, सर-स्वतीचे हातपाय तुटले, कलेचा सौभाग्यतिलक पुसटला गेला, आणि कित्येक नरश्रेष्ठ धर्मासाठीं बद्धपरिकर होऊन शेवटीं यवनयुद्धाच्या होळींत खाक होऊन गेले. त्यांच्या त्या अत्यंत आवडत्या शील-संपन्न साध्वी स्त्रिया! छे! छे! तें लेखणी लिहूंहि शकत नाहीं! पण त्याची कल्पना दिल्यावांचून स्वाभिमानी तरुणांची कर्तृत्वशक्ती तरी कशी जाग्रत होणार! त्या नरशार्दूलांच्या स्त्रिया, त्या क्षात्र कन्या, वाचकहो, त्या आपल्या परमवंद्य माताभगिनी, शत्रूंच्या हातीं लागल्या, आणि अशा कित्येक माऊलींचें शील भ्रष्ट झालें. असें करणें म्हणजेच आपल्या जन्माचें सार्थक असेंच त्या लोकांचा धर्म त्यांना सांगतो. त्यांचा धर्म त्यांना सांगत असेल तसें; पण अशा वेळीं आपण काय करावें! आपली गीता आपल्याला काय शिक-वीत आहे बरें!!

महंमद पैगंबरानंतर थोड्याच वर्षांत मुसलमानांचा पश्चिमेला चांगलाच बज बसला. पूर्वेकडेहि त्यांनीं बराच धिंगाणा घातला.

तुर्कस्थान इराण व काबूल वगैरे देश आत्मसात् करून ते हिंदुस्थानवर आले; आणि कित्येक वर्षे हिंदुस्थानशीं त्यांचा झगडा चालला. त्या त्या प्रांतांतील लोकांचा त्यांच्या धर्मात प्रवेश झाला. आणि त्यांचीं निरनिराळीं नांवें पडलीं. सामान्यपणें शेख, सय्यद, मोंगल व पठाण असे त्यांच्यांत प्रमुख भेद झाले. अरब लोकांतील प्रतिष्ठित लोक ते शेख, सय्यद हे पैगंबराच्या दौहित्रें वंशांतील लोक होत. इराणांतील जे पार्शी बाटविले गेले ते मोंगल आणि काबुलांतील बाटविलेले क्षत्रिय म्हणजे पठाण होत.

काबूलांतील क्षत्रियांची दाणादाण उडून, जेव्हां त्यांना धर्मत्याग करावा लागला, तेव्हां पंजाबांत अर्थातच भीति उत्पन्न झाली. स्वसंरक्षणार्थ कित्येक क्षत्रियांचे बळी पडल्यावर नइलाजानें तेथील भाटी क्षत्रिय तेथून देशत्याग करून दक्षिणेकडे आले. हल्लीं त्यांची वस्ती कच्छ, मांडवी, पोरबंदर या भागांत असून अलीकडे त्यांनीं वैश्य वृत्ती स्वीकारिली आहे. मुंबईचे जे भाट्ये लोक आहेत ते याच भाटी क्षत्रियांचें वंशज होत.

अशा रीतीनें खालीं उतरत उतरत मुसलमानांनीं चितोडवर स्वारी केली. त्यावेळीं परम शूर बाप्पा रावळानें अनेक रजपूत वीरांसह यवनांवर प्रचंड हल्ला चढवून, त्यांचा फार मोठा पराभव केला. गिजनी शहर मूळचें क्षत्रियांचें असून तें असुरांनीं (मुसल्मान) घेतलें हें ठीक नाहीं असें बाप्पाचें म्हणणें होतें. म्हणून त्यानें थेट गिजनीवर चाल करून तेथील सेलीम नांवाच्या राजाचा पराभव केला. आणि गिजनीवर आपला किरमिजी विजयध्वज फडकविला.

अशा प्रकारें बाप्पा रावळाच्या वेळेपर्यंतचा विधर्मीयांच्या आक्रमणाचा थोडक्यांत इतिहास आहे. यावरून मुसलमानांचें हिंदुस्थानशीं

इकडे घेऊन आला असें म्हटलें तरी चालेल. हिंदुस्थानांतील या दोन संपन्न प्रांतांतील व्यापार हस्तगत करण्यासाठीं उमर खलिफानें टाइग्रीस नदीच्या तीरावर बगसार म्हणून एक शहर वसविलें होतें. आर्थिक दृष्टीनें सुद्धां त्यांची हिंदुस्थानावर दृष्टी होती हेंच या गोष्टीवरून ठरत आहे. त्यांनीं हिंदुस्थानचें धन तर लुटलेंच पण इकडे त्यांनीं जे अनन्वित प्रकार केले त्यांचें नुसतें स्मरण सुद्धां असह्य होतें. शहरेंच्या शहरें बेचिराख होऊन गेलीं, असंख्य लोक प्राणास मुकले, हजारों लोकांची वाताहात झाली, लाखों अन्नान्नदशेला लागले, आणि कित्येकांना जन्म नकोसा झाला. राज्येंच्या राज्यें धुळीला मिसळलीं तीं निराळींच. लक्ष्मीवर बलात्कार झाले, सरस्वतीचे हातपाय तुटले, कलेचा सौभाग्यतिलक पुसटला गेला, आणि कित्येक नरश्रेष्ठ धर्मासाठीं बद्धपरिकर होऊन शेवटीं यवनयुद्धाच्या होळींत खाक होऊन गेले. त्यांच्या त्या अत्यंत आवडत्या शीलसंपन्न साध्वी स्त्रिया! छे! छे! तें लेखणी लिहूंहि शकत नाहीं! पण त्याची कल्पना दिल्यावांचून स्वाभिमानी तरुणांची कर्तृत्वशक्ती तरी कशी जागृत होणार! त्या नरशार्दूलांच्या स्त्रिया, त्या क्षात्र कन्या, वाचकहो, त्या आपल्या परमवंद्य माताभगिनी, शत्रूंच्या हातीं लागल्या, आणि अशा कित्येक माऊलींचें शील भ्रष्ट झालें. असें करणें म्हणजेच आपल्या जन्माचें सार्थक असेंच त्या लोकांचा धर्म त्यांना सांगतो. त्यांचा धर्म त्यांना सांगत असेल तसें; पण अशा वेळीं आपण काय करावें? आपली गीता आपल्याला काय शिकवीत आहे बरें!!

महंमद पैगंबरानंतर थोड्याच वर्षांत मुसलमानांचा पश्चिमेला चांगलाच बज बसला. पूर्वेकडेहि त्यांनीं बराच धिंगाणा घातला.

तुर्कस्थान इराण व काबूल वगैरे देश आत्मसात् करून ते हिंदुस्थान-वर आले; आणि कित्येक वर्षें हिंदुस्थानशीं त्यांचा झगडा चालला. त्या त्या प्रांतांतील लोकांचा त्यांच्या धर्मांत प्रवेश झाला. आणि त्यांचीं निरनिराळीं नांवें पडलीं. सामान्यपणें शेख, सय्यद, मोंगल व पठाण असे त्यांच्यांत प्रमुख भेद झाले. अरब लोकांतील प्रतिष्ठित लोक ते शेख, सय्यद हे पैगंबराच्या दौहित्र वंशांतील लोक होत. इराणांतील जे पार्शी बाटविले गेले ते मोंगल आणि काबुलांतील बाटविलेले क्षत्रिय म्हणजे पठाण होत.

काबूलांतील क्षत्रियांची दाणादाण उडून, जेव्हां त्यांना धर्मत्याग करावा लागला, तेव्हां पंजाबांत अर्थातच भीति उत्पन्न झाली. स्वसंरक्षणार्थ कित्येक क्षत्रियांचे बळी पडल्यावर नइलाजानें तेथील भाटी क्षत्रिय तेथून देशत्याग करून दक्षिणेकडे आले. हल्लीं त्यांची वस्ती कच्छ, मांडवी, पोरबंदर या भागांत असून अलीकडे त्यांनीं वैश्य वृत्ती स्वीकारिली आहे. मुंबईंचे जे भाट्ये लोक आहेत ते याच भाटी क्षत्रियांचे वंशज होत.

अशा रीतीनें खालीं उतरत उतरत मुसलमानांनीं चितोडवर स्वारी केली. त्यावेळीं परम शूर बाप्पा रावळानें अनेक रजपूत वीरांसह यवनांवर प्रचंड हल्ला चढवून, त्यांचा फार मोठा पराभव केला. गिजनी शहर मूळचें क्षत्रियांचें असून तें असुरांनीं (मुसलमान) घेतलें हें ठीक नाहीं असें बाप्पाचें म्हणणें होतें. म्हणून त्यानें थेट गिजनीवर चाल करून तेथील सेलीम नांवाच्या राजाचा पराभव केला. आणि गिजनीवर आपला किरमिजी विजयध्वज फडकविला.

अशा प्रकारें बाप्पा रावळाच्या वेळेपर्यंतचा विधर्मीयांच्या आक्र-मणाचा थोडक्यांत इतिहास आहे. यावरून मुसलमानांचें हिंदुस्थानशीं

## —बाप्पारावळापासून संगराण्यापर्यंत—

### प्रकरण ३ रें.

महापराक्रमी वीरकेसरी बाप्पा रावळापासून महाराणा समर सिंहापर्यंत, म्हणजे इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या आरंभापासून सुमारें १६ व्या शतकाच्या आरंभापर्यंतचा अदमासें ८ शें वर्षांचा काल या प्रकरणांत आपणास पहावयाचा आहे.

या एवढ्या दीर्घ कालांत चितोडच्या सिंहासनावर एकंदर ३८ राजे बसले. या सर्वांचा विस्तृत इतिहास भट्ट लोकांच्या ग्रंथांतून सुद्धां मिळत नाहीं. त्यांपैकीं जे पराक्रमी राजे होते त्यांच्याबद्दल बरीचशी माहिती उपलब्ध आहे. अर्थातच या सर्वांची माहिती देणें या ठिकाणीं अप्रस्तुत होईल. पण चितोडचे राजे बाप्पा रावळाचेच वंशज होत एवढें लक्षांत येण्याकरितां कांहीं महत्वाच्या राजांच्या चरित्रांतील ठळकसे प्रसंग संक्षिप्त रीतीनें अवलोकन करूं.

### खुमान राणा.

खलभोजानंतर सुप्रसिद्ध खुमानराणा चितोडच्या गादीवर बसला. हा बाप्पा पासून चौथा पुरुष होता. याच्यावेळीं खलिफा अलमायून यानें चितोडवर स्वारी केली, आणि नगराला वेढा देऊन त्यानें राण्याजवळ खंडणी मागितली. चितोडच्या राजाजवळ यवन खंडणी मागतो, याचेंआज आपणास कांहींच वाटणार नाहीं, पण या गोष्टीनें त्यावेळीं महापराक्रमी आणि स्वातंत्र्यप्रिय रजपुतांचा क्रोधाग्नी भडकून गेला. महाराणा खुमान याला हा आपला भयंकर अपमान

काय नातें होतें हें समजेल. आणि वीरवर बाप्पा रावळाचा पराक्रम गेहेलोटांसच नव्हे तर अवघ्या रजपुतांस आणि हिंदूंसहि कसा स्फूर्तिप्रद होता हेंही लक्षांत येईल.

---



# —बाप्पारावळापासून संगराण्यापर्यंत—

## प्रकरण ३ रें.

महापराक्रमी वीरकेसरी बाप्पा रावळापासून महाराणा समर सिंहापर्यंत, म्हणजे इसवी सनाच्या आठव्या शतकाच्या आरंभापासून सुमारें १६ व्या शतकाच्या आरंभापर्यंतचा अदमासें ८ शें वर्षांचा काल या प्रकरणांत आपणास पहावयाचा आहे.

या एवढ्या दीर्घ कालांत चितोडच्या सिंहासनावर एकंदर ३८ राजे बसले. या सर्वांचा विस्तृत इतिहास भट्ट लोकांच्या ग्रंथांतून सुद्धां मिळत नाहीं. त्यांपैकीं जे पराक्रमी राजे होते त्यांच्याबद्दल बरीचशी माहिती उपलब्ध आहे. अर्थातच या सर्वांची माहिती देणें या ठिकाणीं अप्रस्तुत होईल. पण चितोडचे राजे बाप्पा रावळाचेच वंशज होत एवढें लक्षांत येण्याकरितां कांहीं महत्वाच्या राजांच्या चरित्रांतील ठळकसे प्रसंग संक्षिप्त रीतीनें अवलोकन करूं.

### खुमान राणा.

**खलभोजानंतर सुप्रसिद्ध खुमानराणा** चितोडच्या गादीवर बसला. हा बाप्पा पासून चौथा पुरुष होता. याच्यावेळीं खलिफा **अलमायून** यानें चितोडवर स्वारी केली, आणि नगराला वेढा देऊन त्यानें राण्याजवळ खंडणी मागितली. चितोडच्या राजाजवळ यवन खंडणी मागतो, याचेंआज आपणास कांहींच वाटणार नाहीं, पण या गोष्टीनें त्यावेळीं महापराक्रमी आणि स्वातंत्र्यप्रिय रजपुतांचा क्रोधाग्नी भडकून गेला. महाराणा खुमान याला हा आपला भयंकर अपमान

आहे असें वाटलें. त्याच्या तळपायाची आग मस्तकास गेली. यवनाच्या या सदर्प मागणीचा त्या महाभागानें योग्य समाचार घेण्याचें ठरविलें. मोठ्या आवेशानें त्यानें प्रचंड रणशिंग फुंकिलें. हां हां म्हणतां, हजारों रजपुत खुमानरावळाच्या विजयध्वजेभोंवतीं जमा आले. सर्वांच्या उत्साहाला जणुं भरतीच आलेली दिसत होती. जेथें उत्साह तेथें जय. हा नियम ठरलेला असल्यामुळें यवनांची दाणादाण उडाली; इतकेंच नव्हे तर या प्रसंगीं त्यांचा पुरा मोड होऊन अलमयुनास खुमानराण्यानें पकडिलें. या झटापटींत यवनसेनाहि बरीचशी कापली गेली आणि रजपुतांना विजयश्रीनें माळ घातली.

अशा रीतीनें रजपुतांनीं झालेल्या अपमानाचें पुरापूर उट्टें काढलें आणि स्वातंत्र्यासाठीं आत्मबलिदान करणाऱ्या रजपुतांजवळ खंडणी मागणें हें सोपें नाहीं असें सर्व लोकांना पटवून दिलें. खलभोज-पुत्र खुमान याच्यावेळीं यवनांचा हा मोठाच पराभव झाला.

खलभोजालाच कर्ण असें दुसरें नांव होतें. बाप्पारावळ लहानपणीं गाईच्या पाठोपाठ गेला तेव्हां ज्या महादेवाचें स्थान त्याला दिसलें होतें त्याचा महिमा बाप्पाच्या वेळीं बराच वाढला होता, पण खलभोजानें या महादेवाच्या भव्य मंदिराची प्रतिष्ठा केली. रजपुतांचा कुलस्वामी भगवान् एक लिंगजी तो हाच.

### बगदादची अवदशा

खुमानच्यावेळीं झालेल्या या पराभवानंतर म्हणजे सुमारें इ. स. ८५० पासून जगभर गाजलेल्या बगदाद शहराला उतरती कळा लागली. एवढ्या मोठ्या सागरालाहि जर भरती व ओहोटी आहे तर ती यवनसत्तेलाच तेवढी कशी टळणार! पण मनुष्याला वैभव-

काळीं उन्माद होतो व त्याच्या हातून त्या भरांतच इतकीं अनन्वित कृत्यें होतात कीं ओहोटीच्या वेळीं त्याच्याकडे सहानुभूतीनें पहाण्यासहि कोणी तयार नाहींसें होतें. यवनांचें यावेळीं जवळ जवळ तसेंच झालें. शेवटीं तर बगदादचें राजवैभव भर बाजारांत लीलांवास काढीपर्यंत वेळ आली. असा प्रसंग केव्हांहि दुःखकारकच, यांत काय शंका आहे ! हिंदुस्थानांतील हजारों निरपराध आर्यांगनांच्या दुःखाश्रूंनीं ज्या गिजनीचे रस्ते धुतले गेले आणि सहस्रावधि आर्यवीरांच्या आणि कित्येक राजेरजवाड्यांच्या रक्तानें ओलेचिंब झालेल्या हातानें हिंदुस्थानांतून लुटून नेलेल्या संपत्तीच्या, जोरावरच ज्या गिजनीतील भव्य मनोऱ्यांच्या कोनशिला बसविल्या, तीच गिजनी आतां दीनस्वरानें सर्व जगाला सांगूं लागली कीं 'बाबानों, मानवी जिणें आणि पराक्रम तुच्छ आहे ! तुमच्या वैभवाची काय ही अस्थिरता ! मग उगाच गर्व कां करितां ! !'

## सबक्तगीन

यवनांची ही स्थिती झाली व हिंदुस्थान कांहीं काल त्यांच्या त्रासांतून सुटला. पण ही स्थिती हिंदुस्थानाच्या वांट्याला फार दिवस टिकली नाहीं. उलट हा विसावा भारतीयांचे दृष्टीनें अंतकालचे दोन शब्द बोलण्यापुरेसाच होता, असें म्हटलें तरी चालेल. थोड्याच दिवसांत भारतमातेच्या भीषण भविष्यानें आपल्या भ्यासूर नाटकाचा दर्शनी पडदा उघाडिला. खुरासानांतून यवनश्रेष्ठ **सबक्तगीन** आपल्या दुर्दम्य सेनेसह भारतांत घुसला व त्याच्या अतुल पराक्रमानें इकडील वीर हतप्रभ झाले. कित्येकांनीं मरेपर्यंत लढावयाचें, मग काय होईल तें होवो म्हणून आत्मबलिदान केलें. कित्येकांचा त्या प्रचंड युद्धांत पत्ताहि नाहींसा झाला; आणि दुःखाची गोष्ट म्हणजे हजारों

लोकांना प्राणाहून प्रिय असा आपला आर्यधर्म त्यावेळीं इच्छेविरुद्ध सोडून द्यावा लागून इस्लामी धर्माची दीक्षा जबरदस्तीनें पतकरावी लागली. हा अनर्थकारक प्रसंग इ. स. ९७५ त घडून आला. सबक्तगीनाच्या या हल्ल्याची वेळ यवनांना अत्यंत हिताची होऊन आर्यांना यावेळेपासून अधिकाधिक वाईट असे दिवस येत गेले. हळू हळू आर्यमातेचा स्वातंत्र्यतिलक पुसट होण्याचीं दुश्चिन्हें दिसूं लागलीं. इतके दिवस आर्यप्रांगणांत मोठ्या आदरानें पदार्पण करणारा चंद्रमा आतां हळूहळू एथें आपल्याला स्वातंत्र्यविलास भोगावयाला मिळणें कठीण असें वाटून भारतीकडे जरा तुच्छतेनेंच पाहूं लागला. पडता काळ कोणालाहि नको असतो. अशा घसरत्या काळांतच याच शतकाच्या अखेरीस हाच सबक्तगीन आपल्या फौजेसह पुनः भारतावर चाल करून आला. यावेळींहि भारतीच्या सिंहासनाला एक धक्का बसल्यासारखें झालें. या खेपेला सबक्तगीनाबरोबर आर्यांच्या स्वातंत्र्यसूर्याचा महाकेतु इकडे आला होता. त्यावेळीं तो लहान होता. पण इतक्या लहान वयांतच त्याला हें विपारी बाळकडू मानवलें आणि तेव्हांपासूनच आर्य देशाची राखरांगोळी करून इस्लमलतेला तिचें खत घालण्याचे विचार त्याचे मनांत घोळूं लागले.

## महाकेतु महम्मूद

हा महाकेतु म्हणजेच आपल्या घोर कृत्यांनीं हिंदुस्थानाच्या इतिहासाला काळिमा लावणारा महम्मूद हा होय. बापाच्या पश्चात् गादीवर बसल्याबरोबर यानें प्रथम हिंदुस्थानावरच हल्ला करण्याचें ठरविलें. एक आणि दोन नव्हे तर यानें हिंदुस्थानावर लहान मोठ्या सतरा स्वाऱ्या केल्या. या सर्वांचा परिणाम मोठा भयंकर झाला.

हिंदुस्थान परतंत्र होण्यांत तर त्यांचा परिणाम झालाच. पण वेदांत-शास्त्राप्रमाणें सतरावी जी जीवनकला तिला म्हणजे आर्यांच्या जीवालाहि यापासून अपाय झाल्यावांचून राहिला नाहीं. म्हणजे या स्वाऱ्यांनंतर आर्य लोकांत म्हणण्यासारखा जीवच राहिला नाहीं.

महंमूदाचे पाशवी: पराक्रम हिंदुस्थानांत अद्यापहि पाहावयास मिळतात. एका हातांत कुराण आणि एका हातांत तरवार धारण करून त्यानें नगरेंच्या नगरें जाळिलीं, गांवेंच्या गांवें उध्वस्त केलीं, मंदिरें धुळीस मिसळविलीं, मूर्ती फोडिल्या आणि अगणित लूट लुटून नेली. चितोड आणि गिरनार येथील विच्छिन्न झालेलीं मंदिरें हीं त्याच्या इकडील अनर्थकारक दुष्ट कृतींचीं स्मारकेंच होत. अखिल आर्य देशाला परम पवित्र अशा सोमनाथावर त्यानें केलेला हल्ला हिंदुमात्राच्या मर्मस्थानीं अद्यावत् झोंबणारें शल्यच आहे.

प्रणाशाची वेळ आली म्हणजे बुद्धिनाश हा ठरलेलाच असतो. महादुष्ट यवनांच्या ऐन उदयाचा काल आमच्या गृहकलहावांचून त्याचें हित तरी कसें करूं शकणार! ‘ रिक्ताभवंति भरिता भरिताश्च रिक्ताः ’ हें जरी खरें असलें तरी भरलेले घट रिक्त होण्याचें किंवा रिक्त घट भरले जाण्याचें कारण योग्य असेल तर त्याबद्दल कुणालाच आश्चर्य किंवा खेद वाटण्याचें कारण नाहीं. पण संपत्ती किंवा विपत्ती जर कोणाला अयोग्य कारणानें आली तर अर्थातच त्याबद्दल राहून राहून आश्चर्य किंवा खेद झाल्यांवांचून रहात नाहीं.

आर्यदेश इतका समृद्ध कीं त्याला जवळ जवळ सर्व दुनियेनें जरी कांहीं द्यावयाचें नाहीं असें ठरविलें तरी त्याचें कांहीं अडणार नाहीं. उलट तसें करण्यानें इतर पुष्कळ देश मात्र उपाशीं मरतील. असें

असूनहि इकडे कलह व्हावेना ! कलहाचें मूळ दारिद्र्यांत असतें, हें जर खरें असेल तर त्यावेळीं, त्या अत्यंत समृद्ध अशा हिंदुस्थानांत कलह कां व्हावे बरें ! एकंदरींत मोह हा अनिवार आहे हीच गोष्ट खरी.

## गृहकलह व आत्मनाश

पुढें, दिल्लीपति तुवर राजा **अनंगपाळ** यानें अजमीरच्या **सोमेश्वराचा** पुत्र **पृथ्वीराज** या आपल्या दौहित्रास आपल्या पश्चात् आपलें राज्य दिलें. यामुळें कनोजच्या **विजयपाळाला** जी त्याची एक मुलगी दिली होती तिचा पुत्र **जयचंद** याला वैषम्य वाटलें. आणि आपल्या सख्या मावस भावाशीं वैर धरून त्याच्या वधाकरितां त्यानें महाघातकी **घोरीस** पाचारण केलें. (यासंबंधीं सविस्तर माहिती आमच्या पृथ्वीराज या पुस्तकांत येईल.) या आपसांतील कलहाचा फायदा घेऊन त्यानें पृथ्वीराजावर चाल केली. पण महाबलाढ्य पृथ्वीराजानें सात वेळां त्याच्या मुसक्या बांधिल्या. पण वेळोवेळीं त्याला सोडून दिल्यामुळें शिरजोर होऊन शेवटीं महंमुदानें पृथ्वीराजास पकडिलें. या शेवटच्या युद्धांत पृथ्वीराजाच्या बहिणीचा नवरा चितोडचा **समरसिंह** हा रणांत पडला. त्याच्या पश्चात् त्याची महापराक्रमी राणी कर्णवती हिनें आपला पुत्र कर्णराजा हा मोठा होईपर्यंत धैर्यानें चितोडचें राज्य चालविलें. या रजपूत स्त्रीनें मोठमोठ्या यवनांस रणांत नमविलें होतें. खरोखर रजपुतांचें रक्त मग तें पुरुषाचें असो अथवा स्त्रीचें असो महाप्रभावी यांत शंकाच नाहीं.

महाराणी कर्णवतीनें योग्य वेळ पाहून आपला पुत्र **कर्ण** याला गादीवर बसविलें. त्याच्या १० व्या पिढींत चितोड एथें पुनः रण-

कुंड घेतलें. राणा लक्ष्मणसिंग याचा भीमसिंग नांवाचा चुलता होता. राणा लहान असल्यामुळें भीमसिंगच राज्यकारभार पहात असे. भीमसिंगाची पट्टराणी पद्मिनी ही सिंहलद्वीपच्या राजाची कन्या होती. त्यावेळीं पद्मिनीच्या तोडीची सुंदरता दुसऱ्या कोठेंहि पहावयास मिळत नव्हती.

## शूर राणी पद्मिनी

मायदेशाच्या पायांत पारतंत्र्याच्या बेड्या पडून पुष्कळ वर्षें झालीं होतीं. दिल्लीपती पृथ्वीराजाच्या पायांत ज्यावेळीं १०० मणांची बेडी पडली त्याच वेळीं, जणुं पतीचें दुःख आपल्यावर ओढवून घेण्यासाठीं अंधव्रत पतकरणाऱ्या गांधारीप्रमाणें मायभूमीनेंहि आपल्या पायांत पारतंत्र्याची लोखंडी बेडीच अडकवून घेतली होती. इ. स. ११९३ त समरसिंहानें रणक्षेत्रांत आपला देह ठेविला, आणि लक्ष्मणसिंग इ. स. १२७५ त चितोडच्या गादीवर बसला. या काळांत दिल्ली एथें यवन राजे राज्य करूं लागले होते.

लक्ष्मणसिंगाचे वेळीं दिल्लीच्या तक्तावर अल्लाउद्दीन नांवाचा महाक्रूर यवनराजा राज्य करीत होता. पद्मिनीच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून त्यानें चितोडवर स्वारी केली. पण रजपुतांच्या पराक्रमापुढें त्याचें शहाणपण चालेना. तेव्हां त्यानें कपट मार्गाचा अवलंब करून भीमसिंगास पकडिलें. आणि विश्वासघातानें त्याला बंदिशाळेंत टाकिलें. इकडे पद्मिनीला त्यानें असा निरोप पाठविला कीं, जर तुझ्या पतीची मुक्तता व्हावी आणि त्याचा प्राण वांचावा अशी तुझी इच्छा असेल, तर तूं माझ्या स्वाधीन हो. राणीला या निरोपानें अत्यंत दुःख झालें आणि चीडहि आली. पण काय करावें हें कोणा-

लाच सुचेना. शेवटीं जशास तसें वागण्यावांचून या दुष्टाच्या हातून पतीची मुक्तता होणें कठीण, असें वाटून राणीनें त्याला मी माझ्या सख्यांसह तुझ्या स्वाधीन होतें, माझ्या पतीची मुक्तता कर, असें कळविलें. यावेळीं तिनें धूर्तपणानें निराळीच युक्ति योजिली होती. सख्यांच्या ऐवजीं रजपुतवीरांना पालख्यांत बसवून तिनें अल्लाउद्दीनाच्या गोटांत पाठवून दिलें, आणि पतीची सुटका करून घेतली. इकडे रजपुतांनीं पालख्यांतून बाहेर पडून मुसलमानांवर निकराचा हल्ला चढविला. तेव्हां यवनांना असें होईल अशी कल्पनाच नसल्यामुळें त्यांना रजपुतांकडून यथास्थित मार खावा लागला. अखेरीस अल्लाउद्दीनानें तेथून दिल्लीस पाय काढला. पण त्याला हा अपमान फारच डांचूं लागला. पद्मिनीपरी पद्मिनी नाहीं आणि पराभव मात्र पदरांत आला. याचा त्याला राग आला, आणि कांहीं दिवसांनीं त्यानें पुनः चितोडवर चाल करून रजपुतांचा पराभव केला. आतां आपणांस पद्मिनी मिळेल, यामुळें त्याला फार आनंद झाला होता, पण पद्मिनीची प्राप्ती होणें त्याच्या भाग्यांत नव्हतें. पद्मिनीनें पुढील भाकीत जाणून हजारों रजपुत स्त्रियांसह आपलें तेज अग्निनारायणाच्या तेजांत आधींच विलीन करून टाकिलें होतें.

## जोहार

या महाभयंकर प्रकाराला रजपुत लोक 'जोहारव्रत' असें म्हणतात पावित्र्य रक्षणाचा अन्य कोणताहि मार्ग उरला नाहीं म्हणजे रजपुतस्त्रिया आपल्या नाशिवंत शरिराला तृणतुच्छ लेखून मोठ्या आनंदानें तें अग्नीला अर्पण करीत. या वेळींहि अशीच बिकट वेळ आल्यामुळें पद्मिनीसह चितोडच्या सर्व वीर स्त्रिया किल्ल्यावरील एका प्रचंड भुयारांत चिता पेटवून त्यांत प्रविष्ट झाल्या. परम पवित्र

स्त्रियांची अशी व्यवस्था झाल्यावर रजपुतहि या प्रसंगीं मरेपर्यंत लढले व स्वर्गांत आपल्या स्त्रिया माता व भगिनी यांना भेटण्यासाठीं मोठ्या आनंदानें गेले.

आज कित्येक पिढ्यांचें चितोडनगरीचें स्वातंत्र्य आतां यवनांनीं हिरावून घेऊन तिला उघडी केली. अर्धी अधिक उजाड आणि स्मशानतुल्य झालेली चितोडनगरी इ. स. १३०३ मध्यें यवनांची दासी झाली, आणि तिला पारतंत्र्याच्या घोर नर्कवासांत दुर्दैवानें दिवस कंठावे लागले.

या युद्धांत हिंदुस्थानचें कधींहि भरून न येणारें नुकसान झालें. लक्ष्मणसिंहाचे ११ पुत्र एका मागून एक केशरी झगे घालून रणांत घुसले आणि त्या कोंवळ्या मुलांनीं आपल्या सर्व आशा मारून टाकून स्वधर्मासाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं, रणांगणांत आपले परम-पवित्र देह ठेविले.

## पितृआज्ञा परिपालन

लक्ष्मणसिंहानें आपला द्वितीय पुत्र जो अजयसिंह यास वंश नष्ट होऊं नये म्हणून, त्याच्या मनांत नव्हतें तरी चितोड सोडून बाहेर जावयास भाग पाडिलें होतें. याच्याच वंशांत पुढें महाराष्ट्राचा तेजस्वी सूर्य श्रीमच्छत्रपति शिवाजी जन्मास आला.

अजयसिंहाचा मोठा भाऊ ऊरूसिंह, याचा पुत्रहि त्याच्याबरोबर चितोड सोडून गेला होता. अजयसिंहानें डोंगराचा आश्रय केला आणि तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. पुढें आपण वृद्ध झालों असें पाहून, लक्ष्मणसिंहाच्या आज्ञेप्रमाणें त्यानें आपल्या गादीचे अधिकार आपल्या पुत्रास न देतां आपला वडील भाऊ ऊरूसिंह

लाच सुचेना. शेवटीं जशास तसें वागण्यावांचून या दुष्टाच्या हातून पतीची मुक्तता होणें कठीण, असें वाटून राणीनें त्याला मी माझ्या सख्यांसह तुझ्या स्वाधीन होतें, माझ्या पतीची मुक्तता कर, असें कळविलें. यावेळीं तिनें धूर्तपणानें निराळीच युक्ति योजिली होती. सख्यांच्या ऐवजीं रजपुतवीरांना पालख्यांत बसवून तिनें अल्लाउद्दीनाच्या गोटांत पाठवून दिलें, आणि पतीची सुटका करून घेतली. इकडे रजपुतांनीं पालख्यांतून बाहेर पडून मुसलमानांवर निकराचा हल्ला चढविला. तेव्हां यवनांना असें होईल अशी कल्पनाच नसल्यामुळें त्यांना रजपुतांकडून यथास्थित मार खावा लागला. अखेरीस अल्लाउद्दीनानें तेथून दिल्लीस पाय काढला. पण त्याला हा अपमान फारच डांचूं लागला. पद्मिनीपरी पद्मिनी नाहीं आणि पराभव मात्र पदरांत आला. याचा त्याला राग आला, आणि कांहीं दिवसांनीं त्यानें पुनः चितोडवर चाल करून रजपुतांचा पराभव केला. आतां आपणांस पद्मिनी मिळेल, यामुळें त्याला फार आनंद झाला होता, पण पद्मिनीची प्राप्ती होणें त्याच्या भाग्यांत नव्हतें. पद्मिनीनें पुढील भाकीत जाणून हजारों रजपुत स्त्रियांसह आपलें तेज अग्निनारायणाच्या तेजांत आधींच विलीन करून टाकिलें होतें.

## जोहार

या महाभयंकर प्रकाराला रजपुत लोक 'जोहारव्रत' असें म्हणतात पावित्र्य रक्षणाचा अन्य कोणताहि मार्ग उरला नाहीं म्हणजे रजपुतस्त्रिया आपल्या नाशिवंत शरिराला तृणतुच्छ लेखून मोठ्या आनंदानें तें अग्नीला अर्पण करीत. या वेळींहि अशीच बिकट वेळ आल्यामुळें पद्मिनीसह चितोडच्या सर्व वीर स्त्रिया किल्यावरील एका प्रचंड भुयारांत चिता पेटवून त्यांत प्रविष्ट झाल्या. परम पवित्र

स्त्रियांची अशी व्यवस्था झाल्यावर रजपुतहि या प्रसंगीं मरेपर्यंत लढले व स्वर्गांत आपल्या स्त्रिया माता व भगिनी यांना भेटण्यासाठीं मोठ्या आनंदानें गेले.

आज कित्येक पिढ्यांचें चितोडनगरीचें स्वातंत्र्य आतां यवनांनीं हिरावून घेऊन तिला उघडी केली. अर्धी अधिक उजाड आणि स्मशानतुल्य झालेली चितोडनगरी इ. स. १३०३ मध्यें यवनांची दासी झाली, आणि तिला पारतंत्र्याच्या घोर नर्कवासांत दुर्दैवानें दिवस कंठावे लागले.

या युद्धांत हिंदुस्थानचें कधींहि भरून न येणारें नुकसान झालें. लक्ष्मणसिंहाचे ११ पुत्र एका मागून एक केशरी झगे घालून रणांत घुसले आणि त्या कोंवळ्या मुलांनीं आपल्या सर्व आशा मारून टाकून स्वधर्मासाठीं आणि स्वातंत्र्यासाठीं, रणांगणांत आपले परम-पवित्र देह ठेविले.

## पितृआज्ञा परिपालन

लक्ष्मणसिंहानें आपला द्वितीय पुत्र जो अजयसिंह यास वंश नष्ट होऊं नये म्हणून, त्याच्या मनांत नव्हतें तरी चितोड सोडून बाहेर जावयास भाग पाडिलें होतें. याच्याच वंशांत पुढें महाराष्ट्राचा तेजस्वी सूर्य श्रीमच्छत्रपति शिवाजी जन्मास आला.

अजयसिंहाचा मोठा भाऊ ऊरूसिंह, याचा पुत्रहि त्याच्याबरोबर चितोड सोडून गेला होता. अजयसिंहानें डोंगराचा आश्रय केला आणि तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें. पुढें आपण वृद्ध झालों असें पाहून, लक्ष्मणसिंहाच्या आज्ञेप्रमाणें त्यानें आपल्या गादीचे अधिकार आपल्या पुत्रास न देतां आपला वडील भाऊ ऊरूसिंह

याचा मुलगा हमीर यास दिले. आणि मागेंपुढें राज्य लोभानें आपला पुत्र त्याच्याशीं भांडेल म्हणून त्याला चितोड सोडून जाण्याची आज्ञा केली. त्याचा आज्ञाधारकपुत्र सजनसिंह पुढें दक्षिणेंत जाऊन राहिला. शिवाजीभोसल्यांचा मूळ पुरुष तो हाच.

## हमीराची आई

हमीर मोठा पराक्रमी असून त्यानें आपल्या पूर्वजांची चितोडची गादी पुनः मिळविली. याच्या आईची एक आश्चर्यकारक गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे ती अशीः—

हमीराचा बाप ऊरूसिंह लहान असतांना आपल्या मित्रांबरोबर एकदां शिकारीस गेला होता. तेव्हां एका रानडुकराचा त्यानें पाठलाग केला. पळतां पळतां डुकर एका जोंधळ्याच्या शेतांत शिरला. शिकारी लोकांनीं शेताच्या भोंवतीं सारखें लक्ष ठेविलें होतें. आपल्या शेताची राखण करीत बसलेल्या शेतकऱ्याच्या मुलीला जेव्हां शेतांत डुकर दिसला तेव्हां तिनें एक जोंधळ्याचें ताट मोडून घेतलें आणि नवलाची गोष्ट अशी कीं, त्या ताटानेंच डुकराला ढंवशीत तिनें त्याला शेताच्या बाहेर काढिलें. शिकार बाहेर आल्यामुळें शिकारी लोकांना आनंद झाला; व त्यांनीं आपलें पुढील काम केलें; पण ऊरूसिंहाचें लक्ष मात्र शिकारीपेक्षां त्या शूर मुलीकडेच अधिक वेधलें. त्या मुलीच्या अशाच आणखी कांहीं गोष्टी लक्षांत आल्या-मुळें, ऊरूसिंहानें त्या शेतकऱ्याजवळ तिची मागणी केली, आणि त्याच मुलीला पुढें हमीर झाला. मातेच्या शौर्याचा ठसा पुत्राच्या ठिकाणीं चांगला उमटला होता म्हणूनच ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्धीस आली आहे. असो.

## लाखाराणा व कुंभोराणा

हमीरानंतर त्याचा नातू लाखाराणा याच्या वेळीं महंमद लोदीनें चितोडवर स्वारी केली होती. पण लाखाराण्यानें त्याचा पराभव केला. लाखाराणा मोठा शूर, राजनीतिकुशल आणि कलाकौशल्याचा चाहता होता. त्यानें प्रजेला संतुष्ट केलें. जावडा एथें रुप्याच्या आणि कथलाच्या खाणी यानेंच शोधून काढल्या. अल्लाउद्दीनानें चितोडची जी नासधूस केली होती ती यानें भरून काढिली. त्याच्या वेळचें काम चितोड एथें अद्यापिहि इमारतींच्या रूपानें पहावयास सांपडतें.

लाखाराण्याला चोंडा म्हणून एक शूर व निग्रही पुत्र होता. एका क्षुल्लक गोष्टीवरून गैरसमज होऊन त्यानें यावज्जन्म अविवाहित रहाण्याची भीष्मप्रतिज्ञा केली, आणि ती शेवटपर्यंत मोठ्या निर्धारानें तडीस नेली. अर्थात् लाखाच्या दुसऱ्या पुत्राकडे गादीचे अधिकार गेले.

पुढें लाखाराण्याचा नातू कुंभोराणा हा मोठा शूर निघाला. यानें यवनांवर एक प्रचंड विजय मिळविला होता. त्याचें स्मारक म्हणून चितोड एथें एक जयस्तंभ उभा केला आहे.

मेवाडच्या राज्यांत एकंदर ८४ किल्ले आहेत. त्यांच्या योगानें त्या देशाचें उत्तम प्रकारें संरक्षण होतें. या ८४ किल्ल्यांपैकीं ३२ किल्ले एकट्या कुंभोराण्यानेंच बांधिले आहेत. हा चांगला कवि असून श्रीकृष्णावर याची भक्ती असे. सुप्रसिद्ध मिराबाई ही याचीच राणी होय.

कुंभोराण्यानें ५० वर्षें उत्तम तऱ्हेनें राज्य केल्यावर त्याचा मोठ्या चमत्कारिक रीतीनें शेवट झाला. उदयसिंग नांवाचा त्याला एक अवि-

चारी, उतावळा आणि महत्वाकांक्षी पुत्र होता. त्यानें आपल्या बापाचा वध केला, आणि उतावीळपणानें सिंहासनावर बसण्याची आपली हौस पूर्ण करून घेतली, यामुळें त्याचा फारच दुर्लौकिक झाला. लोक त्याला धडधडीत मारेकरी-हत्यारी-अशा हांका मारीत.

## सन्मानार्थ अविचार व ईश्वरी योग

अशा रीतीनें मानहानी सोसावी लागल्यामुळें त्याला मान मिळविण्याचा एक भलताच मार्ग सुचला. त्यानें दिल्लीच्या यवन बादशहाशीं सख्य केलें, आणि अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे आपली मुलगी बादशहास देण्याचाहि एकदां त्यानें बेत केला; पण ईश्वरी इच्छा निराळीच होती. बाप्पारावळाचें घराणें भ्रष्ट व्हावें असा त्याचा संकेत नव्हता. या पवित्र घराण्याकडून ईश्वराला पुढें कांहीं महत्वाचें कार्य साधावयाचें होतें, असें पुढील गोष्टीवरून वाटतें.

आपली कन्या देण्याचा बेत ठरवून बादशहाकडून तो स्वदेशीं जाण्यास निघाला मात्र, तों एकाएकी त्याच्यावर प्रचंड वीज कोसळून त्यांत त्याचा अंत झाला व बाप्पाचें परमश्रेष्ठ घराणें या अनर्थांतून अशा चमत्कारिक रीतीनें बचावलें.

उदयसिंहाचा भाऊ रायमल्ल हा त्याच्या मागून मेवाडच्या गादीवर बसला. त्याला संग, पृथ्वीराज, आणि जयमल्ल असे तीन पुत्र होते. महाराणा संग हाच आपल्या चरित्रनायकाचा महापराक्रमी आजा होय. याच्या चरित्राचा प्रतापच्या चरित्राशीं निकट संबंध असल्यामुळें त्याची माहिती थोडक्यांत पुढील प्रकरणांत देऊं.

# — राणा संग्रामसिंह —

## प्रकरण ४ थें.

रायमल्लाला संग, पृथ्वीराज आणि जयमल्ल असे तिघे पुत्र होते. हे तिघे जर एकजुटीनें राहते, तर अधिक काय सांगावें ! राजस्थानच्याच नव्हे, तर अखिल हिंदुस्थानच्या इतिहासाला निराळें वळण लागलें असतें. पण, असें झालें असतें तर दुर्दैवाची हौस कोणी पुरविली असती ! आर्यदेश पुढें यवनांच्या हातून महागर्तेत लोटला जावयाचा होताना ! ज्या चुका सुधारण्यासाठीं, काल, थोडीबहुत अवधी देतो अशा चुका एकादे वेळीं क्षम्य ठरतात; पण ज्याचें फल ताबडतोब भोगावें लागण्याचा जास्त संभव अशा, म्हणजे उशाशीं शत्रू असेल त्यावेळच्या चुका या अक्षम्य होत.

बाकी संगाचे बालपणीं यवन जरी इकडे होते, तरी ते मोठ्या जोमांत होते असें नाहीं; पण योगायोग असा कीं रजपुतांची आपापसांत लाथाळी उडायला आणि यवनांस जोर चढायला एकच वेळ आली. दुर्दैव तें हेंच ! आणि यासाठींच कलह केव्हांहि होऊं न देण्याविषयीं दक्ष असणेंच शहाणपणाचें असतें.

### संगाचें थोर मन

संग, पृथ्वीराज आणि रायमल्ल या तिघांत लहानपणापासून कलह सुरू असत. संग हा बापाच्या मागून खरा गादीचा वारस, पण कलह टाळण्यासाठीं तो शक्यतों दूर असे. एकदां तिघे भाऊ एके ठिकाणीं असतांना संग त्यांना म्हणाला, भाई, गादीचा खरा वारस जरी मी

असलों तरी आपण देवीच्या देवळांत जाऊन, मेवाडच्या गादीवर कोणी बसावें, असा कौल घेऊं. हें म्हणणें सर्वांस मानलें आणि ते व त्यांचा चुलत भाऊ सूरजमल, असे उदेपुरापासून दहा कोसांवर त्यांच्या चारणी देवीचे देवळांत गेले.

## पृथ्वीराजाचा दुष्टपणा

देवीच्या भक्तिणीला पृथ्वीराजानें आपल्या येण्याचा हेतु कळविला. तेव्हां तिनें त्याप्रमाणें देवीचा कौल घेतला, आणि मग त्या सर्वांकडे एकदां दृष्टि टाकिली. पृथ्वीराज आणि जयमल्ल हे जमिनीवरच बसले होते. संग तेथील एका व्याघ्राजिनावर बसला होता, आणि सूरजमल त्याच्या जवळच बसला होता. भक्तिणीनें संगाकडे बोट दाखवून म्हटलें, याला चितोडची गादी मिळेल. हें भविष्य ऐकल्याबरोबर, पृथ्वीराजाला क्रोध आला, आणि त्यानें तेथेंच संगावर आपलें शस्त्र उपसलें. तेव्हां सूरजमलनें त्याचा हात धरिला, म्हणून संग वांचला; पण पांच-चार वार त्याला सोसावे लागलेच. त्यावांचून एक बाण त्याच्या डोळ्याला लागल्यामुळें, एका डोळ्यानें तो जन्माचा अंध झाला. आपापसांत अशा रीतीनें कलह करणें त्याला पहिल्यापासूनच आवडत नसल्यामुळें, यावेळीं सुद्धां चढाई तर नाहींच, पण प्रतिकारहि न करितां संग तेथून वेश पालटून निघून गेला. कारण भक्तिणीचें भाकीत खोटें करण्याची पृथ्वीराजानें प्रतिज्ञा केली होती.

## धनगराच्या घरीं

राजपुत्रच नव्हे तर पुढें राजा होण्याचाच ज्याचा मान असा राजपुत्र, पण त्यानें एका धनगराकडे आतां मेंढपाळाचें काम

स्वीकारिलें. दैवलीला तर खरीच, पण पडतील ते कष्ट सोसण्यास तयार असलेल्या त्या शूर लोकांबद्दल धन्यता वाटते! त्यांना आपल्या भावी उर्जीतकालाबद्दल विश्वास असे. आपत्तीच्या वेळीं क्षुद्र मानापमानाचा बुरखा ते पार झुगारून देत, आणि एकाद्या भिकाऱ्याला सुद्धां साधणार नाहीं इतका साधेपणा आणि योग्यालाहि साधणार नाहीं इतकी सहनशीलता धरून ते मोठ्या चिकाटीनें आपल्या ध्येयाचा मार्ग आक्रमीत. स्वातंत्र्योत्सुक लोकांना अशा अमोलिक गुणांची निश्चयानें अवश्यकता असते.

मेंढरें पाळणें देखील कांहीं सोपें काम नाहीं. ज्या धनगराकडे संग राहिला होता तो संगाला नेहमी म्हणे तुला जेवतां मात्र येतें आणि मेंढरें कशीं वळतां येत नाहींत! त्या मानी राजपुत्राला या शब्दांनीं किती दुःख होत असेल; पण या स्थितींत संगास फार दिवस रहावें लागलें नाहीं. त्याच्या एका परममित्र अशा राजानें त्याला एक घोडा आणि हत्यारें दिलीं. तेव्हां तो अजमीरजवळील श्रीनगरच्या करमचंदाच्या पदरीं चाकरीस राहिला.

## राजकन्येची प्राप्ती

श्रीनगर येथें असतांना संग एकदां शिकारीला गेला असतां, एका झाडाखालीं गाशा टाकून व उशाला बरची घेऊन झोंपला होता. अशा वेळीं झाडाच्या पानांतून एक कौडसा त्याच्या तोंडावर पडला. इतक्यांत एक नाग येऊन त्यानें आपल्या फणीनें त्याच्यावर छाया धरिली. ही अद्‌भुत गोष्ट गुप्त रहाणें शक्य नव्हतें. असे पुरुष छत्रधारी होतात, असा सर्वत्र समज आहे. ही गोष्ट तेथील राजाला कळतांच त्याची संगाकडे पहाण्याची दृष्टी बदलली; व थोड्याच

दिवसांत त्याला त्यानें आपली मुलगी देऊन त्याच्याशीं नातेंहि जोडिलें.

## रायमल्लाची चिंता

इकडे संग चितोड सोडून निघाल्यानंतर त्याच्या बापाला घडलेला सर्व वृत्तांत कळला. तेव्हां त्याला पृथ्वीराजाचा राग येऊन, त्यानें त्याला आपल्याजवळून घालवून दिलें, आणि तूं आपल्या पराक्रमावर आपलें पोट भर, असें त्यास सांगितलें. बापाच्या सांगण्याप्रमाणें, पृथ्वीराजास चितोड सोडून जाणें भाग पडलें. पुढें त्यानें गोदवाड-प्रांत जिंकून तो तेथें सुखानें राहूं लागला.

आतां राहिला जयमल्ल. पण ताराबाई म्हणून थोडा येथील रावाची एक स्वरूपवान् कन्या होती. तिच्यावर त्याची प्रीति बसली, आणि तिच्या बापाजवळ तिच्याबद्दल त्यानें मागणी केली. त्याचें राज्य पठाणांनीं घेतलें होतें. तें परत मिळवून दे, म्हणजे मी आपली मुलगी तुला देईन, असें तारेच्या बापानें जयमल्लाला कळविलें. तें कबूल करून जयमल्लानें पठाणावर चालहि करण्याचें ठरविलें; पण विषयलोलुप मनुष्य वचनपूर्तीपेक्षां इच्छापूर्तीकडेच अधिक लक्ष देतो. या नियमाप्रमाणें पठाणांचा पराभव करण्यापूर्वीच तारेचा बला-त्कारानें अभिलाष करण्याचा प्रयत्न केल्यामुळें, तारेच्या पित्यानें त्याचा शिरच्छेद केला.

रायमल्लाला हें वर्तमान कळलें, तेव्हां या कृत्याचा सूड घेण्याबद्दल त्याला पुष्कळांनीं सल्ला दिला; पण त्या निःपक्षपाती राण्यानें 'माझा पुत्र झाला म्हणून काय झालें ? त्याला झालें तें शासन योग्यच झालें' असे उद्गार काढिले. स्वधर्मनिष्ठ रजपुतवीराच्या तोंडीं शोभतील असेच हे उद्गार आहेत !

संग कोठें गेला त्याचा रायमल्लास पत्ता नव्हता. वार्धक्याचा काल, आणि तीन पुत्र असून शेवटीं जवळ कोणीच नाहीं; म्हणून रायमल्लानें बोलाविल्यावरून पृथ्वीराज पुनः चितोड येथें आला. त्याला ताराबाईसंबंधीं भावानें केलेली प्रतिज्ञा कळली, तेव्हां त्यानें ती पूर्ण केली. अर्थात् तारेनेंहि मोठ्या आनंदानें पृथ्वीराजाला वरिलें. ही बाई मोठी शूर होती. पतीबरोबर ती नेहमीं धनुष्यबाण घेऊन हिंडे.

## आज्ञातवास संपला

योगायोग मोठे विचित्र असतात. पृथ्वीराज चितोडला आल्यावर तो कांहीं दिवसांनीं विषप्रयोग होऊन मेला. पृथ्वीराजाचा मेहुणा अबूचा ठाकूर, यानें पृथ्वीराज आपल्या बहिणीस नीट वागवीत नाहीं, म्हणून हें क्रूर कृत्य केलें होतें. आपले दोन पुत्र मेले आणि आणि तिसऱ्याचा पत्ता नाहीं या दुःखामुळें, थोड्याच दिवसांत रायमल्लानें इहलोक सोडिला. हें दुःखद वर्तमान कळल्यावर अज्ञातवास संपवून संग चितोडला आला आणि इ. स. १५०९ मध्यें त्यानें चितोडची गादी सनाथ केली.

महाभाग्यशाली पांडवांची अत्यंत आवडती राजधानी, आणि भगवान् गोपालकृष्णांचें माहेरघर, अशी जी इंद्रप्रस्थ नगरी, तिलाच हल्लींचें दिल्लीशहर असें म्हणतात. तुवरवंशीय क्षत्रियांनीं येथें कित्येक पिढ्या मोठ्या लौकिकानें राज्य केलें. अखिल आर्यावर्ताला या नगराचा केवढा अभिमान! पण दैवाच्या वक्रदृष्टीपुढें सर्वांचा अभिमान क्षुद्र ठरला. आणि या परमपवित्र प्राचीन नगरीला, गिझनी, घोरी, खिलजी, लोदी इत्यादि यवनराजांचे अपमानकारक पदाघात निमूटपणें सहन करावे लागले.

रजपुतांचा अदम्य उत्साह, त्यांचें प्रचंड सामर्थ्य आणि अतुल आत्मविश्वास यांच्यापुढें इकडील यवनांची टुरटुर त्यांना कःपदार्थ वाटत असे. यामुळेंच त्यांनीं पुष्कळ वेळां यवनांकडे दुर्लक्ष केलें, आणि पुष्कळ वेळां तर त्यांचा पूर्ण पराभव झाला असतांहि क्षमा करून त्यांनीं यवनांचें इकडील वैभव हिरावून घेतलें नाहीं. पण या उपकाराचे वेळीं हेच यवन कधींकाळीं शिरजोर होतील असें त्यांच्या स्वप्नांतहि आलें नाहीं. वैभवाच्या स्थिरतेवर फाजील विश्वास ठेवल्यामुळें मोठमोठ्या लोकांकडूनहि अशा चुका होतात, आणि त्याचे भयंकर परिणाम पुढील पिढीला चिरकाल भोगावे लागतात.

महाराणा संगाच्या पूर्वीं दिल्लीचें सिंहासन यवनांनीं भ्रष्ट केलें होतें खरें, पण रजपुतांचें त्यांच्याकडे आतां फारसें लक्षच जात नसे. जोंपर्यंत त्यांची मस्ती जिरविण्याचें रजपुतांत सामर्थ्य होतें, तोंपर्यंत हें ठीक होतें; असें वाटल्यास म्हणावें. पण अग्नि, ऋण, रोग आणि शत्रू लहान असले तरी त्यांची उपेक्षा कधींहि करितां कामा नये.

## बाबराचें हिंदुस्थानांत आगमन

महाराणा संग्रामसिंह–संग–चितोडच्या गादीवर बसल्यानंतर अवघ्या दहाच वर्षांनीं हिंदुस्थानांत एका प्रचंड धूमकेतूनें प्रवेश केला. तुर्कस्थानांतील **फरगाण** नांवाच्या एका प्रांतांतून बाबर नांवाचा एक महाबलाढ्य यवन, आपलें भाग्य काढण्यासाठीं दोन हजार स्वार बरोबर घेऊन हिंदुस्थानावर चालून आला. हा इ. स. १४९८ त आपल्या वयाच्या १२ व्या वर्षीं फरगाण प्रांतांतील आपल्या गादीवर बसला होता. पण तिकडे त्याच्या शत्रूनें त्याला सुखानें झोंप घेऊं दिली नाहीं. इतकेंच नाहीं तर अंगीं पराक्रम

असूनहि शेवटीं तो समरकंद सोडून पळाला, आणि हिंदुकुश ओलांडून हिंदुस्थानांत शिरला.

हिमालयाच्या एवढ्या दुर्लंघ्य रांगा ओलांडून जो पराक्रमानें हिंदुस्थानांत उतरेल त्याचें भाग्य उदयाला आलेंच म्हणून समजावें, अशी सामान्यपणें इतिहास साक्ष देत आहे. त्याच रांगा ओलांडून जर इकडून कोणी तिकडे गेला असता तर त्याचें भाग्य नसतेंच का उदयाला आलें? पण अलिकडच्या इतिहासांत तसें उदाहरण फारच क्वचित्.

इ. स. १५१९ त सिंधूनदीच्या अलीकडे येऊन बाबरानें पंजाबांत सैन्याची चांगली जमवाजमव केली, आणि इब्राहिमलोदीवर दिल्ली एथें तो चाल करून आला. त्याच्या धडाक्याच्या हल्ल्यापुढें इब्राहीम टिकाव धरूं शकेना. शेवटीं या लढाईत त्याचा वध झाला आणि दिल्लीची गादी बाबराला मिळाली.

लहानपणापासून निरनिराळ्या बिकट परिस्थितींतून गेल्यामुळें बाबर अत्यंत अनुभवी, कांटक, प्रसंगावधानी व धैर्यवान बनला होता. त्याचे सैनिकहि इकडे भाग्य काढण्यासाठीं मोठ्या महत्वाकांक्षेनें आले असल्यामुळें, त्यांच्यांतहि वीरांना साजेसे पुष्कळ सद्गुण होते. अशा सैनिकांच्या साह्यानें बाबरानें संगावर चाल करण्याचें ठरविलें. हें दिव्य करून त्याला आपली महनीय महत्वाकांक्षा पूर्ण करावयाची होती.

## —संगाचें बल—

राणा संग हा असामान्य योद्धा होता. चितोडच्या गादीवर बसल्यापासून, संगानें आपल्या प्रजेचें उत्तम प्रकारें अनुरंजन केलें

होतें. गादीवर बसल्याबरोबर प्रथम त्यानें गृहकलह पार नाहींसे केले; आणि राज्यांतील तंटेबखेडे मोडून सर्वत्र शांतता निर्माण केली. दिल्ली व माळवा येथील फौजांशीं त्यानें १८ लढाया केल्या होत्या. एकदां तर दिल्लीच्या इब्राहिमलोदीची सर्व फौज कापून काढून त्याचा त्यानें पराभव केला, आणि त्याच्या एका मुलालाहि कैद करून त्यानें चितोड येथें नेलें. संगाच्या या पराक्रमामुळें आणि कुशल राजनीतिमुळें त्याचें यश सर्व लोक गाऊं लागले. त्याच्यावेळीं चितोड वैभवाच्या इतक्या उच्च शिखरावर होतें कीं पांडववंशीय तुवरांपासून चव्हाणांपर्यंत हिंदुस्थानची राजधानी म्हणून गाजत असलेली दिल्ली, मागें पडून, आतां चितोडच हिंदुस्थानची राजधानी झाल्याप्रमाणें लोक तिला मानीत होते.

संगराण्याच्या सैन्यांत ८०००० स्वार, ७ मोठे राजे, ९ राव, १०४ ठाकूर, रावत व रावळनामक सरदार, आणि ५०० हत्ती एवढें बल होतें. त्यावांचून मारवाड व अंमेर येथील राजे त्याचे मित्र असून, ग्वालेर, शिक्री, अजमीर, रायसेन, काल्पी, बुंदी, चंदेरी, गाग्रोन, अबू व रामपुरा येथील सर्व राजे त्याचे मांडलीक होते; आणि ते त्याला फार मान देत. अशा प्रकारें थोड्याच दिवसांत संग, रजपुतराजांत उच्च पदवीला चढला होता.

## बाबराची चितोडवर स्वारी

अशा बलाढ्य राजावर आग्र्याहून शिक्रीच्या मार्गानें बाबरानें चाल केली. तेव्हां इ. स. १५२८ च्या कार्तिक महिन्यांत संगानें बियाना नदी ओलांडून बाबराचे १५०० मुसलमान पुढें चाल करून येत होते, त्यांना कापून काढिले. संगाची ही पहिली झेपच बाबराला

आश्चर्यकारक वाटली. त्यामुळें त्यानें एक पाऊलभरहि पुढें न जातां आपल्या सैन्याभोंवतीं खंदक खणून तेथेंच तळ दिला. मधून मधून एखादा हल्ला चढवून तो योग्य वेळ आली कीं नाहीं, याचा अंदाज पाही, पण प्रत्येक वेळीं संगाच्या लोकांकडून मुसलमानांना मारच खावा लागे. तेव्हां बाबर विवंचनेंत पडला. त्याची चिकाटी मोठी वाखाणण्यासारखी होती, आणि त्याची आशाहि प्रदीर्घ होती; तरी पुढें पुढें त्याला विजय मिळणें फार कठीण वाटूं लागलें. आपले प्रयत्न पुरे पडत नाहींत, असें पाहून आपल्या हातून कांहीं पापें होत असतील, व त्यामुळेंच आपणास यश येत नाहीं असें त्याला वाटूं लागलें. आपल्या धर्माज्ञेचें उल्लंघन करून आपण दारू पितों, हें मोठें पाप करितों, असें वाटून त्यानें दारू सोडून देण्याचा निश्चय केला व आपल्या लोकांकडूनहि तशा शपथा घेवविल्या. यावांचूनहि आपल्या धर्माप्रमाणें त्यानें अनेक पुण्यकारक गोष्टी केल्या, आणि मग तहाचें बोलणें करण्यासाठीं त्यानें संगाकडे आपला मनुष्य पाठविला. अशा या वेळीं एका नराधमानें बाबरास फितूर होऊन, सर्व पारडें उलटवून टाकिलें.

युद्धाला प्रारंभ झाला. हजारों वीर एकमेकांशीं भिडले. संगाच्या सेनेचें अधिपत्य तुवार रायसेन-शिलादित्य-याजकडे होतें. प्रथम प्रथम शिलादित्यानें पराक्रमाची शिकस्त केली व संगाचा पूर्ण विश्वास संपादिला, पण पुढें काय झालें!! हाय! हाय! त्या नीचानें शेवटीं घात केला! रजपुतकुलाला बट्टा लावण्यासारखें घोर कृत्य करून त्यानें आपल्या पूर्वजांना खालीं माना घालावयास लाविलें! महामानी संगाच्या ही गोष्ट मागाहून ध्यानांत आली. पण मग काय उपयोग! दुष्टानें या अधम कृतीनें काय साधलें परमेश्वर जाणें! कराल कालानें मात्र त्या

महापातक्याच्या हातून हिंदुस्थानचें प्राचीन आणि परम पवित्र वैभव नष्ट करण्याचें महाकट्ठ कृत्य परस्पर साधलें खरें !

रजपुतांची भयंकर मनुष्यहानी झाली, आणि पराभवानेंहि त्यांच्या वक्षस्थलावर नाचण्याची आपली क्रूर इच्छा पूर्ण करून घेतली. बाबराच्या लोकांनीं मेलेल्या रजपूत सेनेचीं शिरें कापून त्यांचे ढीगच्या-ढीग रचिले आणि आनंद मानिला. बाबराचा हा विजय खरा, पण तो त्याला महाग पडला. तरीहि त्यानें परमेश्वराचे आभारच मानिले.

समरशार्दूल संग ! त्या महाभागाची काय अवस्था झाली बरें ! ध्यानींमनीं सुद्धां नसलेली फितुरी पाहून, त्याच्या पोलादी काळजाचें सुद्धां पाणी झालें, शेवटीं दुःखानें त्यानें अरण्याचा मार्ग धरिला. त्याच्या पराक्रमाची बाबराला इतकी खात्री पटली होती कीं, एवढा मोठा विजय मिळवून सुद्धां, संगाचा पाठलाग करण्याची त्याला छाती होईना. इतकेंच नव्हे, तर रजपुतांच्या भानगडींत पडण्याचें त्यानें इतउत्तर सोडूनच दिलें.

बाबराचा सूड घेईन, तेव्हांच चितोडला परत येईन. अशी प्रतिज्ञा करून त्या रणधुरंधरानें अरण्य जवळ केलें, पण दुर्दैवानें लौकरच त्याला इहलोक सोडून जावें लागल्यामुळें त्याचे ते मनोरथ त्याला पूर्ण करितां आले नाहींत.

या वीराला संग्रामसिंह हें नांव योग्य होतें. त्याचा बांधा मध्यम होता. वर्ण गौर आणि नेत्र विशाल होते. वयानें लहान असून सुद्धां त्याच्याकडे पाहिलें असतां, तो मूर्तिमंत शौर्याचा पुतळाच दिसे. युद्धांत त्याच्या अंगावर झालेल्या जखमांचे व्रण, त्याच्या पराक्रमाची साक्ष देत होते. लहानपणी त्याचा एक डोळा गेलेला वाचकांना

स्मरतच असेल. दिल्लीच्या बादशहाजवळ झालेल्या लढाईत त्याचा एक हात तुटला होता. एकदां एक तोफेचा गोळा लागल्यामुळें त्याचा एक पाय अधू झाला होता. आणि त्यावांचून त्याच्या शरीरावर सुमारें ८० वार लागलेले होते. हें वर्णन कौतुकास्पद वाटतें खरें, पण हा मान म्हणजे एक अत्यंत महागांत महाग अशी वस्तू आहे. या वीराच्या निधनामुळें लोकांना पराकाष्ठेचें दुःख झालें.

## रत्नसिंह

संगाला एकंदर सात पुत्र होते. त्यांतील दोन बालपणींच वारले. त्यामुळें त्याचे मागून त्याचा तिसरा पुत्र रत्नसिंह हा इ. स. १५३० त चितोडच्या गादीवर बसला. रत्नसिंहहि मोठा शूर होता. चितोडचे दरवाजे नेहमी उघडे असले पाहिजेत. ते लावून आपलें रक्षण करून घेण्याइतके आम्ही भ्याड नाहीं! असें म्हणून त्यानें तसा हुकूमहि सोडिला होता. बापाच्या इच्छा पूर्ण करण्याइतका पराक्रम परमेश्वरानें त्याला दिला होता. पण अनुभव नसल्यामुळें त्याचे हेतु सिद्धीस गेले नाहींत. लौकरच बुंदीचा हाडिया राजा व रत्नसिंह यांच्यांत जयपूरच्या राजकन्येवरून कलह उत्पन्न होऊन त्यांत एकमेकांच्या शस्त्राघातानें एकमेक मारले गेले.

## पपाबाईचें राज्य

रत्नसिंहानंतर इ. स. १५३५ मध्यें त्याचा भाऊ विक्रमाजित चितोडचा अधिपति झाला. त्याच्या अंगीं राज्यसूत्रें धारण करण्यास लागणारे अवश्य ते गुण तर नव्हतेच, उलट भीरुता, अदूरदर्शित्व आणि उच्छृंखलवृत्ति इत्यादि दुर्गुणांमुळें त्याची प्रजा त्याच्यावर असंतुष्ट असे. सरदारांना व सैनिकांना त्यानें अपमानकारक रीतीनें वागविल्यामुळें हळू

हळू तेही त्याचा द्वेष करूं लागले. त्याच्या ढिल्या राजकारभारामुळें त्याचें कोणावरहि वजन राहिलें नाहीं. लोक त्याच्या राज्याला 'पपाबाई'चें राज्य असें उपहासानें म्हणूं लागले. पपाबाई म्हणून एक राणी होऊन गेली. अव्यवस्थित राज्यपद्धतीमुळें तिची रजपुतांमध्यें उपहासात्मक ख्याती होती. विक्रमाजितानेंहि तिचाच धडा गिरविल्यामुळें लोकांनीं त्याला तीच पदवी बहाल केली असल्यास नवल काय ?

गुजराथच्या सुलतान बहादुराच्या बापाला संगाचा भाऊ पृथ्विराज यानें पूर्वीं चितोड एथें पकडून नेलें होतें. विक्रमाजिताच्या राज्यांतील ही अव्यवस्था पाहून बहादूरानें पूर्वींचा सूड उगविण्यास ही वेळ चांगली अहे असें पाहिलें, आणि चितोडवर चाल केली.

राणा संग इहलोक सोडून गेला त्यावेळीं विक्रमाजित गर्भांतच होता. त्याच्या उपहासात्मक राज्यपद्धतीमुळें लोक त्याला मेलेल्या बापाचा मुलगा असें म्हणत. सुलतानाच्या फौजेवर विक्रमाजित चालून गेला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. चितोड सहजासहजीं शत्रूला जिंकतां येणें केव्हांच शक्य नव्हतें. विक्रमाजित हरला असें पाहून चितोडकरितां हजारों रजपूत धांवून आले. देवळा, बुंदी, सोनीगड, अबू इत्यादि ठिकाणचे राजे आपापल्या सेनेसह चितोडच्या संरक्षणासाठीं रणांत उतरले, पण बहादुरशहाचें सैन्य लाब्रीखान नांवाच्या एका पोर्तुगीज सेनापतीच्या हाताखालीं असल्यामुळें रजपुतांचें बल चालेना. त्यांनीं आपली शिकस्त केली पण जेव्हां तेव्हां त्यांना माघारच खावी लागे. रजपुतांची अशी दाणादाण होत असलेली पाहून आपल्या पुत्राच्या नेभळ्या कृत्यामुळें हळहळणारी विक्रमाजिताची शूर माता वीरपत्नी जवाहीरबाई युद्धाचा पोषाख

चढवून रणचंडीप्रमाणें मुसलमानांवर तुटून पडली. तिच्या शौर्यानें बहादूरशहा थोडा वेळ चकितच झाला. पण त्याच्या आफाट सेना समुद्रांत या महा तेजस्वी ठिणगीचें तेज किती वेळ चमकत रहाणार!

आतां चितोडनगरी भयाण दिसूं लागली. जणु तिला रुधिराची तहानच लागली आहे, असें वाटत होतें. आतां आपला पराभव होणार हें निश्चित झाल्याबरोबर रजपुतांनीं आपल्या सर्व आशा तटा-तट तोडून, ते चितोडकरितां मरावयास सिद्ध झाले. जयापजयाची आतां त्यांना क्षीति नसल्यामुळें, सर्वांच्या चेहेऱ्यावर एकप्रकारचें भीषण तेज झळकत होतें.

## पिढीच्या पिढी लयाला गेली

संगराण्याची राणी कर्णावती हिच्या पाठोपाठ तेरा हजार रजपूत-युवती आपल्या परम पवित्र शरिराची दुष्टांकडून विटंबना होऊं नये म्हणून, चितोडनगरीला शेवटचें वंदन करून प्राणार्पणास सिद्ध झाल्या. किल्यांत एक महाविस्तीर्ण खाय खणून त्यांत दारू व इतर ज्वाला-ग्राही पदार्थ भरून टाकण्यांत आले. खाईच्या भोंवतीं महाराणी कर्णावतीप्रमुख सर्व आर्य स्त्रिया गोळा झाल्याबरोबर एका क्षणांत अग्निच्या प्रळयज्वाळा, जणू ब्रह्मांडगोळ एका निमिषार्धांत आपल्या उदरांत सांठविण्याच्या सदर्प मनीषेनें धग् धग् शब्द करीत आकाशा-कडे धांव घेऊं लागल्या. केवळ निश्वासानेच ज्यांचें शरीर होरपळून जाईल, अशीं शिरीषकुसुमाप्रमाणें ज्यांची शरीरें, त्यांना अशा प्रळयवन्हीची काय अवश्यकता होती? असें कोणी म्हणेल, परंतु शरिरानें जरी त्या इतक्या कोमल होत्या तरी मनानें त्या आतां वज्रापेक्षांहि कठीण झाल्या असल्यामुळें, अग्निनारायणाला सुद्धां

सौम्यपणें काम होणार नाहीं असें वाटलें आणि त्यानें असें उग्ररूप धारण केलें! डोळ्याचें पातें लवतें न लवतें तों सर्वांनीं त्या खाईत उडी घेतली! आणि पुढें काय? राख! राख! आणि राख! त्यावांचून कांहींच उरलें नाहीं! त्यांच्या बरोबरच सर्व रजपूतवीरांच्या महनीय आशांचीहि राख झाली, आणि ते केशरी झगे घालून जे रणांत शिरले, त्यांचा पराक्रम मात्र शत्रूच्या समशेरींना आणि वीरांना कळला असेल तेवढाच! बाकी कांहींच शिल्लक राहिलें नाहीं!!

सताड उघड्या पडलेल्या चितोडच्या महाद्वारांतून बहादूरशहा मोठ्या आशेनें नगरांत शिरला. पण तेथें प्रेतांवांचून त्याला कांहींच दिसलें नाहीं. तरीहि चितोड हातीं आल्याचा त्याला आनंदच झाला.

या युद्धांत रजपुतांची एक महापराक्रमी पिढीच्या पिढी लयाला गेली. या प्रसंगीं ३२००० रजपूतवीर चितोडकरितां खर्चीं पडले. काय हा जाज्वल्य अभिमान! केवढा हा स्वार्थत्याग!!

## राखीचें सामर्थ्य

हा सर्व अनर्थ टळणार होता, पण थोडी चुकामूक झाली. महाराणी कर्णावतीनें युद्धाचा अंदाज करून बाबराचा पुत्र **हुमायून** यास भगिनीच्या नात्यानें 'राखी' पाठवून त्याला सर्व वृत्तांत कळविला होता, आणि आपलें रक्षण करण्यासाठीं विनविलें होतें. रजपुतांत राखी पाठवून बंधूचें नातें जोडण्याची एक आश्चर्यकारक पद्धत आहे. महाक्रूरस्वभावाचे यवन सुद्धां या राखीपुढें नमले असल्याचीं इतिहासांत अनेक उदाहरणें आहेत. औरंगजेब एवढा कपटी पण एका राखीच्या सहाय्यानें चितोडच्या राणीनें त्याच्याशीं बंधुत्वाचें नातें जोडिलें होतें.

कर्णावतीचें पत्र आणि राखी मोठ्या आनंदानें स्वीकारून, हुमायून बंगालवर चाल करून निघाला होता, पण तें काम तसेंच टाकून तो चितोडच्या मदतीकरितां तिकडून तसाच चितोडकडे आला; पण तो येण्यापूर्वीच चितोडची कठीण अवस्था होऊन चुकली होती. त्यामुळें हुमायुनास फार खेद झाला व त्यानें बहादूरशहास हांकून देऊन विक्रमाजितास पुनः गादीवर बसविलें. अशा प्रकारें त्यानें आपलें भगिनी प्रेम व्यक्त केलें.

अशा चमत्कारिक रीतीनें विक्रमाजित पुनः चितोडच्या गादीवर आला पण त्याचा स्वभाव बदलणें शक्यच नव्हतें.

एकदां महाराणा संग याला विपत्कालीं आश्रय देणाऱ्या वृद्ध करमचंदावर विक्रमादित्यानें भर सभेंत शस्त्र प्रहार केला. भीष्मासारख्या सन्मान्य वृद्ध नृपावर अशी वेळ येतांच राजाला देव समजणारे रजपूतहि चिडले. त्यांनीं आतां याचे शंभर अपराध भरले असें ठरवून त्याला पदच्युत केला. प्रजेचें अनहित करणाऱ्या राजाबद्दल ते कधीं कधीं असें कठोर वर्तन करीत.

रजपुतांनीं पृथ्वीराजाचा दासीपुत्र बनबीर याच्या करवीं हें कृत्य करून त्याला तात्पुरतें राज्यपद दिलें, आणि सर्वत्र शांतता झाली. आपला गादीवर बसण्याचा खरा अधिकार नाहीं हें बनबीर जाणून होता. तरी संगाचा पुत्र उदयसिंह हा लहान आहे तोंपर्यंत आपण राज्य करावें असें त्यानें ठरविलें होतें. पण राज्य हातीं आल्याबरोबर त्याची मती पालटली; व त्याच्या मनांत निरनिराळे घातकी विचार घोळूं लागले. त्याची सविस्तर हकिगत पुढील प्रकरणांत देऊं.

बाप्पारावळापासून आपण जो इतिहास पाहिला त्यावरून चितो-

डची प्राचीनता, तिचें प्राचीन वैभव, तिच्यावरील रजपुतांचें अकृत्रिम प्रेम, आणि अर्थातच चितोडकरितां केव्हांहि आत्मबलिदान करण्याची त्यांची सिद्धता, या गोष्टी आपल्या ध्यानांत आल्यावांचून रहाणार नाहींत. रजपुतांच्या अचाट शौर्यानें तर वाचक दिपूनच जातील. पण फितूरीनें व दुर्दैवानें त्यांच्यावर काळाची वक्रदृष्टी झालेली पाहून वाचकांचें हृदय तिळतिळ तुटल्यावांचून रहाणार नाहीं. यापुढील सर्व वृत्तांत तर परिणामी दुःखाचाच आहे. दुःखांतूनच सुख निघत असतें असें म्हणतात तिकडे लक्ष देऊन आर्य-स्त्री पुरुषांना स्वधर्माची व स्वकर्तव्याची जाणीव उत्पन्न व्हावी या आशेनें त्या महाभाग प्रतापचें तेजस्वी चरित्र पुढील प्रकरणांतून यथामती कथन करण्याचें ठरविलें आहे.

## —बनबीर आणि राणा उदेसिंग—

### प्रकरण ५ वें.

रजपुत मंत्रि मंडळीच्या सल्यानें बनबीर चितोडच्या सिंहासनावर बसला. सत्ता हातीं येण्याचे पूर्वीं त्याची जी वृत्ती होती ती आतां कायम राहिली नाहीं. त्याला राज्याचा मोह सुटला. संगाचा एक अज्ञान पुत्र आहे, तो मोठा झाल्यावर गादीचा अधिकार त्याच्याकडे जाईल, हे विचार त्याला चैन पडूं देईनात. वास्तविक उदयसिंह अवघा सहा वर्षांचा होता. त्यामुळें कांहीं वर्षें तरी बनबीराला सुखानें राज्योपभोग घेतां येणार होता; पण लोभ मोठा अनिवार असतो हेंच खरें! आपण दासीपुत्र आणि गादीचा खरा वारस जिवंत, असें असतांना बनबीराच्या भाग्यानें त्याला चितोडच्या गादीवर बसण्याचा मान मिळाला होता. एवढ्यांतच संतुष्ट राहिला असता तर त्याचें अनहित झालें असतें असें मुळींच नाहीं. पण त्याच्या लोभाला अंकुर फुटले आणि उदयसिंगाला जगांतून नाहींसा करण्याचा भयंकर विचार त्याच्या मनांत आला.

कितीहि भलभलते विचार मनांत आले तरी थोर पुरुष विवेकानें ते तेथल्यातेथें दडपून टाकितात. त्यांच्या आधीन होत नाहींत. पण या दासीपुत्राला एवढा विवेक कसला होणार!

आज त्यानें तें महाभयंकर कृत्य उरकून घेण्याचा निश्चयच केला होता. रात्र केव्हां एकदां येते असें त्याला होऊन गेलें होतें.

रात्र काय! ठरलेल्या वेळीं तिला बिचारीला कामावर हजर

झालेंच पाहिजे. उदयसिंग, निरागस आणि खेळाडू अर्भक तें ! दूधभात जेऊन दाईच्या अंगावर पडल्याबरोबर चटकन् झोंप लागली त्याला. त्याला पाळण्यांत ठेऊन दाई दुसऱ्या कामाला जायची, तोंच राजस्त्रियांचा आक्रोश तिच्या कानावर आला. उदयसिंगाचें उष्टें काढण्याकरितां आलेल्या राजपुत्राच्या सेवेंतील न्हाव्याला तिनें काय गडबड झाली आहे म्हणून विचारलें. तेव्हां बनबीरानें विक्रमादित्याचा वध केल्याचें वर्तमान तिला कळलें. हा प्रकार ऐकून त्या चाणाक्ष बाईच्या मनांत शंका आली, आणि अधिक वेळ न घालवितां तिनें कांहीं बेत ठरविला.

## दाईची स्वामिनिष्ठा

चटकन तिनें एक टोपली आणली आणि नुकत्याच झोंपी गेलेल्या उदयसिंगाला तिनें त्यांत ठेविलें. मुलाच्या आजूबाजूला कांहीं पानें व फळें घालून तिनें टोपली भरली आणि ती न्हाव्याला म्हणाली– खाल्लेल्या मिठाला जागण्याची वेळ आली आहे. राज्यलोभानें बेभान झालेल्या बनबीराकडून आपल्या खऱ्या धन्याला धोका होण्याचा संभव दिसत आहे, तेव्हां राजपुत्राला घेऊन तूं किल्याखालीं जा. मागाहून मी येतेंच.

न्हाव्यानें ती टोपली उचलली आणि तो बाहेर निघून गेला. इकडे त्या परम प्रामाणिक आणि स्वामिनिष्ठ दाईनें उदयसिंगाच्या-वयाचा तिचा पुत्र होता त्याला राजपुत्राच्या जागीं निजविलें आणि त्याला वारा घालीत ती तेथें बसली. इतका प्रकार होतो न होतो तोंच तिच्या कल्पनेप्रमाणें नागवी तरवार हातांत घेऊन उदयसिंगाचा शोध करीत बनबीर तेथें आला, आणि 'कुठें आहे तो कारटा उदयसिंग ?' असें त्यानें दाईला दरडावून विचारलें.

५२६८



पोटच्या पोराला आपल्या हातानें प्रत्यक्ष काळाच्या हातीं द्यावा लागत आहे, हें पाहून तिला काय वाटलें असेल बरें ! पण तिनें आपलें मन घट्ट केलें आणि तोंडानें कांहींच न बोलवल्यामुळें जड हातानें पाळण्याकडे बोट दाखविलें. मुलाकडे त्या क्रूर राज्यलोभी वनबीराची दृष्टी मात्र गेली तोंच त्याची पापी कट्यार त्या झोंपी गेलेल्या निरपराधी अर्भकाचें पोट फोडून मोकळी झाली. संगाच्या वंशाचा तो एकटा एक अवशिष्ठ अंकूर चुरडला गेल्याचें वर्तमान कळतांच राजस्त्रियांनीं आकांत केला. आपल्या पोटच्या पोराला बळी देऊन राजपुत्राला कोणीं वांचविलें असेल असें कोणाच्या स्वप्नांतहि आलें नाहीं. त्या दाईचें नांव ‘ पन्ना ’ असें होतें.

दीन बापडी पन्ना ! तिनें कृतार्थतेचे सुस्कारे टाकीत वनबीर निघून गेल्यावर आपल्या बाळाचें प्रेत मांडीवर घेतलें मात्र, तों तिचें हृदय पिळवटून आलें, आणि गळा मोकळा सुटला ! कर्तव्यनिष्ठेच्या भरांत तिनें हें कृत्य केलें खरें, पण मुलाचें प्रेत अंकावर घेतल्यावर तिला धीर धरवेना. ती ओक्साबोक्षी रडूं लागली. आपल्या हातानें पोटचा गोळा धगधगीत निखाऱ्यांवर टाकणारी मी, आहें तरी कोण ! असेंहि तिला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. पण थोड्याच वेळांत तिला आपल्या पुढील कर्तव्याची जाणीव झाली, आणि आपल्या मुलाला उद्देशून ती म्हणाली. बाळ तुझा जीव गेला खरा, पण त्याच्याबद्दल तुला फारच मोठा मोबदला मिळाला आहे. चितोडच्या अधिपतीचे प्राण वांचविणें हें लहान सहान काम नाहीं बरें ! असें म्हणून तिनें विवेक केला, आणि आपल्या पुत्राचें दहन करून ती पुढील कार्यासाठीं तेथून निघाली. पन्ने, ही स्वामिनिष्ठा, ही कर्तव्य-दक्षता आणि हें धैर्य तुला कुणी ग शिकविलें ! बाई, तुझी धन्य आहे !

पुत्रशोकाचें सर्व दुःख गिळून पन्ना उदेसिंगाच्या पुढील व्यवस्थे-करितां निघाली. पन्नेच्या सांगण्याप्रमाणें त्या प्रामाणिक न्हाव्यानें आपलें काम उत्तम रीतीनें पार पाडलें होतें. चितोडच्या पश्चिमेस नदीच्या तीरावर तो राजपुत्राला घेऊन पन्नेची वाट पहात बसला. इतक्यांत पन्ना तेथें आलीच. त्याला झालेला सर्व वृत्तांत सांगून आतां राजपुत्राचें रक्षण करणें आपलें पवित्र कर्तव्य आहे, याची तिनें त्या स्वामिनिष्ठ न्हाव्याला पूर्ण जाणीव करून दिली; आणि रात्र-अपरात्र न पहातां तीं दोघें राजपुत्राला घेऊन देवळा येथें सिंहराव याजपाशीं आलीं. तेथें जर पन्नेची इच्छा पूर्ण झाली असती तर मग दुर्दैवाची करामत ती काय ? आणि मग पन्नेची स्वामिनिष्ठा तरी अधिक खुलून कशी दिसली असती ! सिंहरावाला बनवीराचें भय वाटलें, आणि राजपुत्राला आश्रय दिला तर आपला सर्वस्वी नाश झाल्यावांचून रहाणार नाहीं, या धास्तीनें त्यानें पन्नेचें म्हणणें मान्य केलें नाहीं. पन्ना तेथून निघाली ती डोंगरपूर एथें राणा यशकर्ण याच्याजवळ जाऊन तिनें त्याची प्रार्थना केली. सिंहरावा-प्रमाणें यशकर्णानेंहि भ्याडपणाच दाखविला. वास्तविक हे दोघेहि चितोडच्या राजवंशांतील वडील शाखेचे होते; व म्हणूनच पन्नेला मोठी आशा होती पण भरंवशाचीं ठिकाणें निरुपयोगी ठरल्यामुळें जरी तिची निराशा झाली, तरी तिनें आपलें धैर्य लवभरहि चळूं दिलें नाहीं. तिनें विश्वासू भिल्लांचें साह्य घेतलें आणि अरवली-पर्वताच्या डोंगरी रस्त्यांतून आणि दऱ्याखोऱ्यांतून ईडर प्रांत ओलांडून ती कुमळनेरास आली. डेप्रा नांवाच्या एका वणिक् कुळांतील आशाशाह नांवाचा एक जैन राजा त्या ठिकाणीं राज्य करीत होता. चितोडच्या राजांचे सर्वांप्रमाणें याच्यावरहि बरेच उपकार झाले होते.

'त्यासि परावे रक्षिती'। या सिद्धांताप्रमाणें झालें तर पहावें अशी पन्नेनें अटकळ बांधली असावी. तिनें परवानगी काढून राजाची भेट घेतली आणि उदयसिंहाला त्याचे मांडीवर ठेवून ती हात जोडून म्हणाली 'आपल्या राजाचा सांभाळ करा!'

उदयसिंहाकडे पाहून आशाशाह यास करुणा आली पण त्याला अभय देण्याचें त्याला धैर्य होईना; पण त्याची वृद्ध आई तेथें होती तिनें यावेळीं जोर केला. आशाशाह राजपुत्राला आपल्या अंकावरून खालीं उतरण्याच्या बेतांत असलेला पाहून ती त्याला म्हणाली–'मुला, भिऊं नकोस! संगराण्याचा पुत्र तुझा धनी आहे. आज तो संकटांत सांपडला असून तुझ्या आश्रयाला आला आहे हें भाग्य समज, आणि त्याच्यासाठीं सोसाव्या लागणाऱ्या आपत्तींना सुखानें तोंड दे. भगवान तुझें कल्याण करील.' योग्य वेळीं मातेनें दिलेल्या उत्तेजनाचा आशाशहावर चांगलाच परिणाम झाला, आणि त्यानें पन्नेचें म्हणणें मान्य केलें. पन्नेला आतां किती आनंद झाला असेल बरें! उदयसिंहाला तेथें ठेऊन तिला सोडून जाववत नव्हतें तरी आपल्या एथें रहाण्यानें कांहीं धोका होण्याचा संभव म्हणून न्हाव्यासह ती चितोड एथें परत गेली.

इकडे आशाशहाचा भाचा म्हणून, उदयसिंह तेथें सुखानें काल कंठूं लागला. थोड्याच दिवसांत अनेक बारीकसारीक गोष्टींवरून लोकांना त्याच्याबद्दल शंका येऊं लागली. हळूहळू रजपुतांना आंतून आंतून सर्व वृत्तांत कळला. एकदां आशाशहाच्या वडिलांच्या श्राद्धाचे वेळीं पुष्कळ रजपुतांनाहि भोजनास पाचारण केलें होतें. एकीकडे रजपूत आणि एकीकडे जैन अशा पंक्ती बसल्या होत्या. त्या त्या पंक्तीचे वाढपीहि निरनिराळे होते. उदयसिंगहि दोन्ही पंक्तींतून

मधून मधून कांहीं वाढीत होता, पण रजपुतांनीं त्याला कांहीं हरकत केली नाहीं. तेव्हां लोकांना अधिकच शंका वाटूं लागली व मोठमोठे रजपूत राजे उदयसिंहाची भेट घेऊन जाऊं लागले. शेवटीं एक मोठा दरबार भरवून आशाशहानें पन्ना व तो न्हावी यांच्याकडून सर्व हकीगत लोकांस ऐकविली. त्यावेळीं प्रमुख प्रमुख सर्व रजपुत राजे त्या ठिकाणीं आले होते. साळुंब्रापति ठाकूर, चोंडाचा वकील, केळव्याचा जगो, बहोरचा संग कोठारिया, आणि बेडला येथील चव्हाण, बिजोलीचा परभार, सोनोगडचा अखिराज, सांचोराचा पृथ्वीराज आणि लोणकर्ण जेठावत इत्यादि सर्व पुढारी मंडळी कुमळनेरास जमली होती.

पन्नादाईच्या मुखानें अंतःकरणास पीळ पाडणारी प्रारंभापासूनची हकीगत ऐकून संगराण्याचा पुत्र बनबीरानें मारला असें जें म्हणतात, तें खोटें असून चितोडच्या गादीचा खरा वारस बनवीराच्या दुर्दैवानें आणि बाकी सर्वांच्या सुदैवानें एथें सुखरूपपणें वास करीत आहे; अशी सर्वांची खात्री झाली.

जमलेल्या सर्व मंडळींत वडा व वृद्ध, अशा कोठारियाच्या चव्हाणाला हा सर्व गुप्त व्यवहार पहिल्यापासून माहीत होता. आशाशहानें उदयसिंगाला त्याच्या मांडीवर बसवून, इतउप्पर आपण राजपुत्राचा सांभाळ करा असें सांगितलें. त्यानें ती गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली; आणि सर्वांची पूर्ण खात्री होण्याकरितां सर्वांच्या देखत उदयसिंगासह एका ताटांत भोजन केलें. सर्वांचा आनंद गगनांत मावेना. सोनीगडच्या ठाकूरानें तर उदयसिंहाला आपली मुलगी देऊन त्याच्याशीं सख्य केलें. पूर्वीं हमीराला याच्या पूर्वजांनीं गतभर्तृका कन्या दिल्यामुळें चितोडच्या राजघराण्याशीं

सोनीगडचा बेटीव्यवहार बंद झाला होता, तो यावेळेपासून पुनः सुरू झाला. पुढें लौकरच मेवाडचे सर्व राजे व ठाकूर जमून त्यांनीं कुंभो येथील किल्यांत उदयसिंगास चितोडचा राणा, असें ठरवून त्याच्या मस्तकीं टिळा लाविला, व पद्धतीप्रमाणें सर्वांनीं त्याला मुजरे केले. पुढें झालावाडच्या राण्यानेंहि उदयसिंगाला आपली कन्या दिली.

बनबीराच्या उर्मट वर्तनानें आणि अरेरावीनें सर्व लोक त्याला कंटाळले होते. उदयसिंग चितोडचा राणा असें प्रसिद्ध होतांच ठिकठिकाणच्या सर्व ठाकूर, राव, रावळांकडून त्याला यथाशक्ती भेटी आल्या, पण माहोलीचा सोळंखी व ठाण्याचा मालोजी यांनीं राण्याचा कांहींच सन्मान केला नाहीं. या अपमानाचें उट्टें काढण्याचा सर्वांनीं विचार केला आणि त्यांतच बनबीराचा समाचार घेण्याचेंहि त्यांनीं ठरविलें. या झटापटींत मालोजी प्राणास मुकला आणि सोळंखी शरण आला. तेव्हां रजपुतांचा मोर्चा बनबीराकडे वळला पण त्यानें निमूटपणें किल्ला खालीं करून दिल्यामुळें युद्ध टळलें. बनबीर पुढें आपल्या सर्व मंडळीसह दक्षिणेंत गेला. नागपूरकर भोसले हे बनबीराचेच वंशज होत असें म्हणतात.

अशा प्रकारें इ. स. १५४१–४२ सांत उदयसिंगाला चितोडची गादी मिळाली. ही अद्‌भुत नवलकथा रजपूत स्त्रिया निरनिराळ्या प्रसंगीं मोठ्या आवडीनें अद्यापि गातात.

एवढ्या आनंदानें आणि उत्सुकतेनें उदयसिंगाला सर्व रजपुतांनीं गादीवर बसविलें खरें, पण शौर्यधैर्यादि राज्यशकट हांकण्यास अत्यंत अवश्य असा कोणताच सद्‌गुण त्यांचे अंगीं नव्हता. लहानपणा-पासून दुसऱ्याच्या घरीं राहिल्यामुळें उदयसिंगाला जबाबदारीची

जाणीव नाहींशीं झाली होती. एकंदरींत आतां चितोडच्या क्षितिजावर पापग्रह चमकूं लागले होते, एवढें खरें ! दोन वेळां महाभयंकर जोहार आणि अनेक युद्धप्रसंग यांनीं चितोडची रुधिरतृष्णा आतां वास्तविक शमावयास पाहिजे होती पण तसें मुळींच न होतां याच्या उलटच प्रकार घडून आला. मनुष्याची इच्छा एक असते तर कालाचे भलतेच विचार चाललेले असतात ! श्री, कांती, आणि स्वतंत्रता या चितोडच्या जणु देवताच, पण कालाला त्यांचें चिरसौभाग्य पहावत नाहींसें झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं !

इकडे कुमळनेरच्या राजमंदिरांत ज्या वर्षी उदयसिंगाला चितोडचा खरा वारस ठरवून, मोठा आनंदोत्सव करण्यांत आला, त्याच वर्षी अमरकोट एथें एक महापराक्रमी यवन जन्मास आला. त्याच्या किर्ती सुगंधानें लौकरच दशदिशा दरवळून गेल्या. सुप्रसिद्ध यवनराजाधिराज अकबर तो हाच.

बाबराचा पुत्र हुमायून चितोडच्या संरक्षणार्थ बंगालची स्वारी रहित करून आला होता तें वाचकांना स्मरतच असेल. त्याच्यावर पुढें मोठे कठीण दिवस आले. आपापसांतील कलह हे हिंदूनांच वाहिलेले आहेत असें मुळींच नाहीं. हुमायूनाच्या भावाचें व त्याचें पटेना व त्यांच्यांत मोठ्या चुरशीचा कलह लागला. ठरलेल्या सिद्धातांप्रमाणें या दोघांच्या भांडणाचा तिसऱ्यानेंच म्हणजे शिरशहा नामक पठाणानें लाभ घेऊन त्यानें हुमायूनाचा पराभव केला व त्याला त्यानें लाहोरापर्यंत पिटाळून लाविलें. पुढें हुमायूनानें नाना प्रकारच्या यातना सोसून व अनेक हिंदूराजांना शरण जाऊन, शेवटीं तो अमरकोटच्या राजाच्या आश्रयास राहिला. तेथें असतानांच इ. स. १५४२ मध्यें त्याला अकबर या नांवाचा महापराक्रमी पुत्र

झाला. हा मोठा पराक्रमी आणि महत्वाकांक्षी होता. त्यानें आपल्या वयाच्या १२ व्या वर्षींच दिल्लीच्या बादशहाला जिंकिलें, आणि अत्यंत हालअपेष्टा सोसून दुसऱ्या राजाच्या आश्रयास राहिलेल्या आपल्या बापाला त्यानें संतुष्ट केलें. पुढें हुमायून दिल्ली एथें आपल्या वाचनालयाच्या गच्चीवर ग्रंथ वाचीत असतां तेथून खालीं पडला आणि त्यांतच त्याचा अंत झाला. हुमायून मोठा विद्याव्यासंगी होता.

हुमायूनानंतर दिल्लीच्या गादीवर अकबर बसला. तो शूर होता हें पूर्वींच सांगितलें आहे. त्यानें हळूहळू आपल्या राज्याचा जम उत्तम बसवून पुष्कळ रजपूतराजांवरहि त्यानें जरब बसविली. कांहीं राजांवर त्यानें स्वारी केली तर कांहीं राजे त्याचा पराक्रम पाहूनच त्याला शरण आले. अकबर शूर तर होताच पण त्याचें भाग्यहि फार मोठें होतें. स्वधर्माच्या मार्गावर आपल्या कातडीच्या पायघड्या घालून जे रजपूतवीर आर्य संस्कृतीला पंचप्राणांचे दिवे मोठ्या आनंदानें ओवाळावयाचे, तेच रजपूत आपल्या मुली घेऊन अकबरासारख्या एका मुसलमान राजाची कृपा संपादन करण्यासाठीं त्याला शरण जातील ही गोष्ट कल्पनेंत तरी शक्य वाटते काय? पण कधीं कधीं कल्पनेंतहि न येणाऱ्या गोष्टी सुद्धां ईश्वरी सृष्टींत प्रत्यक्ष घडून येतात, आणि मग त्यांची कारणमीमांसा शोधीत पुष्कळ लोक आपल्या आयुष्याचे कित्येक दिवस घालवीत बसतात.

एकाच वेळीं चितोड आणि दिल्ली एथें राज्य करणारे दोन निरनिराळे राजे अगदीं परस्पर विरुद्ध अशा धर्मांनीं युक्त होते. खेदाची गोष्ट अशी कीं, अकबराचे अंगीं सार्वभौम होण्याचे गुण होते आणि उदयसिंग मात्र सामान्य राज्य चालविण्याच्याहि योग्यतेचा नव्हता.

महाराणा संगाचे वेळीं त्याच्याच तोडीचा बाबर चितोडवर चाल करून आला तेव्हां संगाचा जरी पराभव झाला होता तरी बाबराची संगावर चाल करण्याची पुनः छाती झाली नाहीं, पण लगेच त्याच्या पुढच्याच पिढींत चितोडच्या गादीवर उदयसिंगासारखा पराक्रम-शून्य राणा असावा आणि दिल्लीला अकबरासारखा महापराक्रमी बादशहा व्हावा ही केवळ ईश्वरी योगायोगाचीच गोष्ट असें म्हणावें लागतें !!

अशा स्थितींत चितोडची राज्यलक्ष्मी तरी चितोडला कंटाळली असली पाहिजे किंवा इतकीं शतकें मोठ्या मानानें वैभवाचा तोरा मिरवीत दिमाखानें कालकंठना करणाऱ्या चितोडच्या भाग्यलक्ष्मीचें तें वैभव सहन न होऊन दुष्ट काळानें तरी तिचा नक्षा उतरण्याचा पण केला असला पाहिजे, असें म्हणण्यावाचून गत्यंतर नाहीं.

चितोडची अशी केविलवाणी स्थिती असतांना संग्रामशूर अकबरानें चितोडवर चाल केली. एवढें म्हटल्याबरोबर यापुढें काय झाले हें सांगण्याचें कारण उरत नाहीं. पण मंगल प्रसंगांत जर वरातीपासून विड्या तोडण्यापर्यंत सर्व लहान मोठे आनंदाचे प्रसंग आपण मोठ्या उत्सुकतेनें आणि हुरूपानें पाहतों तर अंत्येष्टीचे रोमांचकारी प्रसंग तरी टाकून कसें चालेल याच भावनेनें त्या स्वारीची हकीगत काय आहे ती पुढें देतों.

या स्वारीचें वर्णन मुसलमान इतिहासकारांनीं आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें एकमार्गी दिलें आहे. मुसलमान इतिहासकार ज्या वेळीं मुसलमानांचा पाडाव झालेला असेल तेवढा विषय कधींकधीं अजिबात गाळून टाकावयासहि कमी करीत नाहींत. यावेळींसुद्धां त्यांनीं

असेंच केलें आहे. चितोड जिंकण्यासाठीं अशा विपन्न स्थितींतहि अकबराला दोन वेळां स्वारी करावी लागली ही त्यांतल्या त्यांत अभिमानाची गोष्ट आहे, पण मुसलमानांनीं या वेळच्या पहिल्या स्वारीचें वर्तमान जाणून बुजून टाळलें आहे. त्यांनीं असें कां केलें तें पुढील हकीगतीवरून ध्यानांत येईल.

पुष्कळसे रजपूत हळूहळू आपलेसे केल्यावर अकबरानें चितोडवर आपल्या अफाट फौजेसह चाल केली. लहानपणापासून जरी दुसऱ्याकडे वाढावें लागलें तरी दुःख क्लेश आणि विघ्न हें कधींच ठाऊक नसल्यामुळें उदयसिंग केवळ सुखाला लाचावलेला असल्यास त्यांत काय नवल ! सुख झालें तरी तें टिकविण्यासाठीं दुःखाचा अनुभव असावा लागतो. उदयसिंग अकबराचे सैन्याशीं झुंजण्याकरितां पुढें झाला खरा, पण धाडस नाहीं, पराक्रम नाहीं किंवा एकादी प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा हट्टहि नाहीं. मग त्याच्याकडून सेनेला प्रोत्साहन तरी कसें मिळावें ! शेवटीं रजपूत सेनेचा हुरूप नष्ट झाला आणि उदयसिंग शत्रूच्या हातीं लागला.

बाप्पारावळाच्या या महाप्रसिद्ध घराण्यांत अशी दुःखद गोष्ट आजपर्यंत कधींहि झाली नव्हती. अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे आपला राजाधिराज पकडला गेला, चितोडचा अधिपती रणांत पराभूत होऊन यवनांचा कैदी झाला, ही हृदयविदीर्ण करणारी हकीगत ऐकूनहि रजपूत स्वस्थ बसले. राजाच्या मुक्ततेची काय व्यवस्था करावी याची कोणी चौकशीहि करीना. केवढी खेदाची आणि आश्चर्याची गोष्ट अहे ही ! ज्या चितोडकरितां हजारों युवक–युवती मृत्यूला ठोकर देऊन मोठ्या आनंदानें स्वर्गाची वाट पतकरीत,

त्याच चितोडची केविलवाणी मुद्रा, त्याच रजपूत युवक-युवती आज सुखानें पाहात होत्या, पण कोणाला त्याबद्दल कांहीं विषाद वाटत नव्हता. ही संतापजनक दु:खकारक आणि मोठ्या नामुष्कीची गोष्ट पाहून उदयसिंगाच्या एका रखेलीच्या अंगांत शौर्यानें संचार केला. तिला वाटलें, मेवाडांतील सर्व वीर आज नष्ट झाले काय ? रजपूत वीरांचें तें सळसळणारें रक्त आज पार आटलें काय ? का वीरांची खाण अशी ही मेवाडभूमि मेषपात्रांनाच जन्म देऊं लागली आहे ! एवढ्या मोठ्या चितोडनगरींत आज एकहि रजपूत वीर जिवंत नाहींना ! धडधडीत आपल्या डोळ्यांदेखत मातृभूमीची विटंबना होत असून, तिचा पति उदयसिंग याच्या मुसक्या बांधून शत्रू त्याला अपमानानें फरफरां ओढीत आहे तरीहि ज्याची शांती लवभरहि ढळली नाहीं असे हे रजपूत, परमहंस तर नाहींतच मग हे षंढच झाले काय ? का रजपूत वीरांगनांनीं हल्लीं भावनाशून्य आणि निरवयव मांस पिंडानांच जन्म देण्याचें ठरविलें आहे ! धिक्कार ! धिक्कार असो रजपुतांच्या या कर्तव्यविन्मुख भ्याडवृत्तीला !

असें म्हणून तिनें एक भलें भक्कम पोलादी कवच आपल्या अंगांत घातलें आणि तीक्ष्ण शस्त्रें घेऊन ती एका चलाख घोड्यावर स्वार झाली व भगवान एकलिंगजीचें स्मरण करून तिनें डिवचलेल्या नागिणीप्रमाणें यवनसेनेंत झेप घेतली. तिच्या अंगांत जणूं रुद्र चंडीनेंच संचार केला आहे असें वाटे. हां हां म्हणतां आपल्या भयंकर भाल्यानें व तीक्ष्ण बाणांनीं तिनें शत्रूची फळी फोडून मुसलमानांवर अचानकपणें निकराचा हल्ला चढविला व कित्येक मुसलमान वीरांना धारातीर्थीं लोळविलें. थोड्याच वेळांत ती चपळ गतीनें थेट अकबराच्या मुख्य छावणीजवळ आली. यावेळीं ती

इतकी चवताळली होती कीं तिच्या दारुण पराक्रमानें शहानशहा दिल्लीपति वीरश्रेष्ठ अकबर चकित झाला. त्याला अनेक प्रकारच्या भ्यासूर कल्पनांनीं भेवडाविलें आणि त्यानें रणांतून पाय काढिला. अपमानाची चीड स्वदेशप्रेम आणि कर्तव्याची जाणीव अंगांत संचरल्याबरोबर यःकश्चित एका स्त्रीनें, एका वेश्येनें ! भारतसम्राट अकबरासारख्या वीराला रणांतून हांकलून देण्यासारखा पराक्रम करावा, ही गोष्ट पुनः पुनः लक्षांत घेण्यासारखी आहे. एका रजपूत रमणीचें एवढें हें अचाट शौर्य रजपूतांच्या इतिहासांत अमर होऊन राहील यांत काय शंका आहे !

आपल्या प्रचंड शौर्यानें अकबराला रणांतून पळवून लावून उदयसिंगासह ती रणचंडी गर्जना करीत चितोड नगरांत प्रविष्ट झाली. खरोखर त्या वीर ललनेचा पराक्रम किती कौतुकास्पद होता ! पण चितोडची परिस्थिति अशी चमत्कारिक झाली होती कीं तिचें कौतुक तर कोणी केलें नाहींच, पण राजसभेंत उदयसिंगानें कृतज्ञतेनें तिच्याविषयीं काढलेले गौरवोद्गारहि रजपुत वीरांस सहन झाले नाहींत. अर्थात् रजपुतांच्या मनांत असे विचार येण्यालाहि कांहीं कारणें असतीलच असें नाहीं; पण असलें तरी जें झालें ते रजपूतांनीं चांगलें केलें असें मात्र मुळींच म्हणवत नाहीं. त्यांनीं अशा त्या महापराक्रमी आणि अभिमानी बाईचा वध केला ! बाईचा पराक्रम सांगतांना जितका अभिमान वाटतो तितकाच रजपुतांचें हें कृत्य पाहून संताप येतो, खेद वाटतो आणि मन विषण्ण होतें.

एका अबलेनें आपल्या राजाला शत्रूच्या हातून सोडवून आणिलें, एवढ्या एकाच गोष्टीनें शूरांना खरोखर फार आनंद व्हावयास पाहिजे

होता. पण राष्ट्र पारतंत्र्याच्या पंकांत पडावयाचें असलें किंवा पडलें असेल तर, तसेंच पिचत पडावयाचें असलें, म्हणजे मुख्य जर कांहीं होत असेल तर प्रथम दुसऱ्याचा उत्कर्ष पहाववत नाहींसा होतो. स्वजनांचा उत्कर्ष जोंपर्यंत सहन होऊं लागला नाहीं तोंपर्यंत राष्ट्र उन्नत होण्याची मुळींच आशा नको. ती उदयसिंगाची वेश्या होती. तिच्या आज्ञेंत मोठमोठ्या वीरांना उदयसिंगाच्या इच्छेखालीं रहावें लागे. त्यामुळें रजपूतवीरांचा अपमान होई. या सगळ्या गोष्टी जरी जमेस धरिल्या तरी त्या बाईच्या या आणीबाणीच्या प्रसंगींचा हा एकच पराक्रम तिच्याबद्दल आदर उत्पन्न होण्यास पुरे होता. एकदां उदयसिंगाला पकडून जर अकबर दिल्लीस गेला असता तर राजाची मुक्तता करणें रजपुतांना-त्या रजपुतांना-शक्य होतें काय ? ज्या वीरांना डोळ्यांदेखत आपल्या नृपाला शत्रू धरून नेत आहे हें पाहूनहि आपल्या कर्तव्याची जाणीव उत्पन्न झाली नाहीं, त्यांना उदयसिंग एकदां डोळ्यांआड झाल्यावर त्याची सुटका करण्याची बुद्धी झालीच असती असें म्हणण्यास काय आधार आहे ?

उदयसिंगाची सुटका करणाऱ्या त्या महातेजस्विनीचा वध झाल्यानंतर, चितोडनगरांत मोठा असंतोष आणि अंदाधुंदी माजल्यासारखी झाली. कोणाचें कोणावर वजन नाहींसें झालें. कोणाला कसलाच अभिमान नसल्यासारखें होऊन गेलें. हा सर्व वृत्तांत अर्थातच अकबरास कळला तेव्हां त्याला आनंद वाटणें सहाजिकच होतें. चितोड एथें झालेला अपमान विसरून जाण्यासारखी त्याची नेभळी वृत्ती नव्हती. इतकेंच नाहीं तर झालेल्या अपमानाचा केव्हां एकदा सूड उगवीन असें त्याला क्षणोक्षणी वाटत होतें. चितोडमध्यें फाटाफूट झाली आहे हें जेव्हां त्याला कळलें तेव्हां तो या संधीचा कां बरें

लाभ घेणार नाहीं ! शत्रूवरील आपत्ती हीच तर आपली पर्वणी असें राजनीतीचें मुख्य तत्व आहे. अकबरानें ही पर्वणी वायां जाऊं द्यावयाची नाहीं असा निश्चय केला आणि आपल्या अफाट सेनेसह तो पुनः चितोडवर चाल करून आला.

अकबर आल्याचें वर्तमान कळल्याबरोबर भित्र्या उदयसिंगानें चितोड सोडलें आणि तेथून तो पळून गेला.

आतां चितोडचें रक्षण कोण करणार ! जिच्या अंगणांत प्राचीन काळापासून चिंतामण्याची पखरण पडलेली असे तिला स्वसंरक्षणासाठीं उपयोगांत आणील म्हणावें तर चार दगडहि मिळण्याची मुष्कील झाली ! जिच्या द्वारासमोर मोठमोठे गजराज सुवर्ण शृंखला निबद्ध होत्साते मोठ्या डौलानें झुलत असावयाचे, त्या चितोडदेवीला फांस लावून जीव देईन म्हटलें तर सुतळीचा तोडाहि मिळण्याची मुष्कील झाली ! खरोखर कालगती मोठी विचित्र आहे. उदयसिंगाच्या पलायनामुळें चितोडची अशी दुःखद स्थिती झालेली पाहून दुष्ट अकबराला अधिकच द्वेष आला.

चितोडचा आश्रय तुटला. उदयसिंग पळून गेला. आतां चितोडचें रक्षण करण्यास कोणीच राहिलें नाहीं. असा वृत्तांत कळला मात्र ! तो काय चमत्कार सांगावा ! जणु चितोडच्या आसपासच्या रानांतील दगडाधोंड्यांनाच जीव आला कीं काय ! असा क्षणभर प्रेक्षकांस भास झाला. चितोडच्या रणभूमीवरील पूर्वी झालेल्या महादारुण युद्धप्रसंगीं धारातीर्थी पतन पावलेले रजपूत पुनः जिवंत झाले कीं काय असें वाटूं लागलें. चितोड या शब्दांतच रजपुतांना अशी कांहीं जादू वाटते कीं चितोडकरितां खरोखरच ते मेलेले पुनः

जिवंत होतील! हजारों रजपूत चितोडच्या रणक्षेत्रांत आपापल्या शस्त्रांसह अहमहमिकेनें पुढें होत असलेले दिसूं लागले. वीरश्रेष्ठ **सहीदास** आपल्या परमशूर सैनिकांसह चितोडच्या 'सूर्यद्वार' नांवाच्या महादरवाज्यावर येऊन उभा राहिला. मदेरियापति रावंत, बैदल आणि कटोरिया येथील दोन बलाढ्य राजे, प्रमार, झालापति इत्यादि अनेक राव, राजे, चितोडच्या रक्षणासाठीं धाऊन आले. राजस्थानप्रमाणें अन्य प्रांतांतूनहि कित्येक रजपूत राजे या प्रसंगीं आले होते. देवलपति वाघजीचे वंशज, झालोरपति सोनगढ, ईश्वरदास राठोड, करमचंद कछवाह, तसेच ग्वालेरचे तुवारराज इत्यादि वीरवरांनीं याप्रसंगीं अलौकिक पुरुषार्थ केला.

युद्ध जुंपलें. यवनांनीं रजपुतांवर निकराचा हल्ला केला. रजपुतांच्या पराक्रमानें यवन थक्क झाले. कित्येक वेळां त्यांना माघारहि खावी लागली, पण अखेर त्यांच्या अफाट सेनेपुढें रजपुत फिके पडूं लागले. यवनांच्या सेनेचा जणु एक महासागरच पसरला होता. त्यांतूनहि तो खवळलेला! मग काय विचारतां त्याचें तें भीषण स्वरूप पाहून आतां प्रळय होतो कीं काय अशी शंका वाटूं लागली. रजपुत मागें हटूं लागले! वीर शिरोमणी सहीदास मात्र वाटेल तें झालें तरी एक रतीभरहि मागें पाऊल घेईना. जोंपर्यंत त्याचें शरीर हालचाल करीत होतें, तोंपर्यंत त्याच्या नसांतून शेवटचा रक्ताचा बिंदु खालीं पडला नव्हता; आणि जोंपर्यंत त्याचा श्वास सुरू होता, तोंपर्यंत 'सूर्यद्वार' ओलांडून शत्रू आंत शिरला अशी अक्षरें उच्चारण्याची कोणाचीं छाती नव्हती.

बेदनूरचा राजा **जयमल्ल** आणि केळवाडचा अधिपती **पत्ते** यांनीं या प्रसंगीं अभुतपूर्व पराक्रम केला. जयमल्ल आणि पत्ते यांच्या

नांवाचा रजपुत लोक अद्यापि जप करितात, त्यांच्या नांवानें प्रातः-स्मरण करितात आणि स्त्रिया पुत्रप्राप्तीसाठीं किंवा मुलांची रोगराई दूर होण्यासाठीं त्यांना नवस करितात.

साळुंब्रापति सहीदास, सूर्यद्वारावर पडतांच अवघ्या सोळा वर्षे वयाच्या वीरसिंहपत्तेनें त्याची जागा स्वीकारली आणि आपल्या अदम्यउत्साहानें रजपुतांना शौर्यानें भारून टाकिलें. केळवाडच्या राजघराण्याचा तो एकच अंकूर होता. त्याची शूर माताहि पण आपल्या अल्पवयस्क सुनेसह, अंगावर पोलादी चिलखत चढवून, या प्रसंगीं युद्धास आली होती. वाचक हो, केवळ चितोडच्या प्रेमा-साठीं, आणि आर्यधर्माच्या अभिमानासाठीं, अशा प्रकारें ज्यानीं आपले वंशाच्या वंश उच्छिन्न करून टाकिले, त्या देवतुल्य महापुण्यकारक वीर आणि वीरांगनांचे आपण कसे बरें उत्तराई होऊं ! ! स्वतःच्या वंशलतेचे कोवळे अंकूर चुरडून टाकून राष्ट्रांतील हजारों वंशलतांना खत घालणाऱ्या हे महाभागांनों, तुम्हांला शतशः प्रणाम असो !!!

पत्ते, अशा एखाद्या मंगलकार्याला जातात त्याप्रमाणें, सहकुटुंब समरांगणांत चमकूं लागला; त्यावेळीं घनघोर संग्राम झाला. शत्रूच्या माना कापीत कापीत आणि रजपुतांना चेतवीत चेतवीत त्यानें सहकुटुंब स्वर्गाचें शिखर गांठिलें तेव्हां सर्व मायाममतेचा त्याग करून रजपूत रणोन्मत्त होऊन गेले. एका क्षणांत युद्धाचा रंग पालटला. यवनांची त्रेधा उडाली. वीररत्न जयमल्लाच्या आधिपत्याखालीं सर्व रजपूत मुसलमानांवर तुटून पडले होते. आतां चितोडची मुक्तता झाल्या-वांचून रहात नाहीं, असा रंग दिसूं लागला पण आपल्या कराल दाढा करकर चावीत दैवानें एकदां विकट हास्य केलें! त्याबरोबर यवनांच्या हर्षाला आणि रजपुतांच्या कायमच्या अपकर्षाला एकदमच प्रारंभ

झाला ! सूं सूं करीत एक दारुण गोळी जयमल्लाच्या हृदयांत घुसली, आणि तो घोड्यावरून खालीं आला ! आतां चितोडच्या रक्षणाचा मार्ग कोणता ! असा विचार त्या महाभागाच्या मनांत घोळूं लागला. त्याच्या मुठीची तलवारीला पक्की पकड बसलेली होती. दांतओंठ चाऊन तो अकबर सेनेकडे पहात होता इतक्यांत त्याच्या आरक्त नेत्रांतून चटकन् दोन अश्रुबिंदु खालीं पडले. त्यानें चितोडकरितां सर्वस्वाचा त्याग केला होता, आणि अंतकाळीं त्यानें अनेक रजपुतांना तशा प्रतिज्ञा करावयास लाविल्या आणि शेवटीं त्यानें चितोडकरितांच प्राण सोडिला.

आतां रजपुतांना दुसरा मार्ग कोण दाखवील ! शेवटीं काय ! भराभर हजारों वीरांच्या अंगावर केशरी झगे चढले. जोहार ! जोहार ! अगणित रजपुतयुवती आपल्या पावित्र्याचें रक्षण आणि जन्माचें सार्थक करण्यासाठीं म्हणाल्या, जोहार ! जोहार !

भयंकर प्रभावी तीक्ष्ण, आणि यशस्वी शस्त्रास्त्रें आतां आपल्या शेवटल्या कामगिरीसाठीं सज्ज होऊन म्हणाली जोहार ! जोहार !

शेंकडों आणि हजारों अर्भकें आतां आपल्याला जगांत मायेचें कोणीहि उरणार नाहीं असें जाणून दीर्घश्वास टाकीत उद्गारलीं, जोहार ! जोहार ! !

तो रोमांचकारी प्रसंग एथेंच सोडलेला बरा. जगद्गुरु आणि महात्मा (!) अकबराची रुधिर पिपासा शांत करण्यासाठीं हजारों जीवांच्या सुखाची माती झाली. अवघ्या रजपुत जातीची म्हणजेच अवघ्या हिंदुस्थानची कधीं भरून न येणारी भयंकर हानी झाली. याप्रसंगी चितोडचा सत्यनाश झाला त्याचें यथार्थ वर्णन कोणती लेखणी करूं शकेल ?

इ. स. १५६८ चैत्र शुद्ध एकादशी रविवार या घोर दिवशीं चितोडचा सर्वनाश होऊन त्याच्या वैभव सूर्याचा चिरकालिक अस्त झाला.

या प्रसंगीं जे वीर खर्ची पडले त्यांचीं नुसतीं जानवीं अकबरानें वजन करून पाहिलीं तीं पक्क्या चार शेराचा १ मण, याप्रमाणें ७४॥ मण भरलीं. त्यावेळपासून मेवाडांत ७४॥ हा आंकडा म्हणजे शपथेप्रमाणें समजतात. एकाद्या लखोट्यावर ७४॥ चा आंकडा असेल तर तो मालकावाचून कोणीहि फोडणार नाहीं. कारण फोडील त्याला त्यावेळीं झालेल्या हत्येचें पातक लागेल अशी त्यांची समजूत आहे. या महाघोर प्रसंगाची स्मृति अशा रीतीनें किती तीव्रतेनें राखली गेली आहे, हें यावरून समजेल.

स्मशानतुल्य चितोड, शत्रूच्या हातीं सांपडल्यावर आतां चितोडचें कथानक काय सांगायचें ? उदयसिंग आधींच जो चितोडहून निघून गेला होता त्यानें अरवलीच्या डोंगराळ भागांत उदयसागर नांवाचें एक सरोवर बांधिलें, तसेंच तेथें वाहाणाऱ्या अनेक नद्यांपैकीं एका नदीचा प्रवाह रोखून त्यानें जवळच एका टेकडीवर ' नव चौकी ' म्हणून एक सुंदर महाल बांधिला. थोड्याच दिवसांत त्या महालाभोंवती अनेक महाल झाले आणि तेथें एक सुंदर नगर वसलें. उदयसिंगाचेंच नांव त्या नगराला पडलें व उदयपूरच आतां मेवाडची नवी राजधानी झाली.

चितोडची अनवस्था झाल्यावर थोड्याच दिवसांनीं आपल्या वयाच्या ४२ व्या वर्षी गोगुंडा येथें उदयसिंगानें इहलोक सोडिला. त्यावेळीं त्याला पंचवीस पुत्र होते. आपला धाकटा पुत्र जगमल याला त्यानें गादीचा अधिकारी नेमिलें होतें. वास्तवीक सोनगडाच्या

राजकुमारीच्या उदरीं उदयसिंहाला प्रताप नांवाचा पुत्र झाला होता तोच खरा राज्याधिकारी होता, पण उदयसिंगाच्या इच्छेनुरूप जगमल्लालाच राज्यपदावर बसविण्यांत आलें.

केवळ उदयसिंगाची अंतिम इच्छा म्हणून त्याच्या लाडक्या जगमलला रजपुतांनीं गादीवर बसविलें, परंतु या गोष्टीच्या विरुद्धहि पुष्कळ रजपूत होते. राणा जगमल जरी उदयसिंगाचा आवडता होता, तरी राज्यकारभार हांकण्यास अवश्य असे गुण त्याच्या अंगीं नव्हते. स्वामीनिष्ठ रजपुतांना याहीबद्दल कुरकूर करण्यास जर वाव नसता तर ते स्वस्थ बसून जें होईल तेंच पाहात राहिले असते; आणि उदयसिंगाच्या बाबतींत त्यांनीं तेंच केलें होतें. पण दूरदृष्टीच्या चितोडभक्तांस यावेळीं स्वस्थ बसवेना. केवळ उदयसिंगाची इच्छा म्हणून खरा वारस बाजूला टाकून जगमल गादीवर बसल्यानें त्यांना चैन पडेना. त्यांच्या अस्वस्थतेचें खरें कारण असें होतें कीं, उदयसिंगाची ही निवड वाखाणण्यासारखी तर नव्हतीच, पण उलट ती अन्यायाची आणि हानिकारक होती. खरा गादीचा वारस प्रताप, हा महाप्रतापी आहे हें त्यांना ठाऊक होतें. केवळ हा माझा आवडता मुलगा म्हणून महापराक्रमी अशा खऱ्या अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करून एखाद्या गयावळास गादीवर बसविणें न्यायाचें तर नाहींच पण हिताचेंहि नाहीं, असें त्यांचें ठाम मत झालें. प्रसंगाविशेषीं धकाधकीचा व्यापार चालविण्याची पात्रता जर खऱ्या वारसाच्या अंगीं नसेल तर त्याच्या एखाद्या लायक भावाला गादीवर बसविणें अन्यायाचें न ठरतां राष्ट्रहिताचेंच ठरेल. पण वारस लायक असून नालायक माणसास गादीवर बसविण्यानें दोन अन्याय होतात. त्यांचा परिणाम राष्ट्राला भोगावा लागल्यावांचून कसा राहील? असा

विचार करून राष्ट्रहितासाठीं उदयसिंहाच्या इच्छेकडे दुर्लक्ष करणेंच योग्य असें त्यांनीं ठरविलें, आणि मेवाडचा मुख्य सामंत कृष्णजी यासह ते दरबारांत जावयास निघाले.

इकडे प्रतापची स्थिती फारच अवघड झाली होती. तो राज्याचा अधिकारी होता. त्याच्या शूर आजोबांचें तेजस्वी रक्त त्याच्या अंगांत सळसळत होतें. त्याची तरवार शत्रूला कंठस्नान घालण्यास उत्सुक झाली होती. चितोडसाठीं काय करावें यासंबंधीं तो रात्रंदिवस विचार करीत होता. बापाच्या सर्व व्यवहाराकडे त्याचें बारकाईनें लक्ष होतें. आपण राज्यपदारूढ झालों म्हणजे काय करूं तें त्यानें जवळ जवळ ठरवून टाकिलें होतें. पण दुर्दैवानें त्याचे सर्व मनोरथ मनोराज्यवत् झाले. उदयसिंगानें जगमलास गादीचा अधिकारी नेमिलें, याबद्दल त्याला मुळींच वाईट वाटलें नाहीं; पण आपल्या चितोडबद्दलच्या सर्व योजना लांबणीवर पडल्या म्हणून क्षणभर तो उद्विग्न झाला. जगमलास सहाय्य करून त्याच्या करवीं आपल्या योजना सिद्धीस जाऊं शकतील असें त्यास वाटेना. उलट आतां कर्तव्य दृष्टीनें अपमान सोसूनहि जर आपण एथें राहिलों तर कदाचित् आपला दगा होण्याचाहि संभव आहे, असें वाटून चितोडकरितां हळहळणारा तो तेजस्वी वीर देशत्याग करून जाण्याच्या विचारास लागला. न्यायानें ज्याला उदेपूरचें राज्य मिळावयाचें, तो आपल्या उदयासाठीं आणि चितोडच्या मुक्ततेसाठीं वनांत जाण्यास सज्ज झाला. त्यानें आपला घोडा सज्ज केला, आपली आवडती समशेर कमरेला बांधिली आणि उंच व टोंकदार भाला हातांत घेतला. आतां तो हाल अपेष्टांच्या खाईत उडी घेण्यास सिद्ध झाला होता, पण त्याबद्दल दुःखी झाल्याची अंधुक छटाहि त्याच्या चर्येवर

दिसत नव्हती. कर्तव्यनिष्ठांना हालअपेष्टांची यत्किंचितहि पर्वा वाटत नाहीं. त्यांना तीं भूषणेंच वाटतात.

प्रतापची प्रयाणाची सिद्धता होते तोंच कृष्णजी प्रमुख सामंत मंडळी तेथें पोंचली. राण्याची ती गडबड पाहून कृष्णजी त्यास म्हणाला प्रताप, झालेल्या प्रकारावरून तूं आंखलेला मार्ग चुकीचा आहे असें कोण म्हणेल, पण तुझ्यासारख्या नररत्नास गमावून चितोडचे पांग कसे फिटणार ! आमचा विचार सिद्धीस नेणें केवळ तुझ्या हातीं आहे, व चितोडकरितां, रजपुतांच्या लौकिकाकरितां आणि आर्यधर्माकरितां आमचें म्हणणें तूं ऐकावेंस अशी आमची मनापासून इच्छा आहे. असें म्हणून त्यानें आपला विचार प्रतापला समजावून दिला आणि त्याला आपल्या बरोबर घेऊन सर्व मंडळी दरबारांत गेली. ग्वालेरचा पदच्युत अधिपती आणि कृष्णजी या दोघांनीं निश्चयच केला होता. सरळ जगमल्लाच्या जवळ जाऊन त्यांनीं दोन बाजूंनीं त्याचे दोन हात धरिले, आणि सिंहासनावरून उठवून त्याला जवळच्याच एका उच्चासनावर बसविलें. जगमल त्यांच्याकडे विस्मयानें पाहूं लागला तोंच कृष्णजी म्हणाला ‘ महाराज आपली नजरचूक झालेली दिसते. या गादीवर बसण्याला प्रतापसिंहच अधिकारी आहे. जगमल्ल हें जाणून नव्हता असें थोडेंच आहे ! कृष्णजीच्या या भाषणावर त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं.

सालुंब्राधिपतीनें प्रतापास राजवेष, आणि भवानीनें प्रसाद म्हणून दिलेली बाप्पा रावळाची ती तरवार देऊन गादीवर बसविलें आणि तीन वेळ भूमिस्पर्श करून त्यानें प्रतापला वंदन करून मेवाडचा राणा म्हणून त्याच्या नांवाचा जयजयकार केला. कृष्णजीच्या या पवित्र कृतीचा इतर सर्व सामंतांनीं गौरव केला व राणाजीस वंदन

करून त्या सर्वांनीं मोठ्या स्फूर्तीनें त्याच्या नांवाचा जयघोष करून त्याचें आधिपत्य मोठ्या संतोषानें मान्य केलें. अशा रीतीनें देश-त्याग करावयास निघालेला हा महावीर योग्य व पवित्रस्थानीं विराजमान झाला. नंतर सर्व सामंतांसह राणा शिकारीस गेला, तेव्हां त्याला चांगली शिकार मिळाली. हें चांगलें चिन्ह आहे असें रजपुत समजत असत. शिकारीच्या यशस्वितेवर शुभाशुभ समजण्याची जुनी पद्धत अद्यापिहि अनेक जातींत आहे. रजपुतांना प्रतापचें राज्या-रोहण मंगल आणि यशदायी वाटलें, व ते प्रतापच्या कृतीकडे आशेनें पाहूं लागले.

# प्रताप, राणा झाल्यावर !

## प्रकरण ६ वें.

अतुल पराक्रमी प्रताप मेवाडचा राणा झाला. मेवाडकरितां आणि चितोडकरितां त्याला जें कांहीं करावयाचें होतें तें करण्याची त्याला संधी मिळाली व आपला मार्ग कसा आक्रमावा याचा विचारहि प्रतापच्या मनांत सुरू झाला—

' हिंदुस्थान ! हा देश आम्हा हिंदूंचा आहे ! क्षत्रीय हे या देशांतील जातिवंत लढवय्ये ! आमच्या देशाचें शत्रूपासून संरक्षण करणें हाच आमचा मुख्य धर्म ! मेवाडकरितां आमच्या पूर्वजांनीं अनेक दिव्यें केलीं आहेत. सिशोदे वंशाची महनीय मान्यता, आमच्या पूर्वजांनीं शत्रूचे दारुण शस्त्रप्रहार आपल्या दगडी छातीवर झेलून, जगाला पटवून दिली आहे ! त्या अलौकिक महापुरुषानें—बाप्पारावळानें—अदम्य उत्साहानें पराक्रमाचें शिंग फुंकून आम्हाला कर्तव्योन्मुख करण्यासाठीं आपल्या यशनिनादानें दशदिशा दणदणून टाकिल्या आहेत ! असें असतां, त्याच कुळांत जन्मून मी केवळ लौकिक सुखाकडे कशी दृष्टी देऊं ! दुष्ट यवनांनीं देशावर आणि धर्मावर भयंकर आक्रमण चालविल्यामुळें स्वस्थ बसून मला अन्नच गोड लागत नाहीं. त्याला काय करूं ? चितोड ! चितोड ! हाय ! हाय ! चितोडनगरी ! ती चितोडनगरी ! जी मेवाडची अनंतकाळची राजधानी. ती चितोड नगरी ! माझ्या पूर्वजांनीं जिच्याकरितां पिढ्यान्‌-पिढ्या रक्त आटविलें आणि रक्त सांडिलें, इतकेंच नव्हे तर जिच्या-

करितां त्यांनीं आत्मबलिदानहि केलें, तीं, ती चितोडनगरी ! हजारों युवक युवतींनीं जिच्याकरितां आपल्या प्रपंचाची राखरांगोळी केली, आणि जिच्याकरितां तिचे सुपुत्र आपल्या सुखावर लाथ मारावयास मध्यान्ह रात्रीहि सिद्ध असावयाचे ती चितोडनगरी ! ती वैभव लक्ष्मी ! मेवाडच्या तो आवडता अलंकार ! हजारों वीरांच्या हृदय कोंदणांतील तें अमोल रत्न ! काय वाटेल तें करीन, आणि माझी ती चितोडनगरी, ती स्वातंत्र्यदेवी, यवनांच्या तडाक्यांतून मुक्त करीन. एवढें झालें नाहीं तर मग सिसोदे वंशाचें नांव तरी कशाला धारण करावयाचें ? असे विचार राणाजीच्या नेहमी मनांत येत. पूर्वजांच्या वीररसपरिप्लुत कथा, आणि त्यांचीं समरगीतें ऐकण्यांत राणाजीचे तासानुतास आणि दिवसानुदिवस गेले होते. भाटांच्या काव्यगान प्रसंगीं त्याचे बाहू स्फुरण पावत आणि आपल्या उदात्त रम्य कल्पनांशीं समरस होऊन तो बेहोष होऊन जाई. त्याला वाटे, अभिमन्यूनें, अर्जुनानें आणि बाप्पारावळानें जसा पराक्रम केला तसाच पराक्रम करून दुष्टांची नांगी मीहि ठेंचून टाकीन. तो म्हणे, अकबर मोठा पराक्रमी आहे ! ठीक आहे. पण त्याच्याहूनहि जर आपण पराक्रम केला तर आपणाला यश कां मिळणार नाहीं ! अवश्य मिळेल ! काय चितोडनगरी अशीच यवनांच्या ताब्यांत राहील ? रजपुतांच्या भेकड आणि नेभळट वर्तनामुळें आज जरी तसें वाटत असलें, त्यांचें आजचें वर्तन जरी आत्मघातकी आणि अभिमान शून्यतेचें असलें तरी आपल्या अहर्निश प्रयत्नानें स्वार्थत्यागानें आणि भगवान् एकलिंगजीच्या कृपेनें उद्यां ही स्थिति पालटल्यावांचून राहणार नाहीं; व कालचक्राचे फेरे वैभवगिरीच्या उच्च शिखरावर चढलेल्या यवनांच्या विरुद्ध फिरावयास लागून त्या धक्यानें

यवनसत्ता तेथून कोलमडल्यावांचूनहि कधींच रहाणार नाहीं. यवनांची सत्ता धुळीस मिळवून मीच चितोड स्वतंत्र करीन, अशी त्याची प्रचंड मनीषा होती. त्याची तशी प्रतिज्ञाच होती म्हटलें तरीहि चालेल.

अकबराचें सामर्थ्य अचाट आहे; त्याच्याशीं झगडा करणें अत्यंत कठीण आहे हें राणाजीस ठाऊक नव्हतें असें मुळींच नाहीं, पण रजपुतांच्या देशप्रीतीवर आणि धर्मनिष्ठेवर त्याचा भरंवसा होता. त्यामुळें त्यानें त्यांच्यावर वाजवीपेक्षां अधिक विश्वास टाकिला. पण ती परिस्थिती आतां राहिली नाहीं, हें त्याला लौकरच कळून आलें. कांहीं झालें तरी शूर तो शूरच. असल्या गोष्टींना तो थोडीच भीक घालणार !

पूर्वजांच्या शौर्य-मंत्रानें त्याच्या शरिराचा अणुनअणू भारून गेला होता ! त्यांच्या स्फूर्तिचंद्रानें राणाजीच्या हृदयसागरास भरती आणिली होती, आणि त्यांची ती विक्रमविद्युत् प्रतापच्या अंगांत द्विगुणित होऊन संचरली होती ! त्यामुळें प्रतिकुल स्थितीचीहि त्याला पर्वा वाटेना ! अकबराची प्रचंड सेना, तर राणाजीचे मूठभर लोक, त्याचें अगणित द्रव्य तर याची संपत्ती चितोडबरोबरच शत्रूनें लुट-लेली ! त्याचे शत्रू देखील त्याचे खुषमस्कऱ्ये होऊन त्याच्यापुढें गोंडा घोळीत होते, तर इकडे चितोडचे कट्टे अभिमानी अस्सल रजपूत देखील आत्मघातकीपणानें वाटेल तें निंद्य कर्म करून, अकबराची मर्जी संपादण्यांत गुंग झाले होते ! अकबर आपला भाग्याचल चढत होता तर राणाजी तेथून घसरून, खरचटत, ठेंचाळत खालीं येऊं लागला होता ! एकाचें विमान दिमाखानें भराऱ्या मारीत उंच उंच जात होतें तर दुसऱ्याच्या विमानाचे पंख मोडून तें खालीं कोसळलें होतें !

अशा विषम स्थितींत अकबरावर चालून जाणें वेडेपणाचें आहे, हें राणाजीस समजलेंच का नसेल ! पण कितीहि उपवास पडले म्हणून सिंह कधीं तृणभक्षण करील का ? तशीच राणाजीची स्थिती झाली. 'शिसोद्यांचें घराणें शत्रूला शरण जाण्याकरितां उत्पन्नच झालें नाहीं. शरण जाण्यापेक्षां शिसोदे घराण्यांतील पुरुष मरणच अधिक सुखाचें मानितील.' असें राणा म्हणत असे.

आतां राण्यापुढें दोनच मार्ग होते. जगावयाचें असेल तर अकबरास शरण जाणें; नाहीं तर आपलें उद्दिष्ट योगायोगानें साधलें तर ठीकच झालें, तें नच साधलें तर मारीत मारीत मरून जाणें. त्याचा स्वभाव, त्याचें शौर्य, त्याचा पीळ आणि त्याचा स्वाभिमान लक्षांत घेतला म्हणजे त्याला कोणता मार्ग रुचला असेल तें कोणासहि समजण्यासारखें आहे. अर्थात् त्यानें मारीत मारीत मरण्याचाच मार्ग स्वीकारला. आणि हा मार्ग स्वीकारला म्हणूनच त्याचीं चरित्रें लिहिलीं जात आहेत व त्याचे पोवाडे गाइले आणि ऐकले जात आहेत. यामुळेंच तो रजपुतांचा सूर्य झाला आणि या एकाच कारणासाठीं त्याचें नांव दलित जनांना प्रातःस्मरणीय झालें. नाहीं तर त्याच्यासारखे पराक्रमी रजपूत त्यावेळींहि दुसरे नव्हते असें मुळींच नाहीं. पण त्यांच्या पराक्रमाला परधार्जिणें वळण लागलें होतें.

तसें पाहूं गेलें तर, रजपूतांचें शौर्य कोठें लयाला गेलें होतें असें मुळींच नाहीं. गंगायमुनेच्या तीरांवरील प्रांतापासून अरवलीच्या डोंगराळ प्रदेशापर्यंत जे जे देश पूर्वी मुसलमानांनीं उध्वस्त करून टाकिले होते, त्या त्या देशांचें बल आता वाढीस लागलें होतें. मारवाडच्या अधिपतीला तर एवढा आत्मविश्वास आलेला होता कीं, त्यानें एकदां

आपल्या एकट्याच्या विश्वासावर दिल्लीपति शेरशहासहि शह दिला होता. तसेंच चंबळ नदीच्या किनाऱ्यावरील लहान लहान राज्येंहि बलवान् झालीं होतीं. तात्पर्य बलधैर्यादि सर्व गोष्टी रजपुतांना अनुकूल होत्या, पण एकाच गोष्टीचा त्यांच्याजवळ अभाव झाला होता. कांहीं सद्‌गुण असे असतात कीं ते ज्याच्याजवळ असतील त्याच्यावर लोक भराभर विश्वास टेवूं लागतात. महाराणा संग्रामसिंहाच्या अंगीं असे सद्‌गुण होते. त्यामुळें त्याचा आसिंधु हिमाचल सर्व हिंदूंस मोठा आधार वाटे. त्याच्या नेतृत्वाखालीं सर्व राजे प्रसंगीं चटकन् एक होत; पण दुर्दैवानें त्याच्या पश्चात् तसा पुरुष रजपुतांना लाभला नाहीं. जे लाभले ते रजपुतांची फळी फोडण्यासच कारण झाले असें म्हटलें तरी चालेल. याचा परिणाम प्रतापला तर भोगावा लागलाच पण त्यामुळें अवघ्या हिंदु राजसत्तेवर परिणाम होऊन हिंदुस्थानचें अपरिमित नुकसान झालें.

विस्कळीत झालेल्या रजपुतांची पुन्हा एक जूट करण्याचें काम आतां सोपें राहिलें नव्हतें; परंतु प्रतापचा उत्साह एवढा जोरदार होता कीं, त्याला अडथळा करण्याचें सामर्थ्य जगांत कोणासहि नव्हतें. त्यानें कुमळनेरला आपली राजधानी करून आपला उद्योग मोठ्या चिकाटीनें सुरू केला. कुमळनेर आणि गोगुंडा हे किल्ले डागडुजी करून मजबूत केले. अकबराच्या मानानें आपलें सैन्य फारच थोडें असल्यामुळें सपाटीवर शत्रुसेनेपुढें आपला टिकाव लागणें शक्य नाहीं हें जाणून, त्यानें आपलें सैन्य डोंगराळ प्रदेशांत नेलें. अशा प्रकारें व्यवस्था केल्यावर अशी दौंडी पिटण्यांत आली कीं, "प्रतापची प्रजा म्हणून राहणें ज्याना मान्य असेल त्यांनीं तावडतोब डोंगरी मुलुखाचा आश्रय करावा. जे असें करणार नाहींत ते देशद्रोही आणि शत्रूस

सामील, असें समजण्यांत येऊन त्यांना देहदंड केला जाईल." राण्याची ही आज्ञा सुटतांच शहरवासीलोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या टोलेजंग घरादारांचा आणि नंदनवनसदृश बागबगीचांचा त्याग करून भराभर डोंगरी वस्तींत समाविष्ट होऊं लागल्या. स्वातंत्र्यप्रेमापुढें ऐषारामाला भीक न घालणाऱ्या त्या वीरांचा हा त्याग अपूर्व नव्हता असें कोण म्हणेल !

मनुष्याचें सुख श्रीमंतीवर किंवा ऐषआरामावर मुळींच अवलंबून नसून, तें त्याचें पवित्र वर्तन आणि एकजूट यावरच अवलंबून आहे. असें त्या लोकांनीं जगाच्या निदर्शनास आणिलें. थोड्याच दिवसांत अवघा मेवाड प्रांत ओस पडला, आणि अरवलीच्या अवघड रांगा माणसांनीं गजबजून गेल्या. या आज्ञेचें पालन होणें राण्याला अत्यंत अवश्य असल्यामुळें त्यानें या बाबतींत फार कडक धोरण ठेविलें होतें. आपल्या सार्थीदारांसह तो स्वतः सर्वत्र हिंडून या आज्ञेचें पालन न करणारांस योग्य शासन करी. भट्ट लोकांनीं राण्याच्या या वर्तनक्रमाचीं वर्णनें अनेक ठिकाणीं करून ठेविलीं आहेत.

मेवाडांतील जीं ठिकाणें माणसांनीं फुललेलीं असावयाचीं तीं राण्याच्या या आज्ञेमुळें आतां भीषण, निर्जीव, निस्तब्ध आणि शून्य दिसूं लागलीं ! ज्या राजपथावरील केर, दिवसांतून तीन वेळां निघावा तेथें कांटेरी झाडें माजून गेलीं ! ज्या महालांच्या गवाक्षद्वारांतून रमणींच्या मुखकमलाचे पराग रसिकांच्या नयनभृंगांस आकर्षून घ्यावयाचे, त्याच गवाक्षद्वारांतून वटवाघळांचा संचार होऊं लागला ! ज्या गीतशाळा मधुरगीतालापांनीं भरून जावयाच्या, त्याच स्थळीं घूकांनीं आपलें वास्तव्य केलें ! शस्त्रांनीं आणि

वीरांनीं जे वाडे शोभायमान व्हावे, तेथें वन्यश्वापदें डिरकण्या फोडूं लागलीं, आणि जागोजाग सशस्त्र सैनिकांच्या पहाऱ्यांनीं जे राजपथ रक्षिले जावयाचे, तेथें वारुळें माजून महाभुजंग पहारा करूं लागले ! !

विहिरी तलाव ओस पडले ! सुपीक जमिनींत अरण्य माजलें ! बागबगीच्यांचीं स्मशानें झाली ! क्रीडांगणें उध्वस्त झालीं ! नृत्य शाळांतून पिशाच्चांचें भीषण नृत्य सुरू झालें आणि नगरेंच्यानगरें वन्य श्वापदांच्या मुखानें अक्राळविक्राळ आरोळ्या ठोकूं लागलीं ! !

केवळ स्वातंत्र्यासाठीं मेवाडांतील लोकांनीं हा अनर्थ आपल्यावर ओढवून घेतला. राणाजीच्या स्वातंत्र्यप्रीतीस एवढी किंमत मिळेल असें यवनांच्या स्वप्नांतहि नसेल. धन्य ! मेवाडवासीजन, तुमची धन्य ! तुमच्या स्वाभिमानाला जगांत तोड नाहीं !

इकडे डोंगराळ प्रदेशांत मनुष्य वस्ती झाल्याबरोबर, तेथील सर्व दृश्य पालटूं लागलें. उद्योगी मनुष्य जेथें जाईल तेथें स्वर्ग करून टाकील. एकाच वाक्यांत सांगावयाचें झालें तर मेवाडवासी लोक अरण्यांत राहूं लागल्यावर त्या अरण्याचें नंदनवन होऊन गेलें.

राणाजीनें अशा रीतीनें कळकळीचीं माणसें संरक्षित ठिकाणीं नेल्यावर आपल्या उद्देशांप्रमाणें पुढील कार्याची रूपरेषा त्यानें आंखून टाकिली. प्रजेनें आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आहे, हें जाणून त्यानें प्रजेकडून कोणत्याहि प्रकारें द्रव्याची अपेक्षा ठेवली नव्हती, पण द्रव्यावांचून पुढील योजना सिद्धीस जाणार कशा ? म्हणून त्यानें एक युक्ति योजिली. सुरत आणि इतर बंदरांतून, विविध प्रकारचा विलायती माल त्यावेळीं दिल्लीस जात असे. हा माल अर्थातच मेवाडांतून जाई. राणाजीनें आपल्या शूर सैनिकां-

करवीं हा माल लुटण्याचा सपाटा चालू केला यामुळें राण्याला बरेंच आर्थिक सहाय्य झालें.

— प्रतिज्ञा —

कोणतेंहि कार्य सिद्धीस न्यावयाचें म्हणजे त्या संबंधीं कर्त्याचा अत्यंत दृढ असा निश्चय असावा लागतो; आणि अशा निश्चयाचें द्योतक म्हणून मोठमोठ्या प्रतिज्ञा करण्याची पूर्वापार चाल आहे. राणाजीनें चितोड स्वातंत्र्यमंडित होईपर्यंत वाटेल ती आपत्ती सोशीन अशी प्रतिज्ञा केली होती; व चितोडच्या पारतंत्र्याचें दुःख अहर्निश होत असल्याची खूण म्हणून, त्यानें कोणत्याहि प्रकारें विलास भोगावयाचा नाहीं असा पण केला होता. जन्मापासून ऐश्वर्यांत लोळलेला असूनहि सोन्याचांदीच्या पात्रांतून भोजन, आणि सर्व प्रकारचें खाद्यपेय त्यानें वर्ज केलें होतें. पुष्पांच्या आणि परांच्या शय्येवर शयन करण्याची ज्याची पात्रता, त्यानें परतंत्र चितोड स्वतंत्र होईपर्यंत सुखानें तृणशय्या पत्करिली व एखाद्या तपस्व्याप्रमाणें दाढी वाढवून तो राहूं लागला. सुवर्णपात्राचा त्याग केल्यामुळें तो धडधडीत पत्रावळी व द्रोण यांच्या सहाय्यानें भोजन आणि पान करीत असे. चितोडच्या स्वातंत्र्यासाठीं राणाजीच्या मनांत केवढी तळमळ होती, याचा याहून जास्त पुरावा काय पाहिजे ? पारतंत्र्यामुळें ज्याच्या अंगाची अशी आग होत असेल त्याच्या वाऱ्याला तरी पारतंत्र्य राहील काय ?

राण्यानें स्वीकारलेलें व्रत त्याच्या एकट्या पुरेंसेंच होतें असें नाहीं, तर त्यानें सर्व शिसोदेकुळालाच तो नियम घालून दिला होता. जोंपर्यंत चितोडचा पुनरुद्धार झाला नाहीं, जोंपर्यंत तिच्या मस्तकावर स्वातंत्र्यतिलक झळकला नाहीं, आणि जोंपर्यंत चितोडचें वैभव

आपण परत मिळविलें नाहीं, तोंपर्यंत शिसोदे कुळांतील कोणाहि राजपुत्रानें वरील मर्यादेचें उल्लंघन करूं नये अशी राणाजींची आज्ञा होती. राणाजींची ही आज्ञा त्यावेळीं सर्व सिसोदे कुलांतील तरुणांनीं शिरोधार्य केलीच, पण अद्यापिहि त्या महनीय आज्ञेचें त्यांच्याकडून अंशतः पालन होत आहे. सिसोदेवंशीय रजपूत राजे आणि इतर रजपूतहि आपल्या शय्येखालीं तृण, आणि भोजनपात्राखालीं पर्ण घेतल्या-वांचून रहात नाहींत. अशा रीतीनें आपली प्रतिज्ञा रात्रंदिवस डोळ्यांपुढें राखण्यासाठीं राणाजींनें हा उपाय केला. तसेंच चितोड स्वतंत्र होईपर्यंत आपण दुःखी आहोंत याची सर्व लोकांना जाणीव व्हावी म्हणून, त्यानें आपल्या सेनेतील रणवाद्यांपैकीं नगारे व नौबती वाजविण्याची चाल बंद ठेविली; व रणवाद्यें सेनेच्यापुढें असावयाचीं तीं त्यानें सैन्याच्या मागून वाजविण्यास सुरवात केली. या सर्व गोष्टींचा इष्ट तोच परिणाम झाला. रजपुतांचा स्वाभिमान जागृत होण्याचे कामीं या गोष्टींचा फारच उपयोग झाला; आणि राणाजींच्या वैयक्तिक व्रतामुळें त्याची खरी खरी कळकळ आणि विदेही स्थिति लोकांना चांगलीच कळून आली. त्यामुळें ज्यांचें राणाजीवर प्रेम होतें त्यांचें प्रेम द्विगुणित झालें आणि इतरांच्या मनांतहि राणाजीबद्दल आदर उत्पन्न झाल्यावांचून राहिला नाहीं.



# – राणाजीचें बालपण –

## प्रकरण ७ वें.

उदयसिंगाला ज्यावेळीं सर्व सामंत मंडळीनें राजतिलक लाविला, त्यावेळीं त्याला शोणितगुरु नामक झालावाडच्या रावानें आपली कन्या दिली होती, हें वाचकांस स्मरत असेलच. त्या वेळीं या कन्येला जो पुत्र होईल त्यालाच मी राज्याधिकारी नेमीन, असें उदेसिंगानें आपल्या शालकाला वचन दिलें होतें. या झालावाडच्या राजकन्येला शुभ वेळीं जेव्हां गर्भ राहिला, तेव्हां तिचें तेज अधिकच खुलूं लागलें. चितोड नगरी स्वतंत्र करीन, रजपुतांचा लौकिक वाढवीन, व यवनांना दमवीन, अशा भाषा ती बोलूं लागली. राजनगरीचा त्याग करून तिला अरण्यवास आवडूं लागला. असे तिचे ते डोहाळे उदयसिंगानें मोठ्या हौसेनें पुरविले. पुढें नवमास पूर्ण झाल्यावर त्या राजकन्येला पुत्र प्राप्त झाला. त्याचें भाल भव्य होतें, छाती रुंद होती, नेत्र विशाल होते आणि बाहू पुष्ट होते. त्या हास्यवदन, बाळसेदार मुलाला पाहून सर्व लोकांना मोठा आनंद वाटे. त्या मुलाला मोठ्या आवडीनें 'प्रतापसिंह' असें नांव ठेवण्यांत आले. ज्योतिषांनीं हा पुत्र महापराक्रमी होईल, हा ईश्वरांश आहे, असें त्याचें जातक वर्तविलें होतें.

यवनजांचानें त्रस्त झालेल्या भाविक जनांनीं भगवान् एकलिंगजीची वेळोवेळीं प्रार्थना केल्यामुळें आपल्या प्रार्थनेनें द्रवलेला कैलासनाथच आपल्या उद्धारार्थ आला आहे असें लोकांना वाटलें.

## — विद्या व बल —

प्रताप पांच वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या शिक्षणाची उत्तम व्यवस्था करण्यांत आली. त्यावेळीं 'जोजो जयाचा व्यापार' तेथें 'खबरदार' करणाऱ्या शिक्षणास लोक अधिक महत्व देत. 'सब घोडे बारा टक्के–' या न्यायानें प्रत्येक विद्यार्थ्याला एकाच सांच्यांतून काढण्यांत येत नसे. प्रताप हा रजपुताचा बच्चा होता. रजपुतांचें शिक्षण मुख्यत्वेंकरून लष्करी असे. घोड्यावर बसणें, दांडपट्टा, तरवार, भाला बोथाटी, जंबिया बरची इत्यादि लढाऊ शस्त्रास्त्रें कुशलतेनें चालविणें, नेम मारणें, झाडावर चढणें, पोहणे, मल्लखांब कुस्ती इत्यादि सर्व विद्यांमध्यें प्रताप थोड्याच दिवसांत प्रवीण झाला. इतकेंच नव्हे तर त्या विद्यामध्यें त्यानें चांगलाच लौकिक मिळविला.

समवयस्क अशा दोनदोन तीनतीन मुलांशीं तो एकदम झुंज घेई, आणि त्यांत हटकून विजय संपादी. उडत्या पक्षाला बाण मारून त्याला तो अचूक खालीं पाडी. प्रतापाचा वृक्ष-शरिरांत घुसलेला बाण, बाहेर काढणें दोघांदोघांनाही अशक्य होऊन बसे.

पळत्या घोड्यावर प्रताप कुशलतेनें सहज स्वार होत असे. त्याचें बाहुबळ इतकें दाणगें होतें कीं, एकाद्या केळीच्या खांबाप्रमाणें तरवारीच्या फटक्यासरशी तो लोहदंडाचे खंड करून काटी. दृढमुष्टि प्रहारानें पाषाणांचें चूर्ण करणें, ही तर त्याची नित्याची लीला होती. प्रतापच्या या पराक्रमानें त्यावेळींसुद्धां वीरांना विस्मय वाटे.

इतकें बल, होतें आणि युद्धकलेंत प्रताप अत्यंत कुशल होता,

एवढ्यानेंच प्रतापचा लौकिक अजरामर झाला असेल, असें मात्र कोणीहि समजूं नये. शारिरिक बलाप्रमाणें त्याचें बुद्धिवैभवहि अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें होतें. त्यानें जरी एखाद्या विद्यापीठाच्या पदव्य संपादिल्या नव्हत्या, तरी आपल्या पराक्रमाचा व बुद्धिमत्तेचा आपल्या राष्ट्राला अधिकांतअधिक कसा उपयोग होईल, हें तो पूर्ण-पणें जाणीत होता. त्याच्या स्वाभिमानाला, धर्मनिष्ठेला आणि राष्ट्र-प्रीतीला दुसरी तोड नव्हती. असें होतें म्हणूनच त्याची ' यावच्चन्द्र दिवाकरौ ' कीर्ति झाली आहे.

## शाक्तसिंह फुटला

गोगुंडा एथें उदयसिंगानें जेव्हां देह ठेविला, तेव्हां आपलें पूर्व वचन विसरून आणि खरा अधिकार प्रतापचाच असूनहि उदय-सिंगाने त्याचा आवडता पुत्र जयमल्ल यासच गादी देण्याविषयीं केलेली आज्ञा वाचकांस ठाऊकच आहे. पुढें सर्व सामंतांच्या विचारानें जेव्हां प्रतापला राज्याभिषेक झाला, तेव्हां त्याच्यासह सर्व सामंतजन शिकारीस गेले होते त्यावेळीं जो एक उद्वेगकारक प्रकार घडून आला त्यामुळें प्रतापचा एक पराक्रमी भाऊ, शाक्त-सिंह त्याला अंतरला. तो प्रकार असा—

शिकार करण्यासाठीं रजपूत अरण्यामध्यें हिंडत असतां, एका जाळींतून एक दांडगा रानडुकर बाहेर आला. तो एका बाजूनें प्रता-पच्या व दुसऱ्या बाजूनें शाक्तसिंहाच्या एकदम नजरेस पडला व त्या दोघांनींहि त्याच्यावर बाण सोडिले. कर्मधर्मसंयोगानें दोघांचेहि बाण त्याच्या शरिरांत घुसले आणि त्या आघातानें डुकर खालीं पडला. दोघांसहि ही शिकार आपण केली असें वाटलें; आणि त्या-मुळें त्यांच्यांत बखेडा झाला. हा मानाचा प्रश्न असल्यामुळें कोणीच


माघार घेईना. शेवटीं हें प्रकरण हातघाईवर आलें; आणि भावा-भावांत रण पेटण्याची वेळ आली. त्यावेळीं सिसोदियाकुलाचा अत्यंत अभिमानी, जो त्यांचा कुलपुरोहित तो मधें पडला; आणि या क्षुल्लक गोष्टीसाठीं असें भांडूं नका, असें त्यानें दोघांसहि विनाविलें. पण क्षत्रियांच्या मानापमानाची तुम्हाला कल्पना नाहीं, तुम्ही स्वस्थ रहा. असें उत्तर मिळाल्यामुळें त्याला फार खेद झाला. तो म्हणाला, आपला देश यवनांच्या पदाघातांनीं त्रस्त झालेला आहे ! चितोड नगरी परतंत्र झाली आहे ! हिंदूंचें जीवित अपमानास्पद झालें आहे ! अशा वेळीं जर तुम्ही आपापसांत भांडाल तर शत्रूला आयतेंच फावेल; आणि आपल्या आकांक्षा पार चुरडून जातील ! करितां बाळांनों, असा अविचार करूं नका ! पण इतकें सांगूनहि जेव्हां कोणीच ऐकेना, तेव्हां तो निराश झाला ! त्याला या कलहाचें भीषण चित्र डोळ्यांपुढें दिसूं लागलें; आणि अशा दुःखद स्थितींत जगण्यापेक्षां मरणच अधिक श्रेयस्कर असें वाटून, त्यानें आपल्या उदरांत तीक्ष्ण सुरा खुपसून घेतला आणि आपला देह विसर्जन केला.

हा प्रकार पाहून प्रतापचें मन कळवळलें व त्यानें त्या ब्राह्मणाचें और्ध्वदेहिक केलें. अर्थातच यामुळें मारामारीवर आलेलें प्रकरण मिटलें; पण पुढें नगरांत गेल्यावर प्रताप शक्तिसिंहास म्हणाला, बंधो एकंदरींत झाला हा प्रकार अत्यंत उद्वेगकारक झाला आहे. यापुढें आपलें जमेल असें मला वाटत नाहीं. यासाठीं तुला जें पाहिजे असेल तें तूं घे, आणि तूं स्वतंत्र हो ! मानी व साहसी शक्तिसिंहानें हें भाषण ऐकिलें; आणि तो कांहींहि न घेतां तसाच तेथून निघाला. तो जर स्वपराक्रमानें एखादें राज्य संपादून राहिला असता तर त्याला अशक्य नव्हतें; पण हिंदूंची परधार्जिणीवृत्ति शक्तिसिंहालाच तेवढी

कशी सोडून रहाणार ! प्रतापाकडून निघाला तो शक्तसिंह थेट अकबराला येऊन मिळाला. अकबराला काय, होतील तितके गृह-कलह हवेच होते. त्यानें त्याचा मोठा सन्मान केला, आणि त्याला आपल्या पदरीं ठेऊन घेतलें.

अशा रीतीनें राणाजीचा एक पराक्रमी भाऊ त्याच्यापासून फुटून शत्रूला सामील झाला. हें वर्तमान कळलें तेव्हां राणाजीला अत्यंत खेद झाला, पण आतां त्या गोष्टीला कांहींच उपाय नव्हता. आणखी बरेच जातिवंत रजपूत अकबरास सामील झाले होते. त्यांची माहिती पुढील प्रकरणांत देऊं.

स्थळ प्रत
सं. ......
ता. ........



# — दिल्लीच्या बादशहाचे आधारस्तंभ —

## प्रकरण ८ वें.

महाराणा प्रताप स्वाभिमानें प्रेरित होऊन चितोडच्या मुक्ततेची प्रतिज्ञा करून व असिधाराव्रत स्वीकारून कार्यास लागला खरा; पण त्याच वेळीं त्याच्या शत्रुपक्षाची जोरानें वाढ होऊं लागली होती.

राण्याला स्वसंरक्षण करावयाचें होतें, तर अकबराला आक्रमण करावयाचें होतें! राणा स्वाभिमानानें धुंद झाला होता, तर अकबर राज्यविस्ताराच्या मोहक मदिरेनें धुंद झाला होता! राण्याच्या डोळ्यांवर कर्तव्याचा धूर चढला होता तर अकबराचे नेत्र सत्तेच्या धुरानें धुरकटले होते! राणाजी आपल्या लोकांस देशभक्तीची फुंक मारून जागृत करी तर अकबर आपल्या लोकांस सोन्याच्या पंख्यानें रत्नांचा वारा घालून जागृत ठेवी!

एकीकडे निराशा तर दुसरीकडे पूर्ण आशा! एकीकडे दैन्य तर दुसरीकडे विलास! एकीकडे हालअपेष्टा तर दुसरीकडे ऐष आराम! एकीकडे जागोजाग ठेंचा आणि दगडी डोंगरी रस्ते तर दुसरीकडे जागोजाग मेजवान्या आणि मखमलीच्या पायघड्या! एकीकडे घोट-भर पाण्याची आणि मूठभर अन्नाचीहि पंचाईत तर दुसरीकडे ठिकठिकाणीं वाळ्याचें आणि चंदनाचें थंडगार पाणी आणि पंच पक्वान्नांचें भोजन! एकीकडे कांटेरी जाळ्या व डोंगरी गुहा हींच निवासस्थानें आणि दगडाखडकाचीं शयनगृहें तर दुसरीकडे रम्य, हवाशीर सुंदर प्रासाद आणि महाल व सकल सुखसोयीचीं शयनगृहें आणि पुष्पशय्या!!

राणाजींचे लोक कट्टे धर्माभिमानी आणि पूर्ण सदाचारसंपन्न असूनहि त्यांना नित्य अपमान सोसून लाजिरवाणे व कष्टाळू जिणें कंठावें लागत होतें आणि अकबराकडील लोक फितुरीसारखीं घोर पातकें करून आणि स्वगोतास काळ होऊनहि, तुरा खोऊन दिमाखानें मिरवीत होते.

अशा रीतीनें पापवृक्षाला गोड फळें आणि पुण्यावृक्षाला कटु ळफें लागलेलीं प्रत्यक्ष दिसत असतांहि पुण्यमार्ग न सोडण्याला असामान्य निष्ठा आणि धैर्य लागत असतें. एवढी निष्ठा आणि हें अचाट धैर्य सामान्य लोकांत कोठून असणार! अशा वेळीं क्षणिक सुखासाठीं सन्मार्गावरून खोल दरींत धडाधड उड्या टाकण्यास सामान्यजन अहमहमिकेनें पुढें येऊं लागतात. पुष्कळ वेळां तर जो तो तेंच करूं लागल्यामुळें विचारी मनुष्यालाहि भ्रम पडण्याचा संभव असतो, तसें न होईल तर लोकांकडून त्याची वेड्यांत गणना होऊं लागते आणि त्याचा उपहासहि होतो.

राणाजीच्या वेळींहि अशीच स्थिति उत्पन्न झाली होती. ज्याला त्याला आपल्यावर अकबराची कृपादृष्टि असावी असें वाटूं लागलें होतें. बादशहा आपल्याकडे नुसतें पाहील का तरी! पुष्कळांना तर त्याच्याजवळ एकादा शब्द बोलण्याची संधी मिळाली तरी स्वर्गीय आनंद वाटे. अकबराच्या हुजऱ्याचा हुजऱ्या तरी व्हावें अशी मोठमोठ्यांना हांव उत्पन्न झाली होती. अकबराचें वैभव अशा प्रकारें चढत्या कमानीवर असलें, तरी रजपुतांचा मात्र त्यामुळें अधःपात होत होता.

## पदवीदान

मारवाडचा महापराक्रमी **ठाकूर मालदेव** यानें अकबराचा बाप

हुमायून यासहि धाक बसविला होता, अकबरानें त्याच्यावर चाल करून त्याचें मेरटीया नामक मारवाडांतील प्रसिद्ध नगर घेतलें व पित्याच्या अपमानाचा सूड उगविला. असें असून महामानी मालदेवहि अकबराच्या कच्छपी लागला. राणाप्रताप गादीवर बसून त्यानें आपली प्रतिज्ञा प्रसिद्ध केल्यावर दोन वर्षांनीं त्यानें आपल्या उदयसिंग नामक मुलास खंडणी देऊन अकबराकडे पाठविलें. राणाप्रतापचा समाचार घेण्यासाठीं अकबर यावेळीं अजमीर एथें येत होता. वाटेंत उदयसिंग आणि अकबर यांची नागोर एथें गांठ पडली. अकबर अत्यंत धोरणी आणि कार्यसाधू होता. त्याला रजपुतांचा स्वभाव पूर्णपणें कळून चुकला होता. कोरड्या मानानेंच रजपूत खूष असतात हें तत्व त्यानें ओळखिले होते. मारवाडच्या राजपुत्रास त्यानें मोठा राजा अशी पदवी बहाल केली.

ह्यानें आपली बहिण जोधाबाई ही अकबरास दिल्यामुळें तर अकबराची त्याच्यावर फारच मर्जी बसली. त्यानें मारवाडपतीला गोदवाड, उज्जयिनी, देवलपूर आणि बडनावर असे चार प्रांत दिले. यामुळें त्याचें उत्पन्न १५ लाखांनी वाढलें आणि अकबराच्या दरबारांत मोठ्या मानाची जागा मिळाली. या जोधाबाई पासूनच ‘ जहांगीरा ’ चा जन्म झाला होता.

## स्वार्थासाठीं अधमपणा

अंभेर (जयपूरचा) ठाकूर राजाबिहारमल्ल आणि त्याचा पराक्रमी पुत्र भगवानदास हे अकबरापुढें आपलें शहाणपण व्यर्थ आहे असें समजून त्याला जाऊन मिळाले. इतकेंच नव्हे तर अकबर आपला कायमचा सखा व्हावा म्हणून रजपूतकुळाला बट्टा लावणारें अधम

कृत्य करण्यासहि त्यांनीं कमी केलें नाहीं. बिहारमल्लानें आपली कन्या अकबराला देऊन त्याच्याशीं नातें जोडिलें आणि कृतार्थता मानिली! क्षणिक मानासाठीं केवढा अविचार हा! पुढें भगवानदासानेंहि आपली कन्या मानाबाई सलिमास दिली. सलिमाचा पुत्र खुस्रू हा मानाबाईचाच पुत्र होता.

कनोजच्या राजवंशास दरबारांत उजवीकडे बसण्याचा मान देऊन त्या वंशावर अकबरानें आपली छाप बसविली.

मंदोर एथील रावासहि राजा अशी पदवी देऊन अकबरानें त्याला आपला आश्रित केलें. या सन्मानानें मंदोराधिपतीसहि मोठी धन्यता वाटली.

पुढें पुढें आपल्या बहिणी किंवा मुली यवनांस देऊन त्यांची मर्जी संपादण्याची रजपुतांमध्यें एक साथच आली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. जयपूर आणि जोधपूर एथील प्रसिद्ध राजघराण्यांचा धडा, इतर राव राऊत आणि ठाकूर यांनीं भराभर गिरविला आणि कित्येक रजपुतांनीं अकबराशीं नात्याचें संबंध जोडिले.

अकबराला राजस्थानांतील अनेक राजघराण्यांचें जें सहाय्य होतें त्यांत राजामानसिंग याची अकबरास फार मोठी मदत झाली. मानसिंगानेंहि आपली बहीण देऊनें अकबराशीं दुसरें जवळचें नातें जोडिलें होते. एका बाजूनें तो अकबराचा मामा होताच. जो तो अकबराशीं नातें जोडूं लागल्यामुळें, पुष्कळांशीं त्याचीं गुंतागुंतीचीं नातीं झालीं होतीं. मानसिंग हा महाबलाढ्य राजा असून अकबराचें अर्धें यश या मानसिंगाचें आहे, असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं.

मानसिंगानें केवळ आपल्या रजपुत सेनेच्या सहाय्यानें अकबराच्या राज्याचा, पश्चिमेकडे काबूल, व पूर्वेकडे ब्रह्मदेशांतील आराकान-पर्यंत विस्तार केला होता. ज्या बलाढ्य वीराला एवढा मुलूख जिंकतां आला, त्याला स्वतंत्र होतां आलेंच नसतें कां ! पण अकबराच्या वैभवानें दिपून जाऊन त्याची बुद्धि भ्रष्ट झाली असल्यामुळें त्याच्या डोक्यांत स्वातंत्र्याचे विचार आलेच नाहींत !

एकदां मानसिंग अकबराच्या राज्यविस्तारासाठीं मुलुखगिरीवर निघाला असतां, अटक नदीच्या ( सिंधूच्या ) तीरावर येऊन तेथें थांबला, आणि अटकेच्या पार जाऊं नये. या * रूढीप्रमाणें मी पुढें कसा जाऊं असें त्यानें अकबरास कळविलें त्यावेळीं अकबरानें त्याची शंका पुढील दोह्यानें दूर केली. त्यानें कळविलें कीं—

सबही भूम गोपाल की उसमें अटक कहां ?
जिसके मनमें अटक है सोही अटक रहा।

' सर्व भूमी परमेश्वराची आहे. त्यांत अटक कसली ! ज्याच्या मनांत अटक असेल तो मात्र व्यर्थ अडकून पडेल. ' या उत्तरानें मानसिंगाचा संशय दूर झाला आणि त्यानें अटकेपार जाऊन, अकबराच्या राज्याचा अप्रतिबंधपणें विस्तार केला.

तात्पर्य राणाप्रताप, एका बाजूनें मेवाड आणि स्वधर्म यासाठीं आटोकाट यत्न करीत असतां, वैभवासक्त रजपुत राजेरजवाडे तिकडे अशा रीतीनें अकबरास सामील झाले होते. हे सर्व राजे-

* तसें शास्त्रवचन उपलब्ध नाहीं म्हणून आम्ही रूढीप्रमाणें असें म्हटलें आहे.

रजवाडेच अकबराचें सिंहासन स्थिर करण्यास खरे कारणीभूत असल्यामुळें, मुसलमान इतिहासकारांनीं देखील यांचा उल्लेख मोठ्या आदरानें केला असून, ते त्यांना ' दिल्लीच्या बादशहाचे अधारस्तंभ ' अशा शब्दानें गौरवितात.

---

स्थळ प्रत
सं. च- ८०६
ठाणे.

## — द्वेषाची ठिणगी पेटली —

—=:०:=—

### प्रकरण ९ वें.

महाराणा प्रताप स्वातंत्र्यासाठीं काय करीत होता, त्याचे विचार काय होते, त्यानें आपली सिद्धता कशी चालविली होती, इत्यादि विषय आतां वाचकांच्या ध्यानांत आलेच आहेत. तसेंच रजपुतांविषयीं आणि हिंदुस्थानविषयीं अकबराच्या आकांक्षा काय होत्या व तो आपले उद्देश सिद्धीस नेण्यासाठीं कसकसे डाव खेळत होता, याची थोडीशी कल्पनाहि वाचकांस आली आहे.

स्वामिनिष्ठेच्या गोंडस नांवाखालीं रजपुतांचा स्वाभिमान चिरडून टाकण्यांत तर अकबराला चांगलेंच यश आले होतें. या एका यशावरच अकबराचें सर्व यश आधारलेलें होतें, असें म्हणावयास मुळींच हरकत नाहीं. अशा स्वामिष्ठांची स्वाभिमानज्योति, पार विझून गेली होतीच पण तेवढ्यानेंच त्यांचें समाधान झालें नाहीं. लांड्या कोल्ह्याला जसें इतर कोल्ह्यांचें पल्लेदार पुच्छ पहाववेनासें होतें, तसाच प्रकार एथें झाला. यवनांची मर्जी संपादणें हा त्यावेळीं एक पुरुषार्थ गणला जाई. ज्या स्वाभिमानी रजपुतांना तसें करणें कमीपणाचें वाटे, त्यांना केव्हां एकदां आपल्या गोटांत ओढतां येईल अशी तळमळ स्वामिनिष्ठ रजपुतांस लागून राही.

### निर्मळ तें निर्मळच

वैभव लालसेसाठीं, यवनाळलेल्या रजपुतांच्या गोटांत जरी पुष्कळ रजपुत शिरले होते, तरी उदेपूरच्या घराण्याचा संबंध

दिल्ली, पट्टण, मारवाड आणि धार इत्यादि पवित्र घराण्यांशींच होई. इतरांशीं उदेपूरच्या घराण्यानें बेटीव्यवहार तर नाहींच पण रोटीव्यवहारहि बंद केला होता.

प्रथम प्रथम वैभवोन्मत्त रजपुतांस यागोष्टीचें कांहीं वाटलें नाहीं पण पुढें पुढें त्यांना त्यांचें मन खाऊं लागलें.

अंभेर ( जयपूर ) चा अधिपति महाविक्रमशालि **मानसिंग** म्हणजे प्रति अकबरच होता असें म्हटलें तरी चालेल. अकबराच्या राज्यांत मानसिंगाचा मान फार मोठा होता. असें होतें खरें, पण आपल्याशीं उदेपूरचें घराणें मोकळेपणानें वागत नाहीं, यवनसंसर्गामुळें आपल्याला हीनत्व आलें आहे, याची त्याला मनोमन हुरहुर लागली होती; हें पुढील गोष्टीवरून सहज ध्यानांत आल्यावांचून रहात नाहीं. त्याची विवेकशक्ती स्वामिनिष्ठेनें आणि वैभवलालसेनें जरी दडपलेली होती तरी तशा स्थितींतहि संधि मिळेल तेव्हा मानसिंगाच्या मनाला तिनें टोंचणी लावण्यास कमी केलें नाहीं.

स्वाभिमानी उदेपूरप्रभृति घराण्यांच्या पवित्र वर्तनाचा मानसिंगासारख्या वैभवाच्या शिखरावरील लोकांवर सुद्धां अशा रीतीनें परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. मग इतरांची स्थिति निराळी कशाला सांगावयास हवी !

## पावित्र्याला वैभव शरण गेलें

एकदां मानसिंग दक्षिणेंत सोलापूरभागांत स्वारी करण्यासाठीं गेला असतां तेथून परत येतांना त्यानें प्रतापची भेट घेण्याचें ठरविलें, व त्याला निरोप पाठविला कीं, “ मी आपणाकडे अतिथि म्हणून येत आहें. ” यावेळीं महाराणा कुमेळनेर एथें होता.

'उदयसागर' नांवाच्या सरोवरापर्यंत मानसिंगाला सामोरा जाऊन, प्रतापनें त्याचा योग्य आदरसत्कार केला. व दुसऱ्या दिवशीं मानसिंगास एक थाटाची मेजवानी देण्याचेंहि ठरलें.

मानसिंगासारखा भरभराटीच्या कळसावर चढलेला रजपुत-राजा प्रतापसारख्या वैभवहीन राजाकडे अतिथि म्हणून, आमंत्रण नसतांना भेटीच्या इच्छेनें येतो, याचा अर्थ, कितीहि झालें तरी पावित्र्य तें पावित्र्य ! त्याची सर वैभवाला केव्हांहि येणार नाहीं; हाच नाहीं काय ?

## सर्पाच्या शेंपटीवर पाय

महाराण्याच्या आज्ञेनें मानसिंगाच्या मेजवानीची विविध प्रकारें सिद्धता करण्यांत आली होती. उदयसागर नामक सरोवराच्या तीरावर एक भव्य मंडप उभारण्यांत आला होता. सुवर्ण पात्रांतून विविध प्रकारचे खाद्यपेयादि पदार्थ वाढण्यांत आले. मानसिंग मेजवानीस आला, पण त्याला राणा कोठेंच दिसेना. मेजवानीच्या व्यवस्थेसाठीं राण्यानें आपला पुत्र उमराव यास पाठविलें होतें. मानसिंगानें राजपुत्रास, प्रताप कां आला नाहीं; असें विचारिलें, तेव्हां त्याचें डोकें दुखत आहे, असें त्यास सांगण्यांत आलें.

मानसिंगाला यांतील मर्म तेव्हांच समजलें व तो राजपुत्रास म्हणाला—राणाजींना जाऊन सांग कीं, तुमचें डोकें कां दुखत आहे तें मी समजलों. झाली गोष्ट होऊन गेली. आतां त्याला इलाज नाहीं. आम्ही तुमच्याकडे अतिथि आलों आहोंत. एकट्यानें भोजन कसें करूं ? तरी आपण आमच्या बरोबर भोजनास यावें.

राणाजीनें उमरावाबरोबर मानसिंगास पुनः निरोप पाठविला

कीं, यावेळीं आमची प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें माझ्याच्यानें याप्रसंगीं येववत नाहीं. तरी आपण आग्रह न धरितां सुखानें भोजन करावें.

राणाजीच्या या उत्तरानें मानसिंगाचें समाधान कसें होणार ! त्यानें पुनः निरोप पाठविला कीं, आपणास येतां येतच नसेल, तर आपल्या पुत्रास तरी मजबरोबर भोजन करण्यास सांगा. मानसिंगाच्या या आग्रहावरून उदेपूरकरांच्या पंक्तीला बसण्यासाठीं तो कसा उत्सुक झाला होता हें कळून येईल.

परोपरीनें सांगितलें तरी मानसिंग ऐकत नाहीं; असें पाहून राण्याला राग आला व शेवटीं मोठ्या आवेशानें त्यानें असा निरोप पाठविला कीं, ज्या क्षत्रिय कुलकलंकांनीं आपल्या बहिणी व मुली गोमांसभक्षक यवनांस दिल्या, त्यांच्याशीं अन्नोदकव्यवहार करून आपल्या पवित्र कुलाला कलंकित करण्याची माझी इच्छा नाहीं. यामुळें मला तिकडे येतां येत नाहीं. तुम्ही भोजन करावें अशी माझी इच्छा आहे पण त्यासाठीं आमच्या कुळांतील कोणीहि तुमच्याबरोबर भोजनास येणें शक्य नाहीं. यामुळें तुमचा गैरसमज किंवा अपमान होत असेल तर त्याला माझा इलाज नाहीं. '

राजपुत्राकडून हा सणसणीत निरोप कळतांच मानसिंगानें पात्राला वंदन केलें आणि तो पानावरून उठला. इतक्यांत प्रतापसिंग तेथें आला. त्याला पाहून, मानसिंग म्हणाला—प्रतापसिंह महाराज, आम्हीतर भ्रष्ट झालोंच आहोंत, परंतु तुमचें पावित्र्य आमच्यामुळेंच टिकून राहिलें आहे हें विसरूं नका. अखिल क्षात्रकुलाचा विध्वंस होण्याची वेळ आहे, असें जाणून आम्ही पुढें झालों व

आपलें कुल कलंकित करून इतरांचें पावित्र्य राखिलें. आमचा असंतोष होऊं नये म्हणूनच दिल्लीपति तुमच्यावर चाल करीत नाहीं. नाहींतर त्यानें तुमचा केव्हांच फडशा पाडिला असता.

राणाजी मानसिंगाच्या या दर्पोक्तीनें फसणारा आणि वचकणारा मुळींच नव्हता. तो क्रोधानें म्हणाला–धर्मद्रोही मानसिंगा, सिसोदे कुळांतील आम्ही लोक भगवान् एकलिंगजी वांचून दुसऱ्या कोणा-च्याहि कृपेची अपेक्षा करीत नसतों. भगवत्कृपेनें शिसोदेकुलाचें पावित्र्य आजपर्यंत शिसोदेवंशीयांच्या प्रखर खड्गानेंच राखिलें आहे.

रजपुतांना प्राणाहूनहि प्रिय अशा चितोड नगरीवर आक्रमण करणाऱ्या यवनांना आपल्या बहिणी आणि मुली देणाऱ्या स्वार्थी, लोभी, आत्मघातकी, देशद्रोही आणि सुखलोलुप अशा नराधमांनीं, कुकर्म झालें तें.झालेंच आणि त्यावर पांघरूण घालणें व विपर्यास करून आमच्या पावित्र्यरक्षणासाठींच हें नीच कृत्य केल्याचें भासविणें, या-सारखें दुसरें नीच कर्म कोणतें आहे!

आमच्यावर स्वारी करणें शक्य होतांच तुमच्या सारख्या हांजी हांजी खोरांच्या असंतोषास जुमानून अकबर क्षणभरहि स्वस्थ बस-णार नाहीं. **स्वाभिमानशून्य जितांच्या असंतोषाची जेत्यांना यत्किंचितहि पर्वा नसते.** हें लक्षांत ठेवा.

राणाजींच्या या मर्मभेदक वाग्बाणांनीं मानसिंगाचा अपमान झाला. त्याच्या नेत्रांतून क्रोधाच्या जणुं ज्वाळाच बाहेर पडूं लागल्या, व तो क्रोधावेशानें राणाजीकडे पाहूं लागला.

राणाजी म्हणाला–मानसिंग, धिक्कार असो तुझ्या त्या वैभवाला! पारतंत्र्याच्या रौरवांत लोळत पडणाऱ्या तुमच्या सारख्याचें वैभव,

आम्हाला नर्कवासासारखें वाटतें. त्यापेक्षां गिरिकंदरांत राहून दिवस कंठणें शतपटीनें चांगलें !

राणाजीच्या या भाषणानें मानसिंगाचा क्रोधाग्नी पेटून गेला; आणि तो अग्निज्वाळेप्रमाणें पुढील भाषण करिता झाला !

" या अपमानाचें जर उट्टें काढलें नाहीं तर हा मानसिंहच नव्हे " हें मानसिंगाचें भाषण ऐकून राणाजी उद्गारले–ठीक ! ठीक ! या गोष्टीनें मला मोठा संतोष होत आहे ! समरांगणांत मी तुझें मोठ्या आनंदानें स्वागत करीन !

मानसिंग मोठ्या कुऱ्यानें आश्वारूढ होऊन निघाला तोंच राणाजीकडील एका वीरानें म्हटलें–मानसिंग, येतांना तुझ्या भाच्यालाहि घेऊन ये बरें का ? या भाषणानें मानसिंग अधिकच चिडला आणि संतापानें लाल होऊन तेथून निघून गेला.

## तीव्र निषेध

मानसिंग संतापानें निघून गेल्यामुळें आतां युद्धाला तोंड लागणार हें निश्चित होतें, पण त्याची राण्याला फिकीर नव्हती. तो निघून गेल्यावर ज्या ठिकाणीं मानसिंगाच्या स्वागताची सिद्धता केली होती, ती सर्व जागा झाडून सारवून स्वच्छ करण्यांत आली; आणि तेथें गंगोदक शिंपून ती पवित्र केली गेली. तसेंच ज्या पात्रांतून मानसिंगास खाद्यपेयादि पदार्थ दिले होते, तीं पात्रें अग्निसंस्कारानें शुद्ध करून, घांसून पुसून साफ करण्यांत आलीं. तसेंच सर्व मंडळींनें सचैल स्नानहि केलें. केवढी ही स्वधर्मप्रीति ! भ्रष्ट आणि देशद्रोही लोकांशीं अशा प्रकारें कडक वर्तन करणें, परिणामीं मोठें हिताचें असतें. अशा वर्तनामुळें धर्मविरोध आणि देशद्रोह करण्याकडे लोकांची

प्रवृत्ति होत नाहीं, व त्यांतूनहि कोणी तसा अधमपणा केलाच तर त्याला शासन होतें.

राणाजींचे हेतु सिद्धीस जाण्याच्या दृष्टीनें त्यानें केलेल्या या वर्तना-मुळें त्याच्या लोकांत जरी इष्ट तोच परिणाम झाला, तरी शत्रुपक्ष मात्र त्यामुळें चिडून गेला.

मानसिंग निघून गेल्यावर झालेला प्रकार हेरांकडून अकबराला कळला, तेव्हां त्यालाहि त्या गोष्टीची मोठी चीड आली. एकंदरींत मानसिंगाच्या अपमानानें ठिणगी पेटली आणि त्यामुळें रणकुंड चेतण्याचीं चिन्हें स्पष्टपणें दिसूं लागलीं.



# — हळदीघांटचा घनघोर संग्राम —

## प्रकरण १० वें.

देशोदेशींचे रजपुतराजे आपणापुढें नमून आपणांस शरण आले, आणि प्रतापचा पीळ मात्र अद्यापि कायम आहे, याचें अकबराला कधींच कांहीं वाटत नसेल असें होणें शक्य नाहीं. रजपुतांच्या मनांत आपल्याविषयीं अभिमान उत्पन्न व्हावा, म्हणून त्यानें त्यांच्याशीं शरीरसंबंध करण्याची युक्ति काढिली होती, व ती त्याची युक्ति सफळहि झाली, हें ८ व्या प्रकरणावरून वाचकांना पूर्ण माहीत झालें आहेच. त्या युक्तींतील मर्म ध्यानांत आल्यामुळें, महाराण्यानें अशा भ्रष्ट रजपुतांशीं सर्व प्रकारचा संबंध सोडून दिला आहे हें कळतांच अकबराला कसें बरें चैन पडेल! केव्हां तरी संधी साधून प्रतापच्या मुसक्या बांधल्या पाहिजेत, असें फार दिवस त्याच्या मनांत होतें. मानसिंगाच्या अपमानानें त्याला ही आयतीच संधि मिळाली.

महाराणा डोंगराळ प्रदेशांत राहूं लागल्यामुळें त्याच्यावर स्वारी करणें तितकें सोपें नव्हतें. तसेंच तो कट्टा धर्माभिमानी असल्यामुळें, त्याच्यावर स्वारी करण्यानें सारें रजपुतांचें रान खवळेल आणि त्याच्याशीं दारुण युद्ध केल्यावांचून इलाज नाहींसा होईल! बरें राणा म्हणजे एखादा सामान्य वीर असता तर गोष्ट निराळी, पण तसेंहि नव्हतें. त्यामुळें हात दाखवून अवलक्षण होऊं नये, याचीहि दक्षता घेणें अकबरास प्राप्त होतें. एकदां हातीं घेतल्यावर तें काम अर्धवट सोडून देणें हेंहि अकबरास कमीपणाचें होतें; आणि हिंदुवीरांच्या

साह्यानेंच राण्यावर चाल केली तरच विजय मिळण्याचा संभव, एऱ्हवीं त्या डोंगराळ भागांत शिरणें अकबरास धोक्याचें वाटे. यासाठीं तसेंच जोरदार निमित्त सांपडल्यावांचून त्यानें या प्रकरणांत अजून हात घातला नव्हता. पण आतां मात्र त्याला चांगली संधि मिळाली.

मानसिंगाचा अपमान हा माझाच अपमान आहे. असें सांगून त्यानें पदरच्या रजपुतांची मर्जी संपादिली आणि आपला पुत्र ‘ सलिम ’ याच्या बरोबर अगणित फौज देऊन त्यानें राण्याचा नक्षा उतरून येण्याविषयीं त्यास आज्ञा केली. महाराण्यासारख्या महाबलाढ्य वीराला अकबरानें पहिल्या धडाक्यासरशीं जिंकिलें, असा लौकिक झाल्यास पहावें म्हणून त्यानें या स्वारीच्या वेळीं मोठमोठे वीर सलिमाबरोबर दिले होते. राणा कितीहि अवघडस्थळीं असला तरी सर्व आडवाटांची आपल्या सेनेला माहिती असावी म्हणून सलिमा-बरोबर त्यानें महोबतखानास पाठविलें होतें. हा महोबतखान राणा-जीचा बाटलेला पुतण्या होता. सागरजी नांवाच्या राण्याच्या भावाचा तो पुत्र होता. महोबतखान मोठा पराक्रमी होता. इतकेंही करून राणा नच आंवरला तर त्याचा गर्व हरण करण्यासाठीं खुद्द मानसिंगासहि बरोबर पाठविण्यांत आलें होतें. मानसिंग शूर तर होतांच पण त्याचाच अपमान झाल्यामुळें, राण्याचा सूड उगविण्या-साठीं तो आपली शिकस्त केल्यावांचून रहाणें शक्यच नव्हतें.

अशा रीतीनें अगणित फौज आणि कसलेले पूर्ण माहितगार शूर लढवय्ये बरोबर देऊन अकबरानें राण्यावर सलिमाची रवानगी केली.

महाराणा प्रतापला त्याच्या हेरांकडून अकबराच्या या हाल-

चालींचा पूर्ण सुगावा लागला. तेव्हां त्यांनीहि आपली सिद्धता केली. स्वतंत्रतेसाठीं देहांवर उदार झालेले २२००० रजपूत एकलिंगजीचा जयघोष करीत, घरादाराची आणि बायकामुलांची आस्था सोडून राणाजीबरोबर समरांगणास निघाले. शत्रुहृदय कंपित करणाऱ्या आरोळ्या ठोकीत त्यांनीं अरवली पर्वताच्या डोंगराळ प्रदेशांत प्रवेश केला. पुढें त्यांनीं त्या बिकट डोंगराचा पश्चिमेकडील प्रदेश पसंत केला, आणि अवघड डोंगरांच्या रांगा पाहून त्यांनीं एक युद्धभूमि निश्चित केली.

## — हळदीघाट तो हाच —

नवानगर आणि उदेपूर यांच्या पश्चिमभागीं अत्यंत डोंगराळ अशा एका अवघड ठिकाणीं राणाजी आपल्या सेनेसह तळ देऊन बसला. तो चाळीस कोस लांबीरुंदीचा एक विस्तीर्ण हमचौक डोंगराळ प्रदेश होता. मधून मधून लहान मोठे ओढे त्या ठिकाणीं स्वैरपणानें क्रीडा करीत होते. जागोजाग भव्य आणि उत्तुंग गिरिशिखरें मेवाडची भव्यता दर्शवीत होतीं. राणाजीची महाप्रतिज्ञा जागृत राहण्यास त्यांचा चांगला उपयोग होई. हजारों वर्षें ऊन, पाऊस आणि वारा खाऊनहि त्यांची भव्यता लवमात्र कमी न झाल्यामुळें ‘ काळ अनंत आहे ’ असेंच जणुं ते राणाजीस सांगत होते. त्या विस्तीर्ण प्रदेशांतील मोठमोठे वृक्ष आणि लहान लहान जाळ्या पाहून राणाजीस वाटे कीं, या वृक्षांपुढेंहि या लहान लहान जाळ्या असल्या, तरी जशा निर्भयपणानें रहात आहेत, त्याच प्रमाणें आपलें बल कमी असलें तरीहि स्वाभिमान जागृत असेल तर अकबरापुढें आपणासहि मानानें रहातां येणें मुळींच अशक्य नाहीं.

राणाजीनें डोंगराळ प्रदेशाचा आश्रय केला आहे, हें जेव्हां

सलिमास कळलें तेव्हां त्यानें आपला मोर्चाहि तिकडेच वळविला. मानसिंगाच्या सांगण्यावरून आपल्या फौजेच्या लहान लहान टोळ्या करून त्यानें डोंगरी मुलखांत मोठ्या सावधपणानें प्रवेश केला.

इकडे राण्यानें अवघड अवघड अशा जागा रोखून धरून, तेथें आपल्या लोकांना टोळ्याटोळ्यांनीं दडून छपून उभें केलें होतें. जागोजाग दगडांच्या राशी जमा करण्यांत आल्या होत्या, आणि त्या राशींजवळ आपआपल्या गोफणी सज्ज करून राणाजीचे विश्वासू भिल्ल उभे राहिले होते. बाण व दगड यांचा वर्षाव करून शत्रूला हटवून धरण्यासाठीं ही योजना केली होती. कांहीं ठिकाणीं मोठ-मोठ्या तुटलेल्या कड्यांखालून ज्या वाटा होत्या तेथून शत्रू जाऊं लागला म्हणजे त्याच्या अंगावर मोठमोठ्या धोंडी लोटून देण्याची तजवीज करून ठेविली होती.

ही सिद्धता होते न होते तोंच यवनसेना हळदी घाटांत येऊन दाखल झाली. हां हां म्हणतां परस्परांच्या लहान लहान चकमकीहि उडूं लागल्या आणि जो तो आपआपली बाजू अधिक संरक्षित कशी होईल याची तजवीज करूं लागला. उभयतांनीं आपआपल्या सेनेचे व्यूह रचले आणि इ. स. १५७६ च्या श्रावण शुद्ध षष्ठी सप्तमीस हळदीघांटच्या त्या सुविख्यात निर्जन अरण्यांत महाराजा-धिराज यवनसम्राट् अकबराविरुद्ध, रजपुतसिंह महाप्रतापी प्रताप-सिंहाचें देशाभिमानानें प्रेरित होऊन प्रचंड स्वातंत्र्ययुद्ध सुरू झालें.

वीरांशीं वीर भिडले! खड्गावर खड्ग खणखणलें! भाल्या-वर भाला चालून गेला! धनुष्याच्या कमानी कसरत करूं लागल्या! बाणांच्या शर्यती लागल्या! वीरांच्या आरोळ्यांनीं, हजारों वर्षें

गाढझोपीं गेलेलीं गिरिशिखरें जागृत होऊन तीं वीरांना प्रत्युत्तर देऊं लागलीं ! स्ववंशीयांचा असा पराक्रम फारा वर्षांनीं पहावयास न मिळाल्यामुळें भगवान् सूर्यनारायण आपली गति विसरून तें भयंकर युद्ध पहातच राहिला !

थोड्याच वेळांत त्या डोंगराळ अरण्यांतील सर्व दृश्य पालटून गेलें ! दोन्ही सैन्यांतील प्रत्येक वीर गर्जना करीत पुढें पुढें जात असलेला दिसूं लागला ! जणुं महाकाळानें संहाराचा चलच्चित्रपटच सुरू केला आहे, असें वाटलें ! हजारों वीर धारातीर्थी बुड्या मारून जन्ममरणाचे फेरे टाळीत होते ! रुधिराची जणु वृष्टीच झाल्या प्रमाणें, त्या डोंगराळ आणि खडकाळ प्रदेशांतून चोहोंकडे रुधिर प्रवाह धांव घेऊं लागले ! मांसरुधिराच्या इच्छेनें वन्यश्वापदें निर्भयपणानें पुढें येऊन आपली क्षुधा व तृषा शमवूं लागलीं ! शेंकडों मरणोन्मुख-वीरांच्या विव्हळण्यानें प्रेक्षकांच्या अंतःकरणास पीळ पडूं लागला ! कोणी धांवतो, कोणी चावतो, कोणी मारतो, कोणी बचाव करितो, कोणी रडतो, कोणी रडवितो आणि कोणी पडतो तर कोणी लढतो, अशी एकच धाई होऊन गेली !

अशा धाईत, लांडग्यांच्या कळपांत एकादा वाघ जशा डुरकण्या फोडीत घुसावा, त्याप्रमाणें राणाजी यवनसेनेंत मानसिंगाचा शोध करीत निर्भयपणानें गिरक्या घालूं लागला.

## चित्तकाचा पराक्रम

महाराण्याच्या पराक्रमांत त्याच्या अत्यंत आवडत्या चित्तक नांवाच्या घोड्याचें स्थान फार मोठें आहे. चित्तक मोठा चपळ, धाडसी, महाधोरणी आणि अत्यंत शूर होता. त्याची स्वामिनिष्ठा

अवर्णनीय होती. ऐनवेळीं त्याचा उपयोग इतका होत असे कीं, केवळ चित्तक होता म्हणूनच यावेळीं आपण वांचलों असें राण्याला वाटे. असे प्रसंग राण्यावर अनेक वेळां आले होते. त्यामुळें चित्तक म्हणजे राण्याचा एक अत्यंत आवडता गळ्यांतला ताईतच होऊन गेला होता. डोंगराळ प्रांतांतून कांहीं ठिकाणीं तुटलेल्या दऱ्या, नुसती फलांग मारून चित्तक धन्यासह ओलांडून जात असे. प्रसंगविशेषीं नद्या नाले सुद्धां झेपेसरशीं उल्लंघून जाण्यांत चित्तकाचा हातखंडा होता. धन्याचे संकेत तो तात्काळ ओळखी आणि वाटेल त्या धाडसी कृत्यांत तो धन्याला अपेक्षेबाहेर साह्य करी. अर्थात् चित्तकाचे हे सर्व सद्गुण महाराण्याच्या संगतीमुळेंच वाढीस लागले आणि प्रसिद्धीस आले. तो एखाद्या शेळपटनंदनाच्या हातीं पडता, तर त्याचें हे गुण कळणें शक्यच नव्हतें. किंवा जातिवंत घोडा महापराक्रमी वीराच्या हातीं पडला, म्हणूनच त्याच्या अंगीं पराक्रमाची पात्रता असते हें लोकांच्या निदर्शनास येऊं शकलें. अश्व, शस्त्र, शास्त्र, वीणा, वाणी, नर आणि नारी हीं ज्याच्या संगतींत असतील त्याप्रमाणें तीं योग्य किंवा अयोग्य होतात.* या न्यायानें पाहिलें तर चित्तक राणाजीस शोभेल असाच अश्वाग्रणी होता असें म्हटलें म्हणजे त्याचें वर्णन पुरे आहे.

चवताळलेला सिंह गजयूथामध्यें ज्या प्रमाणें गर्जना करितो, त्याप्रमाणें यवनसेनेमध्यें राणाजी गर्जना करीत मानसिंगाचा शोध करूं लागला; पण मानसिंग त्याला कोठेंच दिसेना. मानसिंगाला शोधतां

---

* अश्वःशस्त्रं शास्त्रं वीणा वाणी नरश्च नारीच ।
पुरुषविशेषं प्राप्यहि भवन्ति योग्या अयोग्याश्च ॥

शोधतां अचानक त्याला सलिम मात्र दिसला. एका रणधुरंधर गज-नाथावर तो आरूढ झाला होता. बरें झालें, अकबराचा पोरें आयता तावडींत सांपडला आहे! असें म्हणून राण्यानें तिकडे दृष्टी वळविली तोंच, वायुवेगानें चित्तक सलिमाजवळ आला. राणाजीनें अचाट शौर्यानें यवनांची फळी फोडिली आणि सलिमाशीं लगट केली.

## सलीम मेला! सलीम गेला!!

सलिमाच्या हत्तीजवळ येतांच त्या रणपंडितानें महापराक्रमी समरशूरांना देखील थक्क करून सोडण्यासारखें महाधाडसी कृत्य केलें. आपला अतिप्रखर पात्याचा भाला हातांत घेऊन, त्यानें चित्तकास जरा दाबिलें, त्याबरोबर त्या अश्वराजानें आपले पुढले दोन पाय त्या रणधुंद हत्तीच्या अंगावर टाकिले! खरोखर, त्या वेळीं तें दृश्य किती रोमांचकारी दिसलें असेल! क्षणार्धात् महाराण्यानें सलिमाच्या संरक्षकांचा सप्पा उडविला; आणि आपल्या भयंकर भाल्याची फेंक सलिमाकडे रोंखिली! तेव्हां सलिम मेला! सलिम मेला! अशी यवनांनीं भयकारक आरोळी फोडली! तोंच भाल्याचा घाव दणकन् झाला! पण तो फुकट गेला! तो हौद्यावरच बसला! सलिमाच्या आयुष्याची दोरी बळकट होती! राणाजीच्या भाल्याचा घाव हौद्यावरून निसटला! कारण हौद्याला भलेभक्कम पोलादी पत्रे ठोकलेले होते! नाहीं तर हौद्याचा भेद करून भाल्यानें आपलें काम केव्हांच करून टाकिलें असतें! दैवगति विचित्र होती! राण्याच्या हातांतून सलिम निसटावयाचा होता!

हौद्यावरून निसटलेल्या भाल्याचा फटका बसून हत्तीचा माऊत मात्र ठार झाला. त्यामुळें हत्ती निरंकुश होऊन समरांगणांतून पळून

गेला. अशा प्रकारें सलिम वांचला; पण आतां राणाजींचा जीव धोक्यांत आला. त्याच्यावर पठाणांनीं चोहींकडून गर्दी केली. बेहोष झालेला राणा, यवनसेनेंत एकटाच घुसून सलिमावर चाल करून आल्यामुळें, त्याला कोणाचें साह्यहि नव्हतें. अशा वेळीं राणाजीस चित्तक आणि चित्तकास राणाजी, यावांचून दुसरें कोणीचि नव्हतें. प्रसंग कसाहि बाका असला तरी डगमगणें हें राण्याला कधींच ठाऊक नव्हतें. राण्याचें केवढें धैर्य हें ! स्वातंत्र्यासाठीं आणि स्वधर्मासाठीं असा अतर्क्य पराक्रम करणारे महायोद्धे, हे साक्षात् देवच नव्हत काय ?

भगवान् एकलिंगजींचें स्मरण करून, राण्यानें आपला पट्टा फिरविला, आणि यवनांची गर्दी मोठ्या कौशल्यानें कापून, तो पार झाला ? राणाजी, तुझी धन्य आहे ! हे महापुरुषा तुला किती धन्यवाद देऊं ! आणीबाणीच्या प्रसंगीं नुसतें स्मरण केलें तरी कार्यकर्त्याला धैर्य आल्यावांचून रहाणार नाहीं, एवढी तुझी पुण्याई आहे !

राणा यवनांची एक फळी फोडून गेला म्हणून सुटला, असें मुळींच नाहीं. यवनांची फौज अफाट होती. शहाजाद्या सलिमावर ज्यानें प्राणांतिक प्रसंग आणिला त्या राणाजीला, तो एकटा यवनसेनेंत सांपडला असतांहि यवन असा सुखासुखी निसटून जाऊं देतील काय ? बाळअभिमन्यूप्रमाणें त्यांनीं तीन वेळां राणाजीस कोंडिलें. पण आश्चर्याची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे तितक्याहि वेळां तो शत्रूची फळी फोडून व त्यांच्या माना कापून पार झाला ! प्रताप, या तुझ्या शौर्याचें वर्णन करणें हें लेखणीचें कामच नव्हे ! झालेंच तर तें काम तरवारीनें व्हावयाचें, आणि त्यालाहि एकटी

ती तुझीच तरवार समर्थ आहे! करितां तूं, तुझा तो चित्तक, ते तुझे संवगडी, आणि तुझीं तीं शस्त्रास्त्रें या सर्वांचें स्मरण करून पूज्य-भावानें मी तुम्हांला वंदन करितों!!

दोन वेळां यवनांस झुकांडी देऊन महाप्रतापी प्रताप जेव्हां तिसऱ्यांदा कोंडला गेला, तेव्हां त्याला एकंदर सात जबर जखमा झाल्या होत्या. त्यांतील तीन जखमा भाल्याच्या, तीन तरवारीच्या, आणि एक जखम बंदुकीची गोळी लागून झालेली होती. दिवसभर अदम्य उत्साहानें आणि नवस्फूर्तीनें अभूतपूर्व युद्ध करून तो दमून गेला होता. त्याला यावेळीं कोणाच्या तरी मदतीची फार अवश्य-कता होती, त्यानें मोठ्या आशेनें एकदां चोहींकडे नजर फिरविली, पण! पण काय? जिकडे पहावें तिकडे पठाण! पठाण! आणि पठाण! त्याच्या बाजूचा असा त्याला एकहि वीर दिसला नाहीं.

## झालापति मानसिंहानें प्राणांची कुरवंडी केली!

इतक्यांत 'महाराणा प्रतापकी जय!!' असा मेघनादसदृश शब्द राणाजीच्या कानावर आला. आधींच स्फूर्तीचा जिवंत झरा, आणि त्यांत मेघगर्जनापूर्वक वृष्टी झाली! मग काय विचारतां? राणाजीच्या रोमरोमांतून स्फूर्तीचे प्रवाह उफाळूं लागले! दीडशें रावतराउळांसह महापराक्रमी झालापती मन्नाजी, विद्युद्वेगानें राणा-जीच्या समीप आला; आणि समय ओळखून राणाजीच्या राज-छत्राखालीं तो स्वतः जाऊन उभा राहिला, राजछत्र आणि राजचिन्हें, यांच्या योगानें राणाजी पठाणांस तेव्हांच ओळखितां येई, आणि त्यामुळेंच त्याच्यावर तुटून पडण्यास त्यांना सोपें जाई; परंतु राणा-जीनें अद्यापि स्वचिन्हांचा त्याग केला नव्हता. पण आतां मात्र

त्यावांचून त्याचा बचाव होणें कठीण होतें, एवढी आतां पठाणांनीं त्याच्यावर गर्दी केली होती. ही वेळ ओळखून, मन्नाजीनें राण्याचीं चिन्हें मोठ्या चलाखीनें आपण धारण केलीं, आणि राणाजीस फळी फोडून सुस्थळीं जाण्यास विनविलें. आपल्यासारखीं माणसें राणाजी निर्माण करूं शकेल, पण राणाजीचा पराक्रम मात्र स्वयंभू आहे. तो कोणाला निर्माण करितां येणार नाहीं. तेव्हां यावेळीं आपल्या प्राणांची कुरवंडीच केली पाहिजे. असें चिंतून मन्नाजीनें राणाजीचा बचाव करून त्याच्या जागीं तो यवनांशीं झुंजूं लागला. यावेळीं यवनांनीं असा व्यूह रचला होता कीं त्यांतून सुटणें कोणासच शक्य झालें नसतें, आणि म्हणूनच तर राणाजीनेंहि मन्नाजीच्या विनंतीस, पुढील कार्याकडे लक्ष देऊन मान दिला होता. मन्नाजी त्याप्रसंगीं शिकस्त करून लढला, पण अखेरीस यवनांनीं त्याच्या पवित्र शरिराच्या ठिकऱ्या उडवून टाकिल्या !

अशा रीतीनें मन्नाजीनें आपल्या शरिराचें सोनें केलें ! त्याचा जन्म कृतार्थ झाला ! तो पुण्यात्मा धारातीर्थीं पतन पावला ! तो मेला, पण मरावें कसें, याचा वीरांना धडा देऊन मेला ! त्याच्या मरणानें रजपुतांना चौपट जोर चढला ! त्या दिवशींचें युद्ध संपलें. हजारों वीरांनीं त्या दिवशीं यवनांशीं आश्चर्यकारक झुंज घतला होती ! प्रत्येकाजवळ सांगण्यासारखे आणि आठवण्यासारखे अनेक प्रसंग होते ! पण मन्नाजीच्या आत्मबलिदानापुढें ते सर्व प्रसंग फिक्के पडून जो तो मुक्तकंठानें मन्नाजींचेच गुण गाऊं लागला ! मन्नाजीच्या मरणानें जिवंत रजपुत स्फूर्तीनें भरून गेले ! मन्नाजीच्या मरणानें मृतवत् रजपूत जिवंत झाले आणि मन्नाजीच्या मरणानें मरून अमर होण्याची रजपुतांना हौस वाटूं लागली !

## झालापतीचा सन्मान

आणीबाणीच्या प्रसंगीं झालापतीनें केलेल्या या अमोलसेवेचें सर्वांस स्मरण रहावें म्हणून, त्याच्या वंशजांस राण्यानें साद्रीपरगणा व नौबतीचा मान दिला. राजाचे मंदिराजवळ आलें असतां सर्व सरदारांनीं आपल्या नौबती वाजवावयाच्या नसतास पण ज्यांना हा नौबतीचा मान देण्यांत आला असेल, त्यांनीं आपल्या नौबती बंद करण्याचें कारण नसतें. शिवाय राजदरबारांत झालापतीच्या वंशजांनीं राजचिन्हें धारण करून राण्याच्या उजव्या बाजूस बसावें असाहि त्यांस मान देण्यांत येऊन त्यांना ' राजे ' अशी पदवीहि देण्यांत आली. हा सन्मान झालापतीचे वंशज अद्यापि उपभोगीत आहेत.

## — चित्तकाची स्वामिनिष्ठा —

झालापतीच्या वधानें त्या दिवशींचें युद्ध संपलें. भगवान् दिनरश्मी अस्तंगत झाला. सकाळपासून यवनांच्या आलटून–पालटून अनेक टोळ्या रजपुतांशीं युद्ध खेळून गेल्या; पण राणाजी मात्र सकाळीं एकदां जो चित्तकावर स्वार झाला होता, तो अजून अश्वावरून क्षणभरहि खालीं उतरला नव्हता. त्याला विसावा घेण्यासहि सवड मिळणें शक्य नव्हतें. प्रत्येक लहान मोठ्या चकमकींत स्वतः भाग घेऊन लढणाऱ्या त्या वीराला विसावा मिळणार तरी केव्हां !

राण्यालाच जर विसावा नाहीं तर चित्तकाला तरी कसा विसावा मिळणार ! शेवटची फळी फोडून राणा जेव्हां यवनसैन्यांतून बाहेर पडला, तेव्हांच तिकडे झालापतीचा वध झाला; आणि इकडे राणा आत्मसंरक्षणार्थ अरण्यांत घुसला. चित्तक यावेळीं फार थकून

गेला होता. त्याच्या अंगांतून रक्ताचे पाट वहात होते! त्याच्या तोंडाला फेंस आला होता! त्याचीं गात्रें शिथिल होऊन गेलीं होतीं! त्याचा घसा कोरडा पडला होता! आणि प्राण कासावीस झाले होते! त्याची स्वामिनिष्ठा मात्र क्षणोक्षणी वाढीस लागली होती! जसजशी त्याची जीविताची आशा कमी होऊं लागली, तसतशी त्याची स्वामिनिष्ठा अधिकच जागृत होऊं लागली!

माझा धनी! हाय! हाय! आतां या महाभागाला सोडून जाण्याची मजवर पाळी येणार ना! आजपर्यंत ज्यानें आपलें, पोटच्या पुत्रासारखें पालन केलें त्याला संकटांत टाकून जाण्याची मजवर वेळ यावी ना! आतां काय करूं! कोणाला शरण जाऊं! धन्याला स्वतंत्र झालेला पाहण्याचें माझ्या नशिबीं नाहींच ना?

असे विचार त्या शहाण्या घोड्याच्या मनांत येत असावे असें वाटूं लागलें! त्याचे डोळे भरून आले! तो एकसारखा मागें वळून राणाजीच्या मुखाकडे पाहूं लागला! राणाजीनेंहि त्या मूकसेवकाचा भाव ओळखिला! त्याला वाटलें, मी किती निर्दय आहें! माझ्या चित्तकाला आज मी क्षणभरहि विसावा दिला नाहीं! चित्तक, बेटा, तुला फार श्रम झाले! पण समयच बाका आला त्याला मी तरी काय करूं? असें म्हणून राण्यानें त्याला मोठ्या प्रेमानें चुचकारिलें. चित्तकाला राणाजीच्या त्या कृतीनें किती किती धन्यता वाटली?

## अनर्थ ओढवला

अशा वेळीं राण्याला घेऊन चित्तक अरण्यांत जात असतांना दोघां पठाणांची त्याच्यावर दृष्टी गेली. लगेच त्यांनीं त्याचा पाठलाग केला. चित्तकाच्या हें तात्काळ ध्यानांत आलें. त्याच्या तीक्ष्णकर्णेंद्रि-

यांना पठाणांच्या दौडीची चाहूल लागली. पठाण धन्याचा पाठलाग करीत आहेत हें पाहून, चित्तकाला फार खेद झाला. त्याला आतां मुळींच त्राण उरलें नव्हतें. त्याला वाटलें या आपत्तींतून आपण आपल्या धन्याला वांचवूं शकूं का तरी! इतका वेळ लढून आणि इतक्या गर्दीतून धन्यासह पार पडलों, आणि या दोघां पठाणांच्या तडाक्यांतून सुटणें देखील मोठें कठीण वाटण्याइतकें मला दौर्बल्य यावें ना! महासागरांत बुडलेल्या जहाजांतून बचाऊन यावें आणि दारांतल्या पाटांत पडून प्राण घाबरावा, अशी त्यावेळीं चित्तकाची अवस्था झाली होती. काय वाटेल तें होवो, जिवांत जीव आहे तोंपर्यंत धन्याला घेऊन पळायचें, असा चित्तकानें निश्चयच केल्याचें दिसत होतें. तो वायुवेगानें अरण्यांत जाऊं लागला. हां हां म्हणतां त्यानें पठाणांपासून बरेंच दूरचें अंतर गांठलें होतें. संकटें जणुं आधीं आपापसांत संगनमत करूनच मग एकाद्याच्या पाठीस लागतात. म्हणूनच एकामागून एक त्यांचा एकाद्यावर हल्ला होऊं लागला म्हणजे वर डोकें काढणें कोणालाहि शक्य नाहींसें होऊन जातें.

आतां आपण सुस्थळीं आलों, पठाणांचा मागमूसही नाहीं. अशा रीतीनें चित्तकाला जरा आशा वाटूं लागली, तोंच पुढें एक अनर्थ ओढवला. मार्गांत एक नदी आड येऊन तिनें चित्तकाची पूर्ण निराशा केली. नुकतीच झालापतीनें आपल्या प्राणांची कुरवंडी केलेली त्याच्या स्मरणांत होती व त्यामुळें त्याला जरा धीर वाटला. हे विचार चालू असतांना त्याची गति कायमच असल्यामुळें थोड्याच वेळांत तो नदीच्या तीरापर्यंत येऊन पोंचला.

वास्तवीक पाहतां ही नदी उल्लंघून जाणें चित्तकाला मुळींच अवघड नव्हतें परंतु दिवसभर क्षणाचाहि विसावा नाहीं, पोटांत

चिमटीभर दाणा नाहीं आणि सबंध दिवसांत पोटभर पाणीहि पितां आलें नाहीं असें असतां श्रम मात्र जिवापाड झालेले, त्यामुळें त्याचे प्राण अगदीं डोळ्यांत आले होते. प्रतापासारख्या रणंधा-वीराला दिवसभर पाठीवर घेऊन क्षणोक्षणीं जिवाची शिकस्त होई-पर्यंत श्रम झाल्यामुळें, चित्तकाची छाती फुटून गेली होती. त्याला अगणित जखमा झाल्या होत्या. त्याच्या नसांतून रुधिरप्रवाह वहात होते. असें असूनहि त्या पशुदेवानें मानवास थक्क करून सोडणारा दिव्य पराक्रम केला.

आतां मला फार वेळ धन्याची सेवा करतां येणें शक्य नाहीं! अंतकाळीं आपल्या धन्याला प्रसंगांत लोटून, व त्याला दगा देऊन मरणेंच जर नशिबांत असेल, तर त्याला काय करणार! पण आज-पर्यंत मी जर धन्याची त्याला ईश्वर समजून एकनिष्ठपणें सेवा केली असेल तर अंतकाळीं माझी इच्छा पूर्ण होईल! असें मनांत आणून आपण ताज्या दमातच आहों अशा विचारानें त्यानें किनाऱ्यावरून पैलतीरीं मोठ्या तडफेनें झेप घेतली व लीनेनें नदीचें पैलतीर गांठून, अजरामर लौकिक संपादिला व जन्ममरणाचेंहि पैल-तीर गांठिलें.

झालापतीसारखे नरदेव आणि चित्तकासारखे पशुदेव, यांपैकीं अधिक कौतुक कोणाचें करावें, हेंच समजत नाहीं. का ज्या महा-त्म्याच्या संगतींत अशा दिव्य जीवांना स्फूर्ति येते त्याचेंच कौतुक केलें तर त्यांत सगळ्यांचा समावेश होईल!

चित्तक तूं कैलासनाथांचा नंदी होतास! का लक्ष्मीकांताचा आव-डता गरुड होतासरे? महाराण्याला साह्य होण्यासाठींच का तूं अश्वरूप धारण केलें होतेंस? बाबा, तुला पशु कोणत्या तोंडानें

म्हणू ! रजपुतांसारख्या अस्सल धर्मनिष्ठांतहि मानसिंग, भगवानदास, उदेसिंग असे देशद्रोही लोक निघतात आणि बा चित्तका, तुझ्या सारख्या पशूनें महाराण्यासारख्या धर्मनिष्ठाची अशी उत्कृष्ट सेवा करून मानवासहि थक्क करून सोडणारा पराक्रम केला हें तुला किती भूषणास्पद आहे ! वाहावारे, चित्तक ! अखिल अश्व जातीचें भूषण झालास बाबा ! !

मोठ्या शिकस्तीनें नदी उल्लंघून चित्तक पार झाला, पण तेथें तो क्षणभरहि थांबला नाहीं. तेथून त्यानें जी भरारी मारिली तो हां हां म्हणतां दृष्टीच्या टप्प्यांतून दूर निघून गेला.

त्यावेळीं सविता समुद्रस्नानास गेला तिकडेच बुडी मारून राहि· ल्यामुळें भूतलावर अंधःकाराचें साम्राज्य पसरण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. संधि प्रकाशांत थोडा वेळ पायाखालची वाट दिसत होती, पण वनांमध्यें तर मुळींच दिसेनासें झालें होतें, वनपशू आप-आपल्या स्थानीं जांभया देऊन व आळेपिळे काढून अरण्यसंचा-राची पूर्वसिद्धता करूं लागले होते. रातकिड्यांना रात्रभर गाणें करावयाचें असल्यामुळें त्यांनीं हळूहळू दोन दोन चारचार ताना मारून आवाज मोकळा आहे किंवा नाहीं हें पहाण्यास सुरवात केली होती. सृष्टिदेवीची गंभीरता भीषणतेच्या हद्दींत पदार्पण करूं लागली होती.

अशा वेळीं त्या निर्मुष्य अरण्यांत चित्तकानें राणाजीसह प्रवेश केला ! त्याला स्वार्थधुंद मनुष्यापेक्षा अरण्यांतील क्रूरश्वापदेंच अधिक चांगलीं वाटलीं असलीं पाहिजेत ! लोभ—प्रेरित होऊन, स्वजनद्रोह आणि राष्ट्रघात करणाऱ्या नराधमांनीं गजबजलेल्या प्रदेशापेक्षां निर्मनुष्य अरण्यच त्याला अधिक सुखद वाटलें असेल ! किंवा परतंत्र

दिवसापेक्षां सर्व बंध विनिर्मुक्त अशी त्या अरण्यांतील रात्रच त्याला अधिक योग्यतेची दिसली असावी ! कांहींहीं असो त्या अरण्यांत येतांच त्याला मोठें समाधान वाटलेलें दिसले एवढें खरें! त्यानें एकदां आपले तीक्ष्ण कर्ण सर्वत्र फिरविले व चोहींकडे दृष्टी टाकून शत्रूची चाहूल घेतली आणि मग हळूहळू आपला वेग कमी कमी करण्यास सुरवात केली.

## आघात तेंच हित झालें

आतां चित्तक आपल्या धन्याला सुस्थळीं नेऊन पोंचविल्याची धन्यता मानून जरा फुरफुरूं लागणार! इतक्यांत राणाजीला एक नवीनच संकट ओढवल्याचें कळून आलें. "अरे काळ्या अश्वावर आरूढ झालेल्या स्वारा भिऊं नकोस" असे शब्द त्याच्या कानावर आले! चित्तकाला कोणी तरी धन्यावांचून अन्य व्यक्ति या कान-नांत बोलत आहे हें कळलें, व त्याला संकटांनीं अद्यापि आपली पाठ सोडिली नाहीं असें वाटलें, व तो पुनः येईल त्या प्रसंगास तोंड देण्याची सिद्धता करून, पुढें काय होतें तें पहात राहिला. आलेल्या शब्दाच्या मागोमाग थोड्याच वेळानें कोणी एक व्यक्ति राणाजीच्या दृष्टिपथांत आली. राण्याला प्रथम नुसती आकृतीच दिसत होती. पण थोड्याच वेळानें, त्याचा हात, कमरेच्या कट्यारीकडे गेला! नेत्र विस्फारित झाले! बाहु स्फुरण पावले! मुठी आंवळूं लागल्या! आणि त्यानें अश्वावरील आपली बैठक घट्ट करून सांवरली! व येणाऱ्या व्यक्तीकडे चित्तकाचा मोर्चा वळवून तो आवेशानें म्हणाला-दुष्टा अशा आणीबाणीच्या वेळीं वैर साधावयास आलास काय? ठीक! अशा स्थितींतहि ही माझी समशेर तुझा समाचार घेण्यास समर्थ आहे! ये! असा माझ्या समोर ये! जरी मी अत्यंत

दमलों असलों, अथवा माझा चित्तक जरी श्रांत झाला असला तरी तुझ्यासारख्या स्वकुलद्रोही महापातक्याचा समाचार घेण्यास भगवान् एकलिंगजीनें मला पूर्ण सामर्थ्य दिलें आहे !

राणाजींचा तो आवेश पाहून व अशा विकल स्थितींतहि शत्रूचें पारिपत्य करण्याची त्याची सिद्धता पाहून शत्रूलाहि राणाजींच्या कर्तव्य-दक्षतेचें नवल आणि कौतुक वाटल्यावांचून रहाणार नाहीं ! मग येणारी व्यक्ति तर राण्याच्या सकाळपासूनच्या पराक्रमानें शुद्धीवर आलेला त्याचा सख्खा भाऊ होता. त्याला आपल्या महापराक्रमी वडील भावाची ही वृत्ति पाहून अधिकच पश्चाताप झाला आणि त्यानें राणाजीस नम्रभावानें लोटांगण घातलें.

## शाक्तसिंह शरण आला !

अशा दमलेल्या स्थितींत खुरासनी आणि मुलतानी अशा दोन पठाणांनीं राण्याचा पाठलाग केलेला पाहून पूर्वी अकबरास येऊन मिळालेला, राण्याचा महापराक्रमी भाऊ शाक्तसिंह यास वाईट वाटलें. स्वधर्मासाठीं आणि स्वदेशासाठीं इतकी तळमळ बाळगणाऱ्या आपल्या भावापासून आपण उगाच फुटलों, असा त्याला राण्याचें वर्तन पाहून आणि त्याचा पराक्रम पाहून, आतां पश्चाताप झाला होता. तो सद्गद कंठानें राण्यास म्हणाला—दादा मी तुला शरण आलों आहे ! माझ्या वर्तनाचा आतां मला पूर्ण पश्चाताप झाला असून, माझें यापुढील सर्व आयुष्य तुझ्या सेवेंत कंठावें असें मी ठरविलें आहे.

तुझा पाठलाग करणाऱ्या दोन्हीं पठाणांना कापून मी तुझ्या भेटीस आलों आहें. तेव्हां मला पदरांत घे. मी तुझा धाकटा भाऊ

आहे. माझे अपराध पोटांत घालून मला क्षमा कर. शाक्तसिंहाचें हें भाषण ऐकून राण्याला जो आनंद झाला त्याचें वर्णन शब्द कसे बरें करूं शकतील! त्यानें मोठ्या प्रेमानें शाक्तसिंहास जवळ घेतलें आणि त्याला आशीर्वाद देऊन त्याच्या मस्तकाचें अवघ्राण केलें. सोन्यांत सोनें मिसळलें! हंसाला हंसाची ओळख पटली आणि सिंहाला सिंह जाऊन मिळाला!!

## — चित्तकाचें देहावसान —

हा सर्व प्रकार पाहून चित्तकाला मोठी धन्यता वाटली! आपला मृत्युकाल धन्याला लाभदायकच झाला, हें पाहून त्याला परमावधीचा आनंद झाला. शाक्तसिंहाला भेटण्यासाठीं राणा जेव्हां चित्तकावरून खालीं उतरला तेव्हांच चित्तकाला कृतकार्य झाल्याचें समाधान वाटलें!

इतका वेळ त्याच्या तीव्र इच्छाशक्तीमुळेंच केवळ त्याचे प्राण शरिरांत राहिले होते. पण आतां त्याचे नेत्र भरून आलेले दिसले! त्याचा कंठहि दाटून आला असावा! धनीसाहेब, या दीन सेवकाचे जे अपराध झाले असतील त्याची आतां मला क्षमा करा! असें विनवीतच आहे कीं काय, अशा मुद्रेनें त्यानें एकदां राणाजीकडे पाहिलें! तसेंच महाराज, माझी आठवण विसरूं नका बरें! अशा भावनेनें तो राणाजीच्या जवळ आला आणि त्यानें धन्याच्या खांद्या-वर आपली मान टाकिली! प्रतापनेंहि तितक्याच प्रेमानें त्याचें मुख कुरवाळिलें. आणि त्याच्या गळ्यांत गळा घालून त्यानें त्याला अत्यंत प्रेमानें भेट दिली! चित्तका तुझे उपकार जन्मभर फिटावयाचे नाहींत! तुला यावांचून दुसरें काय बक्षीस देऊं! अशी कृतज्ञता राणाजीच्या या कृतींत भरून गेली होती!

चित्तकाला धन्याच्या या कृतीनें मोक्षसुखाचा आनंद झाला व त्या आनंदांतच त्यानें भूमीवर अंग टाकिलें! तोंच महाराण्यानें चटकन् खालीं बसून त्याचें मस्तक आपल्या अंकावर घेतलें! तेव्हां चित्तकाची प्राणज्योति राण्याकडे पहात पहात निघून गेली! दिवा मालवला! रत्न हरपलें! चित्तकानें आपले पाणीदार नेत्र कायमचे मिटून घेतले! आणि प्रतापसारख्या महावीराला चटका लावून त्या शहाण्या, ममताळू, महाशूर आणि कृतज्ञ घोड्यानें परलोक जवळ केला! त्याच्या निधनानें राणाजीला आपला एक सख्खा भाऊ निधन पावल्याचें दुःख झालें!

जेथें चित्तक पडला त्या ठिकाणीं राणाजीनें त्याचें एक थडगेंहि बांधिलें आहे. जारोळ गांवाजवळ 'चित्तकका चबुतरा' या नांवानें तें थडगें अद्यापि प्रसिद्ध आहे. चित्तकाच्या अनेक शौर्याचीं उदेपूर राजधानींत निरनिराळीं चित्रेंहि काढलेलीं आहेत. जितके दिवस महाराण्याचें नांव कायम राहील, तितकेच दिवस झालापति मन्नाजी आणि चित्तक या दोघांचीं नांवेंहि या भूलोकीं चिरकाल रहातील! अशी त्यांची कृति उज्वल आहे!

## सलिमास शंका आणि शाक्तसिंहाचें पुनरागमन

इकडे प्रतापाची भेट घेऊन व त्याला शरण जाऊन शाक्तसिंह सलिमाजवळ आला, आणि त्यानें, पाठलाग करणाऱ्या पठाणांची प्रतापानें कत्तल केली असें सलिमाला सांगितलें. दिवसभर श्रम करून दमून गेलेल्या प्रतापाला या कामीं शाक्तसिंहानें मदत केली असावी अशी सलिमाला शंका आली. त्यानें शाक्तसिंहाला म्हटलें कीं, शाक्त, खरें सांग, तुला अभय आहे. तूं महाराण्याला साह्य केलेंस कीं नाहीं?

शक्ताला आतां यवनांकडे रहावयाचेंच नव्हतें आणि सलिमा-कडून त्याला अभयहि मिळालें होतें. त्यामुळें त्यानें झालेली सर्व हकिगत सलिमाला स्पष्टपणें सांगितली. अर्थातच या गोष्टीचा सलिमाला राग आला, पण अभय दिलें असल्यामुळें त्याला कांहीं कडक शासन करितां येईना. शेवटीं त्यानें शाक्तसिंहाचे आपल्या सैन्यांतील अधिकार काढून घेतले. हा अपमान सहन न होऊन शाक्तसिंह तेथून निघाला तो भाइन्सर किल्यावर स्वारी करून त्यानें यवनांकडून तो किल्ला मोठ्या शिताफीनें जिंकून घेतला आणि त्याच नांवाचें किल्या-जवळील गांव ताब्यांत घेऊन व तेथें बंदोबस्त करून तो महाराण्यास येऊन मिळाला. स्वपराक्रमानें मिळविलेला गांव व किल्ला प्रतापच्या चरणीं अर्पण करून त्यानें पदरीं आश्रय देण्याविषयीं प्रतापास विनविलें.

थोर ते केव्हांहि थोरच ! त्यांचें अंतःकरण फार मोठें असतें. राण्यानें शाक्तसिंहास तो गांव व किल्ला बक्षिस देऊन वंशपरंपरा तेथील अधिपत्यहि त्याजकडेच दिलें. तसेंच त्यानें शाक्तसिंहाला आपलें सेनापत्यहि दिलें आणि त्याचा गौरव केला.

भाइन्दर एथील शाक्तसिंहाच्या वंशाला '**सूक्तावत**' असें म्हणत. आपल्या बंधूस येऊन मिळाल्यामुळें शाक्तसिंहाचें भाटांनीं फार वर्णन केलें असून, पठाणांच्या हल्यांतून त्यानें राणाजीस वांचविल्यामुळें ते त्याला 'खोराखानी-मुलतानीका अग्गल' म्हणजे खोराखान व मुलतान या पठाणांचा प्रतिबंध करणारा असें म्हणत.

## दुसऱ्या दिवशीं भयंकर अनर्थ

ऋषभनाथाच्या खोऱ्यांत अशा प्रकारें रजपुतांनीं घनघोर संग्राम


केला. या युद्धांत यवनांचें अपरिमित नुकसान झालें, पण शेवटीं त्यांचें बळ अमर्याद असल्यामुळें विजयश्रीनें त्यानांच माळ घातली. पहिल्या दिवशीं सलिमावर प्राणांतिक संकट आल्यामुळें, दुसऱ्या दिवशीं त्यानें भयंकर क्रूर स्वरूप धारण केलें. रजपुतांनीं यवनांशीं शिकस्तीची टक्कर दिली परंतु पुढें त्यांचें बळ अपुरें पडलें, व त्यांची पीछेहाट होऊं लागली.

इ. स. १५७६ श्रावण शुद्ध सप्तमी हा दिवस रजपुतांच्या अभूतपूर्व पराक्रमाची साक्ष देत इतिहासांत अजरामर होऊन राहिला आहे. स्वातंत्र्यासाठीं रजपुतांनीं या लढ्यानें, जगाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखे जे थोडेसे प्रसंग आहेत त्यांत आपलें नांव प्रविष्ट करून घेतलें.

मूठभर रजपुतांनीं आपल्या चौपट यवन फौजेशीं टक्कर देणें आणि त्यांत रजपुतांना जरी माघार घ्यावी लागली तरी एवढी मोठी फौज असूनहि यवनांची खात्री होणें ही कांहीं सामान्य पराक्रमाची गोष्ट नाहीं, हजारों रजपुतांनीं मोठ्या उत्साहानें आणि कर्तव्यबुद्धीनें या युद्धांत आत्मार्पण केलें. अवघे ८००० रजपूत शिल्लक राहिले. रणकुंडांत हुत झालेल्या १४००० वीरांत ५०० महायोद्धे राणाजीचे नातलग आणि इष्टमित्र होते. यावरून राणाजीची याप्रसंगीं केवढी मोठी हानी झाली याची वाचकांस कल्पना येईल. एवढ्या लोकांचीं नावें कुठवर सांगावी ! पण ग्वालेरचा पदच्युत राजा रामशा, त्याचा पुत्र खंडेराव व त्याचे ३५० तुवरवंशीय वीर व झालापति मन्नाजी व त्याचे १५० सामंत साथिदार इत्यादि अद्वितीय योद्धे या युद्धांत अतुल पराक्रम करून अमर झाले.

हळदीघांटांतील तें अरण्य आणि ऋषभनाथचें तें खोरें रजपुत

युवकांच्या रुधिरानें भिजून गेलें. यवनांनीं अनर्थ केला ! आबाल-वृद्धांची त्यांनीं कत्तल केली ! नाना प्रकारचे अत्याचार केले ! आणि समरांत झालेल्या सलिमाच्या फजितीचें यवनांनीं अमानुषपणें उट्टें काढिलें ! या प्रसंगीं रजपूत-समरधीरांचा वंशाच्या वंश लयाला गेला ! घरोघर कोणा तरी रजपूत युवतींचें सौभाग्य नष्ट झालेलें होतें ! अशा तऱ्हेनें या युद्धाचा महाभीषण शेवट झाला ! पुढें पाऊस जोर करूं लागल्यामुळें, यवन स्वस्थानीं निघून गेले.



# — दुर्दैवाचा फेरा —

## प्रकरण ११ वें.

लाभहानीचा प्रश्न नव्हता ! सलिमाला विजय मिळाला हीच फार मोठेपणाची गोष्ट वाटली. वास्तविक त्यांत मोठेपणा वाटण्यासारखें कांहींच नव्हतें. युद्धसामुग्रीच्या दृष्टीनें राणाजीपेक्षां यवनांची सुधारलेली होती. बंदुका व तोफांसारख्या प्रचंड संहारक साधनांची सलिमास अनुकूलता होती. एवढ्या एकाच गोष्टीचा जरी विचार केला, तरी सलिमास विजय मिळाला यांत लवभरहि आश्चर्य मानण्या-सारखें कांहींच झालें नाहीं.

आतां, राणाजीचें सैन्य स्वदेशप्रेमाच्या महामंत्रानें भारून गेलेलें होतें व अकबरसेना ही केवळ पगारी शिपायांची होती; त्यामुळें सलिमास विजय मिळणें कठीण होतें असें कोणी म्हणेल ! परंतु ह्या मुद्यांत सुद्धां सलिमाची वाखाणणी करण्यासारखें कांहींच नव्हतें. कारण राणाजीची फौज २२००० होती तर सलिमाबरोबर अक-बरानें ८८००० फौज दिली होती. त्यावांचून राणाजीजवळ मुळींच लोक नव्हते पण अकबरानें जरूर पडल्यास आणखी पाहिजे तितकें सैन्य सलिमास पुरविलें असतें. अशा स्थितींत एवढ्या मोठ्या प्रचंड राजसत्तेपुढें आपल्या अवघ्या मूठभर लोकांनिशीं महा-राण्यानें पुढील परिणाम जाणीत असून सुद्धां, केवळ तीव्र देशा-भिमानानें प्रेरित होऊन, झुंज घेतली हीच आश्चर्यासहि आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट होय ! राणाजीचा उत्साह केवढा प्रचंड होता,

आणि त्याची देशप्रीती किती जाज्वल्य होती, याची या एकाच गोष्टीवरून साक्ष पटण्यासारखी आहे.

पर्जन्यामुळें हळदीघांट आणि ऋषभनाथ एथील डोंगराळ प्रदेशांत नुसतें रहाणें सुद्धां यवनांना शक्य नव्हतें. मग ते राण्याबरोबर युद्ध कसे करणार! त्यामुळें सलिमानें विजयानें धुंद होऊन राजधानी गांठिली; पण लांडग्याला एकदां रक्ताची गोडी लागली म्हणजे जसें चैन पडत नाहींसें होतें तशी आतां अकबराची स्थिति झाली. त्यानें पावसाळा संपल्याबरोबर पुन्हा सलिमास सैन्य देऊन राण्यावर रवाना केलें. इ. स. १५७७ च्या माघ शुद्ध सप्तमीस सलिमानें कुमळनेर-किल्ल्यावर पुनः स्वारी केली.

राण्यानें या किल्ल्याची डागडुजी करून तो चांगला भक्कम केला होता; आणि त्याची युद्धकुशलताहि वाखाणण्यासारखी होती. त्यामुळें त्यानें सलिमाच्या अफाट सेनेपुढें सुद्धां पुष्कळ दिवस चिकाटीनें दम धरिला होता; परंतु ऐन वेळीं एका देशद्रोही रजपुतानें त्याला दगा दिला.

## देवरानें दगा दिला

जाज्वल्य देशप्रीति किंवा देशद्रोह, दिगंत कीर्ति किंवा चिरकाल नरकवास, आणि पुष्पवृष्टि किंवा पैजारपूजा, या परस्परविरुद्ध पारितोषकांचा जन्म एकाच आईपासून आणि एकाच क्षणी होतो. म्हणजे ज्या क्षणी जी गोष्ट केली असतां ती कर्त्याला जाज्वल्य देशभक्तीच्या उच्च शिखरावर चढविते, त्याच क्षणी ती न केल्यास किंवा त्याच्याविरुद्ध वर्तन केल्यास कर्ता देशद्रोहाच्या खोल गर्तेत ढकलला जातो. असेंच सत् किंवा असत् लौकिकाचें आहे. राणाजी सलिमास थक्क करून

सोडणारा पराक्रम करून आपला देश स्वतंत्र करण्याची आटोकाट मेहेनत घेत असतां अबूचा राजा देवरा यानें त्याच वेळीं स्वार्थ-बुद्धीनें यवन दरबारांत, आपला मान वाढावा म्हणून एक अत्यंत नीच कर्म केलें, आणि त्यामुळें राण्याचा नाइलाज होऊन त्याला कुमळनेर सोडून जाणें भाग पडलें.

कुमळनेर किल्ल्यांत 'नोगण' नांवाची एक विहीर होती. किल्ल्यावरील सर्व लोकांना पाण्याचा पुरवठा करणारी ती एकच सोय होती. त्या विहिरींत महाविष कालवून तिचें पाणी निकामी करून टाका, म्हणजे कुमळनेर हस्तगत झालाच म्हणून समजा! असा देवरानें सलिमास सल्ला दिला, आणि युक्ति प्रयुक्तीनें यवनांनीं तसें केल्याबरोबर, किल्ल्यांतील लोकांना जीवनच मिळेनासें झाल्या-मुळें, राण्याला किल्ला सोडून देणें भाग पडलें. चौकशीअंती एका रजपुतानेंच हा नीच सल्ला देऊन आपल्यावर हा अनर्थ आणिला आहे, असें कळतांच राणाजीला अत्यंत खेद वाटला. हा अबूचा देवरा अकबराला पूर्वीच सामील झाला होता. या आणीबाणीच्या प्रसंगीं यवनांच्या उपयोगीं पडून त्यानें स्वदेशाच्या गळ्याला तांत लावून, यवनकृपा संपादन केली. असल्या नालायक लोकांना जन्म दिल्याचें प्रायश्चित्तच जणुं अशा लोकांकडून त्या त्या देशाला मिळत असतें! अधमाधम देवरा, तुझ्या सत्कारासाठीं, तुझें नांव निघतांच सज्जन कसल्या माळा घेऊन येतील, याचा क्षणभर तरी विचार केला होतास का रे?

दुष्ट कृती करतांना जरी सुखकर दिसत असल्या तरी त्याचे परिणाम गोड होत नसल्यामुळें, ते दुष्टांना सुद्धां नको असतात. म्हणून जरा विचार करून त्यांनीं जर क्षणिक स्वार्थाला आळा

घातला तर त्यांना अनंतकाल भोगावा लागणारा नर्कवास टाळतां नाहीं का येणार !

कुमळनेर सोडून महाराणा निघाला तो चोंड संस्थानांत गेला. हें संस्थान भिल्लांचें असून तें मेवाडच्या नैर्ऋत्य दिशेकडील डोंगराळ प्रदेशांत आहे. मोंगल सैन्यानें राण्याच्या मागोमाग जाऊन चोंड-लाहि वेढा दिला. सोनगडचा ठाकूर मानसिंह, यवनांच्या दाढेंतून चोंडची मुक्तता करण्यासाठीं मोठ्या निकरानें लढला ! अखेरीस त्यानें या कामीं आपले पंचप्राण अर्पण करीपर्यंत शत्रूची डाळ शिजूं दिली नाहीं. या लडाईत मेवाडचा मुख्य भट्टकवी मारला गेला. या कवीचीं अत्यंत स्फूर्तिदायक काव्यें आणि त्याचें अद्भुत रण-नैपुण्य यांच्या योगानें त्या वेळचे रजपूत स्फूर्तीनें बेहोष होऊन गेले होते. रजपुतांत यवनाविरुद्ध जिवावर उदार होऊन लढण्यास प्रवृत्त करण्याचे कामीं भट्ट कवीचीं काव्यें फारच उपयोगी पडलीं. त्याचीं काव्यें मेवाडवासी जन आजहि मोठ्या आवडीनें गातात.

जे बेइमानी रजपूत राणाजींचे विरोधक होते ते सुद्धां भट्ट कवीचीं काव्यें हौशीनें आणि प्रेमानें वाचीत आणि गात. इतकेंच नव्हे तर राण्याचे कट्टे शत्रू, प्रत्यक्ष मोंगल देखील भट्ट कवीच्या काव्यावर खूष असत.

सलिमाचा सरदार शहाबाजखान कोका यानें देवराच्या सहाय्यानें कुमळनेर काबीज केल्यापासून, यवनांना जरा अधिक जोर चढला होता. तोंच मानसिंगानें धरमेती आणि गोगुंडा हे दोन किल्ले सर केले. फरीदखानाच्या सैन्याने चोंड एथेहि विजय संपादिला होता.

आतां राजाणीस विश्वासाचें असें आश्रयस्थान नाहींसें झालें. तरी त्या महाधैर्यशाली नरशार्दूलानें अकबराशीं समेट करण्याचें

मनांत देखील आणिलें नाहीं. पण दुर्दैवानें त्याचा पिच्छाच पुरविण्याचें ठरविल्यामुळें शेवटीं महाराण्यास अरण्य जवळ करणें प्राप्त झालें. ज्या अरवलीच्या डोंगराळ रांगांतील निबिड अरण्यांत बाप्पारावळानें आनंदानें दिवस कंठिले व ब्राम्हणाच्या गाई चारिल्या, आणि महाराणासंगानें ज्या अरण्यांत धनगराच्या मेंढ्या हांकिल्या, त्याच अरण्यांत महाराण्यानेंहि आपल्या कुटुंबासहवर्तमान प्रवेश केला...

अरण्यचतें तेथें नगरांतील आणि राजमंदिरांतील सुखसोई कोठून असणार ! पण राणाजी, दैवाशीं दंड ठोकून दोन हात करण्याची तुझ्या वांचून दुसऱ्या कोणाची छाती आहे !



# — राणाजीचा वनवास —

## प्रकरण १२ वें.

वनवास, हा किती प्राचीन शब्द आहे ! आणि वनवास असें म्हटल्या बरोबर आर्यांना किती थोर थोर महत्म्यांचें स्मरण होतें ! तो पुण्यश्लोक नरश्रेष्ठ राजा नल ! सूर्यवंश चूडामणि रघुकुलमंडन दाशरथी राम आणि तो अजात शत्रु धर्मराज !

या महापुरुषांच्या चिर संबंधामुळें वनवासहि त्यांच्या बरोबरच चिरंजीव होऊन गेला आहे. त्यानें वर उल्लेख केलेल्या ज्या ज्या महा विभूतींचें आदरातिथ्य केलें आहे, तशा तऱ्हेचे कोणी महापुरुष त्याला दिसले म्हणजे त्याला त्यांची भेट घेतल्यावांचून रहाववत नाहींसें होतें, असें दिसतें. वनवासा बाबा, तुझें ठीक आहे ! पण ज्यांचें आदरातिथ्य करण्यासाठीं तूं प्रेमानें पुढें होतोस, त्यांना तुझ्या त्या कृतीनें सुख होतें कीं यातना होतात याचा मात्र तूं मुळींच विचार करीत नाहींस. भुतें जशीं ज्याच्यावर लोभ करितात त्याला बेजार करून सोडितात, असें म्हणतात. तशीच वनवासा, तुझीहि स्थिति आहे, असें नाइलाजानें म्हणावें लागतें !

वनवास ! तपस्व्यांना तो मोठा सुखदायक असेल ! वनचरांना तर तो कदाचित् स्वर्गहि वाटत असेल ! खुनी किंवा दरोडेखोर लोकांना तो मोठा आश्रयदाताहि होत असेल ! क्रूर श्वापदांचें तर तें वास्तव्य स्थानच होय ! पण महाराणा तसा तपस्वी नव्हता ! तो वनचर नव्हता किंवा कोणी घोर अपराधीहिपण नव्हता ! त्या-

मुळें त्याला तशा लोकांप्रमाणें वनवास सुखकर होणें शक्य नव्हतें! मग वनवासा, तू कां रे त्या महाभागाच्या राशीस लागलास! पण बिचारा वनवास तरी काय करील! अद्वितीय पुण्यात्म्यांना कसोटीला लावण्यासाठींच परमेश्वरानें त्याला निर्माण केलें आहे! आणि तो आहे म्हणूनच थोरांना थोरपण येतें! नाहींतर सामान्य लोकांपेक्षां, त्यांचें वैशिष्ट्य काय असतें, तें स्पष्ट करून दाखविणार तरी कोण! शिवाय राण्यानेंच तर स्वसंतोषानें अपमानित जिण्यापेक्षां अरण्यवास सुखाचा मानिला होता. आणि अरण्यावांचून आतां त्याला आश्रय तरी कोणता होता बरें? तेव्हां बा वनवासा तुझे राण्यावर मोठे उपकारच आहेत, असेंच शेवटीं निमूटपणें कबूल करावें लागतें!

ताऊन सुलाखून बाहेर पडलेल्या सुवर्णाला लोक अमोलिक म्हणतात हें खरें, पण भट्टींतील त्याचे ते हाल ज्याचा तोच सहन करूं जाणे! चिडोडाधिपति महाभाग्यशालि महाराण्याला, दुर्दैवानें अथवा दुसऱ्या दृष्टीनें पाहिल्यास महद्भाग्यानें म्हणा हवें तर, आपल्या परमोच्च कर्तव्याचा मार्ग वनवासासारख्या महा खडतर दिव्यांतून आक्रमावा लागला!

वनवास!! ही अक्षरें अवघीं चारच आहेत! एका दृष्टीनें वनवासांत ते चतुर्विध पुरुषार्थ सांठविलेले आहेत! पण! निर्मनुष्य रहाणी बहुविधयातना—फल पत्रांचा आहार आणि व्याघ्रसिंह भुजंगादिकांची सोबत! या चौकटींतून जो सुटेल, त्याच्या भागांत जें लिहिलेलें असेल तें मग त्याला मिळावयाचें!

सध्या राणा आपल्या मुलाबाळांसह वर उल्लेखिलेल्या यमदंड सदृश कराल चौकटींत सांपडला होता हें खरें! विलासांचा तर

त्यानें केव्हांच त्याग केला होता ! हें भावी संकट हलकें जावें म्हणूनच जणुं परमेश्वरानें त्याला आधींच तशी बुद्धी दिली होती ! नाहींतर हा अरण्यवास त्याला चार दिवसहि तोलला नसता ! साधी रहाणी केव्हांहि सुखकरच असते ! निर्झराचें स्वच्छजल ! कंदमूळांचा आहार ! दऱ्याखोरीं आणि गुहा यांतील तो साशंक विहार ! तृणाची अथवा प्रसंगीं खडकाची शय्या ! पाषाणाची उशी ! आणि वृक्षांची छाया ! राणाजी, तूं चितोडचा राजाना ? प्रताप, तूं हिंदूंचा सूर्य ना ? * पुत्तो, तूं यवनांचा काळ आणि आर्यधर्माचा प्रतिपालन कर्तानारे ? मग सांग तुझ्यावर त्या कराल कालाची अशी करडी नजर कारे व्हावी ? स्वदेशासाठीं तुझें अंतःकरण तिळतिळ तुटत असल्यामुळें, तुला ह्या यातनांकडे लक्ष देण्यास कदाचित् वेळहि झाला नसेल; परंतु ती महाराणी, ती तुझी आवडती सून, तो युवराज आणि ती तुझी लाडकीं लहानलहान मुलें, यांची त्या अरण्यांतून धांवपळ करतांना कायरे अवस्था झाली असेल !

बरें, अरण्यामध्यें एकमार्गी जर कांहीं ठराविक काळच कंठावयाचा असता तर एक गोष्ट निराळी ! पण राणाजीला किती दिवस अरण्यांत काढावे लागतील त्याचाहि नियम नव्हता ! बरें, अरण्यांत आलों, आतां सुटलों ! काय पडतील ते एकमार्गी हाल सोसले म्हणजे झालें ! असें तरी होत ? तेंही नाहीं ! यवन रात्रंदिवस हात धुवून पाठीस लागलेले ! त्यामुळें राण्याला घटकोघटकीं आपल्या सर्व मुलाबाळांसह धांवत पळत या अरण्यांतून त्या अरण्यांत, आणि त्या दऱ्याखोऱ्यांतून या दऱ्याखोऱ्यांत, असें सारखें रानोरान मुठींत जीव

* हें राण्याचें टोंपण नांव होतें.

घेऊन वणवण हिंडावें लागे! पण राणाजीच्या चिंतेचें या सर्वांहून एक निराळेंच कारण होतें! आपली असहाय स्थिति त्याला पूर्णपणें माहीत होती! आपलें जिणें किती धोक्याचें आहे याचीहि त्याला पुरी जाणीव होती! परंतु आपलें सुख आणि आपलें जीवित यांच्यापेक्षां त्याला आपल्या पावित्र्याची आणि लौकिकाची शतपटीनें अधिक चाड वाटे! यवनांचा स्वभाव त्याला मुळींच अपरिचित नव्हता. दुर्दैवानें यदाकदाचित् जर आपण यवनांच्या हातीं लागलोंच तर आपल्या बायकामुलांची काय अवस्था होईल, याची त्याला फार चिंता वाटे! शिसोदेकुळाचें पावित्र्य! प्राण गेला तरी त्याला कधींहि धक्का लागतां कामा नये! ही राणाजीची तीव्र इच्छा! बायकामुलांशीं यवनांचें वर्तन कसें असतें तें सर्व प्रसिद्धीच होतें, आणि त्यांत ज्या कुळाच्या पावित्र्यासाठींच एवढा अनर्थ ओढवलेला होता, त्याच घराण्यांतील बायकामुलांवर जर तो घोर प्रसंग येईल तर मग काय विचारतां! यासाठीं राणा या बाबतींत नेहमीं डोळयांत तेल घालून सावध असे!

## त्यांतच यवनांवर हल्ले

अशा बिकट स्थितींत आपल्या कुटुंबासह दिवस कंठीत असतांहि राणाजीनें आपल्या कर्तव्यांत तिळभरहि कसूर होऊं दिली नाहीं. त्याच्यावर जरी आकाश कोसळलें होतें तरीहि तो आपल्या ध्येयापासून लवमात्र ढळला नाहीं. एकीकडे इतक्या हालअपेष्टा कंठीत असतां, संधि साधतांच किंवा मुद्दाम संधि आणूनहि त्याचा शोध करीत असणाऱ्या यवनांवर तो अचानकपणें छापे घाली, आणि सांपडतील त्या यवनांस यमदरबारीं अतिथी म्हणून पाठवून देऊन, पुनः तेथून निसटून कोठें बेपत्ता होऊन जाई. राण्याच्या या वृत्ती-

मुळें यवनांचे कित्येक लोक गमावले आणि त्यांचें अपरिमित नुकसान झालें. त्यामुळें अकबर चिडून गेला व त्यानें राण्याला पकडण्याचा विडाच उचलिला. त्यानें अनेक शूर सरदारांची या कामीं योजना केली होती.

## फरीदखानास हात दाखविला

एकदां फरीदखान नांवाचा एक यवनसरदार राणाजीस पकडण्याचा चंग बांधून, आपल्या सेनेसह अरवलीच्या रानांत घुसला. राणाजीच्या हेरांकडून त्याला हें सर्व वर्तमान कळलें. तेव्हां राण्यानें त्याला एकदां चांगला हात दाखविण्याचें ठरविलें, व तो कांहीं निवडक लोक बरोबर घेऊन फरीदखानाच्या दृष्टीस पडावें अशा बेतानें अरण्यांतून हिंडूं लागला. खानानें पाठलाग करितांच राण्यानें सुवर्णमृगन्यायाचा अवलंब केला, आणि यवनांस चकवीत चकवीत त्याला एका अत्यंत बिकट जागीं नेऊन त्यानें एकदम उलट खाल्ली; आणि आपली पल्लेदार समशेर खेंचून तो खानावर धांवून गेला. इतका वेळ पळणारा राणा, एकाएकीं उलटल्याबरोबर यवनाची त्रेधा उडाली, व तो थोडासा मागें होऊन साह्यासाठीं चोहींकडे पाहूं लागला. पण राण्यानें त्याच्या साथिदारांची आगोदरच नाकेबंदी केली होती, व कांहीं जणांस त्यानें पकडिलेंहि होतें. तो फरीदखानास म्हणाला– भिऊं नकोस ! आणि कोणाच्या सहाय्याचीहि अपेक्षा करूं नकोस ! एथें तुझ्या साह्याला कोणी येऊं शकणार नाहीं. तुझ्या लोकांना आम्हीं योग्य तें शासन करून मगच तुझ्यावर चाल केली आहे. पण भिऊं नकोस ! यवनाधिपति अकबरास माझा असा निरोप सांग कीं, मी कांहीं मानसिंग नव्हे ! आपल्या बहिणी आणि मुली यवनांस देऊन, शिसोदेकुलांतील लोक असला अधमपणा कधीहि करा-

वयाचे नाहींत! तूं जरी माझा पराभव केला असलास तरी थोड्याच दिवसांत माझें सर्व राज्य मी परत मिळविल्यावांचून रहाणार नाहीं! बुडबुड्या प्रमाणें क्षणभंगुर अशा वैभवानें असा धुंद होऊन जाऊं नकोस! परमेश्वराचें माझ्या न्याय्यवर्तनाकडे पूर्ण लक्ष आहे हें लक्षांत ठेव आणि त्याच प्रमाणें आपलें वर्तन कर! फरीदखां, जा! तुला मी यावेळीं सोडून देत आहें!

राणाजीचें हें धाडसी कृत्य पाहून, फरीदखां चकितच झाला. त्यानें राणाजीकडे वर नजर करून पाहिलें सुद्धां नाहीं. इतका तो घाबरला होता. तसेंच राणाजीला तो कांहीं उत्तरहि देऊं शकला नाहीं. एखाद्या शेळीपुढें जर वाघ आला तर जशी शेळीची अवस्था होते, तशीच राण्यापुढें खानाची अवस्था झाली. राण्याचें सर्व भाषण संपल्यावर जेव्हां त्यानें खानास निघून जावयास सांगितलें, तेव्हां तो निमूटपणें तेथून निघून गेला, व दिल्लीस जाऊन त्यानें झालेला सर्व प्रकार अकबरास कळविला. तेव्हां क्रोध येऊन राण्याचा पिच्छा-पुरविण्याचा त्यानें निश्चय केला. पण मनोमन राण्याच्या भाषणानें अकबरास एक प्रकारची लज्जा उत्पन्न झाल्यावांचून राहिली नाहीं.

अकबरानें राणाजीचा पिच्छाच पुरवावयाचें ठरविल्यामुळें पावसाळा सोडून बाकी सर्व दिवस अकबराचे लोक राण्यावर नेहमीं चाल करून जात. अशीं कित्येक वर्षें लोटलीं तरी यवन, राण्याचें कांहीं करूं शकले नाहींत. म्हणजे त्यांचा राण्याला कांहींच त्रास झाला नाहीं असें मात्र नव्हे, तर तो इतका पिच्छा पुरवूनहि त्यांच्या हातीं लागूं शकला नाहीं.

## भिल्लांचे अनंत उपकार

रानावनांतून वेळोवेळीं राण्याचा यवनांनीं पाठलाग केल्यामुळें,

पुष्कळ वेळां राण्यावर मोठे कठीण प्रसंग आले होते; परंतु अशा वेळीं भिल्लांनीं राण्याला जें साह्य केलें तें अमोलिक होतें. कित्येक प्रसंगीं केवळ भिल्लांच्या सहाय्यानेंच राण्याच्या कुटुंबाचा वचाव झाला. एकदां तर चोहींकडून यवनांचा वेढा पडून मध्यें सांपडल्यामुळें राणाजीच्या मुलांमाणसांची मुळींच आशा राहिली नव्हती, परंतु अशा ऐन प्रसंगीं भिल्लांनीं सर्व मंडळीस जावडा एथील कथलाच्या खाणींत लपविलें आणि त्या सर्वांचें संरक्षण केलें.

भिल्ल ! रानटी लोक ते ! पण त्यावेळीं या रानटी लोकानींच गांवठी आणि नगरस्थ लोकांपेक्षां अधिक माणुसकी दाखविली ! बिचारे भिल्ल, आपल्या तोंडचा घांस काढून राणाजीला तें अन्न नेऊन देत. त्यांच्या दारिद्र्यामुळें पुष्कळ वेळां त्यांना उपवास पडत, तरीहि ते सोसून राण्याला तो असेल तेथें भाकरी पोंचवून कित्येक वेळां त्यांनीं त्याचा सांभाळ केला होता. रामचंद्रांना आपत्कालीं जसें वानरांनीं साह्य केलें तसेंच प्रतापला यावेळीं भिल्लांचें साह्य झालें. राणाजीच्या मुलांना मोठमोठ्या वृक्षांना पाळणे बांधून भिल्ल सांभाळीत असत. जावडा आणि चोंड एथील अरण्यातील पुरातन महावृक्षांवरील आणि त्यांच्या फांद्यांवरील अद्यापि दिसणारे खिळे आणि लटकणारे सांखळदंड, भिल्लांनीं केलेल्या राण्याच्या अमोलिक सेवेची अजून साक्ष देत आहेत.

वनवासांत असतांना राणाजीला धड स्वस्थपणें भोजनसुद्धां करितां येत नसे. कधींकधीं त्याला अर्ध्या जेवणावरूनच उठून जावें लागे तर कधीं त्याला अन्न बरोबर घेऊनच अरण्यांतून पळावें लागे. कधीं अर्धपोटीं तर कधीं उपाशींच्या उपाशींच राहून त्याला यवनांच्या हल्ल्यांतून आत्मसंरक्षण करून घ्यावें लागलें आहे. एकदां

तर वाढलेल्या पानावरून पानच घेऊन त्याला पळून जावें लागलें, आणि तें अन्न पुढें घेऊन सुस्थळीं म्हणून भोजनास बसावें इतक्यांत यवनांनीं त्याच्यावर हल्ला चढवावा असें एकच पात्र त्याला पांच वेळां पुढें घेऊनहि अन्नाची व त्याची शेवटीं गांठ पडली नाहीं !

पावसाळा आला कीं, राणाजीला जरा विसावा मिळावा; आणि शरत्काल आल्यापासून पुन्हा पावसाळा येईपर्यंत त्यानें यवनसेनेशीं सारखी झुंज खेळावी. असे कित्येक दिवस आणि कित्येक वर्षें चाललें होतें. कांहीं दिवस जाऊं द्यावे आणि मधेंच एखाद्या गिरिशिखरावर राणाजीनें आपला किरमिजी ध्वज पटकन उभा करावा, म्हणजे त्याच्या ध्वजाभोंवतीं त्याचे लोक तेथेंहि जमा व्हावे, आणि किरमिजी ध्वज दृष्टीस पडल्याबरोबर यवनांनीहि त्याच्यावर हल्ला करावा; आणि या झटापटींत शक्य तितका यवनांचा नाश करून राण्यानें अरण्यांत अदृश्य व्हावें ! असें कित्येक वर्षें चाललें होतें.

सृष्टींत नाना प्रकारच्या घडामोडी झाल्या, पण राणाजीचें व्रत जसेंच्या तसें होतें ! यवनसत्तेमुळें देशाची स्थिति पुष्कळच बदलली होती, पण राणाजीची प्रतिज्ञा लवमात्र शिथिल झाली नाहीं ! लोकांच्या मनांत किती तरी परिवर्तन झालें होतें, तरी राणाजीचा निर्धार अचल होता ! जगांत वाटेल त्या उलाढाली झाल्या, लोकमत वाटेल तिकडे झुकत गेलें, आणि परिस्थिति कितीहि बदललेली असली तरी आपल्या दृढसंकल्पानें आणि अचल निर्धारानें योग्य काल येतांच ही सर्व परिस्थिति मी पालटून टाकीन अशी राण्याची जबरदस्त आत्मनिष्ठा होती !

## शत्रूनेंहि प्रशंसा केली

महाराण्याची पराकाष्ठेची सहनशीलता, त्याचें गिरिराज हिमा-

चलासारखें अचल धैर्य, तें अतुलनीय शौर्य, ती बुद्धिमत्ता आणि त्याचा तो आत्मविश्वास पाहून खुद्द अकबरानेंहि अनेक वेळां त्याची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे. राण्याचें वनांतील प्रत्यक्ष वर्तन पाहून येण्यासाठीं, अकबरानें एकदां आपल्या एका विश्वासू सेवकास, राण्याच्या गुप्त-निवासस्थानीं रजपुतवेषानें मुद्दाम पाठविलें होतें. तेथें त्याला पुढील आश्चर्यकारक दृश्य पहावयास सांपडल्याचें इतिहासांत नमूद आहे.

आपल्या जिवास जीव देणाऱ्या सरदार सामंत मंडळींत एका मोठ्या वृक्षाखालीं राणा, तृणासनावर बसलेला असून मोठ्या आनंदानें भोजन करीत होता; आणि अधिकारी सरदार मंडळी अत्यंत आदरानें आणि प्रेमानें 'दूना' घेऊन आपणास कृतार्थ समजत होती. राण्यानें आपल्या पात्रांतील अन्न आपल्या अत्यंत विश्वासू सरदारांस प्रसाद म्हणून द्यावें आणि तसें तें अन्न प्रसाद-दूना-म्हणून ज्यांस मिळेल त्यांनीं आपणास धन्य समजावें, अशी रजपुतांची चाल होती.

आश्चर्य हें कीं उदयपूरच्या राजमंदिरांत असतांना, 'दूना' म्हणून राणाजीनें दिलेले उत्तमोत्तम भोज्य पदार्थ, त्याचे सामंतजन जितक्या आवडीनें घेत असत तितक्याच आवडीनें आणि त्याच प्रेमानें त्या निबिड अरण्यांत नानाप्रकारच्या हालअपेष्टा सोशीत असतांना, राणाजीनें दिलेला कदान्नाचा दूना त्याची सामतमंडळी घेत होती. अकबराच्या दूतानें हा सर्व प्रकार दिल्लीपतिस जाऊन सांगतांच अकबर आणि त्याची सर्व दरबारी मंडळी तें ऐकून विस्मयानें थक्क होऊन गेली! अकबरासह त्या सर्वांच्या मनांत प्रतापाबद्दल मोठा आदर उत्पन्न झाला. प्रताप, केवढा हा तुझा

महिमा ! असे उद्गार नकळत त्यांच्या मुखावाटे बाहेर पडले ! ज्या रजपुतांनीं आपल्या कुलमर्यादांचें उल्लंघन करून अकबराला आपलें सर्वस्व अर्पण केलें होतें, ते रजपुत वीर देखील राण्याच्या अनेक सद्गुणांवर मोहित होऊन गेले, आणि त्याची प्रशंसा करण्यांत त्यांना यत्किंचितहि कमीपणा वाटेनासा झाला !

## पुत्तो तुझी धन्य आहे

आपल्या पवित्र उद्देशासाठीं, नाना प्रकारच्या यातना सोसाव्या लागल्या तरी, त्या सुखानें सोसून, ईश्वरनिष्ठापूर्वक आपले प्रयत्न चिकाटीनें सतत करीत रहाणें, यालाच तपश्चर्या म्हणतात. राणाजीची अशी तपश्चर्या होऊन आतां बारा वर्षांहून अधिक काल लोटून गेला होता. अकबरासारख्या सार्वभौम आणि महाधूर्त बादशहानें राणाजीला वांकविण्यासाठीं, आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली होती. आज कित्येक वर्षें प्रत्येक यवनअधिकाऱ्याला दरदिवशीं राणाजीचा एखादा तरी पराक्रम ऐकावयास मिळे. त्यामुळें त्यांच्या मनांत राण्याविषयीं आपोआपच एक प्रकारचा आदर उत्पन्न झालेला होता.

अकबरानें मुद्दाम पाठविलेल्या दूताच्या तोंडून राण्याचें सर्व वर्तमान ऐकून, त्यावेळचा दिल्लीचा पहिला प्रधान, बहिरामखानाचा पुत्र खानखनान मिरजाखां हा राण्याच्या सद्गुणांवर अत्यंत लुब्ध होऊन गेला. तो एक चांगला कवी होता. त्यानें राण्याला एक काव्यमय प्रशंसापत्र पाठवून त्यांत राण्याचा त्यानें अंतःकरणपूर्वक गौरव केला होता. मेवाडच्या भाटांनीं आपल्या ऐतिहासिक काव्यातून या पत्रांतील बरींच पद्यें जशींच्या तशीं घेतलीं आहेत.

या पत्रांत खानखनान राणाजीस म्हणतो—राणाजी तुझें धैर्य

आणि तुझी गंभीरता अवर्णनीय आहे ! जगांतील सर्व प्रकारचें वैभव आणि सत्ता हीं नश्वर असून, मनुष्याचे सद्‌गुण आणि त्याची सत्कृती मात्र जगामध्यें पुष्कळ काळ टिकणारी असते ! प्रताप, तूं आपलें राज्य, वैभव आणि सुख या सर्वांना तिलांजलि दिली आहेस ! आणि तुझ्यावर इतकीं संकटें आलीं, प्रत्यक्ष तुझे अनेक जातभाई तुझे शत्रू झाले ! तरी तूं अद्यापि अकबरास शरण आला नाहींस ! इतकेंच नव्हे तर अशा बिकट परिस्थितींतहि तूं आपल्या कुलाचा लौकिक राखण्यासाठीं, सर्वांना थक्क करून सोडण्यासारखे प्रयत्न सारखे चालविले आहेस ! पुत्रो, खरोखर तुझी धन्य आहे ! तुझ्यासारखे कांहीं हिंदु राजामध्यें सद्‌गुण असाधारण आहेत ! तूं आपल्या या उज्वल कृतीनें आपल्या जातीच्या अभिमानाचें विलक्षण रीतीनें संरक्षण करीत आहेस ! आणि आपल्या कुलाचें नांव अजरामर करीत आहेस ! !

## —परिस्थितीचा फटका—

सागराचें मंथन करावयाचें झालें तर ज्याप्रमाणें मंदराचलासारखा प्रचंड महाबळीच मंथन दंड असावा लागतो; त्याचप्रमाणें राजकारणाच्या झंजावातांतहि आपलें स्थान अचल राखावयाचें असेल, तर धैर्याच्या महामेरूचाच आश्रय करावयास हवा. ही गोष्ट पूर्णपणें जाणूनच महाराण्यानें या क्षेत्रांत पदार्पण केलें होतें, व त्याप्रमाणें त्यानें आजपर्यंत आपलें कार्य महाधैर्यानें आणि अद्वितीय पराक्रमानें चालविलेंहि होतें; परंतु परिस्थिति एखाद्याच्या पाठीस लागली म्हणजे ती त्याचा इतका पिच्छा पुरविते कीं, मग तो कोण आहे इकडेहि तिचें लक्ष रहात नाहीं. ब्रम्हा विष्णु महेशादि देवाधिदेव आणि विश्वामित्र पराशरादि महर्षि यांनाहि परिस्थितीनें वांकवावयास कमी केलें

नाहीं. महाराणा नरदेव होता ही गोष्ट खरी ! पण परिस्थिति वाटेल तशी असली तरी आपलें व्रत कधींहि सोडावयाचें नाहीं, असा त्यानें चंग बांधलेला होता, ही गोष्टहि पण खरी ! परिस्थितीशीं झगडणें हें व्याघ्रसिंहादि क्रूर श्वापदांशीं झगडण्याइतकेंच धोक्याचें असल्यामुळें हा झगडा कितीहि सावधगिरीनें केला तरीहि आखाड्यांतच उतरलें म्हणजे प्रसंग विशेषीं एखादा डाव आंगावर आल्यावांचून रहात नाहीं, त्याचप्रमाणें आज राणाजीवरहि एक महाव्यामोह उत्पन्न करणारा प्रसंग अचानक रीतीनें आला.

आज किती तरी वर्षें लोटलीं ! मी माझ्या मुलांबाळांसह या वनांत काल कंठीत आहें ! इतका दीर्घ कालपर्यंत, मी जाणून बुजून आपत्तींत पडलों, पण या सगळ्या गोष्टींचा परिणाम काय झाला ? इतक्या दिवसांच्या हालचालीनें माझ्या पदरांत काय पडलें बरें ! यवनांस मी अजून दाद दिली नाहीं हें खरें ! पण असाच जन्म कंठून कदाचित् माझ्या व्यक्ति पुरेसा लौकिक जरी माझ्या पदरांत पडला तरी माझ्या मेवाडच्या आणि माझ्या परम प्रिय चितोड नगरीच्या सुखांत त्यामुळें किती भर पडेल ! अशाप्रकारें माझ्या मतासाठीं माझ्या कुटुंबाची कुचंबणा मी किती दिवस करूं ! आपल्या या सगळ्या यातनांचा मोबदला कांहीं तरी भरींव स्वरूपांत पदरांत पडण्यासाठीं काय बरें युक्ति करावी ! अशा केवळ कोरड्या ध्येयनिष्टेनें आपल्या अनुयायांनीं तरी किती दिवस आपल्या मागोमाग येऊन सर्व प्रकारची हानी सोसावी !

अशा प्रकारें राणाजी आपल्या पुढील परिस्थितीचा विचार करीत होता. जवळच एका पर्णकुटींत त्याचीं मुलें तशा शोचनीय स्थितींतहि सुख मानून आनंदानें बालक्रीडा करीत होतीं. चोहींकडे

वनश्री कशी नटून थटून राहीली होती ! तिनें एवढे अलंकार कोणाकरितां आपल्या अंगांवर चढविले होते कुणाला ठाऊक ! तो हिरवा शालु ! किती आकर्षक तऱ्हेनें विणला होता तो ! कोणी आणि कसल्या धाग्यांनीं तो विणला होता बरें! सृष्टिदेवीच्या मस्तकावर फुलें तरी किती किती प्रकारचीं आणि कशा सुंदर रीतीनें रचना केलेलीं शोभत होतीं ! ते झुळझुळ वाहणारे निर्झर, त्यांच्या तिरावर फुललेल्या त्या सुवर्ण केतकीपुष्पांचें प्रतिबिंब पडल्यामुळें, त्यांचें उदक सुवर्णवर्ण झालें होतें. सृष्टि देवीच्या गळयांतील जणुं ते सुवर्णाचे विविधप्रकारचे दागिनेच कीं काय असें वाटे ! राणाजी सृष्टिदेवीनें, केवळ तुला रानांत पडल्या सारखें वाटूं नये म्हणूनच हे अलंकार चढवून फळा फुलांनीं तुझें स्वागत केलें होतें बरें !

हें सगळें ठीक आहे पण हंसणाऱ्या आणि बागडणाऱ्या राणाजीच्या त्या मुलांमध्यें एकाएकीं अशी रडारड कां बरें सुरू झाली ?

इतकीं वर्षें एवढ्या कुटुंबाला मुद्दाम तशी व्यवस्था केल्यावांचून पुरेशीं कन्दमुळें तरी कोठून मिळणार ! ह्यामुळें पुष्कळवेळां त्या सर्व मंडळीला कडकडीत उपोषणें पडत असत. उपोषण मुद्दाम केलें तर जरी आनंद दायक होत असलें, तरी अशा अवघड परिस्थितीमुळें कांहीं मिळत नाहीं, म्हणून जर तें करावें लागलें तर त्यामुळें किती दुःख होतें, याची कल्पना तशा स्थितींतून गेलेल्या लोकांनाच यथार्थपणें होऊं शकेल ! साधी रहाणी एकाद्या गर्भश्रीमंताची जर असेल तर त्याला ती भूषणास्पद होते. भिकारी काय ? त्याला नाकदाबून साधेपणानें रहाणेंच भाग ! त्यांत त्याचा मोठेपणा तो कसला ! घरांत अठरा विश्वे दारिद्र्य आसल्यामुळें एखाद्यानें प्रपंच करितां येत नाहीं म्हणून वैतागानें जर सर्वसंग परित्याग

केला, तर त्याला शहाणे लोक कधीं त्याग म्हणत नाहींत ! सर्व गोष्टींची अनुकूलता असून जर आपण एकादशी केली, तर ती खरी एकादशी ! पण ह्याच्याउलट परिस्थिमुळें, मुलाबाळांसह जेव्हां राण्याला उपवास घडे तेव्हां त्याला मरणापेक्षांहि अधिक दुःख होई !

पुढें पुढें त्यानें ' मोळ ' नांवाच्या गवताचें बीं काढून त्याच्या भाकऱ्यांवरच गुजराण करण्याचें ठरविलें. दैवलीला किती अतर्क्य आहे ! अंगांत सामर्थ्य असून, राज्याचा अधिकार असून, आणि लोकांची पूर्णसहानुभूति असूनहि दैवानें, आजपर्यंत कित्येकांना कुंभाराच्या चाकावरील घटाप्रमाणें इच्छेला वाटेल तसें गिरक्या घेण्यास लाविलें आहे ! छळ करण्याचे कामीं अशारीतीनें वाकबगार झालेल्या दैवाचा हात कोण बरें धरूं शकणार !

आज यवन पाठीवर नसल्यामुळें राणाजीला जरा स्वस्थपणा मिळाला होता, पण कधीं कधीं मनुष्याला स्वस्थपणाच अधिक तापदायक होतो. रात्रंदिवस यवनांच्या व राण्याच्या झटापटी चालावयाच्या, त्यामुळें त्या नादांतच त्याचा सर्व वेळ जाई, आणि एखादवेळ जर असा स्वस्थपणा मिळाला तर त्याच्या डोक्यांत अनेक विचारांचें काहूर माजे.

राणाजी त्या निबिडकाननांत एका निवांत स्थळीं स्वस्थपणें विचार करीत बसला होता ! महाराणीनें मोळतृणाच्या बीजाच्या कांहीं भाकऱ्या भाजून त्यांतील अर्ध्या ठेऊन दिल्या, आणि अर्ध्या आपल्या मुलांस तिनें वांटून दिल्या ! तेव्हां मुलें किती आनंदित झालीं !

मुलेंच ती ! त्यांचा आनंद किंवा दुःख ही एखाद्या कोमल पुष्पलतेप्रमाणें असतात ! एक दिवस जरा पाणी घालण्यास उशीर झाला कीं लगेच

पुष्पलता कशी अगदीं कोमेजून जाते ! पण ती पाणी घातल्याबरोबर थोड्यावेळानें किती टवटवीत दिसते ! तशीच मुलें असतात. राणाजीच्या मुलांचे प्राण क्षुधेनें कासावीस झाले होते; पण त्यांच्या हातांत नुसता भाकरीचा एकेक तुकडा पडल्याबरोबर त्यांच्या वदन-कळया टवटवीत झाल्या आणि नेत्र रूपानें त्यांची एक एक पांकळी उमलूं लागली ! आपल्या वांट्याला आलेली भाकरी घेऊन मुलें उड्या मारीत मारीत हर्षभरानें झोंपडीच्या बाहेर गेलीं. आणि नाचत बागडत भाकरी खात तीं आनंद करूं लागली !

इतक्यांत जवळच्या एका वेलींच्या जाळींतून एक रानबोका बाहेर आला आणि त्यानें राणाजीच्या एका मुलीच्या हातांतील भाकरीवर झडप घालून तो तेथून पळून गेला ! ह्या राजस लेकरांना वनांत आल्यापासून इतक्या मोकळेपणानें क्वचितच अन्न खावयास मिळे ! तीं बिचारीं इतकीं समंजस आणि प्रेमळ होतीं की, जें मिळेल आणि जेव्हां मिळेल त्यांत समाधान मानून तीं आपल्या मातापितरांस सुख देत ! हें भाग्य फार थोड्यांच्या वांट्याला येतें ! खाद्यपेयादि अनेक पदार्थ पाहिजे तेव्हां मिळत असूनहि सदा वखवखलेलीं पोरें काय थोडीं आहेत ?

क्षुधेनें प्राण व्याकुळ झालेला ! भाकरीचा एक तुकडा मोडून तोंडांत त्याचें चर्वण चाललें आहे ! आणि आनंदानें एकीकडे कांहीं तरी गुणगुणत वनलता हातांत धरून तिच्याशीं मुलीचा कांहीं तरी खेळ चालला आहे, इतक्यांत त्या दुष्ट बोक्यानें झेप घातली होती, व हातांतील भाकरी पळवून तो बेपत्ताहि झाला होता. मुलीनें एकदम एक आरोळी फोडिली ! रानबोक्याचें भय आणि भाकरी गेल्याचें दुःख, अशा द्विविध भावना त्या आरोळीच्या मुळाशीं होत्या. सर्व

मुलें घाबरलीं आणि त्यांनीं झोंपडींत असलेल्या महाराणीकडे धांव घेतली ! मुलीनें आईच्या कमरेला मिठी मारिली, आणि रडत रडत वर मान करून तिनें आईच्या तोंडाकडे पाहिलें ! तिच्या गोजिरवाण्या वदनाची शोभा एक प्रकारें विशेषच खुलली होती ! कपोलावरून अश्रुप्रवाह वहात होते आणि मळक्या हातांनीं डोळे चोळल्यामुळें व तेच हात लागल्यामुळें त्या गोंडस आणि निर्मल वदनावर मातीचें डाग पडले होते ! जणू तो चंद्रावरील शशांकच कीं काय असें पाहणारास वाटे. अशा स्थितींत मुलीनें, आई ! रानबोक्यानें माझी भाकरी नेलीग ! मला आतां भाकरी कोण देईल ! असें बोबड्या शब्दांत बोलून, महाराणीच्या अंतःकरणास पीळ पाडिला ! माझ्या मुलांना, आतां आपल्याला पुन्हां भाकरी कोण देईल ? असें वाटण्याइतकी आमच्या दैन्याची जाणीव ! आणि आम्ही मात्र दुर्दैवी ! या निरागस अर्भकांचें योग्य संगोपन करणेंहि आम्हाला आज कठीण झालें आहे ! त्यांच्या आज्या पणत्यांचें राज्य असून आमच्या कृतीनें त्यांना हे असे हाल सोसण्याची पाळी आली ! असें वाटून माउलीच्या अंतःकरणाचें पाणी झालें ! आणि तें तिच्या नेत्रांवाटे एकदम खळखळां वाहूं लागलें ! त्रासलेल्या जिवाला पुष्कळ वेळां ते त्रास असह्य होण्यास अगदीं थोडें कारणहि पुरेसें असतें !

मुलांची ओरड ऐकून राणा चटकन् उठून तेथें आला. तों आपल्या मुलीनें तिच्या आईच्या कमरेला मिठी मारिली आहे; आणि ती व महाराणी दोघेंहि ढळढळां रडत असून त्यांच्यांच सुरांत इतर मुलांनींहि आपले सूर मिळविले आहेत ! असें दृश्य त्याच्या दृष्टीस पडलें !

## मोह अनिवार आहे

हें पाहून राणाजीनें महाराणीस सर्व वृत्तांत विचारिला. तेव्हां तिनें एका लहानशा भाकरीच्या तुकड्यासाठीं एवढा प्रकार झाल्याचें सांगून आपल्या दैवगतीचा हा फेरा पालटेल तेव्हां पालटो! असें म्हणून डोळ्यांना पदर लाविला! हें पाहून राण्याच्या डोळ्यांपुढें गर्रकन् कांहीं फिरल्यासारखें होऊन, त्याला त्याच्या पूर्वस्थितीचें चित्र साक्षात् पुढें दिसूं लागलें! आणि त्याच्या अंतःकरणाची विलक्षण कालवाकालव होऊन गेली! त्याची दृष्टि भूप्रदेशावर बराच वेळ स्थिर झाली! आणि त्याचें शरीरहि स्तब्ध झालें, पण त्याच्या विचारांत मात्र भयंकर खळबळ उडून गेली! नकळत त्याच्या नेत्रांतून दोन अश्रुबिंदूहि बाहेर आल्यावांचून राहिले नाहींत! व्यर्थ! माझ्या सर्व हालचाली व्यर्थ होत! पोटच्या पोरांच्या तोंडांत वेळेवर दोन घांस अन्न घालण्याची ज्याला पात्रता नाहीं, तो जगाचें कल्याण काय करणार! मेवाडच्या स्वातंत्र्याची महत्वाकांक्षा धरणें फुकटचें नाहीं! प्रताप, असल्या व्यापांत पडण्याची तुझी लायकी नाहीं! धिक्कार असो तुझ्या पराक्रमाला! फुकट कोरड्या अभिमानानें त्या महापराक्रमी अकबराशीं वैर करून काय व्हावयाचें आहे! प्रबलांशीं वैर करून आजपर्यंत कोण सुखी झाला आहे! आणि आजपर्यंत इतके कष्ट करून पदरांत तरी काय पडलें! या निरपराध अर्भकांचे तळतळाट मात्र माझ्या माथीं बसले खरे!

अशा प्रकारें राण्याच्या मनाला जो एक जबरदस्त धक्का बसला, त्या धक्यापुढें आजपर्यंत हजारों यवनांनीं आपल्या प्रखर शस्त्रास्त्रांनीं त्याला दिलेले सर्व धक्के फिक्के पडले! राण्याच्या धैर्याचा महामेरु या वरवर साध्या दिसणाऱ्या परंतु आंतून मोठमोठ्यांच्या काळजास

हात घालणाऱ्या प्रसंगानें प्रकंपित झाला ! त्याची पृथ्वीच्या सहनशीलतेसहि लाजविणारी सहनशीलता दुःखानें रूदन करूं लागली ! त्याच्या ध्येयाचा अचल ध्रुवहि क्षणभर डळमळला आणि त्या भरांतच त्यानें दिल्लीश्वरास एक पत्र खरडलें ! '**मला थोडे दिवस सवड दे ! माझा नाइलाज झाला आहे**' असा मजकूर त्या पत्रांत लिहिला होता ! हाय ! हाय ! मोह अनिवार आहे ! भवितव्यतेची लीला अगाध आहे ! तरी पण ईश्वरेच्छा आणि तपश्चर्या यांचें बलहि अतर्क्यच असतें ! ! !

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

# — बादशहाचा आनंद व पृथ्वीराजाचें पत्र —

## प्रकरण १३ वें.

दिल्लीपति, एवढा त्याचा व्याप ! देशोदेशींच्या राजेरजवाड्यांकडून वेळोवेळीं नाना प्रकारचे नजरनजराणे यावयाचे, आणि अकबरानें त्यांच्याकडे कधीं नुसतें पहावें तर कधीं पहाण्यापुरेसें औदार्यहि दाखविण्यास त्याला सवड नसावी ! एवढें ज्याचें वैभव आणि एवढी ज्याची सत्ता ! त्या अकबराला राणाजीचें चार ओळींचें पत्र येतांच त्याला अपरंपार आनंद झाला ! त्यानें आपल्या राज्यांत त्या निमित्तानें जागोजाग उत्सव केला ! घरोघर मंगल वाद्यें वाजूं लागली ! नृत्य गीतादिकांच्या योगानें ज्यानें त्यानें आपला आनंद व्यक्त केला ! एवढें कशासाठीं ! तर म्हणे, राणाजीनें अकबरास स्वहस्ताक्षरानें पत्र लिहिलें ! राणाजी, तुझ्या हातच्या चार ओळींची केवढी ही योग्यता ! करारी आणि स्वधर्मनिष्ठ लोकांच्या तेजस्वीतेचा महिमाच तसा असतो !

अकबरानें तें पत्र पृथ्वीमोलाच्या एकाद्या स्वर्गीय वस्तूप्रमाणें स्वतःजवळ बाळगून मोठ्या अभिमानानें त्यानें तें आपल्या पृथ्वीराज नांवाच्या एका सामंतास दाखविलें. पृथ्वीराज हा बिकानेरच्या मालदेवाचा धाकटा भाऊ असून तो मोठा शूर आणि बुद्धिमान् होता. तो एक चांगला कवीहि होता. अकबराला मारवाडपति जेव्हां शरण गेला, तेव्हांच नाइलाजानें पृथ्वीराजहि अकबराच्या आश्रयास येऊन राहिला होता.

अकबरानें दाखविलेलें हें राणाजीचें पत्र पाहून इतरांप्रमाणें पृथ्वीराजास आनंद तर झाला नाहींच पण तें पाहून तो खिन्न झाला; पण त्यानें तसें इतरांस कांहींच भासूं दिलें नाहीं. तो अकबरास म्हणाला—

" हें पत्र महाराण्याचें नसून तें कोणी तरी मधल्या मधेंच पाठविलेलें दिसतें आहे ! महाराणा, त्याला दिल्लीचें साम्राज्य मिळालें तरीहि अशा रीतीनें तो दिल्लीपतीस शरण येणें शक्य नाहीं; असा माझा विश्वास आहे. या करितां मी एक माझा विश्वासू दूत पाठवून या गोष्टीचा तपास करितों. "

पृथ्विराजाचें हें म्हणणें ऐकून बादशहानें त्याला तसें करण्याला परवानगी देतांच पृथ्विराजानें राणाजीस एक अत्यंत उद्बोधक आणि चेतविणारें पत्र लिहिलें. या पत्रांतील पद्यें तिकडे मोठ्या प्रेमानें अजून गाइलीं जातात. पृथ्विराजाच्या पत्राचा सारांश पुढीलप्रमाणें आहे:—

" महाराणा प्रतापसिंगजी आम्हां हिंदूंच्या सर्व आशा आपल्यासारख्या परमपराक्रमी हिंदुमहाराजांवरच अवलंबून आहेत. कित्येक हिंदुराजांकडून जरी त्या आशेचा भंग झाला तरी प्रतापसिंग राण्याकडूनहि तसाच आशाभंग होणें व त्यानेंहि अकबराला शरण येणें हें अत्यंत खेदकारक आहे. आम्ही तर दुर्दैवानें आपलें सर्वस्व हरून गेलों आहोंत आणि आमच्या स्त्रियांचें पावित्र्यहि आम्ही गमावून बसलों आहोंत ! आमची लज्जा आणि आमच्या स्त्रियांचें पावित्र्य आम्ही अकबराला विकिलीं आहेत व त्यानें तीं खरेदी केलीं आहेत. परंतु हे उदेसिंगपुत्र, आपण मात्र रजपुतांची लाज आणि रजपुत स्त्रियांचें पावित्र्य आपल्या कुळांत उज्वल राखिलें

आहे. यापुढेंहि आपण तें आपलें व्रत अखंड चालवा. राणाजी काय सांगू ? एथें जो नवरोजाचा उरूस भरतो त्यांत कोणत्या खऱ्या रजपूत स्त्रीचें पावित्र्य राहिलें आहे ? महाराज चितोडच्या त्या सुविख्यात आणि परम पवित्र शिसोदिया घराण्याची अब्रू मात्र एथील 'नौरोजा'च्या जत्रेंत विकावयास आणूं नका ! तुम्हांला असें वाटेल कीं, आपण आपलें सर्वस्व गमावून भिकारी होऊन बसलों आहोंत ! परंतु असें मुळींच समजूं नका ! जें तुम्ही गमाविलें तें सर्व जणु काय तुम्ही राखूनच ठेविलें आहे असें समजा. निराशेनें आम्हा क्षत्रिय कुलोत्पन्नांस अनेक अपमान आणि दुःखें भोगावयास लाविलीं आहेत, परंतु तशी अपमानकारक दुःखें व अपकीर्ति ही हमीर वंशीयांस आजपर्यंत भोगावीं लागलीं नाहींत. त्यांनीं आपली अब्रू व आपला अभिमान आजपर्यंत रक्षण केला आहे, हें आपण ध्यानांत बाळगिलें पाहिजे. सर्व जगाची दृष्टि तुमच्याकडे आहे. सर्व लोकांना असें वाटत आहे कीं, जें काय शौर्य गाजावयाचें आणि हिंदूंच्या लौकिकाचें जें संरक्षण व्हावयाचें तें प्रतापसिंगाकडूनच होईल. तुमच्या कुळाची आणि राजवंशाची अद्यापि अपकीर्ति झाली नाहीं व ती यापुढेंहि होऊं नये असें आम्ही सर्वजण इच्छित आहोंत. तुमच्या स्वाभिमानी आत्म्याची आणि तुमच्या विजयी तरवारीचो तुम्हांला पूर्ण मदत आहे. त्यांच्या मदतीनें तुम्ही क्षत्रियांचें ब्रीद राखा. हा मोंगल बादशहा जो आमचो अब्रू आणि आमच्या स्त्रियांचें पावित्र्य लुटीत आहे, किंवा खरेदी करीत आहे, हा कधीं तरी उच्चासनावरून खालीं येईलच. त्याचें उच्चासन आणि ही त्याची भरभराट नेहमीं अशीच कायम राहील असें मुळींच नाहीं. माझीतर खात्री आहे कीं, हें सर्व यश प्रतापशाली प्रतापच संपादन करील. आणि मग आमची रजपूत

जाती जी भ्रष्टबीज झाली आहे, ती तुमच्याकडे येऊन तुमच्याकडून निष्कलंक व पवित्र असें क्षात्र बीज घेऊन तें आपल्या वैराण व ओसाड रजपूत क्षेत्रांत पेरील ! महाराजे प्रतापसिंगमहाराज ! ह्याप्रमाणें आपली जाति पुनः तेजस्वी होईल व म्लेच्छांची कारकीर्द धूळ खात पडेल. दिल्लीच्या निर्लज्ज कारभारांत कांहीं अर्थ नाहीं ! व बादशहास शरण येण्याचें कांहीं कारण नाहीं ! तुमच्या अभिमानास व यशसंपादनास परमेश्वर साह्य आहे ! ! ”

इत्यादि अनेक मुद्यांचें अत्यंत प्रभावशाली पत्र लिहून पृथ्विराजानें तें आपल्या विश्वासू दूताकडून राणाजीस पोंचतें केलें. पत्र कसलें ! स्वातंत्र्य स्फूर्तीनें भारलेली ती महायक्षिणीची कांडीच होती ! किंवा प्रतापलंकेश्वराची मात्रा, नाहींतर प्रत्यक्ष संजीविनीचे वळसे उगाळून, भगवान् एकलिंगजीनें पृथ्विराजाकरवीं ते राणाजीकडे पाठविले असेंहि म्हटल्यास अतिशयोक्तीचें होणार नाहीं !

ती वेळ गेल्यावर राणाजी जेव्हां विचार करूं लागला, तेव्हां आपण अकबराला पत्र लिहिलें तरी कसें ? असें त्याच्या कृतीचें त्यालाच मोठें आश्चर्य वाटूं लागलें होतें. इतक्यांत पृथ्विराजाचें पत्रहि त्याच्या हातांत पडलें. मग काय विचारतां ! अहो ! तें पत्र वाचून त्या महाप्रतापशाली वीरास दहा हजार वीरांचें बळ आलें, व त्याचे ते मोहमग्न विचार त्या विद्युत्संचारानें कोठें पार वितळून गेले त्याचा पत्ताहि लागेनासा झाला ! पृथ्विराजाच्या पत्रांतील प्रत्येक गोष्टीचा त्यानें नीट विचार केला, तेव्हां कितीहि हाल सोसावे लागले तरी आपल्यावांचून रजपूत जातीला आज दुसरा आधार नाहीं ! माझ्याकडे सर्व विचारी लोक मोठ्या आशेनें पहात आहेत ! इतक्या सर्व लोकांची निराशा करणें खचित गर्ह्य आहे ! असें

वाटून राणाजींनें एक मोठी गर्जना केली ! व तो पुढील कार्यास चौपट नेटानें लागला. ! !

---



# नौरोजा !

## प्रकरण १४ वें.

पृथ्विराजाच्या पत्रांत ज्या 'नौरोजा'चा उल्लेख केला आहे, त्याची थोडी माहिती देणें अत्यंत अवश्य आहे. या नौरोजाचा उल्लेख पृथ्विराजानें मुद्दाम केला होता. राणाजीच्या स्वाभिमानरूप अग्निकुंडांत या नौरोजाच्या वृत्तांतानें घृतधारा धरिली.

स्त्रियांचें अत्यंत पावित्र्य हें आर्य धर्मांतील वैशिष्ट्य आहे. रजपुत घराण्यांचा तर या विषयीं अत्यंत कटाक्ष ! स्त्रियांच्या पावित्र्यावर घाला पडल्या बरोबर आर्यांना जितका संताप येतो, तितका तो दुसऱ्या कशानेंहि येत नाहीं. राणा खरा आर्य होता ! नौरोजाचें स्मरण दिल्या बरोबर त्याच्या तळ पायाची आग मस्तकापर्यंत गेली !

पृथ्विराजानें आपल्या पत्रांत जा नौरोजाचा उल्लेख केला आहे तो 'खुषरोज' मनांत धरून केला आहे.

भगवान् सूर्यनारायणानें मेष राशींत प्रवेश केला म्हणजे पौर्वात्य मुसलमान 'नौरोजा'चा उत्सव करीत. 'वर्षाचा नववा दिवस' असा त्याचा अर्थ आहे. हा उत्सव घरोघर मोठ्या थाटानें होई. आपल्या वर्ष प्रतिपदेसारखाच हा उत्सव खरा, पण तो यवन नऊ दिवस करीत. नवव्या दिवशीं अकबरानें या उत्सवाला एक नवीनच उत्सव जोडिला होता. त्याला त्यानें 'खुषरोज' (आनंदाचा दिवस) असें नांव दिलें होतें. हा 'खुषरोज' प्रत्यक महिन्याच्या मुख्य सणाच्या नवव्या दिवशीं होत असे. 'खुषरोज'ही अकबराच्या सुपीक

बुद्धींतून निघालेली, स्त्रियांचें पावित्र्य भ्रष्ठ करणारी एक अजब युक्ती होती. या उत्सवांत फक्त स्त्रियांनींच भाग घ्यावयाचा असे. मोठमोठे मुसलमान व्यापारी आणि अकबराचे हिंदु-मुसलमान सरदार, यांच्या स्त्रियांनीं तसेंच पुरुषांनींहि हरतऱ्हेचे केलेले कलाकुसरीचे जिन्नस या उत्सवांत विकावयास मांडीत, आणि तेथें तें अवाच्या-सवा किंमतीला राजघरण्यांतील स्त्रियांत खपत असत.

## --अकबराचा स्त्री वेष--

या उत्सवांतील विशेष गोष्ट म्हणजे दिल्लीपति, जगद्गुरु (!) महात्मा (!) अकबर या उत्सवासाठीं जमलेल्या **कुलीन स्त्रियांच्या घोळक्यांत, स्वतः स्त्रीवेश धारण करून मोठ्या आनंदानें हिंडत असे** ! केवढी जबरदस्त विषयलालसा ही ! तरीहि तो महात्माच !

मुसलमान रियासतीचा अभिमानी अबूफजिल नांवाचा एक इतिहासकार, अकबराच्या वरील कृत्याचें राजकारणाच्या नांवाखालीं एक फुसकें समर्थन करितो. तो म्हणतो-स्त्रीवेषानें स्त्रियांच्या मेळयांत हिंडण्यांत अकबराचा असा उद्देश होता कीं, त्या योगानें आपल्या राज्यकारभारासंबंधीं लोकांचें आपल्याबद्दल काय मत आहे, तें आपणाला समजावें. अबूफजिल ! वाः ! चांगला उद्देश होता अकबराचा ! आणि उद्देश सिद्धीचा त्याचा मार्ग तर फारच नामी होता म्हणावयाचा ! लोक अकबराच्या या कृतीचा उद्देश न समजण्याइतके दुधखुळे आहेत, असें का अबूफजिल समजतो ! अकबरासारख्या प्रसिद्ध आणि लोकप्रिय बादशहानें अशा परमनिंद्य चाली प्रचलित कराव्या, हें त्याला कलंकभूत आहे यांत तिळमात्र शंका नाहीं ! त्यांतहि ज्या भाग्यहीन रजपुतांना पराभूत झाल्यामुळें अकबराच्या आधीन व्हावें लागलें, त्यांच्या स्त्रियांची अब्रू

घेण्याचें अतिनीच वर्तन अकबरासारख्यानें करावें ही मोठी उद्वेगकारक गोष्ट आहे ! एकंदरींत अकबरानें या जत्रेच्या निमित्तानें, पुष्कळ रजपुत कुटुंबांची खराबी केली ! परंतु अशा अत्यंत बिकट काळांतहि परमशूर आणि सुप्रसिद्ध कवि पृथ्विराज राठोड याच्या बायकोनें, एकदां अकबराची जी फजिती केली तो प्रकार वाचून, परम पवित्र कुळांतील रजपूत स्त्रियांच्या पावित्र्याची आणि त्यांच्या शौर्याची योग्य कल्पना येऊन, त्यांच्याविषयीं मुखावाटे धन्योद्गार बाहेर पडल्यावांचून रहात नाहींत !

## अकबराची फट्फजिती

एकदां ' खुषरोजां ' च्या उत्सवाला पृथ्विराजाची कांता इतर बरोबरीच्या स्त्रियांबरोबर गेली होती. तेव्हां स्त्रीवेषांत हिंडणाऱ्या अकबराची तिच्यावर दृष्टी गेली. पृथ्विराजपत्नी अत्यंत सुंदर होती. राजकारणासाठीं (!) हिंडणाऱ्या अकबराला तिला पाहून कोणतें कारण आठवलें कोणाला ठाऊक ! त्याची दृष्टी त्या देवीच्या सौंदर्यावर खिळून गेली ! सर्व बाजार फिरून सती परत जाण्याकरितां जों मागें फिरते तों स्त्री वेषधारी अकबरानें तिला एक अडचणीची वाट दाखविली व ती त्या वाटेनें जाऊं लागतांच वाटेंत अकबरानें तिला अडविलें, आणि नानाप्रकारचीं आमिषें दाखवून तो दोन्ही हात पसरून तिच्या पुढें उभा राहिला ! अनेक रजपुत युवतींना भ्रष्ट करून संवकलेला आणि आज त्याला पवित्र सिसोदिया कुळांतील एका सतीचें शील भ्रष्ट करावयास सांपडत होतें, म्हणून अकबरास परमहर्ष झाला होता. पृथ्विराजाची कांता ही शाक्तसिंह कन्या म्हणजे राण्याची पुतणी होती !

स्त्री वेषधारी अकबर ! ज्याच्यावर सर्व प्रजेचीं सुखदुःखें अव-

लंबून, तसेंच जो सर्व प्रजेचा मायबाप ? जो सर्वांचा आधार! प्रजेचा धर्माधर्म, तिची नितिमत्ता आणि तिचें यशापयश ज्याच्या हातीं ! तो राजाच जर धर्मवृक्षाच्या मुळांत कुऱ्हाड घालील ! तोच जर नीति–अनीतीचे निर्बंध झुगारून देईल आणि तोच जर पवित्र स्त्रियांची अब्रू लुटूं लागेल तर त्याला प्रतिबंध कोण करणार ! पण त्यालाहि मार्गावर आणणारे प्रसंग परमेश्वर घडवून आणतोच !

" हे दिल्लीपते ! मला सुखानें स्वस्थळीं जाऊं दे ! कुलीन स्त्रियांना अशा प्रकारें त्रास देणें तुला शोभत नाहीं " असें त्या तेजस्विनीनें त्याला गोड शब्दांत सांगून पाहिलें परंतु तेवढ्यानें अकबराचे डोळे उघडले नाहींत ! शेवटीं त्या महासाध्वीनें क्रोधानें चंडीचें रूप धारण करून मोठ्या चलाखीनें आपल्या कमरेची कट्यार उपसिली आणि अकबरावर चाल करून तिनें त्याच्या छातीवर मोठ्या शौर्यानें ती रोखून धरिली ! हें कल्पनातीत शौर्य पाहून अकबर गांगरला ! तो स्त्रीवेषधारी असल्यामुळें त्याच्या जवळ शस्त्र मुळींच नव्हतें. तसेंच त्याला कोणाचें साह्यहि घेतां येण्यासारखें नव्हतें. बरें, मदतीसाठीं कोणाला तो मोठ्यानें हांक मारील तर भोंवतालीं सर्व स्त्रियाच असल्यामुळें त्यांचीच गर्दी होऊन फजिती मात्र व्हावयाची ! आणि कांहीं हालचाल करावी तर कट्यार छातीला टेंकलेली !

अशा रीतीनें अकबर मोठ्या अडचणींत पडला व त्याची वृत्ति बावरली !

बादशहाची ही स्थिति पाहून त्या सिंहकन्येनें त्याला म्हटलें, माझ्या किंवा माझ्यासारख्या रजपूत स्त्रियांच्या पुन्हा वाटेस जाणार नाहीं; अशी जर तूं शपथ घेतलीस, तरच या प्रसंगांतून तुझी सुटका होईल ! त्या महासाध्वीचें हें वचन ऐकून अकबरानें निमूटपणें

तिच्या म्हणण्याप्रमाणें शपथ घेतली ! व त्या वाघिणीच्या जबड्यांतून आपली मुक्तता करून घेऊन तो निमूटपणें तेथून चालता झाला. अकबर निघून गेल्याबरोबर त्या साध्वीनेंहि लगेच तें स्थान सोडिलें; आणि तेथून ती त्वरित आपल्या घरीं गेली ! पृथ्वीराजाला आपल्या त्या परमशूर कांतेच्या तेजस्वी कृतीचें किती कौतुक वाटलें असेल बरें !

भाट लोकांनीं आपल्या काव्यांतून त्यावेळीं चितोडच्या जगदंबेनेंच व्याघ्रारूढ होऊन त्या महासाध्वीला साह्य केलें व ती कट्यारहि जगदंबेनेंच तिच्या हातांत दिली; असें मोठ्या गौरवानें जागोजाग वर्णन केलें आहे ! तिच्या दैवी पराक्रमाचें अशा रीतीनें वर्णन झालें हें उचितच होय ! यापेक्षां अशा प्रसंगांचा अधिक गौरव करतांच येणें अशक्य आहे ! अशा स्त्रीया केव्हांहि क्वचितच असतात !

याच पृथ्वीराजाचा भाऊ रायसिंग याच्या स्त्रीचें पातिव्रत्य अकबरानें लुटिलें होतें ! पृथ्वीराजास हें कळलें तेव्हां त्यानें आपल्या भावास निरोप पाठविला कीं—" तुझी बायको, तोरड्यांचा आणि कमरपट्याच्या घागऱ्यांचा, छुमछुम शब्द करीत, आणि जडावाच्या अलंकारांच्या किणकिणाटानें दिशा निनादित करीत, तुझ्या घरीं आली खरी ! पण कायरे, तुझी दाढी आणि तुझ्या त्या मिशा कोठें आहेत ? "

अशा रीतीनें सर्वत्र भ्रष्टाकार चालविला असतांहि, अकबराची फटफजिती उडवून पृथ्वीराजपत्नीनें आपल्या कुळाचें नांव राखिलें ! या खुषरोजाचीच आपल्या पत्रांत पृथ्वीराजानें महाराण्यास आठवण दिली होती ! !

---

# — अचानक हल्ला —

## प्रकरण १५ वें.

पृथ्वीराजाच्या त्या अत्यंत प्रभावी पत्रानें, इतकीं वर्षे होऊन गेलीं तरी आजहि आपणास त्या वेळच्या परिस्थितीचें स्मरण होऊन, अंतःकरणास एक प्रकारची चेतना मिळाल्यावांचून रहात नाहीं. मग राणाजीसारख्या ज्वलज्जहाल ज्वालामुखीची काय अवस्था झाली असेल, याची कल्पना वाचकांनींच करावी !

इतके दिवस आपण जे हाल सोशीत आहोंत, त्याची इतर रजपुतांसहि कल्पना आहे व त्याबद्दल ते आपणास धन्यवादहि देत आहेत. हें कळल्यामुळें राणाजीला एक प्रकारची धन्यता वाटली. त्याला त्याच्या मोठेपणाबद्दलच धन्यता वाटली, असें कोणास कदाचित् वाटेल, परंतु तसें मुळींच नसून त्याला धन्यता वाटली त्याचें कारण निराळेंच होतें. यवनांच्या वैभवानें दिपून जाऊन स्वाभिमानशून्य झालेल्या रजपुतांतहि अद्यापि सदसद्विवेकबुद्धि शिल्लक आहे ! स्वार्थलोलुपतेपेक्षां स्वार्थत्यागाची योग्यता काय आहे, हें त्यांना अजूनहि कळतें ! आणि स्वातंत्र्यासाठीं सर्वस्वाचा त्याग करून भिकारी झालेल्या माझ्यासारख्या एखाद्या वेड्यापीरापुढें त्यांची मान अजून वांकते ! या गोष्टीनें राण्याची आशा पुन्हा पल्लवित झाली ! त्याला नवचैतन्य प्राप्त झालें ! त्याचीं थकलेलीं गात्रें उत्स्फूर्त झालीं ! त्याचें दमलेलें मन पुन्हा ताजेंतवानें झालें आणि त्याचा हुरूप चौपट झाला !!

तिकडे राण्याच्या पत्रामुळें अकबर हर्षभरित होऊन त्यानें सर्वत्र

मोठ्या थाटाचे उत्साह सुरू केले होते. त्यामुळें अर्थातच राणा आपणा-वर चाल करील, अशी यवनांस शंकाहि नव्हती. या गाफिलपणाचा फायदा घेऊन राण्यानें आपल्या विश्वासू व विक्रमशाली लोकांनिशीं यवनांवर मोठ्या धडाक्याचा हल्ला केला. अनेक यवन या झटापटींत प्राणास मुकले व कित्येक जीव वांचवून पळून गेले; पण त्यामुळें राण्याला यत्किंचित्‌हि लाभ झाला नाहीं. यवनांची जागा भराभर भरून निघूं लागली व शेवटीं त्यांच्या अफाट सैन्यापुढें राण्याच कांहीं चाललें नाही. राण्याला पुन्हा अरण्यांत शिरावें लागलेंच पण आतां त्याला अरण्यांत रहाणेंहि मुष्किलीचें होऊन गेलें ! यवनांनीं राण्याचा आतां चवताळून पाठलाग केला. ते रानोरान त्याच्या मागोमाग फिरूं लागले; आणि सुचेल त्या मार्गानें राण्याला त्रास देण्याचा त्यांनीं शिकस्तीचा प्रयत्न चालविला !

कंदमुळें संपून गेली होतीं ! आतां, पुरेशीं फळेंहि मिळत नसत. इतकेंच नव्हे तर तृणबीजहि दिवसेंदिवस दुर्मिळ होऊन गेलें ! अशा परिस्थितींत राण्याला एका मागून एक असे किती तरी उप-वास पडूं लागले, आणि आपल्या सर्व मुलांबाळांसह त्याला पळतां पळतां नकोसें झालें ! विश्वामित्र ज्याप्रमाणें त्या महाभाग हरि-श्चंद्राच्या हातधुवून पाठीस लागला होता, तीच स्थिती यवनांनी केली. भर दोन प्रहरीं अयोध्यापति हरिश्चंद्र आपल्या कांतेसह बाळ रोहिदासाला घेऊन जसा अरण्यांत सांपडला तशीच राण्याची स्थिति झाली. रात्रंदिवस त्याला झोंप नाहीं, अन्न नाहीं, आणि स्वस्थपणें पाण्याचा घोट घेण्यासहि सवड नाहीं, असे दिवस कंठावे लागले ! आतां मला माझ्या मुलाबाळांसह मृत्युमुखीं पडावें लागणार ! अशी राण्याला भीति वाटूं लागली ! मृत्यूचें त्याला मुळींच भय नव्हतें,

कारण आज नाहीं उद्यां तो सर्वांनाच यावयाचा आहे. हें तो पूर्ण-पणें जाणून होता; पण माझ्या मुलाबाळांसह मला अन्नावांचून मरावें लागणें हें मोठ्या नामुष्कीचें आहे असें त्याला वाटे! आतां मी अन्नावांचून मरून जाऊं काय? असें म्हणून तो कपाळाला हात लावी!

## देशत्याग

शेवटीं नाइलाज होऊन त्यानें देशांतर करावें असें ठरविलें! ज्या 'स्वर्गादपि गरीयसी' अशा आपल्या मातृभूमीसाठीं, आज-पर्यंत त्यानें लेखणी तर लिहूं शकत नाहींच पण वाणीहि बोलूं शकत नाहीं असे जे बहुविध हाल सोसले होते, त्या मायभूमीची पुढें अवस्था काय? ज्या उद्देशानें आपल्या वैभवाची आपण आपल्या हातानें राखरांगोळी केली, त्या उद्देशाची सिद्धी आपण देशांतर केल्यानें कशी होणार! तसेंच शत्रूशीं महाभयंकर संग्राम करून यवनांच्या आणि रजपुतांच्या रुधिरानें ज्या बीजाला आपण जलसिंचन केलें त्या बीजाला अंकुर फुटला तर त्याची वाढ होण्याची काळजी कोण घेईल बरें! असे विचार मनांत आले म्हणजे देशांतराचा विचार राण्याला असह्य होई!

आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं वनवास सोसला त्यांच्या वनवासांतील कष्टांशीं तुलना करून पहातां, राणाजी त्यांच्याहून लवभरहि कमी ठरत नसून त्याच्या हालअपेष्टा कांकणभर अधिकच होत्या, असें म्हटलें तरी चालेल! तो पुण्यश्लोक नलराजा! त्याचा वनवास फार थोड्या कालाचा होता! महाभक्त पांडव! ते तेरा वर्षे वनवासांत होते! पण त्यांच्या मुलाबाळांची त्यांनीं व्यवस्था केली होती आणि ते एकासारखे एक पांच जण वनांत असून रात्रंदिवस त्यांना शत्रूचा

राण्यासारखा मुळींच त्रास नव्हता! तो दाशरथी राम! त्याला चौदा वर्षे वनवास भोगावा लागला! पण त्याच्या पाठीवरहि त्याचा शत्रू नव्हता! त्याच्या पाठीशीं मुलाबाळांचा व्याप नव्हता! आणि जानकीहरण होईपर्यंत त्याला रात्रंदिवस हृदयाला जाळणारी चिंताहि नव्हती!

आतां आमचा राणाजी पहा! त्यानें पंचवीस वर्षें खडतर वनवास कंठिला! पहिल्या दिवसापासून शेवटल्या दिवसापर्यंत शत्रू रात्रंदिवस त्याच्या पाठीस लागलेला! चितोड स्वतंत्र करण्याची त्यानें महाप्रतिज्ञा केलेली! आणि बरोबर त्याचीं सर्व मुलें माणसें अशा स्थितींत त्यानें अरण्यांत इतके दिवस कसे काढले, ते त्याचे त्यालाच ठाऊक!

इतके कष्ट सोसूनहि आज राण्याला स्वदेशांतील अरण्यांतसुद्धां रहातां येणें कठीण झालें, तेव्हां त्याला किती दुःख झालें असेल! त्याचा स्वदेशाभिमान किती जाज्वल्य होता, याची खरी कल्पना आली तरच स्वदेश त्यागाच्या कल्पनेनें त्याला किती दुःख झालें असेल त्याची अंधुक कल्पना तरी आपणाला येऊं शकेल!

अनेक प्रकारचे कष्ट झाल्यामुळें तीं सर्व माणसें आतां अगदीं कृश होऊन गेलीं होतीं. महाराणी, राण्याची सून आणि त्याचीं मुलं, सर्वांचींच वदनें अगदीं सुकून गेलीं होतीं; आणि आतां अरवलीच्या डोंगरांत रहाणें सर्वच बाजूंनीं त्याला अशक्य झालें होतें. त्यामुळें देशत्याग करून जाणें राण्याला कितीहि दुःखकारक वाटत असलें तरी त्याला त्यावांचून दुसरा मार्गच नव्हता.

शेवटीं मोठ्या कष्टानें त्यानें मेवाडपरित्यागाची सिद्धता केली. आपलीं जिवाला जीव देणारीं निवडक माणसें त्यानें बरोबर घेतलीं!

कारण आज नाहीं उद्यां तो सर्वांनाच यावयाचा आहे. हें तो पूर्ण-पणें जाणून होता; पण माझ्या मुलाबाळांसह मला अन्नावांचून मरावें लागणें हें मोठ्या नामुष्कीचें आहे असें त्याला वाटे! आतां मी अन्नावांचून मरून जाऊं काय? असें म्हणून तो कपाळाला हात लावी!

## देशत्याग

शेवटीं नाइलाज होऊन त्यानें देशांतर करावें असें ठरविलें! ज्या '**स्वर्गादपि गरीयसी**' अशा आपल्या मातृभूमीसाठीं, आज-पर्यंत त्यानें लेखणी तर लिहूं शकत नाहींच पण वाणीहि बोलूं शकत नाहीं असे जे बहुविध हाल सोसले होते, त्या मायभूमीची पुढें अवस्था काय? ज्या उद्देशानें आपल्या वैभवाची आपण आपल्या हातानें राखरांगोळी केली, त्या उद्देशाची सिद्धी आपण देशांतर केल्यानें कशी होणार! तसेंच शत्रूशीं महाभयंकर संग्राम करून यवनांच्या आणि रजपुतांच्या रुधिरानें ज्या बीजाला आपण जलसिंचन केलें त्या बीजाला अंकुर फुटला तर त्याची वाढ होण्याची काळजी कोण घेईल बरें! असे विचार मनांत आले म्हणजे देशांतराचा विचार राण्याला असह्य होई!

आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं वनवास सोसला त्यांच्या वनवासांतील कष्टांशीं तुलना करून पहातां, राणाजी त्यांच्याहून लवभरहि कमी ठरत नसून त्याच्या हालअपेष्टा कांकणभर अधिकच होत्या, असें म्हटलें तरी चालेल! तो पुण्यश्लोक नलराजा! त्याचा वनवास फार थोड्या कालाचा होता! महाभक्त पांडव! ते तेरा वर्षें वनवासांत होते! पण त्यांच्या मुलाबाळांची त्यांनीं व्यवस्था केली होती आणि ते एकासारखे एक पांच जण वनांत असून रात्रंदिवस त्यांना शत्रूचा

राण्यासारखा मुळींच त्रास नव्हता ! तो दाशरथी राम ! त्याला चौदा वर्षें वनवास भोगावा लागला ! पण त्याच्या पाठीवरहि त्याचा शत्रू नव्हता ! त्याच्या पाठीशीं मुलाबाळांचा व्याप नव्हता ! आणि जानकीहरण होईपर्यंत त्याला रात्रंदिवस हृदयाला जाळणारी चिंताहि नव्हती !

आतां आमचा राणाजी पहा ! त्यानें पंचवीस वर्षें खडतर वनवास कंठिला ! पहिल्या दिवसापासून शेवटल्या दिवसापर्यंत शत्रू रात्रंदिवस त्याच्या पाठीस लागलेला ! चितोड स्वतंत्र करण्याची त्यानें महाप्रतिज्ञा केलेली ! आणि बरोबर त्याचीं सर्व मुले माणसें अशा स्थितींत त्यानें अरण्यांत इतके दिवस कसे काढले, ते त्याचे त्यालाच ठाऊक !

इतके कष्ट सोसूनहि आज राण्याला स्वदेशांतील अरण्यांतसुद्धां रहातां येणें कठीण झालें, तेव्हां त्याला किती दुःख झालें असेल ! त्याचा स्वदेशाभिमान किती जाज्वल्य होता, याची खरी कल्पना आली तरच स्वदेश त्यागाच्या कल्पनेनें त्याला किती दुःख झालें असेल त्याची अंधुक कल्पना तरी आपणाला येऊं शकेल !

अनेक प्रकारचे कष्ट झाल्यामुळें तीं सर्व माणसें आतां अगदीं कृश होऊन गेलीं होतीं. महाराणी, राण्याची सून आणि त्याचीं मुल, सर्वांचींच वदनें अगदीं सुकून गेलीं होतीं; आणि आतां अरवलीच्या डोंगरांत रहाणें सर्वच बाजूंनीं त्याला अशक्य झालें होतें. त्यामुळें देशत्याग करून जाणें राण्याला कितीहि दुःखकारक वाटत असलें तरी त्याला त्यावांचून दुसरा मार्गच नव्हता.

शेवटीं मोठ्या कष्टानें त्यानें मेवाडपरित्यागाची सिद्धता केली. आपलीं जिवाला जीव देणारीं निवडक माणसें त्यानें बरोबर घेतलीं !

जे त्याचे सरदार सुख, दुःख संपत्ति किंवा विपत्ती अशा कोणत्याहि काळांत राण्याला अंतर देत नसत, तेही त्याच्याबरोबर देशांतर करण्यास सिद्ध झाले. मेवाड परित्याग करून सिंधूनदीच्या किनाऱ्यावर जाऊन रहाण्याचा त्यानें निश्चय केला होता. मेवाडचा त्याग करितांना त्याला ब्रह्मांड आठवलें ! मेवाड-सरहद्दीवर येतांच त्यानें एकदां मागें वळून पाहिलें, व आतां माझ्या मायभूमीचें मला हेंच शेवटचें दर्शन ! असें वाटून त्याचे नेत्र भरून आले ! हे माते, शेवटीं तुझा त्याग करून जाण्याचीच तुझ्या या दुर्दैवी सेवकावर वेळ यावी ना ! आई, वाटेल ते हाल झाले तरी मी जोंपर्यंत तुझ्या अंकावर खेळत होतों, तोंपर्यंत मी ते सर्व हाल मोठ्या आनंदानें सहन केले, इतकी तुझ्या पवित्र चरणांची मला आवड आहे ! परंतु आज मला आतां तूं आपल्या घराच्या बाहेर हांकलून देणार ना ! हे माउली तुझ्यावांचून मी कसाग जिवंत राहूं ? मेवाडभूमीकडे राणाजी भरलेल्या डोळ्यांनीं टकटकां पाहूं लागला ! त्याचा कंठ दाटून आला ! त्याचे पाय जड झाले ! त्याची मुद्रा रडवेली झाली आणि त्याचें अंतःकरण कंपित झालें ! त्यानें एवढा निर्धार केला होता, पण त्याची बुद्धी, चितोडच्या सरहद्दीवर आल्याबरोबर पालटली !

काय होईल तें होवो ! आपला देश सोडून जावयाचें नाहीं. असे विचार त्याच्या मनांत जोर करूं लागले ! ती ओसाड चितोड नगरी त्याच्या डोळ्यांपुढें उभी राहून, जाऊं नकोस ! असें सांगते आहे ! असें त्याला वाटे ! चितोडकरितां तो वेडा होऊन गेला होता. अखेरीस पुढें जाववत नाहीं, असें पाहून सर्वानुमतें कांहीं दिवस तेथेंच रहावयाचें ठरलें ! मेवाडचा व आपला वियोग काल,

थोडे दिवसच कां होईना पुढें ढकलला गेला हें पाहून राण्याला जरा बरें वाटलें व आपल्या मंडळीसह त्यानें मेवाडच्या सरहद्दीवर मुक्काम केला.

## भामासा नामक प्रधानाचें सहाय्य

मेवाडभूमीच्या हद्दीवर राण्याचा मुक्काम असतां एक गोष्ट अशी घडून आली कीं, त्यामुळें राण्याच्या सर्व जीवनाला अकस्मात् एक निराळेंच वळण लागलें ! कोणत्याहि गोष्टीला मर्यादा ही असतेच. सुख काय किंवा दुःख काय, समुद्राच्या भरती ओहोटीप्रमाणें एका विशिष्ट मर्यादेपर्यंत गेल्यावर त्याला आपोआप उलट दिशेनें गति मिळूं लागते ! हा सृष्टीचा नियमच आहे ! ज्यानें मेवाडकरितां आपल्या सर्व सुखाची होळी केली होती, त्याच पुण्यात्म्यावर देशत्यागाची पाळी आल्यामुळें त्याला जें परमावधीचें दुःख झालें, तेथून त्याच्या परिस्थितीनें उलट खाल्ली आणि त्यावेळेपासून राणाजीचा भाग्यरवी दुर्दैवाच्या काळ्याकुट्ट मेघांतून मोकळा होऊन हळूहळू त्याचे किरण स्वप्रकाशानें दशदिशा प्रकाशित करूंलागण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं !

एकदां त्याठिकाणीं वास करणाऱ्या राणाजीकडे एक अत्यंत वृद्ध गृहस्थ मुद्दाम राणाजीची भेट घेण्यासाठीं आला. त्याचे सर्व केश पांढरेशुभ्र झाले होते. त्याच्या हातांत एक काठी होती आणि त्याला पोंकहि आलें होतें. राणाजीला पाहून त्यानें त्याचे चरण धरिले. तेव्हां राण्यानें त्याला उठवून व त्याच्या भेटीमुळें संतोष झाल्याचें सांगून त्यानें त्याला भेटावयास येण्याचें कारण विचारिलें. **भामासा** हा राणाजीचा एक वंशपरंपरागत अमात्य होता, स्वामिकार्यांत त्याचे दोन पराक्रमी पुत्र धारातीर्थीं पतन पावल्यामुळें

भगवच्चिंतन करून जन्मसार्थ करण्यासाठीं त्यानें अलीकडे अरण्य-वास पतकरिला होता.

राणाजी देश त्याग करून जावयास निघाल्याचें, त्याला कांहीं भिल्लांचे आपसांत भाषण चालळें होतें, त्यावरून एकदां सहज कळलें. तेव्हां त्याला अत्यंत दुःख होऊन त्यानें राणाजीची सर्व चौकशी केली, एथें राहून राणाजीच्या कुटुंबास यापुढें अन्न मिळण्याचीसुद्धां पंचाईत झाल्यामुळें, तो देश त्याग करीत आहे हें सर्व वर्तमान त्याला कळलें. त्यामुळेंच तो राण्याच्या भेटीस आला होता. त्यानें आपली सर्व स्थिति राणाजीस सांगून म्हटलें – महाराज ! आपल्या कुळाची सेवा करून संपादिलेलें असे मजजवळ पुष्कळ द्रव्य आहे. तें स्वीकारून आपण आपल्या जन्मदात्या पुण्यभूमीची मुक्तता करा?

भामासाचें हें भाषण ऐकून राणाजी त्यास म्हणाला – हे अमात्य-श्रेष्ठा, तुम्ही अनेक पिढ्या आमच्या घराण्याची न्यायानें सेवा करून जें द्रव्य संपादिलें आहे त्या द्रव्यावर माझी मुळींच सत्ता नाहीं. तुम्ही ब्राह्मण असून दान रूपानें आमच्याकडून तुम्हांला जें द्रव्य मिळालें आहे तें द्रव्य कोणत्याहि रूपानें परत घेण्याचा मला मुळींच हक्क नांहीं, आणि माझी तशी इच्छाहि नाहीं !

राणाजीची ही न्यायवृत्ति किती दुर्मिळ आहे, हें लक्षांत आणिलें म्हणजे त्याची थोरवी काय होती हें चटकन् कळेल ! भामासाकडून राण्याला कांहीं चैनीकरितां पैसे खावयाचे नव्हते ! तरीसुद्धां ज्या द्रव्यावर न्यायानें आपली सत्ता नाहीं तें द्रव्य ऐन अडचणीच्या वेळींसुद्धां राष्ट्रकार्यासहि घेण्याची सिद्धता नसणें हें केवढें आश्चर्य कारक कृत्य आहे ! मनुष्याच्या द्रव्यासक्तीचीं मोठमोठ्यांच्या व्यवहा-

तील किळसवाणी उदाहरणें कोणीकडे, आणि राणाजीचें हें परमोच्च वर्तन कोणीकडे !

महाराण्याचें भाषण ऐकून भामासाचा कंठ सद्गदित झाला, आणि तो राणाजीस म्हणाला—महाराज, परद्रव्याविषयींची आपली ही बुद्धी परमपवित्र सूर्यवंशोत्पन्न नरशार्दूलांस शोभण्यासारखीच आहे ! हे यशोधना, साम्प्रतकालीं, राजा या थोर पदवीला लायक असा मला एकटा तूंच दिसत आहेस ! प्रजेचें द्रव्य आणि स्त्रिया यांच्या विषयीं अत्यंत लोलुप असे राजे सध्यां 'राजा' या पदवीची थट्टा करणारेच झाले आहेत ! तेव्हां हे नरव्याघ्रा, मेवाडची पवित्रगादी शोभविणारा तुझ्यावांचून मला दुसरा कोणीहि दिसत नाहीं. आम्ही तुझ्या कुळाची म्हणजे मेवाडचीच सेवा करून हें द्रव्य संपादिलें आहे. अर्थात तें मेवाडचेंच द्रव्य आहे; आणि तूं त्या मेवाड देशाला स्वातंत्र्य मिळावें म्हणून आज कित्येक वर्षें आपल्या आयुष्याचा क्षणानूक्षण फुकट न जाऊं देतां, अव्याहत श्रम चालविले आहेस. तेव्हां तूं माझें सर्व द्रव्य घेऊन त्या परमपूज्य मेवाडभूमीची सेवा करून तिला स्वतंत्र करावीस अशी माझी तुला प्रार्थना आहे. मेवाडच्या हीन दीन स्थितीकडे पाहून तरी तूं माझें म्हणणें नाकबूल करूं नकोस !

हें पितामहसदृश अशा त्या वृद्ध अमात्याचें संयुक्तिक भाषण ऐकून, राण्यानें आपल्या सर्व सवंगड्यांस, याबद्दल काय करावें ? असा प्रश्न केला व त्या सर्वांची संमती घेतली. नंतर परमोदार भामासाच्या बरोबर जाऊन त्यानें दिलेली सर्व संपत्ती राण्यानें आपल्या स्वाधीन करून घेतली ! पंचवीस हजार लोकांना, बारा वर्षें पर्यंत सांभाळितां येईल एवढी विपुल अशी ती संपत्ती होती !

संपत्ती असली तरी योग्य वेळीं योग्य कार्याकडे तिचा व्यय करण्याची बुद्धी होणें हें महा भाग्याचेंच लक्षण होय.

आतां राण्यानें सिंह गर्जना केली असेल ! व तो अकबरावर तुटून पडला असेल ! यांत काय शंका आहे ! ! भामसा ! धन्य ! धन्य ! धन्य ! तुझें नांव चिरंजीव राहो !

# – भाग्योदय व स्वराज्य प्राप्ती –

## प्रकरण १६ वें.

अंगांत कितीहि सद्‌गुण असले, बुद्धि कितीहि कुशाग्र असली आणि कार्याची कितीही कळकळ असली तरी द्रव्य सहाय्यावांचून सर्व सद्‌गुण अपुरे पडतात. राणाजीला इतके दिवस जे नानाप्रकारचे हाल सोसावे लागले तें केवळ पुरेसें द्रव्य नाहीं म्हणून. पैसा असता तर त्यानें हां हां म्हणतां आपलें सैन्य वाढविलें असतें आणि यवनांस तेव्हांच चांगला हात दाखविला असता. **प्रपंचीं पाहिजे सुवर्ण** असें जें समर्थांनीं म्हटलें आहे तें याचसाठीं. व्यवहारांतील कोणतेंहि कार्य सिद्धीस नेण्यास द्रव्याइतकें उपयुक्त दुसरें साधन नाहीं.

राणाजीच्या दुर्दैवानें द्रव्याच्या बाबतींत त्याची बाजू जी लंगडी झाली होती, ती 'भामासा'च्या परमौदार्यानें आतां खंबीर झाली. राणाजीच्या भाग्यखंत्राचा हा एवढा एकाच खिळा सांडून गेला होता, तो जोडल्याबरोबर त्याचें भाग्य उदयाचलावर बालरवी प्रमाणें चमकूं लागलें. राण्याबद्दल हजारों हजार रजपुतवीरांना अत्यंत सहानुभूति होतीच. राणाजीनें रणशिंग फुंकिल्याबरोबर ते सर्व युवक अरवलीच्या अरण्याकडे धांवून आले.

महाराणा! त्याची आरोळी भीमासारखी गंभीर होती! त्याचें शौर्य अर्जुनासारखें होतें! त्याचा बाण रामचंद्राच्या बाणाप्रमाणें अमोघ होता! त्याचें प्रजावात्सल्य धर्मराजाप्रमाणें असे! त्याचें युद्ध कौशल्य स्कंदाप्रमाणें होतें! आणि त्याची भरारी गरुडासारखी होती!

आजपर्यंत राण्याचे हे सर्व अलौकिक गुण दिवसानुदिवस अधिकच मातिमोल होऊं लागले होते, पण भगवंताच्या कृपेनें मेवाडवासी जनांचें भाग्य उदयाला आलें! राणाजीच्या कपाळींचा वनवास टळला! त्याच्या मुलाबाळांचे दुर्भाग्य संपलें; आणि आर्य स्त्रियांच्या हांकेला परमेश्वरानें ओ दिली! 'भामाशा' च्या बेचाळीस पिढ्यांच्या उद्धाराबरोबरच मेवाडभूमीचाहि उद्धार झाला! राणाजीसह त्याच्या सर्व सेनेनें, त्या स्वातंत्र्यशाहीरांनीं, प्रचंड उत्साहानें भगवान् एकलिंगजीच्या नांवाची एक नभभेदक गर्जना केली! आणि सर्वांनीं ईश्वरस्मरणपूर्वक आपलीं खड्गें म्यानांतून बाहेर उपसलीं! खरोखर तो प्रसंग किती स्फूर्तीचा असेल!!

## चवताळलेला सिंह

ईश्वरकृपेनें सर्व गोष्टींची अनुकूलता झाल्यावर राणाजीला किंवा त्याच्या लोकांनां यवनांवर चाल करून जाण्यासाठीं क्रोध यावा, म्हणून कांहीं नवीन कारण पाहिजे होतें असें थोडेंच आहे! आजपर्यंत त्याला यवनांवर चाल करून जाण्यासारखीं हजारों कारणें झालीं होतीं व ती सर्व कारणें अजून होतीं तशींच कायम होतीं.

तिकडे यवनांच्या हेरांकडून बादशहास असें कळलें होतें कीं, यवनत्रासास कंटाळल्यामुळें राणा देशत्याग करून जावयास निघाला आहे. या वृत्तांतानें यवनसैन्यास मोठा आनंद झाला व यवनांचे सर्व सैनिक निर्भय होऊन नाच रंगांत दंग होऊन गेले. भामाशाकडून राण्याला झालेल्या साहाय्याची यवनांना अजून कांहींच वर्दंता नव्हती. यवनांच्या या बेसावधपणाचा राण्यानें पुरापूर लाभ घेतला, आणि 'देवीर' एथें मोंगल सेनापति शहाबाझखान याच्यावर

त्यानें आपल्या लोकांनिशीं चवताळलेल्या सिंहाप्रमाणें महाभयंकर हल्ला चढविला.

देवीरच्या विस्तीर्ण समरांगणांत यवनांच्या प्रचंड सेनेशीं रजपुतांची गांठ पडली तेव्हां शहाबाझखान निष्काळजीपणानें मौजा करीत, आपल्या सैन्याचा तळ देऊन तेथें स्वस्थ पडला होता. इतक्यांत प्रताप अमर्याद शौर्यानें त्याच्यावर तुटून पडला. तेथें कित्येक दिवस उभयतांचें घनघोर युद्ध झालें. शेवटीं महागर्विष्ठ शहाबाजखानास त्याच्या सेनेसह राणाजीनें धारातीर्थीं लोळविलें!

या युद्धांतून जे कित्येक लोक आपला जीव वांचवून राण्याच्या भयानें पळाले ते आमेर मुक्कामीं जाऊन पोंचलें. तेथें यवनांची दुसरी एक मोठी फौज होती. शहाबाजखानाचा नाश करून राणाजी स्वस्थ बसणें आतां शक्यच नव्हतें. पराजयानें पळणाऱ्या त्या यवन सैनिकांचा पाठलाग करीत राणाजी आमेर एथें आला. तेथील सेना राण्यावर मोठ्या दिमाखानें चालून आली, पण त्या सर्वांना राण्यानें आपल्या अतुल पराक्रमानें कापून काढून मायभूमीला शत्रुरुधीरानें स्नान घातलें!

या अचानकपणें राण्यानें चालविलेल्या संहारामुळें मोंगल घाबरले. त्यांना या गोष्टीचा कांहींच उलगडा होईना. वनांत राणा एकदांही आपल्या हातीं लागत नाहीं. त्याचें कारण त्याच्याजवळ कांहीं तरी जादु टोणा आहे, अशी यवनांची समजूत होती. तसलाच हा कांहीं प्रकार आहे कीं काय असेंहि कदाचित् त्यांना वाटलें असेल. दिल्ली एथें राणाजीला नामशेष करण्यासाठीं उपाय योजनाहि सुरू झाली, पण इतक्यांत राण्यानें कुमळनेरवर जोराचा हल्ला चढवून, मोंगलांचा तेथील पराक्रमी सेनापती अब्दुल्ला यास त्याच्या सेनेसह

धुळीस मिळविलें; व तेथील किल्ल्यावर राण्याचें अत्यंत आवडतें किरमिजी निशाण कृतकृत्यतेच्या अपूर्व आनंदानें फडकूं लागलें!

परमपवित्र उद्देश आणि सतत उद्योग यांचा प्रभाव कसा आहे पहा! आज पंचवीस वर्षें परमावधीचे कष्ट सोसून शेवटीं सर्व गोष्टींची निराशा झाली तरीहि जो आपल्या ध्येयापासून ढळला नाहीं, त्याला अखेरीस काल अनुकूल झाला. त्याचे प्रयत्न सिद्धीस गेले व त्याच्या इतक्या दिवसांच्या तपश्चर्येमुळेंच भामाशाच्या मनांत तरी त्याला साह्य करण्याचें आलें.

कुमळनेरचा किल्ला हस्तगत झाल्यावर, राणाजीच्या भाग्याची कमान चढणीस लागली! थोड्याच दिवसांत राणाजीने मोंगलांशीं युद्ध करून, एकामागून एक असे, पस्तीस किल्ले जिंकिले. यवनांची राणाजीनें आतां लवभरहि दया केली नाहीं. शत्रू दिसेल तेथें काप, असें राण्यानें जणुं सत्रच चालविलें होतें. याविषयीं भाट म्हणतात— "मेवाडभागांत शत्रूचें जेव्हां जेव्हां जें जें सांपडेल तें तें सफा करून प्रतापसिंगानें सर्व मेवाडभूमीचें मैदान करून टाकिलें." अशा प्रकारें अल्पावधींतच राणाजीनें बहुतेक सर्व मेवाडप्रांत स्वाधीन करून घेतला. या कामी त्याला फारशा लढायाही कराव्या लागल्या नाहींत. चितोड, अजमीर, आणि मंडलगड हीं स्थळें जिंकावयाचीं राहिलीं होतीं, पण ज्या नराधमामुळें हा सर्व अनर्थ ओढवला व मेवाडभूमीस नाना प्रकारची विपत्ती सोसावी लागली, त्या मानसिंगास जरा हात दाखवावा, असें राण्याच्या मनांत येऊन प्रतापसिंगानें त्या महागर्विष्ठाच्या अंभेर ( जयपूर ) नामक राजधानीवर आपले लोक पाठवून तेथें लुटालूट केली. जयपूरच्या बाजाराची मालपुरा

नांवाची मुख्य पेठ राणाजीच्या लोकांनीं पार लुटून नेली, व मानसिंगाला चकित आणि लज्जित करून सोडिलें.

नंतर त्यानें उदेपूरहि जिंकिलें व फारच थोड्या दिवसांत मेवाडांतील यवनसत्ता धुळीस मिळविली ! या राणाजीच्या पराक्रमामुळें, चोहींकडे त्याचा फार लौकिक झाला ! अकबरानेंहि राण्याच्या या पराक्रमानें तोंडांत बोट घातलें. पूर्वीं ज्या खानखाननें राण्याला प्रशंसापत्र पाठविलें होतें, तो तर राण्याचा हा पराक्रम पाहून त्याची फारच तारीफ करूं लागला ! अशा रीतीनें राण्यानें आपलें पुष्कळसें वैभव थोड्याच दिवसांत परत मिळविलें व तो स्वतंत्र झाला ! !

## प्रतिज्ञा पालन

महाराणा शरिरानें वनांतून जनांत आला खरा, परंतु मनानें तो अद्यापि वनांतच होता. लोकदृष्टीनें वास्तविक आतां त्याला कांहींच कमी नव्हतें. तो मनांत आणील ती गोष्ट करणें त्याला आतां शक्य झालें होतें. आजपर्यंत जवळ जवळ चौदा वर्षें त्यानें प्रत्यक्ष अरण्यांत काढिलीं होतीं, व पुढें १०–११ वर्षें जरी तो पुन्हा महाराणा म्हणून स्वतंत्रपणें राज्य करीत होता, तरी त्याचें वर्तन त्याच्या वनवासांतील वर्तनासारखेंच होतें. चितोड ! चितोड !

रात्रंदिवस त्याच्या डोळ्यापुढें चितोडनगरी दिसत होती ! तिचें तें हीन, दीन आणि रडवेलें तोंड पाहून, त्याच्या अंतःकरणाला सारखा पीळ पडे ! चितोड, आणि मेवाड, स्मशानतुल्य उजाड करून अकबर दिल्लीस जोंपर्यंत सुखानें राज्य करीत होता, तोंपर्यंत राण्याला सुखानें निद्रा येणें शक्यच नव्हतें !

चितोड स्वतंत्र होईपर्यंत राज्यविलास उपभोगणार नाहीं अशी

त्याची प्रतिज्ञा होती! पेशोळा नांवाच्या सरोवराच्या तीरावर अनेक झोंपड्या बांधून राणाजी व त्याचे सत्यप्रतिज्ञ सरदार त्या झोंपड्यांतून रहात असत! राण्याला आतां मोठमोठ्या राजमहालांतून रहातां येणें अशक्य होतें असें मुळींच नाहीं; पण तसें केलें असतें तर राण्याचें वैशिष्ट्य तें काय राहिलें? स्वार्थापुरेशा लोककल्याणाच्या गप्पा मारून, आणि मोठमोठ्या प्रतिज्ञा करून केवळ लोक अनुकूल करून घ्यावे व आपलें हित साधावें! असा राण्याचा मुळींच उद्देश नव्हता! तो खरा धर्मवीर आणि खरा आचारभास्कर होता! त्याची प्रतिज्ञा चितोडच्या मुक्ततेकरितां अत्यंत कळकळीनें झालेली होती! स्वार्थ साधूपणा किंवा लौकिकाची-हांव त्याच्या ठिकाणीं लवलेशहि नव्हती! त्याला केवळ त्याच्या देशाची स्वतंत्रता आणि त्याचें कर्तव्य तेवढें दिसत होतें! त्यामुळें, जरी त्याचें वैभव त्याला परत मिळालें, जरी अकबरानें त्याच्या वाटेला जाण्याचें सोडून दिलें, जरी मानसिंहासारख्या देशद्रोही लोकांस राण्यानें चांगला हात दाखविला व जरी त्याचे शत्रू देखील त्याची स्तुति करूं लागल्यामुळें दिगंतीं त्याचा लौकिक पसरला, तरीहि त्यानें कृतार्थता मानून आपली प्रतिज्ञा सोडिली नाहीं किंवा तो कोणत्याहि प्रकारें वैभवासक्त झाला नाहीं! राणाजी! तूं खरा आदर्शवीर आहेस, यांत तिळभरहि शंका नाहीं!!

# — हिंदुसूर्य मावळला —

## प्रकरण १७ वें.

महाराणा, जन्मभर विरुद्ध परिस्थितीचे हिमालय फोडीत फोडीत आणि संकटांचे महासागर उल्लंघीत उल्लंघीत आतां वृद्धावस्थेला प्राप्त झाला होता. नानाप्रकारची चिंता, अपरिमित, क्लेश, आणि प्रपंचांतील आणि राजकारणांतील महाकठोर आघात यांच्या योगानें राण्याला जरा अवेळींच वार्धक्यानें पछाडिलें. त्याचें शरीर जरी वृद्ध झालें, थकून गेलें तरी त्याचें अंतःकरण मात्र अद्यापि जोरदार होतें, आणि त्याचा हुरूप तरुणासहि लाजविणारा होता. त्याच्या अंगांवर शस्त्रांचे घाव नाहींत अशी तिळाएवढीहि जागा नसेल! त्याचें हृदय चितोडच्या स्वातंत्र्यासाठीं अहोरात्र जळत होतें.

त्याची आशा पूर्ण होण्याची आतां त्याला चिन्हें दिसत नाहींशीं झालीं! तरीहि चितोडच्या उद्धाराची त्याची तीव्र इच्छा जशीच्या तशी कायम होती! एक क्षणभरहि तो विचार त्याच्या मनांतून दूर झाला नव्हता! उदेपुरांत एकाद्या उंच गिरिशिखरावर बसून तो चितोडनगरीकडे आशापूर्ण दृष्टीनें पाही! चितोडच्या महापराक्रमी वीर पुरुषांनीं अद्वितीय पराक्रम करून त्यांचीं स्मारकें म्हणूनच जे मोठमोठे विजयस्तंभ उभारिले होते, त्यांच्याकडे पाहून राणाजी दीर्घ आणि उष्ण श्वास टाकी व चितोडकरितां आजपर्यंत आपण व आपल्या सवंगड्यांनीं शक्य ते आटोकाट प्रयत्न केले तरी भवानीनें आपणास चितोड स्वतंत्र करण्याचे कामीं कां बरें यश दिलें नाहीं! असें वाटून त्याचें हृदय भरून येई व कंठ सद्ग-

दित होऊन तो चोहींकडे वेड्यासारखा बघूं लागे ! " काय करूं ? चितोडच्या मुक्तीकरितां मी काय करावयाचें शिल्लक ठेविलें आहे ! परंतु इतकें करूनहि चितोडचा उद्धार होऊं शकला नाहीं ! हाय ! हाय !

अशा रीतीनें रात्रंदिन त्याचा जीव, या एकाच गोष्टीसाठीं कासावीस झाला होता ! कधीं कधीं अनेक विचारांचें काहूर माजल्यामुळें त्याला एक प्रकारचा उन्माद होई ! व त्या भरांत त्याला कांहीं सुचत नाहींसें होई !

हळू हळू त्याला आतां तो एक हृद्रोगच लागला ! त्याला ध्यानीमनीं चितोडच्या उद्धारावांचून दुसरें कांहींहि दिसत नाहींसें झालें. तो म्हणे आजपर्यंत त्या परमपराक्रमी बाप्पारावळापासून ज्या चितोडनगरीकरितां हजारों हजार युवकांनीं अनेक वेळां आपले प्राण पणास लाविले, आणि कित्येक वेळां मायभूमीची रुधिर तृष्णा आपलीं हजारों हृदयें फोडून शमविली, आणि चितोडनगर स्वस्वाधीन राखिलें ! पृथ्वीराज चव्हाणाबरोबर चितोडचा समरसिंग धारातीर्थीं पतन पावल्यानंतर ज्या चितोडकरितां आटोकाट प्रयत्न करण्यांत आला ! एकामागून एक बारा राजपुरुष बळी देऊन अल्लाउद्दीनाच्या हल्यांतून ज्या पुण्यनगरीचें आपल्या पूर्वजांनीं संरक्षण केलें ! एक का दोन किती प्रसंगांचें स्मरण करूं ? तो देवलपति वाघजी ! तो रणधीर जलमल्ल ! तो महावीर पत्ते, त्याची ती संग्रामशूर माता आणि त्याची पत्नी ! या सर्वांनीं एका चितोडच्या नांवावरच आपला उद्धार करून घेतला ! एक नव्हे दोन नव्हे तीन वेळां अंगावर रोमांच उभे रहातील असा महाभयद जोहार करून, रजपुतवीरांच्या रोमरोमांत स्वकर्तव्ययशाचें एकेक कुंड चेतविण्यास समर्थ, अशी स्वधर्म-

प्रेमाची एक दिव्य ज्योत प्रज्वलित करण्यांत आली ! हें सगळें जें आमच्या पूर्वजांनीं केलें, तें एका चितोडकरितां ! आणि आज चितोड-नगर यवनांचें गुलाम होऊन रहावें ! यापेक्षां मला अधिक लाजिर-वाणी अशी दुसरी कोणती गोष्ट आहे ! उदेसिंगानें एकदां जो चितोडहून पाय काढिला तो पुन्हा चितोडला लागूं नये ही केवढी आश्चर्याची आणि लांच्छनास्पद गोष्ट आहे ! पवित्र सिसोदिया कुळाचा अभिमान आणि त्याचा लौकिक जर आम्हास टिकवितां आला नाहीं तर आमचा जन्म या कुळांत झाला तरी कशाला ! या परमपवित्र कुळाचें नांव सांगण्यांत, आम्हाला शरमच वाटावयास नको काय ? एवढ्या लौकिकमान् घराण्यांत जन्माला येऊन त्या घराण्याचें ब्रीद जर मला राखितां येत नाहीं तर माझें 'प्रताप' हें नांव तरी काय कामाचें ? अशा चिंतेमुळेंच महाराण्यास हळू हळू दुखणें जडलें.

प्रताप सारख्या परमपराक्रमी आणि खऱ्या देशभक्तालाही जेथें जन्मच्या जन्म एकाच उद्देशासाठीं खर्चूनहि आपली देशसेवा अपुरी वाटावी ! इतकेंच नव्हे, तर ज्याच्या नुसत्या नामस्मरणानेंच शेळपटांनासुद्धां पराक्रमाची स्फूर्ति येईल, त्या राणाजीस, 'प्रताप' या आपल्या नांवाची सुद्धां लाज वाटण्याइतकें त्याचें कार्य अपुरें वाटावें ! यावरून राणाजींची चितोडच्या स्वातंत्र्याची तीव्रतम कळकळ आणि त्याची अत्यंत निरभिमानवृत्तीच नाहीं का दिसून येत ? नामधारीदेशसेवेनें फुगून जाणाऱ्या दर्दुरांस ही राणाजींची वृत्ती समजणें सुद्धां कठीण आहे !

पेशोळा सरोवराच्या तीरावरील एका झोंपडींत, राणाजी तृण-शय्येवर झोंपला असून, त्याचें दुखणें आतां दिवसेंदिवस अधिकच

जोर करूं लागलें ! व त्याची महातेजस्वी प्राणजोतीहि फार दिवस तेवत राहील असें वाटत नाहींसें झालें. त्यामुळें त्याचे सरदार व सामंत रात्रंदिवस त्याच्या जवळच राहूं लागले. त्यांना राणाजीच्या विरहाची नुसती कल्पना सुद्धां सहन होईना ! ज्याच्या ज्योतीला जोत लावून आपल्या स्वाभिमानज्योती आदण अनेक वेळां प्रदीप्त केल्या, पण मृत्युशय्येवर पडला असतांहि ज्याची स्वाभिमान ज्योति अद्यापि पूर्वींच्या तेजानेंच झळकत आहे, त्या महात्म्याला तो महाकाळ आपल्या मंदिरांत घेऊन जाणार,-असें नुसतें मनांत आलें तरी त्यांचे नेत्र भरून येत. राणाजीच्या दुखण्यांत त्याच्या संवगड्यांना अन्नहि गोड लागेना ! मग त्यांना निद्रा कोठून आली आहे !

दिवसानुदिवस राणाजीची चिंता वाढूं लागली ! त्याचा पुत्र अमरसिंह (उमराव) याच्याबद्दल त्याला असावा तसा विश्वास नव्हता. एकदां पर्णकुटीच्या द्वाराशीं पुढें आलेल्या एका वांशाला उमरावाचें पागोटें आपटलें व तें खालीं पडलें. वास्तवीक पर्णकुटींत शिरतांना युवराजानें जरा वांकून आंत शिरावयाचें, पण त्यानें तसें केलें नाहीं, म्हणून पागोटें पडलें होतें, पण उमरावास तें सहन न होऊन, उद्यांचे उद्या पर्णकुट्या काढून टाकून तेथें चांगले वाडे बांधावयाची परवानगी मागण्याचा उमरावानें घाट घातला. या गोष्टीवरून राण्याला उमरावास पडेल त्या प्रसंगांतून पार होतां येणें कठिण आहे असें वाटलें; व तो वैभवानें धुंद होऊन आपल्या प्रतिज्ञाहि विसरून जाईल असें त्यानें ठरविलें. त्यामुळें त्याला फारच दुःख वाटूं लागलें. अशा रीतीनें शेवटीं राणा एकाच उद्देशानें तळमळत अंथरुणावर पडला असतां, हळूहळू मृत्यूहि त्याच्या जवळ जवळ येऊं लागला !

## राणाजीचा अंतकाळ

झालें ! तो भीषण दिवस उगवला ! जा ! त्या मेवाडच्या सिंहाला मोठ्या वैभवानें आपल्या लोकीं घेऊन या ! असा पुण्यलोकांतील वरिष्ठांचा तेथील दूतांना हुकूम सुटला ! पुण्यात्म्याच्या स्वागताची सिद्धता करण्याची परलोकांत धांदल उडाली ! आणि जो तो त्या महाभगाच्या दर्शनास उत्सुक होऊन राण्याच्या दिव्ययानाची मार्ग प्रतीक्षा करीत बसला ! !

पुण्यलोकांतील लोकांची अशी स्थिति झाली, तेव्हां इकडे काय चाललें होतें ? आपल्या झोंपडीत महाराज प्रतापसिंहजी एका अंथरुणावर पडले होते ! त्यांचे अनेक जिवलग स्नेहीसोबती व सरदार सामंत त्यांच्या भोंवती गोळा झाले हाते. या सर्वांनीं समरांगणांत कित्येक वेळां एकमेकांना काळाच्या दाढेंतून वांचविलें होतें ! पण आज मात्र राण्याला वांचविण्याचें सामर्थ्य असल्याचें कोणाच्याच चर्येवरून दिसत नव्हतें !

राणाजीचा जीव सारखा तळमळत होता ! त्याची ती तळमळ पाहून सर्वांच्या अंतःकरणानें आपलें स्थान सोडिलें होतें. पण राण्याला अधिक यातना होऊं नयेत म्हणून सर्वांनीं आपलें दुःख गिळून टाकून ते सगळे केवळ राण्याकडे पहात स्तब्ध बसले होते.

राणाजीची तळमळ सारखी चालली होती ! तो एकसारखा या कुशीवरून त्या कुशीवर आणि त्या कुशीवरून या कुशीवर होत होता ! त्याच्या जिवाला कसल्या तरी काढण्या लागल्या होत्या ! मधेंच तो आपले नेत्र उघडून दीनासारखा चोहींकडे पाही ! तेव्हां पाषाणासहि पाझर फुटावयाचा ! मग त्याच्य संवगड्यांची काय अवस्था होत असेल !

शेवटीं सालुंब्र्याचा ठाकूर पुढें झाला व त्यानें राणाजींस पूज्यभावानें वंदन करून म्हटलें "महाराजांच्या जीवाला इतक्या कसल्या यातना होत आहेत ? महाराजांचे प्राण कशासाठीं घुटमळत आहेत ?" सालुंब्रापतीनें हळुवार शब्दानें महाराजांस अशी विनंती केली तेव्हां सर्वजणांच्या डोळ्यांतून खळखळा उष्णजल वाहूं लागलें; व सर्वांनीं आपल्या माना खालीं घातल्या !

सालुंब्राडपतीच्या या प्रश्नानें राणाजीस मात्र एकप्रकारचा आनंद झाल्यासारखें वाटलें ! त्याला शब्द बोलण्याचें त्राण नव्हतें ! त्याची जीभ आंत ओढ घेत होती ! त्याच्या घशाला कोरड पडली होती व त्याचे ओंठहि अगदीं वाळून गेले होते ! जरा वेळानें तो मोठ्या कष्टानें कसेतरी शब्द बाहेर काढीत म्हणाला–" माझ्या परमप्रिय सामंतानों, माझे प्राण घुटमळत आहेत ! माझी एवढीच अंतिम इच्छा आहे कीं, माझ्या पश्चात् माझा देश परकीयांच्या हातीं जाऊं नये ! माझे प्राण सुखानें जावे असें जर तुम्हांस वाटत असेल तर, 'आमच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत आमची मातृभूमि आम्ही शत्रूच्या हातीं जाऊं देणार नाहीं !' असें मला वचन द्या, म्हणजे मी सुखानें आपले डोळे झांकीन." एवढें बोलून राणाजी थोडा वेळ स्वस्थ राहिला, व जरा वेळानें पुन्हा सावध होऊन तो म्हणाला, "युवराज विलासी आहे. त्याला आपल्या खडतर प्रतिज्ञापूर्तीसाठीं सोसावे लागणारे हाल सहन होणार नाहींत. या उदेपुरांत आपल्या या झोंपड्यांच्या जागीं माझ्या पश्चात् मोठमोठे वाडे करून तुम्ही विलाससुखें भोगीत चैनीनें पडाल ! दिल्लीपतीच्या चरण कमलीं आपलीं मस्तकें घांसून त्याचा प्रसाद म्हणून, संपत्ती, पदव्या आणि अधिकार मिळवाल ! आणि ऐषआरामाच्या धुंदीत मेवाडचें स्वातंत्र्य

गमावून स्वाभिमानशून्यतेनें यवनांची स्तुति स्तोत्रें गाल! व ज्यांनीं आपलीं सर्व आयुष्यें स्वातंत्र्यांत आणि अभिमानांत घालविलीं त्या आपल्या परमवंद्य पूर्वजांच्या नांवास काळिमा फांसाल! पण वीरांनो, कशीहि बिकट स्थिति आली तरी असें करूं नका! पूर्वजांचा पूर्ण अभिमान धरून त्यांचें नांव चिरकाल राहील असें करा."

महाराण्याच्या या अंतकाळच्या उपदेशपर मागणीनें सर्व सामंतांच्या हृदयास पीळ पडला व त्या सर्वांनीं अत्यंत नम्रतापूर्वक व निश्चयपूर्वक राणाजीस हात जोडून सांगितले कीं, "आम्ही जर खरे बाप्पारावळाचे वंशज असूं तर आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें चितोड जिंकल्यावांचून उदेपूरच्या झोंपड्या मोडून तेथें आम्ही कदापि राजवाडे बांधणार नाहीं, व युवराजासह आम्ही मेवाडचें वैभव सांभाळण्याचे कामी केव्हांहि आळस करणार नाहीं"

सामंतमंडळीचें हें भाषण कानावर पडेपर्यंत त्या वीर श्रेष्ठानें जणुं काळासहि थोपवूनच धरिलें होतें कीं काय, असें वाटलें. कारण सामंतांचे हे शब्द कानावर येतांक्षणीं राणाजीनें एकदां सर्वांकडे मोठ्या प्रेमानें पाहिलें आणि जे आनंदानें डोळे मिटले ते मिटलेच!!!

सर्वसामंत मंडळीच्या परिवारांत आपल्या झोंपडींतच महाराण्यानें आपला परमपवित्र देह ठेऊन परलोकीं प्रयाण केलें! इ. स. १५९७ या वर्षी भारतभूमिच्या गळ्यांतील हा अमोलिक लाल तुटून पडला! भूमातेला त्याचें दुःख असह्य झालें! अवध्या मेवाड देशांतील राजमंदिरापासून भिल्लांच्या झोंपडीपर्यंत घरान् घर शोक विव्हल झालें! दिल्ली दरबार, राणाजींचें तें शत्रुस्थान ना! पण राणाजीच्या निधनाचें वर्तमान ऐकतांच अवघें दरबार कळाहीन झालें! जगांतील पराक्रमाची एक महातेजस्वी ज्योत काळाच्या

झंजावातानें मालवली गेली ! संग्रामदेवतेला आपलें जिणें नकोसें झालें ! वीरांचा आधार तुटला ! मुत्सद्दी रजपुतांचा धीर सुटला ! आणि मेवाडवासी आबालवृद्धांच्या धैर्याचा बांध फुटून त्यांच्या नेत्रावाटे दुःखाश्रूंचा पूर वाहूं लागला ! चितोडनगरीचे आशातंतु तुटून गेले ! अरवली पर्वत कंपित झाला ! राणाजीच्या झोंपड्यां-वरून मंदगतीनें वाहणारा वायुराज, महाराण्याच्या वियोग दुःखानें स्तब्ध झाला ! अखिल पंचमहाभूतें, अवघ्या ब्रह्मांडांत असले महात्मे फार क्वचितच जन्मास येत असल्यामुळें राणाजी पंचत्वाला प्राप्त झाला तेव्हां व्याकूळ होऊन गेलीं !

राणाजीनें अनेक रजपूतवीरांचीं नांवें अजरामर केलींच होतीं पण अरवलीचीं दरीं खोरीं आणि हळदी-घांटाच्या अरण्यांतील दगडान् दगड राणाजीनें प्रसिद्धीस आणिला होता ! ज्या ठिकाणीं राणाजीच्या आयुष्यांतील एकादा महत्वाचा प्रसंग घडला नाहीं असें अरवलीच्या पर्वतराजींत एकही स्थळ नाहीं !

हळदीघांट भारतीय युद्धांतील कुरुक्षेत्राप्रमाणें लोकविश्रुत करून, भारतीय संतानाना शेंकडों आणि हजारों वर्षें उपयोगी पडेल अशी कर्त-व्याची शिकवण देऊन आणि आपल्या वियोग दुःखानें अवघ्या जगाला धायधाय रडवून, राणाजी इहलोक सोडून गेला ! दिशा मूढ झाल्या ! भारतीच्या प्रांगणांत आणि मंदिरांत, तसेंच भारतीयांच्या निगूढ अंतःकरणांत आपल्या पवित्र किरणांनीं उज्वल प्रकाश पाडणारा एक अत्यंत प्रकाशमान् तारा तुटून पडला ! ! !

# उपसंहार.

—:०:—

## प्रकरण १८ वें.

रघुकुलभूषण श्रीरामचंद्रानंतर कित्येक पिढ्या व कित्येक उलाढाली होऊन गेल्यानंतर हळूहळू अशी परिस्थिति प्राप्त झाली कीं, क्षत्रियांची आक्रमकशक्ती नष्ट होऊन आपल्या संरक्षक शक्तीवरच ते संतुष्ट राहूं लागले. गेहेलोट कुळांतील सुविख्यात बाप्पारावळापर्यंत क्षत्रियांची आक्रमकशक्ती कशीबशी टिकून होती. त्यानंतर क्षत्रियांनीं परदेशावर केलेलीं लहानसान आक्रमणेंहि प्रसिद्ध नाहींत.

इ. स. पूर्वी ३२८ व्या वर्षी जगज्जेत्या शिकंदरानें हिंदुस्थानावर पहिली स्वारी केली. त्यानंतर ग्रीक शिथियन इत्यादि अनेक विधर्मीयांनीं आर्यदेशावर स्वाऱ्या करण्याचा धूमधडाका चालविल्यामुळें क्षत्रियांना स्वसंरक्षणांतच कृतार्थता मानावी लागली.

विधर्मीयांच्या व विदेशीयांच्या हल्ल्यांना धैर्यानें तोंड देऊन कित्येक शतकें क्षत्रियांनीं आर्यदेशाचें संरक्षण केलें, पण पुढें यवनांचा आर्यदेशांत कायमचा शिरकाव झाला. भारतदेशाच्या दुर्दैवानें अशा वेळींच क्षत्रियांच्या आपआपसांतील कलहानेंहि उचल केली व पृथ्विराज चव्हाणाच्या राजवटींत दिल्लीनगर यवनांच्या स्वाधीन झालें.

पुढें यवनांना स्वदेशांतून कायमचें हांकून देण्याचे दिवत संपल्यामुळें, आतां आपआपल्या राज्याचें यवनजांचापासून संरक्षण

करणें हेंच क्षत्रियांचे ध्येय झालें, आणि महाराणा संगासारख्या विक्रमशाली रजपूत राण्यालासुद्धां यवनांना आपल्या पराक्रमानें दिपवून एक प्रकारचा आपला दरारा बसविण्यापलीकडे कांहींहि करितां आलें नाहीं.

आर्यांच्या घसरत्या काळांत यापुढें हेहि दिवस राहिले नाहींत. यवनांच्या वैभवानें दिपून जाऊन रजपूत राजे हळूहळु त्यांच्या आहारीं जाऊं लागले व पुढें पुढें तर ते जवळजवळ यवनमयच झाले असें म्हटलें तरी चालेल.

अशा घसरगुंडीच्या आणि आर्यजनांस अत्यंत बिकट काळांत आपल्या चरित्र नायकाचा अवतार झाला होता. हें पूर्ण लक्षांत ठेऊनच महाराण्याच्या चरित्राकडे पाहिलें पाहिजे. म्हणजे राणाजीच्या एकेका सद्‌गुणाची किती थोरवी होती, त्याची वाचकांस पूर्ण कल्पना येईल. महाराण्याच्या अंगीं कोणकोणते सद्गुण होते, त्यांचें सामान्यपणें अवलोकन करून त्याच्या कार्याची योग्यता काय होती हें थोडक्यांत पहाण्यासारखें आहे.

## शारीरिक बळ

'शरीरमाद्यं खलु धर्म साधनं' या तत्वाप्रमाणें पाहिलें म्हणजे शरीरसंपत्तीसारखी दुसरी संपत्तीच नाहीं. महाराण्याच्या पुढील सर्वचरित्राकडे पाहिलें असतां, त्याच्या सर्व यशाचें मूळ त्याची शरीरसंपदाच होती, असें आपल्या ध्यानीं येईल. सर्व प्रकारचे मर्दानी व्यायाम व लढाऊ कला, राणाजीच्या अंगीं पूर्णत्वानें वास करीत असल्यामुळें, व त्याची प्रकृति दणकट असल्यामुळें कोणत्याहि प्रसंगांत त्याला अडून रहावें लागलें नाहीं. त्याची धडक भीमासारखी दारुण असल्यामुळें ती यवनांना असह्य होई व राण्यावर चाल करून

आंतांनीं ते अति सावधपणा बाळगीत. लढाई म्हटली कीं, कोणत्याहि काळीं प्रकृति दणकट असणेंच उत्तम हें खरें पण, त्या काळच्या लढाया शरीरबलावरच विशेष अवलंबून असत. प्रकृतीची ईश्वरी देणगी व राण्याची कमाई या दोन्ही गोष्टींमुळें त्याचें शारीरिक बल वीराला शोभेल असेंच होतें.

## अतुल धैर्य

सर्व सद्गुणांत महाराण्याचा जर कोणता प्रमुख सद्गुण असेल तर तो त्याचें अद्वितीय धैर्य हाच होय. उदयसिंग मेला तेव्हांच राण्याच्या या सद्गुणाचें एक मोठें प्रदर्शन झालें. गादीचा खरा अधिकारी राणा असूनहि त्याला तो अधिकार मिळाला नाहीं. तेव्हां न डगमगतां, किंवा कलहहि न करितां त्यानें मोठ्या धैर्यानें स्वतंत्र राज्यस्थापनेचा संकल्प करून तो एकाकी राज्यत्याग करून जावयास निघाला.

पुढें योगायोगानें त्याचे अधिकार त्याला मिळतांच त्यानें अकबरासारख्या महापराक्रमी बादशहाशीं आपल्या तुटपुंज्या बळावरच टक्कर देण्याचें ठरविलें. हळदीघांटच्या युद्धांत यवनांच्या गर्दींत घुसून त्यानें एकट्यानेंच सलिमावर हातघाई केली; आणि त्याच्या हत्तीवर आपला घोडा सोडिला. या राण्याच्या धैर्याला इतिहासांत क्वचितच तोड सांपडेल! राणाजीच्या जीवनांतील प्रत्येक प्रसंग त्याच्या धैर्यानें ठांसून भरलेला असल्यामुळें त्याच्या धैर्याचीं उदाहरणें द्यावयाचीं झालीं तर त्याचें सर्व चरित्रच पुन्हा सांगावें लागेल. यासाठीं आणखी एकाच प्रसंगाची आठवण देऊन आपण पुढें जाऊं.

एकदां राणाजीला यवनांनीं जंगलांत चारी बाजूनें वेढून टाकिलें. आतां राणाजीचें कुटुंब शत्रूच्या हातीं लागणार, अशी सर्वांना चिंता

पडली. राणा आपल्या प्रखर खड्गानें यवनांस कापीत सुटला, पण इकडे राण्याच्या कुटुंबावर यवनांच्या हातीं लागण्याची वेळ आली. तेव्हां भिल्लांनीं अति त्वरा करून नाइलाजानें महाराणीसह सर्व मुला-माणसांस कथलाच्या खाणींत लपविलें व वरून झाडें व फांद्या टाकून ते मोठमोठ्या वृक्षांवर चढून बसले. यवनांना या स्थानाची माहिती नसल्यामुळें, ते अगदीं जवळून गेले तरीहि त्यांना शंका आली नाहीं. कांहीं वेळानें तेथें राणा आला व कोणीच दिसत नाहींसें पाहून घाबरला. इतक्यांत भिल्लांनीं खालीं उतरून राणीसह सर्व मंडळीस बाहेर आणिलें. तेव्हां महाराणी खाणींतल्या घाणीनें लडबडून जाऊन घामाघूम झाली होती! राण्यानें तिच्याकडे व युवराजाकडे पाहून म्हटलें, 'क्षत्रियांना हेंच भूषणास्पद आहे. मानधनांना आपल्या मानापेक्षां बाकीच्या सर्व गोष्टी तुच्छ वाटतात.' स्त्रियांविषयीं अत्यंत आदर आणि अभिमान बाळगणाऱ्या महाराण्याच्या आयुष्यांतील हा प्रसंग त्याच्या धैर्याची एक महत्वाची बाजू दाखविणारा असल्या-मुळें मुद्दाम पुढें ठेवला आहे.

## देशप्रीति

मेवाडकरितां राण्याचें अंतःकरण कसें तिळतिळ तुटत होतें, तें जेव्हां त्याला मेवाडचा परित्याग करण्याची वेळ आली त्यावेळीं इतर सर्व प्रसंगांपेक्षां अधिक व्यक्त झालें आहे. 'वाटेल तें होवो मेवाडचा त्याग करून जावयाचें नाहीं' असें जेव्हां त्यानें ठरविलें, तेव्हां त्याला कुटुंबासह अरण्यांत जिवंत रहाणेंहि मुष्किलीचें झालें होतें. अर्थात् सहकुटुंब अन्न अन्न करीत मरावें लागलें तरी बेहेत्तर! असाच त्याचा निश्चय झाला नव्हता काय? यापेक्षां त्याच्या देश-भक्तीचें दुसरें उदाहरण काय देणार!

## स्वधर्म निष्ठा

त्याचा देशाभिमान केवळ मेवाडच्या दगडामाती पुरेसा नसून त्याच्या पूर्वजांचा धर्म आणि त्यांची संस्कृति यांचाहि त्याला अभिमान वाटे ! प्रतापचा अजरामर लौकिक त्याच्या याच सद्गुणामुळें झाला आहे. केवळ दगडामाती पुरेसेंच पहावयाचें तर यवनांशीं हांजी हांजी करणाऱ्या व भ्रष्ट झालेल्या सर्व रजपुतांनीं आपआपल्या देशांतील दगडमाती आपल्याच स्वाधीन राखिली होती, परंतु म्हणून ते देशभक्त, असें कोणासही म्हणतां यावयाचें नाहीं. या दृष्टीनें **जो स्वधर्म निष्ठ असेल तोच खरा देशभक्त होऊं शकतो.** वेगानें घसरणीस लागलेल्या काळांत राण्यानें आपली वृत्ती इतकी कडक ठेविली होती कीं, मानसिंगाच्या मेजवानीच्या वेळीं त्यानें तीं पात्रेंसुद्धां अग्निसंस्कारानें शुद्ध करून घेतलीं !

महाराण्याचा पराक्रम आणि त्याचा स्वाभिमान सर्वत्र प्रसिद्ध झाला तेव्हां **पृथ्विराज राठोडाची** बहीण अरण्यांतील पडतील ते हाल सोसावयास तयार होऊन महाराण्याची सून व्हावयास सांपडावें म्हणून अरवलीच्या अरण्यांत आली होती, परंतु **ती दिल्लीसारख्या शहरांत राहणारी म्हणूनच केवळ राण्यानें तिच्या म्हणण्यास संमती दिली नाहीं.**

या गोष्टी वरवर पहातांच सध्यांच्या परिस्थितींत चमत्कारिक दिसतात, पण त्या आज आपणास दिसतात यावरून त्यांची योग्यता ठरविणें केव्हांहि समंजसपणाचें होणार नाहीं. मानसिंगाचा ज्यांना स्पर्शसुद्धां झाला नव्हता अशी भांडींकुंडीसुद्धां शुद्ध करून घेण्यांतच धर्म आहे, असें समजण्याइतका राणा कांहीं खुळा नव्हता. परंतु आपल्या मुली बाळी देखील यवनांस देण्याइतके दुसऱ्या टोंकाला गेलेले

लोक मागें आणण्यासाठीं राण्यानें हें एक टोंक गांठून बहकलेल्या लोकांना मागें ओढिलें. अशा प्रकारें यवन संसर्गानें लोकांचा धर्माभिमान लयाला चालला असतां, राण्यानें आपल्या जाज्वल्य धर्माभिमानाचा बांध घालून स्वधर्माची अमोलिक सेवा केली !

## स्वार्थत्याग

हा सद्‌गुण असा आहे कीं, तो मनुष्याचे अंगीं ज्या प्रमाणांत असेल त्या प्रमाणानें मनुष्याची लोकोपयोगाची योग्यता कमी जास्त होते. लोकसंग्रह करण्याची इच्छा असणाऱ्या मनुष्याजवळ जर हा गुण नसेल तर त्याच्या इतर कोणत्याही गुणांचा उपयोग नसतो. राणाजीच्या अंगीं हा गुण परमोच्च कोटीचा होता. मायदेशाच्या आणि स्वधर्माच्या चरणीं त्यानें आपलें तन मन धन संपूर्णत्वानें अर्पण केलें होतें. शेवटीं त्यानें त्यासाठीं आपले पंचप्राणहि अर्पण करून स्वार्थत्यागी लोकांच्या अति वरच्या रांगेंत आपला प्रवेश करून घेतला. त्याच्या दृष्टीनें पाहतां त्यानें या सन्मानाचाहि सर्वस्वी त्याग केलेला होता. पवित्रकार्यासाठीं राणाजीनें केलेला त्याग इतरत्र पहावयास मिळणें कठीण आहे !

## सत्यनिष्ठा

राणाजी इतका सत्यनिष्ठ होता कीं, खरोखरीच त्याच्या त्या गुणानें कोणालाहि दाशरथी रामचंद्राचीच आठवण झाल्यावांचून रहात नाहीं. त्याची आपलें वचन सत्य करण्याविषयींहि आटोकाट दक्षता असे. त्यामुळें त्यानें लोकांचा फारच विश्वास संपादिला होता. प्रतिज्ञा परिपालनाविषयींची त्याची करारीवृत्ति तर अलौकिक होती.

## चिकाटी व सततोद्योग

मान तुटली तरी चावा सोडावयाचा नाहीं. अशापैकीं राणा-

जीची चिकाटी होती. त्याचा दीर्घोद्योग म्हणजे दीर्घोद्योगाचें एक आदर्श उदाहरणच होतें. वर्षांमागून वर्षे लोटलीं तरी राणाजी, अमृत प्राप्तीकरितां समुद्रमंथन करणाऱ्या देवांप्रमाणें आपल्या उद्योगापासून ढळला नाहीं. इ. स. १५७२ सांत तो मेवाडचा महाराणा झाल्यापासून इ. स. १५८६ मध्यें मेवाडांतून मुसलमानांस हांकलून देईपर्यंत राणाजीला धड झोंपसुद्धां मिळाली नाहीं. पुढें इ. स. १५९७ सांत त्याचें देहावसान होईपर्यंत त्याचे प्रतिज्ञापूर्तीचे प्रयत्न अखंड चालूच होते.

## बुद्धिमत्ता व राजनीति

राणाजीच्या पूर्वजांचें चरित्र पाहूं जातां रजपूत शूर खरे, परंतु त्यांच्यांतील आदरातिथ्य, त्यांचें औदार्य, स्वशत्रूशीं वागण्याचें उदात्त वर्तन इत्यादि सद्गुण कित्येकवेळां अतिरेकाला पोंचलें होते, असें दिसून येईल. परंतु राणाजीनें हा प्रकार ओळखून त्याला आपल्या कुशाग्रबुद्धीनें योग्य चलन दिलें. आपला शत्रू महा कपटी आहे हें ओळखून त्यानें आपलीं राजनीति बदलिली, आणि ' **व्रजन्तितेमूढधियः पराभवं भवन्ति मायाविषु ये न मायिनः**' हें सनातन तत्त्वडोळ्यापुढें ठेवून गनिमी काव्याचा अंगिकार केला. छत्रपति शिवाजीमहाराजांच्या गनिमी काव्याचे भारतीयांच्या पडत्याकाळांतील आद्यप्रवर्तक राणाजीच होत, असें म्हणावयास हरकत नाहीं.

## स्वातंत्र्येच्छा.

राणाजीला जर कशाची अत्यंत आवड असेल तर ती स्वातंत्र्याची होती ! त्याचे सर्व प्रयत्न आपला देश आणि आपला धर्म यवनांच्या छळांतून मुक्त व्हावा, एवढ्यासाठींच होतें ! स्वातंत्र्यासाठीं घरादारावर तुळशीपत्र ठेवून त्यानें सर्व सुखांवर पाणी सोडिलें

 ५२६०

होतें ! जगांतील सर्व मोहक विषयांवर लाथ मारून देवाधर्मासाठीं आणि स्वातंत्र्य लक्ष्मीची आराधना करण्यासाठीं तो महाभाग, गोसावी बनून गेला होता ! तो स्वातंत्र्यासाठींच जन्माला आला, स्वातंत्र्यासाठींच जगला आणि स्वातंत्र्यासाठींच मरून शेवटीं स्वतंत्रपणें अमर झाला ! ! स्वातंत्र्य हेंच त्याच्या जीवनाचें सार आहे ! स्वातंत्र हीच त्या महापुरुषाची राष्ट्राला शिकवण आहे ! आणि स्वातंत्र्य हीच त्या नरोत्तमाच्या ऋणांतून मुक्त होण्याची एक-मेव स्थिति आहे !

हे स्वातंत्र्यसूर्या तुला वंदन असो ! झालापतिप्रभृति राणाजीच्या संवगड्यानों तुम्हांला वंदन असो ! पवित्र रजपुतवंशदेवते तुला वंदन असो ! राणाजीची महाराणी आणि त्याच्या कच्यावच्यांनों, तुम्हांला वंदन असो ! मेवाडमाते तुला वंदन असो ! आर्यदेशा तुला वंदन असो ! स्वातंत्र्यलक्ष्मी, तुला वंदन असो, भगवान् एक-लिंगजी तुला वंदन असो ! राणाजी, तुझ्या चरित्राचें वाचन मनन आणि चिंतन करीत जो काळ गेला त्याकाळाचें सार्थक झालें ! सगळा जन्मच्याजन्म क्षणोक्षणीं ग्रंथ भरभरून जातील असा पराक्रम करणाऱ्या वीरा, माझ्या तुटपुंज्या ज्ञानानें आणि मोडक्या तोडक्या लेखणीनें ही जी तुझी वेडीवांकडी वाङ्मय सेवा झाली आहे, ती तुझी तुलाच अर्पण असो ! ! राणाजी त्या पुण्य लोकांतील स्वातंत्र्या पुढें जरी या मृत्युलोकींच्या सर्व गोष्टी तुच्छ असल्या तरी आपल्या आर्यदेशाला अगदींच विसरून जाऊं नका ! हीच तुमच्या चरण-कमलीं शेवटची प्रार्थना ! ! !

॥ ॐ तत्सत् ॥

येत्या कार्तिकी एकादशीस

छापत आहे! प्रसिद्ध होईल!

## चैतन्य ग्रंथमाला

पुष्प २ रें

# श्रीमदाद्यशंकराचार्य

REFBK-0005269

लेखक—महादेवशास्त्री जोशी, संपादक 'चैतन्य'

आचार्यांचें हें चरित्र अत्यंत सोप्या, रसाळ आणि लालित्यपूर्ण भाषेंत लिहिलें आहे. एकदां पुस्तक वाचूं लागलें म्हणजे संपेपर्यंत तें खालीं ठेवावेसें वाटत नाहीं, इतकें तें चटकदार झालें आहे. पृष्ठसंख्येच्या मानानें किंमत अल्प ठेवण्यांत येईल.

नांवें नोंदविण्याची त्वरा करा.

पत्ता—चैतन्य कचेरी..........९५९ सदाशिव पेठ, पुणें.

# चैतन्य मुद्रणालय

यांत सर्व छपाईचीं कामें योग्य मुदतींत, स्वस्तांत, आकर्षक, सुंदर आणि मोहक करून दिली जातात.

पत्ता—चैतन्य मुद्रणालय, सदाशिव पेठ,
पोस्टाजवळ ( घ. नं. ९५९ ) पुणें.